# गेश देवस्थान

## समग्र इतिहास

विनायक नारायण शेणवी धुमे


१९५९
म. ग्रं. सं. ठाणे
य भू. प्रवास
क्र. ५३७





EFBK-0018378

मुखपृष्ठ व आंतील रंगीत छायाचित्र :
श्री० विलास भेंडे यांच्या सौजन्यानें

मूल्य : रु. ८.००

७८६१६
संदर्भ
~~वृत्तान्त~~
भू-प्रवास

१८३७८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ७८६१६ वि: भू-प्रवास
क्रमांक ५३७ नों: दि: ३१-२-८२

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

२५।३।७८

# श्रीमंगेश देवस्थान
# समग्र इतिहास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# श्रीमंगेश देवस्थान

## समग्र इतिहास

लेखक

विनायक नारायण शेणवी धुमे

ठाणे
१८३५८
REFBK-0018378

© १९७१ तिमाजी शेणवी काकोडकार

प्रथम प्रकाशन
आश्विन शु॥ १०, शके १८९३
विजयादशमी, २९ सप्टेंबर, १९७१

मूल्य ८-०० रुपये

मुद्रक :
चिंतामण वामन जोशी
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग

प्रकाशक :
तिमाजी शेणवी काकोडकार
फातोर्डा, मडगांव
गोवा

૫૮૬૧૬ શ્રી. પ્રકાશ
૪૩૫ ૩૧-૩-૮૨



श्रीमांगिरीश चरणीं
सादर समर्पण

# श्रीमांगीश आराधना

मांगीश नामकं देवं यस्तूच्चरति मानवः ।
गन्धैर्धुपैश्च नैवेद्येर्वस्त्रैश्च विविधैस्तथा ॥
कोमलैर्बिल्वपत्रैश्च पुष्पैर्नाना विधैरपि ।
शुद्धाक्षतैश्चाभिषिक्तैर्विविधैः स्तवनैरपि ॥
साष्टांगैश्च नमस्कारैस्तथा प्रार्थनया मुने ।
एवं संपूजितो भक्तया भगवान् शंकरस्तदा ॥
तुष्टो महेश्वरस्तस्य पुत्रपौत्रान् प्रदास्यति ।
अंते तस्य पदं स्मृत्वा सगच्छेच्छाश्वतं पदं ॥

(**श्रीमांगिरीश महात्म्य,** अध्याय ५, ओंव्या ३३-३४-३५-३६)


कोमल नारळ तोयें करून । नित्य अभिषेकी हर भगवान ॥
त्याचे त्रिविध ताप दहन । कृपेनें करील शंकर ॥

(श्रीसुबानंत कविकृत **श्रीमांगिश माहात्म्य,** अध्याय ५, ओंवी ६७)


**श्रीशिवाराधनेचें फल :**

श्रीशिवावर अभिषेक केला असतां पापसंहार होतो. पूजेनें साम्राज्य प्राप्त होतें. गंधाक्ष मालांनीं सौभाग्य वाढतें. धूप जाळिल्यानें अंग सुवासिक होतें. दीप लाविल्यानें वंशवृद्धि होते. आयुष्य व कांति हीं त्यामुळें वाढतात. नैवेद्यानें भाग्य आणि संपत्ती मिळते. तांबुलानें चारी पुरुषार्थ साधतात. नमस्कारानें आरोग्य येतें. प्रदक्षिणेनें भ्रम नाश पावतो. ध्यानानें महाज्ञान प्राप्त होतें. जपानें महासिद्धी होते. होमहवनानें द्रव्याची वृद्धि होते. श्रवणानें आधि-व्याधि नाश पावतात. नृत्यानें जन्ममरण मुक्तता येते.

(**श्रीशिवलीलामृत,** अध्याय ६, सिमंतिनीआख्यान, ओंव्या ४८ ते ५३)



श्रीमंगेश लिंग



श्रीकैवल्य मठाधीश श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामीमहाराज
(श्री मंगेशास अभिषेक करण्यासाठीं बसलेले असतांना)

# श्रीकैवल्य मठाधीशांचा आशीर्वाद

॥ श्री ॥

अङ्क १६२ शके १८९३

दिनांक १-६-१९७१

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य पदवाक्यप्रमाणपारावार-पारीण यमनियमासन प्राणायाम प्रत्याहार ध्यानधारणा-समाध्यष्टांग योगानुष्ठानगरिष्ठानिष्ठानादिगुरुपरम्पराप्राप्त निगमागमसार श्रुतिमार्गप्रकाशक सर्वतन्त्र स्वतन्त्र श्रीमज्जमदग्नितनुज तपस्स्वाध्यायाद्यर्थ विनिर्मित शूर्पारक महाक्षेत्र गोमन्ताचल गोमतीतीरसन्निहित कुशस्थलीनगर महामठादिप्रतिष्ठापनाचार्य सकलसुरमुकुटमणिनीराजित दिव्यश्रीभवानीशङ्करपादारविन्दाराधक श्रीमदात्मानन्द-सरस्वतीकरकमलसंजात श्रीमत्पूर्णानन्दसरस्वत्यनुगृहीत श्रीमत्सच्चिदानन्दसरस्वती श्रीपादै :

अस्मदत्यन्तप्रेमास्पदीभूत श्रीमदुमारमणचरणारविन्द भक्तिपरायण शिष्यवर्य श्रियाविराजित राजमान्य राजश्री विनायक नारायण शेणवी धुमे कुंभारजुवें निवासिषु कृत-नारायणस्मरणपूर्विकाशिषः समुल्लसन्त्वद्य शके १८९३ विरोधकृत नाम संवत्सरे ज्येष्ठ शु ॥ ८ मी, भौमवासरावधि कवळे ग्रामे कुशलिनः स्मः भवदीयानामनामयत्वमनुदिन-मेधमानमाशास्महे ॥ विशेषस्तु :—

प्रस्तुत आज्ञापत्रास कारण आपलें दि. ३१–५–७१ चें विनंती पत्र मिळालें. आपण निःस्वार्थी बुद्धीनें परिश्रमपूर्वक श्रीमंगेश देवस्थानचा इतिहास लिहिला आहे, हें समजून समाधान वाटलें. इतिहास या शब्दांत 'इति, ह, आस' असे तीन शब्द आहेत. याचा अर्थ 'याप्रमाणें निश्चित होतें' असा होतो. आपल्या पुस्तकांत दिलेल्या संदर्भावरून आपण त्याबद्दल फार श्रम घेतल्याचें दिसत आहे. आपला तो व्यवसाय नसतांना सुद्धां चिकाटीनें व सत्य उजेडांत आणण्याच्या हेतूनें जें कांहीं लिहिलें आहे, तें पाहून कौतुक वाटलें. श्रीमंगेशभक्तांस याचा खात्रीनें उपयोग होईल. आपल्या हातून झालेल्या या श्रीमंगेश सेवेनें आपणांस व आपले कुटुंबियांस दीर्घायुरारोग्य लाभून सर्वांचें निरंतर कल्याण व्हावें, यद्विषयीं श्रीसंस्थानाराध्यदैवत श्रीभवानीशंकर चरणीं प्रार्थना करून गंधप्रसाद दिला आहे. तसेंच श्रीसंस्थान देवतेचेही शुभाशीर्वाद आहेत.

सुज्ञेषु किंबहुना लेखनेन.

**इति नारायण स्मरणम्**

# निवेदन

श्रीमंगेश देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटींत कमाविसदारच्या ( सेक्रेटरी ) पदावर मी तीन वर्षें ( ६ एप्रिल १९६८ ते ३ एप्रिल १९७१ पर्यंत ) होतों. या काळांत देवस्थानांत येणारी महाजनमंडळी, भाविकजन तसेंच इतर असंख्य पर्यटकांकडून श्रीमंगेश देवस्थानच्या एखाद्या इतिहासाच्या पुस्तकाच्या उपलब्धते-विषयीं वारंवार विचारणा होत असे; आणि असें इतिहासाचें पुस्तक उपलब्ध नसल्याचें सांगतांना फार खेद वाटे. असें एखादें पुस्तक कसें तयार करवून घेतां येईल या विवंचनेंत असतांनाच श्री. एफ्. बाबुराव आगशीकर यांच्या 'अर्चना' च्या दिवाळी अंकांत श्री. विनायक शेणवी धुमे यांचा श्रीमंगेश देवस्थानसंबंधीं लिहिलेला एक अभ्यासपूर्ण लेख वाचावयास मिळाला. विशेष चौकशीअंतीं, श्री. धुमे यांनीं श्रीमंगेश देवस्थानाविषयीं साद्यंत माहिती गोळा केलेली असून ती पुस्तकरुपानें प्रकाशित करण्याचा त्यांचा मनोदय असल्याचें समजलें. लगेच श्री. धुमे यांच्याशीं संपर्क साधून असें पुस्तक शक्यतों लवकर प्रसिद्ध व्हावें व त्यांची तयारी असल्यास त्यांनीं गोळा केलेली माहिती पुस्तक-रुपानें प्रसिद्ध करण्याची मी माझी इच्छाहि दर्शविली. अर्थात श्री. धुमेहि श्रीमंगेश देवावरील त्यांचें उत्कट प्रेम नि अपार श्रद्धा यामुळें या गोष्टीस लगेच तयार झाले नि हस्तलिखिताचें संपूर्ण बाडच त्यांनीं माझ्या स्वाधीन केलें.

जरा उशिरां कां होईना, ही माहिती पुस्तक रुपानें प्रकाशित करतांना मला अतिशय आनंद होत आहे. अर्थात हें काम सरळसुलभ नव्हतें. अडचणी पुष्कळ होत्या. आर्थिक अडचण तर होतीच. पण या बाबतींत आमच्या कमिटीं-तील माझे सहकारी, कमिटीचे अखत्यार (प्रोकुरादोर) व माझे परमस्नेही श्री. विष्णु शेणवी प्रियोळकार यांनीं ही अडचण निवारण्यास मदत केली. त्यांचे आभार मानण्यास माझ्यापाशीं पुरेसे शब्द नाहींत.

प्रस्तुत आज्ञापत्रास कारण आपलें दि. ३१–५–७१ चें विनंती पत्र मिळालें. आपण निःस्वार्थी बुद्धीनें परिश्रमपूर्वक श्रीमंगेश देवस्थानचा इतिहास लिहिला आहे, हें समजून समाधान वाटलें. इतिहास या शब्दांत ' इति, ह, आस ' असे तीन शब्द आहेत. याचा अर्थ ' याप्रमाणें निश्चित होतें ' असा होतो. आपल्या पुस्तकांत दिलेल्या संदर्भावरून आपण त्याबद्दल फार श्रम घेतल्याचें दिसत आहे. आपला तो व्यवसाय नसतांना सुद्धां चिकाटीनें व सत्य उजेडांत आणण्याच्या हेतूनें जें कांहीं लिहिलें आहे, तें पाहून कौतुक वाटलें. श्रीमंगेशभक्तांस याचा खात्रीनें उपयोग होईल. आपल्या हातून झालेल्या या श्रीमंगेश सेवेनें आपणांस व आपले कुटुंबियांस दीर्घायुरारोग्य लाभून सर्वांचें निरंतर कल्याण व्हावें, यद्विषयीं श्रीसंस्थानाराध्यदैवत श्रीभवानीशंकर चरणीं प्रार्थना करून गंधप्रसाद दिला आहे. तसेंच श्रीसंस्थान देवतेचेही शुभाशीर्वाद आहेत.

सुज्ञेषु किंबहुना लेखनेन.

**इति नारायण स्मरणम्**

पुस्तक छपाईच्या बाबतींत मला माझ्या अनेक मित्रांचें सहाय्य झालें. जयंत आर्ट प्रिंटरी (मुंबई) चे श्री. सदाशिव निळकंठ तेलंग यांनीं स्वखुषीनें पुस्तकांतील चित्रें छापून दिलीं व पुस्तक बांधणी करून दिली. त्यांचा मी फार ऋणी आहे.

मुंबईचे श्री. विलास भेंडे यांनीं मुखपृष्ठासाठीं रंगीत छायाचित्र दिलें, तर श्री. एम्. जे. संजगिरी यांनीं आपल्या संग्रहींचीं कांहीं छायाचित्रें दिलीं. 'अर्चना' कार श्री. एफ्. बाबुराव आगशीकर यांनीं आपल्या जवळील कांहीं ठसे दिले; शिवाय छपाईच्या कामींही त्यांचें बहुमोल मार्गदर्शन झालें.

मोहन मुद्रणालय (मुंबई) चे श्री. कृष्णा करवार यांनीं छपाईच्या कामीं पुष्कळ सहाय्य केलें. त्याचप्रमाणें माधव प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. चिंतामणराव जोशी यांनीं सुबक छपाई करून दिली. त्यांचे, त्यांच्या कामगार वर्गाचे नि ज्यांनी ज्यांनी आम्हांला सहाय्य करण्याची तत्परता दर्शविली त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतों.

या पुस्तकांत कांहीं त्रुटी राहून गेल्या असल्यास त्या केवळ अपरिहार्यतेमुळें. संधि मिळाल्यास पुढील आवृत्तींत त्यांत जरूर सुधारणा होईल असें आश्वासन देतों.

शेवटीं एक सर्वांत महत्त्वाची गोष्ट सांगावीशी वाटते ती ही कीं, हें पुस्तक प्रकाशित करण्यामागें कसलाच व्यावहारिक दृष्टीकोण नसून, देवस्थानविषयीं यथायोग्य माहिती इच्छुक भाविकांस मिळावी नि त्याचबरोबर पुस्तक प्रकाशनाचा खर्च वजा जातां जी कांहीं रक्कम जमा होईल ती देवस्थानच्या भांडारीं जमा व्हावी अशी इच्छा आहे. याच भावनेनें वाचकवर्ग माझ्या या अल्पसेवेकडे पहातील अशी आशा बाळगतों.

फातोर्डा
मडगांव—गोवा
दि. २९, सप्टेंबर, १९७१

**तिमाजो शेणवी काकोडकार**

# लेखकाचें हृद्गत

गोमंतकांतील श्रीमंगेश देवस्थान फार सुप्रसिद्ध आहे. या देवस्थानची सुकीर्ति भारतांतच नव्हे, तर भारताबाहेर युरोप, आफ्रिका, अमेरिका याही खंडांत असल्याचें प्रत्ययास आलें आहे. साऱ्या जगांतील नामांकित पुरुष मग ते राजकीय पेशांतील असोत किंवा ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक इत्यादि विषयांचे अभ्यासू किंवा संशोधक असोत, ज्या ज्या वेळीं गोव्यांत येतात, त्या त्या वेळीं प्रामुख्यानें त्यांच्या कार्यक्रमांत श्रीमंगेश देवालयास भेट हें ठरलेलेंच. ही सत्य परिस्थिति जगजाहीर आहे. हें एकच कारण या देवस्थानचें ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक व निसर्गरम्य सृष्टीसौंदर्याच्या बाबतींत महत्त्व पटविण्यास पुरेसें आहे.

श्रीमंगेश दैवत गौड सारस्वत वत्स व कौंडिण्य गोत्रीय ब्राह्मणांचें कुलदैवत असून या सारस्वत ब्राह्मणांची वस्ती पुरातन कालापासून गोमंतकांत होती व आहे. तसेंच या सारस्वत ब्राह्मणांचीं अनेक कुटुंबें आज गोमंतकाबाहेर महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांतच नव्हे, तर सबंध भारतांत ठिकठिकाणीं त्यांच्या कांहीं वसाहतीच आहेत. तथापि त्या सर्वांना ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक प्रेमपाशांनीं एकत्र आणणाऱ्या त्यांच्या श्रीमंगेश कुलदैवताचा आणि गोमंतक ही आपली मातृ-पितृभूमी आहे या गोष्टींचा त्यांना कधींच विसर पडलेला नाहीं.

प्रतिवर्षी गोमंतकांत श्रीमंगेश कुलदेवाचें दर्शन घेण्यासाठीं मुद्दाम येऊन परत आपल्या मुक्कामीं जाणारे जसे लोक आहेत त्याचप्रमाणें देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीकडे पत्रव्यवहार करून दरसाल अभिषेक, नैवेद्य, लघुरुद्र, महारुद्र, रंगपूजा, देवकार्य, ब्राह्मण-सुवासिनी, तसेंच श्रीमुलकेश्वर देवाप्रित्यर्थ एक गावडा वाढणें वगैरे देवकृत्यें करवून श्रीमंगेश देवाचा प्रसाद-कौल गागवि-

णारे देवस्थानचे महाजन कुळावी कांहीं थोडे थोडके नसून असंख्य आहेत. या कुळावी महाजनांची नितांत श्रद्धा व दृढ विश्वास आपल्या कुलदेव श्रीमंगेशावर अढळपणें असला, तरीही या आपल्या देवस्थानची अत्यावश्यक माहिती असणारे इसम सध्यांच्या पिढींत तरी थोडेच सांपडतील. म्हणून श्रीमंगेश देवस्थानच्या महाजन कुळावी इसमांस मुख्यत्वेंकरून आपल्या देवस्थानबद्दल ऐतिहासिक माहिती तसेंच सोळाव्या शतकांत पोर्तुगीज फिरंगी धर्मवेड्या लोकांनी जो हिंदु धर्मीयांवर जुलूम चालविला व तो जुलूम असह्य, अनावर झाल्यामुळें सासष्टी प्रांतांतील कित्येक देवालयांच्या महाजनांनीं आपआपल्या देवाचा प्रसाद-कौल घेऊन त्या त्या देवालयांतील मूर्तीचें शेजारच्या आदिलखानाच्या प्रदेशांत जें स्थलांतर केलें, त्यांत श्रीमंगेश शिवलिंगाचें स्थलांतर सासष्टी प्रांतांतील कुश-स्थली ( कुठ्ठाळ किंवा कुडथाळ ) या गांवांतून शेजारच्या मुलुखांत म्हणजे अदिलखानाच्या राज्यांत, आजच्या फोंडा तालुक्यांतील प्रियोळ गांवांत, मंगेशी वाड्यावर निश्चितपणें कोणत्या परिस्थितींत, कोणत्या सालीं झालें असावें, याबद्दल त्या काळच्या ऐतिहासिक व सरकारी दप्तरांतील पुराव्यांचे आधारें विशेषें करून ज्या जेजुइट पाद्री लोकांच्या मंडळीनें हा धर्मछळ चालविला होता, त्यांच्याच दैनंदिन कृत्यांची नोंद ज्या त्यांच्या तद्विषयक इतिहासांत पत्रें, रिपोर्ट इत्यादि जमा केलेली पोर्तुगालांत इ. स. १७१० मध्यें सरकारी छापखान्यांत छापली गेली; त्या सर्वांच्या आधारें ही माहिती अस्सल कागदपत्रावरून मिळवून शक्य तेवढी जास्त माहिती उजेडांत यावी, तसेंच इतिहासकालांत स्थलांतरा-पूर्वी श्रीमंगेश देवालय कुशस्थली गांवांत कोणत्या जागीं होतें, त्या जागीं आज काय आहे, त्या काळीं देवालयाच्या मालकी हक्काच्या कुठें कोणत्या शेती, बागायती, कुळागरें होतीं, त्यांचीं नांवें, गांवें कोणतीं, तीं आज कोणाच्या भोगवटयांत आहेत व तीं तशीं कां आहेत, तसेंच स्थलांतरानंतर या देवस्थानास आजतागायत कोणकोणत्या शेती, बागायती, कुळागरें मालकी हक्कानें मिळालीं, कोणीं अर्पण केलीं किंवा देवस्थाननें विकत घेतलीं, त्यांचे नामनिर्देश; देवस्था-नचे स्थलांतरापूर्वीचे कुळावी महाजन कोण, त्यांचीं उपनांवें कोणतीं, त्यांची बाटाबाटीनंतर नांवें-उपनांवें कशीं बदललीं, आजच्या कालांत देवस्थानचे दैनं-दिन कार्यक्रम, देवस्थानच्या कारभार व इतर व्यवस्था विषयक नियमावली, वगैरे अनेक महत्वपूर्ण विषयांची माहिती आमच्या एकंदर महाजनांस जास्तींत जास्त मिळावी हाच एकमेव उद्देश हें पुस्तक लिहिण्यामागील आहे.

आजपर्यंत श्रीमंगेश देवस्थानचा इतिहास अनेक विद्वान व अभ्यासू लेखकांनीं लिहून प्रसिद्ध केलेला आहे हें जरी खरें असलें, तरी या पुस्तकांत साधार पुराव्यांसह जी माहिती दिलेली आहे, ती माहिती आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत बहुतांशीं तरी वाचवयास मिळणारी नाहीं. शिवाय, देवस्थानच्या अनेक महत्त्वांच्या विषयांवर जी नवीन माहिती या पुस्तकांत दिली आहे, त्या विषयांवर ही माहिती यापूर्वी कुठेंच वाचावयास मिळण्याची शक्यताही नव्हती; याची प्रचीति या पुस्तकांतील सर्व प्रकरणें वाचल्यानंतर वाचकांच्या ध्यानांत येण्यास उशीर लागणार नाहीं.

श्रीमंगेश देवस्थानचा संक्षिप्त इतिहास प्रथमतःच लिहिण्याचें श्रेय श्रीमंगेश देवस्थानचे एक महाजन कुळावी कैलासवासी श्रीपाद व्यंकटेश वागळे, मुक्काम म्हापसें–गोवा, यांस आहे. त्यांनीं तें पुस्तक शके १८२९ सालीं प्रसिद्ध केलें. श्री. वागळे यांनीं गोमंतकांतील श्रीनागेशमहारुद्र, श्रीमहालक्ष्मी, श्रीरामनाथ, श्रीम्हालसा व श्रीलक्ष्मीनृसिंह या देवस्थानांचा संक्षिप्त ( सचित्र ) इतिहासही सन १९१३ मध्यें प्रसिद्ध केलेला आहे. श्री. वागळे यांचें वास्तव्य ठिकाण गोमंतकांतील म्हापसें शहर होतें. पण त्यांनीं फोंडा महालांतील अनेक देवस्थानांबद्दल परिश्रमपूर्वक माहिती मिळवून तसा संक्षिप्त इतिहास अर्ध्या शतकापूर्वी प्रसिद्ध केला.

त्यानंतर गोमंतकांतील कैवल्यपूर येथील श्रीशांतादुर्गा संस्थानचा संक्षिप्त इतिहास ( श्रीमंगेश देवस्थान व पालवी दैवतांच्या उपयुक्त माहितीसह ) ( आवृत्ती दुसरी ) शके १८५६ सालीं श्रीशांतादुर्गा कवळें देवस्थानचे महाजन कुळावी कै. विष्णु रंगाजी शेळडेंकर आणि कै. मुकुंद सदाशिव शेळडेंकर यांनीं प्रसिद्ध केला. त्यानंतर ‘गोमंतकांतील श्रीशिव-पार्वती श्रीमंगेश–शांतादुर्गा’ या नांवाचें पौराणिक, ऐतिहासिक माहितीसह पुस्तक श्री. अनंत वासुदेव मराठे, वास्तव्य वेंगुर्लें, यांच्या संपादकत्वाखालीं सन १९६४ सालीं प्रसिद्ध झालें. या तीन पुस्तकांनंतर डिसेंबर १९६६ मध्यें ‘श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दिमहोत्सव ग्रंथ, शके १४८८ ते शके १८८८’ श्रीशांतादुर्गा सेवा समितीकडून कै. डॉ. पांडुरंग सखाराम शेणवी पिसुर्लेंकर यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध झाला. त्या पुस्तकांतही श्रीमंगेश देवस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन माहितीसह कांहीं लेख प्रसिद्ध झाले असून त्यांत महत्वपूर्ण विषयांवर माहिती दिलेली आहे. वरील चारही पुस्तकें वाचून, शिवाय ‘Roteiro dos Arquivos da India Portuguesa’ (Publicação do

Arquivo Histórico do Estado da India) Introdução e Notas por Panduronga S. S. Pissurlencar, Director do Arquivo Histórico do Estado da India,—1955, हें पुस्तक; शिवाय पोर्तुगालच्या राजधानी लिस्बन शहरांत, सरकारी छापखान्यांत इ. स. १९१० सालीं प्रसिद्ध झालेलें Oriente Conquistado A Jesú Christo pelos Padres de Companhia de Jesú de Provincia de Goa, Lisboa 1710, त्याचप्रमाणें इटालींतील रोम शहरांत प्रसिद्ध झालेलें Monumenta Histórica Societatis Iesú-Documenta Indica. Edit Ioseph Wicki S. I. 1962 हें जेजुइट सोसायटीच्या लोकांच्या इतिहासाचे ग्रंथ वाचल्यानंतर, तसेंच गोवा सरकारच्या पोर्तुगीज राजवटींतील ऐतिहासिक पुराव्यांचे दाखले व तत्संबंधीं पुस्तकें व त्याचबरोबर श्रीमंगेश देवस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन दप्तरांत जे दाखले, लिखाण उपलब्ध झालें, त्या सर्वांचे वाचन व अभ्यास करून जी माहिती मिळाली, त्या सर्व माहितीचा उपयोग करून हें पुस्तक लिहिलें आहे.

हें पुस्तक लिहिण्यास ज्यावेळीं आरंभ केला, त्यावेळीं वाटलें होतें कीं हें पुस्तक लिहिण्यास बरेच परिश्रम करावे लागणार हें खरें, पण ते परिश्रम शक्य तों लवकर करून हें काम लगेच तडीस नेतां येईल. पण जसजसें लिखाण करावयास प्रारंभ केला, तसतशी आरंभी वाटली तेवढी ही गोष्ट सोपी व सुलभ तर नव्हेच, पण बऱ्याच दीर्घ प्रयत्नांनीं तडीस जातें कीं काय, याबद्दल मन अधिर होऊं लागलें. याचें मुख्य कारण, असे विषय लिहिण्यासाठीं मिळालेलीं जीं सर्व साधनें शक्यतों सुलभपणें, एकीकडे व वेळेवर आपणास पाहिजेत त्यावेळीं तत्परतेनें मिळणें आवश्यक असतें. शिवाय अशा तऱ्हेचा विषय तितक्या सुबोध व सुलभ रितीनें वाचकांसमोर ठेवण्याचें सामर्थ्य व पात्रता जी असावी लागते, ती खासच या पुस्तक–लेखकास नाहीं हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे.

असें असतां लहान तोंडीं मोठा घांस कां घेतला, हा प्रश्न साहजिकपणें निघतोच. पण विषय फार अगत्याचा, लेखकाच्या हातून होणारी वेडीवांकडी सेवा कशीही जरी झाली, तरी ती सेवा करणाराचा सद्हेतु ओळखून आमची महाजन कुळावी मंडळी व वाचकवर्ग दयाळू अंतःकरणानें व उदार मनानें ही सेवा गोड मानून घेईल, या एकाच आशेनें हें धाडस करण्याचें मनांत आणून हें पुस्तक लिहिलें आहे. पण त्याचबरोबर स्पष्टपणें नमूद करणें जरुरीचें वाटतें कीं,

या पुस्तकांत जी सर्व माहिती दिली आहे, ती एकंदर ऐतिहासिक दाखले, पुरावे, सरकार दप्तरांतील माहिती यांवरच आधारलेली व शक्य तों जशाची तशी म्हणजे दाखल्यावर किंवा दप्तरांत तसेंच आतांपर्यंत विश्वसनीय म्हणून मानलेल्या प्राचीन ऐतिहासिक पुस्तकांत जशी आढळते तशाची तशी त्याच भाषेंत त्याच लिपींत नक्कल करून देण्याचा कसोशीनें प्रयत्न केला असून ती कोठून घेतली आहे त्याचा स्पष्ट उल्लेखही त्या त्या जागीं शक्यतों केला आहे. लेखकाच्या पात्रतेच्या दुर्बलतेपणामुळें असो, किंवा अत्यावश्यक साधनांच्या अभावीं असो, हें पुस्तक वाचकांच्या सर्व मनीषा पूर्ण होण्यासारखें वठणार नाहीं याची जाणीव लेखकास आहे. पण असेंही असतांना शक्य तेवढे सर्व खटाटोप करून दीर्घ परिश्रम करून जास्तींत जास्त माहिती मिळवून या पुस्तकांत संग्रहीत केली आहे.

श्रीमंगेश देवस्थानच्या महाजनांकडून इ. स. १९३७ सालीं झालेल्या निवडणुकींत देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटींत मुखत्यार (प्रोकुरादोर) म्हणून मला निवडून दिलें व पुन्हा इ. स. १९४० सालीं झालेल्या दुसऱ्या निवडणुकींत त्याच जागेवर मला निवडून दिलें. या (१९३८ ते १९४३) सहा वर्षांच्या काळांत श्रीमंगेश देवस्थानचें सर्व दप्तर व कागदपत्र व्यवस्थितपणें तपासून मांडणी करण्याची संधि मिळाली व त्यानें आवश्यक त्या सर्व माहितीचा संग्रह केला व तीच माहिती या पुस्तकांत महाजनांसमोर ठेवण्याचा योगायोग आला. शिवाय नंतरच्या काळांत जुन्या पोर्तुगीज राजवटींतील ऐतिहासिक ग्रंथ, तसेंच त्याच सरकारी दप्तरांतील दाखले पहाण्याची संधी मिळाली आणि त्यानंतर श्रीमंगेश देवस्थानच्या सध्यांच्या व्यवस्थापक कमिटीनें देवस्थानच्या जुन्या व आधुनिक दप्तरांतील सर्व प्रकारची माहिती देण्यांत जी तत्परता दाखविली, त्याबद्दल त्या व्यवस्थापक कमिटीचे आभार मानल्याशिवाय रहावत नाहीं.

खुद्द गोमंतकांतील आणि विशेषतः गोव्याबाहेर वास्तव्य करणाऱ्या महाजन मित्रांकडून, अनेक वेळां आग्रहाच्या सूचना आल्यामुळें त्या सर्वांच्या प्रेमादरासाठीं शक्य ते सर्व परिश्रम व झीज सोसून हें काम हातावेगळें केलें आहे. सन्माननीय महाजन कुळावी व उदार वाचक हंसक्षीर दृष्टीनें तें गोड मानून घेतील अशी आशा आहे.

या पुस्तकांत दिलेली माहिती वाचल्यानंतर त्यांत कांहीं दोष, उणिवा, चुका कोणाही अभ्यासू वाचकास आढळणें शक्य आहे. किंवा त्याबद्दल त्यांनीं

आणखीही उपयुक्त माहिती, सूचना कराव्याशा वाटल्यास त्या निःशंकपणें लेखकास कळविण्याची कृपा केल्यास फार आभार होतील व चुकीची दुरुस्ती यथावकाश या पुस्तक लेखकाकडून करवून घेण्याचें महान् श्रेय अनायासें लाभेल.

श्रीमंगेश प्रेरणेनेंच हा श्रीमंगेश देवस्थानचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास लिहिलेला आहे. त्यांत कांहीं नकळत अनवधानपणें चुका झाल्या असतील तर त्याबद्दल श्रीमंगेशचरणीं शिरसाष्टांग नमस्कार करून, क्षमेची याचना करून एवढीच प्रार्थना कीं, त्या दयाघन देवाधिदेव सर्वेश्वरानें सर्व महाजन कुळावी कुटुंबांचे सर्वतोपरि कल्याण करावें, श्रीमंगेशचरणीं उत्तरोत्तर दृढभक्ती वृद्धिंगत होऊं द्यावी, व श्रीमंगेश देवस्थानचा सर्वांगीण उत्कर्ष होण्याच्या कार्यांत झटण्याची प्रेरणा द्यावी.

सरते शेवटीं लिहिण्यास आनंद वाटतो कीं, श्रीकवळें मठाधिपती पूज्य गौडपादाचार्य श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचे शुभाशीर्वाद या पुस्तकास लाभले आहेत ही विशेष महत्वाची घटना आहे.

पुस्तक लिखाणाच्या कामांत सोसलेले दीर्घ परिश्रम व झीज यांची सार्थकता झाल्याचें समाधान श्रीगुरुस्वामी महाराजांनीं शुभाशीर्वादाचा दिलेला रायस वाचून मला झालें. ह्याबद्दल श्रींचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. श्रींच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास कोणतेही शब्द अपुरेच ठरतील.

कुंभारजुवें–गोवा
श्रावण शुक्ल॥ ४, शके १८९३
ता. २६ जुलै, १९७१

**विनायक नारायण शेणवीं धुमें**

# अनुक्रमणिका


श्रीमंगेश आराधना ५
श्रीकैवल्य मठाधीशांचा आशीर्वाद ७
निवेदन ११
लेखकाचें हृद्गत १३
१. पुण्य नगरीकडे.... २५
२. पौराणिक व ऐतिहासिक माहिती २६
३. कुशस्थलीहून स्थलांतर ३९
४. स्थलांतरपूर्व देवालयाची मालमत्ता ५६
५. प्रियोळला आगमन ७७
६. देवस्थानचे आद्यकालीन संस्थापक ८५
७. देवस्थानची स्थावर मालमत्ता ८९
८. कुशस्थलीकरांचीं पालवी देवस्थानें ११५
१०. श्रीमंगेश देवालयांतील प्रसाद-कौल १२०
११. वार्षिक अनुष्ठानें : त्यांचा पूर्वेतिहास १२६
१२. देवस्थानचे दैनंदिन कार्यक्रम १२९
१३. देवस्थानचें कारभारविषयक जुनें दप्तर १३२
१४. स्थलांतर काल व पूर्वप्रकाशित माहिती १३४
परिशिष्ट १. देवस्थानांत होणारे महत्त्वाचे उत्सव १५१
परिशिष्ट २. देवस्थान व्यवस्थेसंबंधी नियमावली १५८
परिशिष्ट ३. भाविकांसाठीं उपयुक्त माहिती १८४
देवस्थान जमिनींविषयक तक्ता १९३

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५८६१६ वि: ग्रं. ५वास
क्रमांक ५३५ नों: दि: ३१-३-८२

# छायाचित्रें

१. श्रीमंगेश–महापुजेनंतर
२. श्रीमंगेशलिंग
३. श्रीमत् सच्चिदानंदसरस्वती स्वामीमहाराज
४. देवालयांतील चौक
५. श्रीदेवशर्मा
६. श्रीगणपती
७. श्रीदेवी भगवती
८. श्रीदेवी सांतेरी
९. श्रीमुळकेश्वर
१०. श्रीलक्ष्मीनारायण
११. श्रीवीरभद्र
१२. श्रीकौंडिण्यपुरुष
१३. श्रीकाळभैरव
१४. श्रीमंगेश देवालय ( जुनें )
१५. श्रीमंगेश देवालय ( सांप्रतचें )
१६. चौघुडा-बुरूज
१७. देवालयाचा विहंगम देखावा
१८. विजयरथोत्सव
१९. हत्ती-अंबारी

२०. सांगड
२१. खांद्यावरील रथ
२२. पालखी
२३. लालखी
२४. तीन दारी पूजा
२५. पंचमूर्ती
२६. थोरला रथ
२७. दीपस्तंभ रोषणाई
२८. श्रीग्रामपुरुषाची प्रसादमूर्ति
२९. श्रीग्रामपुरुषाची प्रसादमूर्ति

# श्रीमंगेश देवस्थान
# समग्र इतिहास

५८६१६ क्र: प्रवास
४३७ ३१-३-८२

# १ | पुण्य नगरीकडे...

९८३७८

गोमंतकांत अति प्राचीन जीं अनेक हिंदु देवालयें व फार प्रेक्षणीय स्थळें आहेत, त्यांत श्रीमंगेश देवस्थान हें प्रमुख मानलें जातें. गोमंतकाची राजधानी पणजी शहर जिथें मुंबईहून येणारी आगबोट थांबते, त्या पणजी शहरापासून मडगांव या रेल्वे स्टेशनाकडे जाण्याचा जो डांबरी रस्ता आहे, त्या रस्त्यावरून नियमित प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेस धावतात. त्या प्रवासी बसेसमधून, पणजी ते श्रीमंगेश देवस्थानकडे सुमारें २१ मैल प्रवास केल्यास थेट श्रीमंगेश देवस्थानच्या मुख्य महाद्वाराजवळ उतरतां येतें. पणजी शहरांतून बसेस चालू झाल्याबरोबर वाटेंत क्रमशः रायबंदर, जुनें गोवें, भाणस्तारीचा पूल, भोम, कुंडई व नंतर लगेच श्रीमंगेश देवस्थान या अनुक्रमानें गांवें असून यापुढें तोच हमरस्ता म्हाडदोळ, फर्मागुडी, फोंडा, बोरीचा पूल, लोटली, राय, फातोर्डा व पुढें मडगांव शहर जिथें रेल्वे स्टेशन आहे तिथपर्यंत जातो. पणजी शहरापासून येतांना कुंडईकडे पोंचल्यानंतर पुढें थोडासा डोंगराळ प्रदेश ओलांडल्यावर श्रीमंगेश देवालयाचीं गगन चुंबित शिखरें, समोरचा उंच स्तंभ, सभोंवतालच्या प्रदेशांतील वनश्री, झुळझुळणारे संथ व गोड पाण्याचे स्वच्छ झरे, वन-पुष्पांचा मधुर सुवास, वनदेवीनें चोहोंबाजूंनीं पसरलेला तो आनंददायक व आल्हाद-कारक हिरवा गालिचा, रम्य झाडी, या सर्वांचें फार मनोरम सृष्टीसौंदर्य ज्यानें पाहिलें, त्याचे अंतःकरण उचंबळून येऊन जीवनाची पूर्तता झाल्याची एक आगळीच अनुभूति प्रत्ययास येते.

□ □ □

# २ | पौराणिक व ऐतिहासिक माहिती

हिंदुस्थानांतील बंगालच्या उत्तरेस भागीरथी नदीच्या तीरीं 'मानगिरी' अथवा 'मोंगिर' या नांवाचें मोठें क्षेत्र आहे व तेथील श्रीशिव दैवताचा तो 'श्रीमांगिरीश' या शब्दाचा अपभ्रंश 'मांगीश' आणि 'मंगेश' असा झाला आहे. असा उल्लेख सह्याद्रि खंडात ( स. खं. उ., अ. ३ ) पाहावयास मिळतो :

'....मांगिरीश पर्वतोनाम पूर्वे देशेत्रिहोत्रके ॥१॥
ब्राह्मणास्थापितं लिंगं पूर्वं तंत्र द्विजोत्तम ।
मांगीश नाम चैतस्य विख्यातं भुवनत्रये ॥२॥'

वेदकालीं उत्तर हिंदुस्थानांतून मध्य कोंकणांत व तेथें पुष्कळ काळ लोटल्यानंतर सारस्वत ब्राह्मणांची बरीच मोठी मंडळी दक्षिणेंत गोमंतकांत आली. सारस्वतांचे संघ गोमंतकात प्राचीनकाळीं अंतरा अंतरानें तीन चार वेळां आले असावें असें वाटतें. त्यांतील एका महत्वाच्या संघाची ही मंडळी दक्षिणेंत आल्यास साधारणपणें आज अकराशें वर्षांपेक्षा जास्त काल लोटला असावा, असा विद्वानांचा तर्क आहे. असे शके १८०७ सालीं प्रसिद्ध झालेल्या श्री. गुंजीकरकृत 'भ्रमनिरास' पुस्तकांत पृष्ठ ८२ वर उल्लेख आहे, त्यावरून दिसते. म्हणजे आज शके १८९३ असल्यामुळें त्या कालास आज ११८६ वर्षे लोटलीं असावी. ही सारस्वत मंडळी कनोज ( कान्यकुब्ज ) देशाहून निघून स्वकीय आप्तेष्टांसह दक्षिणेस श्रीरामेश्वराच्या दर्शनास यात्रेस गेली. या सारस्वत मंडळींत देवशर्मा हा औत्तरीय ब्राह्मण होता व त्याच्याबरोबर कौशिक गोत्री लोमशर्मा व कौंडिण्य गोत्री शिवशर्मा असे दोन नातेवाईक होते. लोमशर्मा हा मेहुणा आणि शिवशर्मा हा भाचा. देवशर्माप्रमाणेच तेही वेदशास्त्रसंपन्न व सच्चरित्र होते. यात्रा करून परत आपल्या कान्यकुब्ज देशास जात असतां, वाटेंत गोमंतकांत ही मंडळी आली. व इथें ह्या मंडळीस कांहीं साक्षात्कार झाल्यामुळें आपल्या देशास जाण्याचा बेत स्थगित करून ती मंडळी येथें गोमंतकांतच राहिली. आणि

गोमंतकांत 'यापूर्वी असलेल्या मूळ सारस्वत जमातींत मिसळून गेली. या मंडळींत जो देवशर्मा हा वत्स गोत्री ब्राह्मण होता, तो कुशस्थली ( आज या गांवास कुडथाळी किंवा कुट्ठाळ या नांवानें ओळखतात. ) येथें राहिला असें सह्याद्रि खंडांतील श्रीमंगीश महात्म्य, अध्याय ६, ओव्या १०–११–१२–१३ व ३० मध्यें वाचावयास मिळते.

श्रीपरशुरामानें त्रिहोत्रपुराहून जे दशगोत्री ( भारद्वाज, कौशिक, वत्स, कौंडिण्य, काश्यप, वासिष्ठ, जामदग्न, विश्वामित्र, गौत्तम व अत्रि ) ब्राह्मण आणले होते, त्यांची गोमंतक क्षेत्रांतच कायमची स्थापना करण्याचा मूळ संकेत असल्यामुळें त्या ब्राह्मणांनीं आपआपलीं कुलदैवतें बरोबर आणलीं. त्या ब्राह्मणांचीं सहासष्ट कुळें होतीं. त्यांत ज्यांना जो गांव अग्राहार मिळाला, तिथे त्या ब्राह्मणांनीं आपआपल्या कुलदैवतांची स्थापना केली. वत्स व कौंडिण्य या दोन गोत्रांच्या ज्या ब्राह्मणांस कुशस्थळी ( कुडथाळी किंवा कुठ्ठाळ ) हा गांव अग्राहार मिळाला त्यांचा कुलदेव श्रीमांगिरीश ( श्रीमंगेश ) या देवाची त्या ब्राह्मणांनीं स्थापना केली. व कौशिक गोत्री लोमशर्मा ब्राह्मणास कर्दलीपूर ( केळोशी ) हा गांव अग्राहार मिळाला. तेथें त्याची कुलदेवी श्रीशांतादुर्गा या दैवताची स्थापना केली. कुशस्थळी येथें हें दैवत श्रीमांगिरीश या नांवानें कसें उदयास आलें याबद्दल जो कथा भाग आहे त्याचा सारांश असा :—

भगवान् श्रीशंकरांनीं लीलेनें, श्रीजगदंबा पार्वतीदेवीस ती श्रीशंकराच्या दर्शनास उत्सुक होऊन शोधार्थ फिरत असतांना, या कुशस्थली क्षेत्रांत श्रीजगदंबेस मुद्दाम भिवविण्याच्या उद्देशानें एका वाघाचें स्वरूप धारण करून श्रीशंकर श्रीजगदंबेच्या सन्मुख अवतरले. ( श्रीमांगीश महात्म्य, अध्याय ५. ओवी १५ ) त्या भयानक वाघाच्या दर्शनानें भयभीत होऊन श्रीजगदंबामातेनें त्यावेळीं " मां गिरीश त्राहि " अशी किंकाळी फोडली. अशा भयभीत गांगरलेल्या अवस्थेंत ते सगळे शब्द तोंडावाटें स्पष्टपणें न निघतां " मांगिश " एवढाच बोबडा शब्दोच्चार झाला. पुढें भगवान् श्रीशंकरानीं आपल्या त्या भयानक व्याघ्ररूपाचा कायापालट करून श्रीजगदंबेस, तिनें तशी इच्छा प्रदर्शित केल्यामुळें आश्वासन दिलें कीं, तू भयभीत अवस्थेंत उच्चारलेल्या " मांगीश " नांवानेच मी इथें अवतरेन. व त्या वरदानाच्या पूर्तीसाठींच भगवान् श्रीशंकरांनीं कुशस्थलींत अवतरून एका लहानशा डोंगराळ खिंडींत हें शिवलिंग प्रगट केलें.

त्यासंबंधीं असा चमत्कार झाला कीं, पूर्वोक्त ब्राह्मणांपैकीं शिवशर्मा यांच्या

# २ | पौराणिक व ऐतिहासिक माहिती

हिंदुस्थानांतील बंगालच्या उत्तरेस भागीरथी नदीच्या तीरीं 'मानगिरी' अथवा 'मोंगिर' या नांवाचें मोठें क्षेत्र आहे व तेथील श्रीशिव दैवताचा तो 'श्रीमांगिरीश' या शब्दाचा अपभ्रंश 'मांगीश' आणि 'मंगेश' असा झाला आहे. असा उल्लेख सह्याद्रि खंडात (स. खं. उ., अ. ३) पाहावयास मिळतो :

> '....मांगिरीश पर्वतोनाम पूर्वं देशेत्रिहोत्रके ॥१॥
> ब्राह्मणास्थापितं लिंगं पूर्वं तंत्र द्विजोत्तम ।
> मांगीश नाम चैतस्य विख्यातं भुवनत्रये ॥२॥'

वेदकालीं उत्तर हिंदुस्थानांतून मध्य कोंकणांत व तेथें पुष्कळ काळ लोटल्यानंतर सारस्वत ब्राह्मणांची बरीच मोठी मंडळी दक्षिणेंत गोमंतकांत आली. सारस्वतांचे संघ गोमंतकात प्राचीनकाळीं अंतरा अंतरानें तीन चार वेळां आले असावें असें वाटतें. त्यांतील एका महत्वाच्या संघाची ही मंडळी दक्षिणेंत आल्यास साधारणपणें आज अकराशें वर्षांपेक्षा जास्त काल लोटला असावा, असा विद्वानांचा तर्क आहे. असे शके १८०७ सालीं प्रसिद्ध झालेल्या श्री. गुंजीकरकृत 'भ्रमनिरास' पुस्तकांत पृष्ट ८२ वर उल्लेख आहे, त्यावरून दिसते. म्हणजे आज शके १८९३ असल्यामुळें त्या कालास आज ११८६ वर्षे लोटलीं असावी. ही सारस्वत मंडळी कनोज (कान्यकुब्ज) देशाहून निघून स्वकीय आप्तेष्टांसह दक्षिणेस श्रीरामेश्वराच्या दर्शनास यात्रेस गेली. या सारस्वत मंडळींत देवशर्मा हा औत्तरीय ब्राह्मण होता व त्याच्याबरोबर कौशिक गोत्री लोमशर्मा व कौंडिण्य गोत्री शिवशर्मा असे दोन नातेवाईक होते. लोमशर्मा हा मेहुणा आणि शिवशर्मा हा भाचा. देवशर्माप्रमाणेच तेही वेदशास्त्रसंपन्न व सच्चरित्र होते. यात्रा करून परत आपल्या कान्यकुब्ज देशास जात असतां, वाटेंत गोमंतकांत ही मंडळी आली. व इथें ह्या मंडळीस कांहीं साक्षात्कार झाल्यामुळें आपल्या देशास जाण्याचा बेत स्थगित करून ती मंडळी येथें गोमंतकांतच राहिली. आणि

गोमंतकांत त्यापूर्वी असलेल्या मूळ सारस्वत जमातींत मिसळून गेली. या मंडळींत जो देवशर्मा हा वत्स गोत्री ब्राह्मण होता, तो कुशस्थली ( आज या गांवास कुडथाळी किंवा कुट्ठाळ या नांवानें ओळखतात. ) येथें राहिला असें सह्याद्रि खंडांतील श्रीमंगीश महात्म्य, अध्याय ६, ओव्या १०–११–१२–१३ व ३० मध्यें वाचावयास मिळते.

श्रीपरशुरामानें त्रिहोत्रपुराहून जे दशगोत्री ( भारद्वाज, कौशिक, वत्स, कौंडिण्य, काश्यप, वासिष्ठ, जामदग्न, विश्वामित्र, गौत्तम व अत्रि ) ब्राह्मण आणले होते, त्यांची गोमंतक क्षेत्रांतच कायमची स्थापना करण्याचा मूळ संकेत असल्यामुळें त्या ब्राह्मणांनीं आपआपलीं कुलदैवतें बरोबर आणलीं. त्या ब्राह्मणांचीं सहासष्ट कुळें होतीं. त्यांत ज्यांना जो गांव अग्राहार मिळाला, तिथे त्या ब्राह्मणांनीं आपआपल्या कुलदैवतांची स्थापना केली. वत्स व कौंडिण्य या दोन गोत्रांच्या ज्या ब्राह्मणांस कुशस्थळी ( कुडथाळी किंवा कुट्ठाळ ) हा गांव अग्राहार मिळाला त्यांचा कुलदेव श्रीमांगिरीश ( श्रीमंगेश ) या देवाची त्या ब्राह्मणांनीं स्थापना केली. व कौशिक गोत्री लोमशर्मा ब्राह्मणास कर्दलीपूर ( केळोशी ) हा गांव अग्राहार मिळाला. तेथें त्याची कुलदेवी श्रीशांतादुर्गा या दैवताची स्थापना केली. कुशस्थळी येथें हें दैवत श्रीमांगिरीश या नांवानें कसें उदयास आलें याबद्दल जो कथा भाग आहे त्याचा सारांश असा :—

भगवान् श्रीशंकरांनीं लीलेनें, श्रीजगदंबा पार्वतीदेवीस ती श्रीशंकराच्या दर्शनास उत्सुक होऊन शोधार्थ फिरत असतांना, या कुशस्थली क्षेत्रांत श्रीजगदंबेस मुद्दाम भिवविण्याच्या उद्देशानें एका वाघाचें स्वरूप धारण करून श्रीशंकर श्रीजगदंबेच्या सन्मुख अवतरले. ( श्रीमांगीश महात्म्य, अध्याय ५. ओवी १५ ) त्या भयानक वाघाच्या दर्शनानें भयभीत होऊन श्रीजगदंबामातेनें त्यावेळीं " मां गिरीश त्राहि " अशी किंकाळी फोडली. अशा भयभीत गांगरलेल्या अवस्थेंत ते सगळे शब्द तोंडावाटें स्पष्टपणें न निघतां " मांगिश " एवढाच बोबडा शब्दोच्चार झाला. पुढें भगवान् श्रीशंकरानीं आपल्या त्या भयानक व्याघ्ररूपाचा कायापालट करून श्रीजगदंबेस, तिनें तशी इच्छा प्रदर्शित केल्यामुळें आश्वासन दिलें कीं, तू भयभीत अवस्थेंत उच्चारलेल्या " मांगीश " नांवानेच मी इथें अवतरेन. व त्या वरदानाच्या पूर्तीसाठींच भगवान् श्रीशंकरांनीं कुशस्थलींत अवतरून एका लहानशा डोंगराळ खिंडींत हें शिवलिंग प्रगट केलें.

त्यासंबंधीं असा चमत्कार झाला कीं, पूर्वोक्त ब्राह्मणांपैकीं शिवशर्मा यांच्या

घरची दुभती गाय दररोज आपोआप स्वयंस्फूर्तीनें त्या शिवलिंगाच्या ठिकाणीं जाऊन आपल्या आचळांतील दुधानें स्वखुषीनें त्या शिवलिंगावर धार सोडीत असे! वासरूं जवळ नसतांना एकाएकी गाईला पान्हा फुटून तिनें एका ठराविक नेमक्याच दगडावर कांहींवेळ एकसारखी दुधाची धार सोडणें, हा प्रकार त्या गाईस राखणाऱ्या ब्राह्मणाच्या घरच्या गुराख्यास मोठा विलक्षण व आश्चर्यकारक वाटला. व त्या गुराख्यानें हा असा प्रकार सतत कांहीं दिवस पाहिल्यावर ही सत्य घटना आपल्या धन्याच्या म्हणजे शिवशर्मा ब्राह्मणाच्या अवलोकनास आणली. त्याच दिवसांत त्या ब्राह्मणाच्या स्वप्नांत दृष्टान्त देऊन, "तुझे भक्तीला वश होऊन मी माझें सान्निध्य या ठिकाणीं कल्पिलेलें आहे" असें भगवान् श्रीमांगिरीशरूप शंकरानीं सांगितलें व तो ब्राह्मण त्या दिवसापासून परम आनंदानें त्या शिवलिंगाच्या आराधनेस लागला. तेव्हांपासून हें दैवत 'श्रीमांगीश' या नांवानें प्रसिद्ध होऊन उदयास आलें. (श्रीसुवानंत कविकृत श्रीमांगिश महात्म्य, अध्याय ६, ओवी ५१ ते ६१)

गौडदेशांतून गोमंतकांत व कुशस्थलीस त्या ब्राह्मण कुळांबरोबर त्यावेळचे तद्देशीय शेतकीचे कामास पिढीजात अत्यंत वाकबगार असे 'गावडे' नांवाचे लोक आले असणें शक्य आहे. कारण, गावडे या नांवावरून ते मुळचे गौड देशाहून आले असावेत. महाराष्ट्रांतील लोक जसे मराठे या नांवानें ओळखण्याचा प्रघात, कोंकणांतील जसे कोंकणे म्हणून ओळखण्याचा प्रघात, तसे गौडांतील गौड व याचेच रूपांतर गोवडे–गावडे असें होणें असंभवनीय वाटत नाहीं. शिवाय, या गावडे जमातीचा वेष व आचरण, खाणें पिणें याकडे लक्ष दिलें असतां, त्यांच्या प्राचीन गौडत्वाबद्दल शंकाच दिसत नाहीं. हे लोक सुरापान, मांस यांस स्पर्शही करीत नाहींत. श्रीमंगेश देवाच्या परिवार देवतांपैकीं, श्रीमुळकेश्वर या नांवाचा देव आहे, तो पूर्वोक्त शिवशर्मा यांच्या घरचा गुराखी, ज्याच्यामुळें श्रीशिवलिंग श्रीमंगिशाची अभिव्यक्ति झालेली शिवशर्मा या ब्राह्मणास दिसली तो होय. तो गुराखी एतद्देशीय शुद्र नव्हता. तो सदर ब्राह्मणांबरोबर गौड देशाहून गोमंतकांत कुशस्थलींत आला असला पाहिजे. कारण, श्रीमंगेश देवस्थानांत आजच्या कालांतही गावडे जातीला बहुमान देण्याचा संप्रदाय चालू आहे. ही जमात ब्राह्मणेतरांच्या घरीं अन्न घेत नसते. यांस श्रीमंगेशाचे कुळावी लोक आपल्या घरीं कुलधर्म देवकार्य होईल त्या प्रत्येक वेळीं श्रीमंगेश देवाप्रित्यर्थ जशी ब्राह्मण पूजा करून ब्राह्मणास जेऊं घालतात म्हणजे

अन्नसंतर्पण करतात, तसेंच त्याबरोबरच श्री मुळकेश्वर देवाच्या प्रित्यर्थ व त्या उद्देशानें गावडा जातीच्या इसमास गंधफूल देऊन पूजा करून जेऊं घालतात व जेवण झाल्यानंतर त्यास डोक्यास खोबरेल तेल घालून नंतर एक तंबाखूची विडी अर्पण करतात. या सर्व अव्याहतपणें चालत आलेल्या रूढीचा विचार करतां ही गावडे जमात गौडदेशीय असून आपल्या पालक ब्राह्मण कुळांबरोबरच पूर्वकालीं गोमंतकांत आली असली पाहिजे असें अनुमान निघतें.

हें श्रीमांगीश दैवत गोमंतक वसविण्याच्या प्रसंगीं कुशस्थली (कुडशाळ किंवा कुड्डाळ) येथें स्थापन करण्यात आलें होतें तेव्हांपासून अघनाशिनीच्या तीरावर—जिला आज आगशीची नदी किंवा जुंवारी नदी म्हणून संबोधण्यांत येते—वसलेल्या या पुण्यक्षेत्राचें महात्म्य वाढत चाललें.

गोमंतकांतील वसाहतीच्या आरंभापासून तों हा प्रांत फिरंगी पोर्तुगीज अंमलाखालीं येईपर्यंत जो फार मोठा कालावधि लोटला, त्या कालांत हें देवस्थान फार मोठ्या वैभवांत नांदत आलें होतें. परंतु गोमंतकांत फिरंगी पोर्तुगीज लोकांनीं पाय ठेवल्यानंतर (ता. २७ फेब्रुआरी इ. स. १५१० रोजीं तिमोजी नामक चांच्याच्या मदतीनें आफोंस दे आल्बुकेर्क या पोर्तुगीज सेनापतीनें समुद्रमार्गे अकस्मात् छापा घालून गोवा शहर हस्तगत करून घेतलें व त्या दिवसापासून गोमंतकांतील आदिलशाही सत्तेस उतरती कळा लागली हें इतिहास सांगतो.) त्यांनीं जें ख्रिस्ती धर्मप्रसाराचें मोठें सत्र बळजबरीनें पेटविलें, व त्यांत गोवा बेटानंतर, सासष्टी प्रांतावरही अत्याचार, जुलूम, छळ व सर्वांची आहुति पडण्याच्या प्रसंगाचा प्रारंभ अनुभवास आला, व इतरांप्रमाणेंच सासष्टींत सर्वांआधीं कुशस्थलीकरांवर हा दुर्धर प्रसंग जलद येणें केवळ संभवनीय नव्हे तर खचितच तांतडीनेच ओढवणार हें जाणून कुशस्थलीकरांनीं प्राणाहून प्रिय असलेल्या आपल्या या कुलदैवताच्या श्रीमंगीश शिवलिंगास अचानकपणें, रातोरात, फिरंगी हद्दीबाहेर म्हणजे त्यावेळच्या आदिलशाही राज्यांत सौंदेकरांच्या मुलुखात, अंत्रुज प्रांतांतील प्रियोळ गांवांत एका वाड्यावर म्हणजे आज आपण ज्या वाड्यास 'मंगेशीचा मोकासा' म्हणून ओळखतो त्या वाड्यावर आणून ठेविलें. व पुढें या कुशस्थलीकरांची स्थिरस्थावर झाल्यावर त्यांनीं याच प्रियोळ गांवांत प्रस्तुतच्याच प्रशस्त व आल्हादकारक ठिकाणीं ह्या दैवताची स्थापना केली. श्रीमंगेश देवस्थानच्या पुरातन दप्तरांत खालीलप्रमाणें उल्लेख आढळतो :—

"श्रीमंगीश देवाचें आगमस्थान पूर्वी प्रांत साहासष्ट येथील कुडथाळी उर्फ कुशस्थळ हा गांव असून शालिवाहन शकाचे १४८२ रौद्रनाम संवत्छरीं अगर क्रिस्ती सनाचे १५६० सालांत साहासष्ट प्रांतामध्यें पोर्तुगेज अगर फिर्गी सरकारचा अंमल चालू झाल्यानंतर हिंदु लोकांस क्रिस्ती धर्मांत वळविण्याचें काम सुरू झालें त्या कालीं तेथून या प्रियोळ गावीं श्रीयालयाचें स्थानांतर झालें. तों पासून आज तागाईत श्रीचें वसतिस्थान मंगीश नामें वाड्यांत झालें. येथ माहाजन यांचे आराधनेस पात्रीभूत आहे."

स्थापनेनंतर हळू हळू त्या देवस्थानास श्रीमांगीशकृपेनेंच पूर्वीपेक्षांही विशेष वैभव आलें आणि तें एक अत्यंत महत्वाचें प्रमुख व जागृत स्थान बनलें व आजवर ते उत्तरोत्तर सुस्थितींत नांदत आहे.

इतिहासकालांत कुशस्थलीस श्रीमंगीश दैवत असतांना तेथें परिवार देवता कोणत्या होत्या, त्या देवस्थानच्या मालकीहक्काच्या शेती, बागायती, जमिनी कोणत्या, कुठें होत्या, त्यांचीं नांवें, गांवें, त्या जमिनी आज कोणाच्या मालकींत आहेत व त्याचें कारण काय, तसेंच त्या कालांत देवस्थानचें कुळावी व दैवतांचें स्थलांतर केव्हां, कसें व कशा परिस्थितींत झालें, याबद्दल थोडक्यांत, पण अत्यंत महत्वाची माहिती, खालीलप्रमाणें, पोर्तुगीज सरकारच्या त्या कालच्या दप्तरावरून व ऐतिहासिक कागदपत्रावरून आणि इतर पुराव्यांवरून कळून येते.

कुशस्थलीस श्रीमंगीश देवस्थान असतांना तेथें कोणकोणत्या देवता होत्या, हे पोर्तुगीज सरकारच्या दप्तरखात्यांत आज "आरकिव्हु इस्तोरिकु दे इस्तादु दे इंदिय" मध्यें "फोराल दे सालसेत" (१५६८) या नांवाची वही म्हणजे हस्तलिखित सरकारी पंचनामे व त्या कालीं देवालयांच्या जमिनी व इतर भांडारांतील वस्तु वगैरे संबंधीचे जे पंचनाम्यांसारखे लिखाण जज्ज साहेबांच्या उपस्थितींत कुशस्थली येथें कुशस्थलीचे गांवकार (ग्रामस्थ) व त्या गांवचा चिटणीस वगैरेंच्या सान्निध्यांत केलें आहे, अशा तऱ्हेचें लिखाण त्या "फोराल दे सालसेत" वहींत आहे व याशिवाय आणखी त्यांत पुष्कळ महत्वाच्या विषयांसंबंधीं लिखाण आढळतें. या "फोराल दे सालसेत" वहींत आंब्रोझियु दे सौज या न्यायाधीशाच्या हजेरींत कुठ्ठाळ येथें ता. ५ मार्च १५६८ रोजीं, कुठ्ठाळ गांवच्या देवस्थानांच्या मालकीच्या जमिनी, दागदागिने, सोनें, चांदी, तांबें, पितळ वगैरे धातूंच्या वस्तू इत्यादि सर्व वस्तूंचा आढावा घेतला असून तसा पंचनामा लिहिलेला आहे. त्याप्रसंगीं तेथें कुठ्ठाळचे गांवकार खालीलप्रमाणें

हजर होते. नरस शेणै, मातम्या शेणै, लखू शैणे, मांगू शेणै, विठू शेणै, दुसरा मांगोरस शेणै, मंगण नाईक, लमू शेणै, सांतप्पा नाईक, रामा नाईक, मंगू देवळी (दळवी ?) आणि केंसू शेणै इस्क्रीव्हांव (चिटणीस) किंवा कुलकर्णी. शिवाय साक्षीदार म्हणून बस्त्यांव पाईस, जुवांव कुतींज, गास्पार फर्नांदिस त्या गांवचे खिश्चन इसम शिवाय आल्व्हास गोंसाल्व्हिस आणि मानुएल आंतांव हा गांवकार, पेरू कोर्नेजु या इस्क्रीव्हांव किंवा कुलकर्णी (चिटणीस) यानें हा पंचनामा (आवतु) लिहिला असून त्यावर जॉर्ज मिनेझिस यांची सही आहे. (फोराल दे सालसेत १५६८, पृष्ठ ४५६ ते ४६४.) या पंचनाम्यावरून त्या कालीं कुशस्थलीस खालीलप्रमाणें देवता होत्या अशी माहिती मिळते.

| | |
|---|---|
| Mamginato | मंजीनातु |
| Samtery | सांतेरी |
| Quensoo Boo | केशंभू |
| Vyro | वीर |
| Capelasor | कपेलासोर |
| Narayna (Chandyrnato) | नारायण (चंदिरनातु) |
| Bagomte | बागोंति |
| Gopynato | गोपिनातु |

उल्लेखित पंचनाम्यांत जी पोर्तुगीज लिपींत देवतांचीं नांवें लिहिलेलीं आढळतात तीं जशाचीं तशीं त्याच लिपींत नक्कल करून घेतलेली असून त्या प्रत्येक पोर्तुगीज लिपींतील नांवापुढें त्याचा मराठींत उच्चार काय होतो तें लिहिलें आहे. सध्यां श्रीमंगेश देवस्थानांत, मंगेशी-प्रियोळ येथें ज्या देवता प्रतिष्ठापना केलेल्या आहेत, त्यांची व जुन्या कालीं कुशस्थली येथें ज्या, वर उल्लेखित देवता अधिष्ठित होत्या, त्या एकमेकांकडे जुळवणी करून पाहिल्यास असें दिसतें कीं,

जुन्या काळची मंजीनातु ही देवता आतां श्रीमंगेश या नांवानें,

जुन्या काळची सान्तेरी ही देवता आतां श्रीसान्तेरी या नांवाने,

जुन्या काळची केशंभू या नावाचा बरोबर उल्लेख किंवा उलगडा होत नाहीं. पण, तो निरंकार किंवा क्षेत्रपाळ असावा कीं काय, असा संशय येतो.

जुन्या काळची वीर ही देवता आतां श्रीवीरभद्र या नांवान,

जुन्या काळची कपेलासोर या नांवाचा किंवा कपिलेश्वर नांवाची देवता आज श्रीमंगेश देवस्थानांत नाहीं. पण, मंगेशीहून कवळेस जातांना वाटेंत फोंडेहून पुढें कपिलेश्वरी म्हणून गांव आहे व तेथें श्रीकपिलेश्वराचें देवालय आहे.

जुन्या काळची नारायण किंवा चंदिरनातु आतां श्रीलक्ष्मी नारायण या नांवाने,

जुन्या काळची बागोति आतां श्रीभगवती या नांवानें, आणि

जुन्या काळची गोपिनातु आतां श्रीमुल्केश्वर या नांवानें ओळखण्यांत येतात. व तशाच नांवांनीं प्रतिष्ठापना केलेल्या आहेत.

कपिलेश्वरी गांवांत श्रीकपिलेश्वर नांवाचें शिवलिंग व त्याचें सुंदर देवालय आहे. हें श्रीकपिलेश्वर दैवत जुन्याकाळीं कुशस्थलींत असलेलेंच व स्थलांतर करून कपिलेश्वरी गांवांत सध्याच्या जागीं आणलें असावें कीं काय, हें खात्रीपूर्वक सांगता येत नाहीं. याचें कारण, तसा स्पष्ट लेखी पुरावा सरकारी दप्तरावरून अद्याप उपलब्ध झालेला नाहीं. मात्र त्या नांवाचें दैवत जुन्याकाळीं कुशस्थलींत होतें. पण श्रीमंगेश देवस्थानांत आतां अधिष्ठित देवतांमध्यें श्रीकपिलेश्वर या नांवाचें दैवत नाहीं. परंतु इतिहासकालांत कुशस्थलीस जीं दैवतें होतीं म्हणून सरकारी दप्तरांत माहिती मिळते, त्या व्यतिरिक्त आणखी परिवार देवता श्रीमंगेश देवस्थानांत आज प्रतिष्ठापित आहेत.

जुन्या कालीं कुशस्थली गांवांत ज्या जागेवर श्रीमंगीश देवाचें देवालय होतें, त्या जागेवर किंवा सभोंवतीं आसपास प्राचीन देवालयाचे कांहींच अवशेष आज दृष्टोत्पत्तीस येत नाहींत व याचीं कारणें उघड आहेत. पैकीं एक कारण असें कीं, ज्या जागेवर पूर्वी श्रीमंगेशाच्या देवालयाची इमारत होती, त्या देवालयांतून शिवलिंगरुपी श्रीमंगेश, तत्कालीन श्रीमंगेश देवाच्या कुळावी महाजन भक्तगणांनीं ख्रिस्ती धर्मप्रसारक जेजुइत पाद्री मंडळाच्या हल्ल्याची चाहूल लागतांच, रातोरात, कुशस्थली गांवाबाहेर, सासष्टी प्रांताच्या हद्दीपार अंत्रुज महालांत पोर्तुगीज राजसत्तेच्या हद्दीबाहेर नेल्यानंतर थोड्याच अवधींत, त्या देवालयाची कुशस्थलींतील इमारत, जरुरी पुरतीच रचना बदलून ख्रिस्ती धर्मीयांच्या चर्चेसाठीं वापरण्यांत आली. व तीच इमारत नंतर मोडून त्याच जागेवर चर्चची नवी इमारत इ. सनाच्या १५६६ सालांतील तारीख १ मे पूर्वी संपूर्ण तयार केली गेली. व त्या चर्चमध्यें सां फिलीप सां तियागु (S.Filipe S.Tiago) या दोन संतांची स्थापना केली. हें नवीन चर्च इमारत बांधणीचें कार्य स्वतः पुढारीपण

व नेतृत्व पत्करून त्याकाळीं अधिकारावर असलेले खिस्तीधर्माचे गोव्याचे आर्चबिशप दों गास्पार दे लेयांव पैरर यांचा भाचा पाद्री फ्रांसिस्क आरांज, यानें कुडाळ व शेजारचा गांव या दोन गांवच्या लोकांकडून वर्गणी जमा करून तडीस नेलें असल्याचें कुडाळ गांवांत जी आज चर्च आहे त्या चर्चच्या इतिहासांत व गोव्याच्या आर्चबिशपच्या ऐतिहासिक संबंधित कागदपत्रांत स्पष्टपणें उल्लेखिलेलें आहे. अर्थातच पूर्वीच्या जागेवर देवालयाच्या इमारतीचे अवशेष राहिले नाहींत व देवालयापुढें तलाव वगैरे होता तोही या चारशें वर्षाच्या कालांत त्या जागेवर जीं अनेक स्थित्यंतरें झालीं, नवीन रस्ते केले गेले, त्यामुळें पूर्वीच्या जागीं किंवा आसपाससुद्धां, पूर्वीच्या देवालयासंबंधीचे थोडेसुद्धां अवशेष आज पाहावयास मिळत नाहींत.

खिस्ती झेझुइत पाद्री लोकांनीं सासष्टी प्रांतांत प्रथमतःच जो पाय ठेवला, तो इसवी सन १५६० सालीं. याबद्दल सर्व इतिहासकारांचें एकमत आहे. कारण ती घटनाच उघड, राजरोसपणें व पोर्तुगीज सरकारच्या आरमारी मदतीसह उघडली. इसवी सन १५६० सालीं, गास्पार नांवाचा पाद्री मुख्य खिस्ती धर्मोपदेशक झाला. त्या पाद्रीनें गोवा बेटांतील गोवा शहरांत, सासष्टी प्रांतांतील बरेच हिंदु लोक केवळ व्यापाराच्या उद्देषानें आल्याचे पाहिलं व अचानकपणें, एकाच दिवसांत त्यांतील चारशें नऊ लोकांस पकडून त्यांस बळजबरीनें खिस्ती धर्माची दिक्षा दिली. ही दिक्षा सां पावलु कॉलेजच्या इमारतींत इतिओपियाचा बिशप आणि मालाकचा बिशप यांच्या उपस्थितींत, उल्लेखित दों गास्पार गोव्याचा पहिला आर्चबिशप यानें दिली. याबद्दलचा उल्लेख ‘ओरियेंती कोंकिस्तादु’ या ग्रंथांत (भाग पहिला, कोंकिस्त १, दिव्हीजांव २, पृष्ठ १०१, आवृत्ति १८८१ सालीं मुंबई येथें एक्झामिनर छापखान्यांत छापलेला) वाचावयास मिळतो. व याच घटनेमुळें खिस्ती धर्मप्रसाराचा ओनामा किंवा प्रवेश सासष्टी प्रांताच्या जनतेंत झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. पुढें या पाद्री लोकांनीं सबंध सासष्टी प्रांत बाटविण्याची आपली इच्छा धरून तसें करण्याबद्दल सरकारची मंजुरी मागितली. सरकारनें त्या कृत्यास पूर्ण मंजुरी तर दिलीच पण, शिवाय मदतीस आरमारही दिलें. अशा तयारीनें प्रत्यक्ष सासष्टी प्रांतावर आक्रमण करावयाचें तर ते आरमाराच्या मदतीसह म्हणजे सासष्टी प्रांताच्या ज्या सीमेस नदी आहे त्या बाजूनेंच व्हायचें हें उघड आहे. ही सीमा म्हणजे त्यावेळच्या गोवा बेटाच्या दक्षिण बाजूस जी अघनाशिनी नदी किंवा आज आगशीची नदी किंवा

जुआरी नदी म्हणून ओळखली जाते ती. ही नदी मुरगांवकडे जाऊन समुद्रास मिळते. तेव्हां मुरगांवपासून सासष्टी प्रांताची उत्तर सीमा जलमय व मुरगांवपासून कुशस्थलीपर्यंत सासष्टी प्रांताच्या उत्तर सीमेचा किनारा, पैलतीरावर गोवा बेटाचा किनारा, म्हणजे गोवा बेट व सासष्टी प्रांताची उत्तर सीमा यामध्यें आगशीची नदी किंवा जुवारी नदी (अघनाशिनी नदी) असल्यामुळें जलमार्गानेंच आरमारासह हल्ला किंवा आक्रमण सासष्टीवर येणार. असें निश्चित ठरल्यानंतर या संग्राम मोर्चाचा रोख सुरुवातीस कुशस्थलीवर येणार हें सर्वांनाच निःसंशयपणें समजून चुकलें याचें मुख्य कारण गोवा बेटाच्या समोर पैलतीरावर जें गांव आहे तें कुशस्थली, गोवा बेट आणि कुशस्थली यामध्यें अघनाशिनी नदी. शिवाय या झेझुइत पाद्री व पोर्तुगीज लोकांकडून सासष्टी प्रांतावर पूर्व व दक्षिण बाजूंच्या सीमावरून प्रवेश होणें अशक्यच होतें. याचें कारण त्या दोन्ही बाजूंनीं परकीय राज्य असल्यामुळें या पाद्री व पोर्तुगीज लोकांस तेथें शिरकाव होणें कठीण होतें. तत्कालीन ख्रिस्ती पाद्री लोक, पोर्तुगीज सरकारी कुमक घेऊन ख्रिस्ती धर्म-प्रसाराचे व्रत स्वीकारलेले पाद्रीमंडळ गोवा बेटांतील हिंदुधर्मीय लोकांस बळजबरीनें बाटवीत चालले होते. हिंदुधर्मीय लोकांवर हा महान् दुर्धर प्रसंग ओढवला, तेव्हां त्या लोकांनीं आपली मालमत्ता, वतनवाडी, घरेंदारें सर्व सोडून जीव मुठींत धरून आपल्या हिंदु धर्मरक्षणासाठीं आपआपला प्रांत सोडून पोर्तुगीज हद्दी-बाहेर जाणें भाग झालें होतें व त्या बेतांत ते होते. इतिहासांत हा फार कठीण प्रसंग अत्यंत हृदयद्रावक रितीनें वर्णिलेला आढळतो. कित्येकांनीं अगतिक होऊन मरण पत्करलें. ख्रिस्तीधर्माचा प्रसार करतांना हे पाद्रीमंडळ हिंदुधर्मीय जनतेचे अनन्वित छळ व हालहाल करीत.

देवालयें जाळून टाकणें, मोडून टाकणें, मूर्ती फोडणें, संपत्तीची लुटालूट किंवा नाश करणें वगैरे अनन्वित कृत्यें करणारी ती मंडळी, तशी कृत्यें करीत करीत, गोवा बेटांत जसजशी एका पुढें एक गांवीं जाऊं लागली होती, व आतां शेवटीं सासष्टी प्रांतांत पाय ठेवण्याच्या तयारींत आहे, तेव्हां आतां ही मंडळी लगेच कुशस्थली गांवांत पोहोंचणार, या परिस्थितीची कल्पना व धोका कुशस्थलीच्या ग्रामस्थांवर येणार, आपल्या देवालयावर धाड येणार, हें ओळखून श्रीमंगीशाचे तत्कालीन कुळावी, महाजन, भक्तजन मोठ्या संकटांत व चिंतेत पडले. त्यांनीं एकत्र जमून श्रीमंगीश देवापुढें शरण जाऊन करुणा भाकली व प्रार्थना केली कीं, ‘देवा सत्वर या महान् संकटाचे वेळीं उडी घे, व यांतून मार्ग दाखव’. त्याच

रात्रौ त्यांना दृष्टांत झाला कीं, 'माझें वास्तव्य सर्वत्रच आहे. तुम्हीं साशंक होण्याचें किंवा भिण्याचें कारण नाही. परंतु त्यांतून तुम्हांला येथील श्रीशिवलिंग प्रतिकाचें संरक्षण करावयाचें मनांत असेल, तर तांतडीनें तें उचलून घेऊन या क्षेत्राबाहेर जिथें तुम्हांस पसंत पडेल, त्या बाजूनें न्या व जिथपर्यंत नेता येईल, तिथपर्यंत नेऊन पुढें जिथें जडपणा येऊन नेणें अशक्य होईल, तिथेंच खालीं ठेवून त्याची पुनः स्थापना करा'.

याप्रमाणें रात्रौ दृष्टांत होतांच कुशस्थलींतील प्रमुख महाजन लगेच एकत्र जमले. त्यांनीं रात्रौ श्रीमंगीशाचे शिवलिंग एका पालखीवजा झोळींत ठेवलें. सोबत एक नाग, एक नंदी, एक लहान समई, एक घंटा इतके पांच नग त्यांत ठेवून शिवाय तेथील परिवार देवतांचीं प्रतिकें त्या संकटकालीं समयानुरूप जीं शक्य झालीं, तीं प्रतिकें बरोबर घेतलीं. कारण, त्या परिवार दैवतांच्या पाषाण मूर्ती रात्रौ काळोखांत वाहवून नेणें सोपें नव्हतें, व कुशस्थली गांवाच्या तीरावर असलेली अघनाशिनी नदी म्हणजे आगशीची नदी किंवा जुवारी नदी होडीनें ओलांडून पैलतीरावर त्यावेळच्या अंत्रुज प्रांताच्या सीमेंत आजच्या मडकई बाजूच्या तीरावर प्रवेश करून ती पालखीसारखी झोळी रातोरात खांद्यावर वाहून नेत नेत प्रियोळ गांवांत एकदांची आतांच्या मंगेशी वाड्यावर आणून ठेवली व तेथें श्रीमंगेश शिवलिंगाची व परिवार दैवतांची पूजा-अर्चा सुरू झाली. दैविक दृष्टांतानें निघालेली ही मंडळी फार वेळ एकसारखी निजे-भूकेला न जुमानतां अविश्रांत कंपायमानस्थितींत धांवत पळत सुटली होती. अशा भयंकर संकटकालीं ज्या महाजन कुळावी इसमांनीं श्रीमंगेश शिवलिंग रात्रीचे आपल्या खांद्यावरून वाहवून कुशस्थली गांवापासून थेट प्रियोळपर्यंत प्रवास करून सर्व धोका पत्करला ते सर्व वत्स गोत्री कुळावी महाजन होते अशी आख्यायिका असून या त्यांच्या त्या संकटकालच्या प्रसंगांत केलेल्या कार्याचें महत्त्व ओळखून सर्व कुळावी महाजनांनीं, स्वखुषीनें, वत्स गोत्री कुळावी यांस, बहुमान म्हणून दर वर्षी कार्तिक शुक्ल द्वादशीस काल्याचा उत्सव झाल्यानंतर दुसरे दिवशीं सकाळींच दहींकाला झाल्यानंतर श्रीमंगेशाची उत्सव मूर्ती पालखींत बसवून व त्याच पालखींत श्रीविठ्ठल रखुमाई या देवतांच्या मूर्ती ठेवून काल्याच्या मंडपांतून श्रीमंगेशाच्या देवालयासमोर असलेल्या तळावाकडे नेण्यांत येऊन ती पालखी तळावाच्या कांठावर ठेवण्यांत येते. पालखीबरोबर वाजंत्री, नृत्यांगना, इलामत, सर्व वैदिक ब्राह्मण देवस्थानचे सेवेकरी, व्यवस्थापक समिति व देवाचे कुळावी महाजन त्यावेळीं उत्सवास उपस्थित असलेले गावडे इत्यादि भक्तवृंद असतो.

नंतर त्या पालखींतील फक्त श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ती देवस्थानचा ब्राह्मण पैरीकर पुजारी आपल्या पोटास घट्ट बांधून त्या मूर्तीसह तलावांत कमरेइतक्या पाण्यांत कांठाकांठानें वाजत गाजत सात फेऱ्या किंवा प्रदक्षिणा काढीत असतो. त्या ब्राह्मण पैरीकर पुजाऱ्याच्या आसपास पाण्यांत गावडे जमातीचीं तरुण मुलें पोहत पोहत प्रदक्षिणा काढतात. तलावाच्या कांठावर उभे असलेले भक्तजन पिकलेलीं केळीं वारंवार पाण्यांत फेंकतात व हीं फेकलेलीं केळीं तीं पोहणारीं तरुण मुलें पकडण्याची शर्यत चालवीत असतात. एकंदरीत हा उत्सव कार्यक्रम फार आनंदायक वाटतो. फेऱ्या किंवा प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर तो ब्राह्मण भटजी, मूर्तीसह तलावाच्या कांठावर येत असतो. श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ती शुभ्रवस्त्रानें पुसून नंतर ती श्रृंगारून परत श्रीमंगेशाच्या पालखींत, श्रीमंगेश मूर्तीजवळच स्थानापन्न करण्यात येते. व त्या नंतर ती पालखी खांद्यावर धरून त्या तलावाच्या वरच्या चौथऱ्यावरून प्रदक्षिणा घेऊन देवालयाच्या सभोंवतालच्या प्राकारांत प्रवेश करून देवालयासभोंवार पेणी ( मुक्काम ) करीत करीत मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणांत देवालयांत नेण्यांत येते.

या सर्व उत्सवांत श्रीमंगेशदेव श्रीविठ्ठल रखुमाईसह, ती पालखी कार्तिक शुक्ल त्रयोदशीच्या दिवशीं तलावावरून देवालयांत येईपर्यंत खांद्यावरून वाहविण्याचा बहुमान फक्त वत्स गोत्री कुळावी महाजन जे त्या समयीं देवस्थानांत उपस्थित असतील त्यांसच मिळतो. हा प्रकार अव्याहतपणें पुरातन कालापासून आजपर्यंत अखंडपणें चालत आला आहे व तोही वर्षांतून फक्त त्या एकाच दिवशीं, म्हणजे कार्तिक शुक्ल त्रयोदशीस हे विशेषेंकरून लक्षांत घेणें महत्त्वाचें आहे. या घटनेमुळें असें वाटतें कीं, श्रीमंगीश देव ज्या दिवशीं कुशस्थलीहून स्थलांतर करून प्रियोळ गांवीं आले, तो दिवस कार्तिक शुक्ल द्वादशीची रात्र व कार्तिक शुक्ल त्रयोदशीचा दिवस असावा.

कुशस्थलीहून श्रीमंगेश देवाचें शिवलिंग आकस्मिकपणें उचलून घेऊन रातोरात अघनाशिनी नदी पैलपार करून प्रियोळ गांवीं नेण्यांत आल्यानंतर पाठोपाठ त्याच दिवशीं कुशस्थळी येथें असलेल्या श्रीमंगेशाच्या देवालयाच्या इमारतीवर गर्भागाराच्या जागीं, अगदी नजीक असलेल्या डोंगराळ टेकडीचा उंचवटा अचानकपणें कोसळला व ज्या जागीं श्रीमंगीश शिवलिंग होतें तोच भाग किंवा तीच जागा टेकडीची कोसळलेली माती पडून पूर्णपणें झांकून गेली अशी आख्यायिका आज चारशें वर्षांपेक्षां जास्त वर्षेंपर्यंत परंपरागत वडिलांकडून आतांच्या पिढीपर्यंत ऐकण्यांत येते.

श्रीची स्वारी तिथून निघून जातांच नजीकच्या टेकडीचा एक भाग त्या देवालयाच्या गर्भागारावरच अचानक व आकस्मिकपणें कोसळून पडणें हा दैवी चमत्कार त्या परमेश्वरी साक्षात्काराचा प्रत्यक्ष पुरावा नव्हे तर काय? पण, ती एक आख्यायिका. त्याला पुरावा नाहीं ही वस्तुस्थिति आहे. नंतर ख्रिस्ती धर्मवेडे पाद्री मंडळ, बरोबर सरकारी कुमकीसह जेव्हां कुशस्थळीस पोंचले व तेथील देवालयावर धाड घालण्यास गेले, तेव्हां त्यांस त्या जागीं व त्या देवालयांतील देव केव्हांच यापूर्वी गुप्तपणें परकीय राज्यांत नेले असल्याचें आढळून आलें. व या सत्य परिस्थितीचा अहवाल व स्पष्ट उल्लेख त्याच धर्मवेड्या पाद्री मंडळानें जो लेखी अहवाल त्याचवर्षी पोर्तुगालास पाठविला होता व नंतरच्या कालांत ती कागदपत्रें पोर्तुगालास त्याच जेझुइत पाद्री मंडळाच्या वरिष्ठ अधिकारी इसमांनीं सरकारी छापखानदाराकडून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलीं त्यांत वाचावयास मिळतो.

त्या पाद्री मंडळानें श्रीमंगीश देवालयाची इमारत अतिशय चांगल्या प्रशस्त ठिकाणीं असल्याचें पाहिल्यावर ती इमारत आपणांस चर्चसाठीं उपयोगांत आणण्यासाठीं मिळावी, म्हणून सरकारकडे मागणी केली. व त्यावेळीं सरकारनें ही मागणी मान्य करून ती देवालयाची इमारत त्या पाद्री मंडळाला चर्चसाठीं उपयोगांत आणण्यास तर दिलीच; पण, त्याचबरोबर त्या देवालयास असलेले सर्व उत्पन्नही त्या नवीन चर्चच्या वापरासाठीं मंजूर करून दिलें. या मंजुरीनंतर देवालयाची इमारत चर्चसाठीं योग्य होईल त्या पद्धतीनें त्यांत फेरफार करून ती स्वच्छ केली गेली. अशी योग्य व्यवस्था केल्यानंतर लगेच एक दिवस तेथें स्वतः पाद्री मंडळाचा एक मुख्याधिकारी "पाद्रि प्रोव्हिंसीयाल" व त्याचे बरोबर पाद्री फ्रांसिस्क रुद्रिगिस हे दोघे त्या जागीं जाऊन ती इमारत व व्यवस्था पाहून त्यांनीं फार समाधान व आनंद व्यक्त करून परत आले. अगदी नजिकच्याच कांहीं दिवसांत त्या चर्चमध्यें पहिलेंच मिस्स म्हणजे सामुदाईक ईशप्रार्थना घडून येईल अशी आपली मनीषा प्रकट केली. हा सर्व मजकूर रोम शहरांत प्रसिद्ध झालेल्या झेझुइत पाद्री मंडळाचा त्या कालीं गोव्याहून पोर्तुगालास पाठविलेला सर्व पत्रसंग्रह प्रसिद्ध झाला आहे त्या पत्रांतील ता. २९ नवंबर १५६६ रोजीं जें पत्र पाद्री गोमिस व्हाज यानें गोव्याहून पोर्तुगालास पाठविलें होतें त्या पत्रांत असून हें पत्र म्हणजे एक सविस्तर बारीकसारीक सर्व कृत्यांचा अहवालच म्हणावा लागेल. हें पत्र छापील बारीक टाइपाची जवळ जवळ २१ पानें आहेत. "Documenta Indica" Edidit: Ioseph Wicki S. I.

Vol. VII (1566-1569). Impresso em Roma em 1962 por "Apud Monumenta Histórica Soc. Iesu" VIA DEI PENITENZIERI, 20.)

वर उल्लेखित प्रियोळ गांवीं, श्रीमंगीश शिवलिंग ज्या जागीं ठेविलें त्या जागीं श्रींचें अर्चन-पूजा चालू झाली. थोड्याच दिवसांत इतर महाजन कुळावी तिथें जमा झाले. त्यांनीं तीच जागा श्रींच्या पुनःस्थापनेस योग्य व सुरक्षित आहे असें पाहून तिथें लहानसें देवालय उभारलें. आणि शके १४८२ रौद्रनाम संवत्सरी इ. स. १५६० सालीं श्रींची परिवार देवतांसह विधीपूर्वक स्थापना केली. ह्या दिवसापासून आतापर्यंत चारशें दहा वर्षे लोटली असून या चार शतकाच्या दीर्घकालांत त्या देवालयाची मुख्य इमारत किती वेळां जिर्णोद्धार करून बांधली गेली असेल, याचें संशोधन केलें नसल्यामुळे त्या विषयी खात्रीपूर्वक सांगता येत नसलें, तरी सध्यां जें श्रीमंगेशाचें शोभिवंत, आकर्षक व सर्वांचे लक्ष वेधून घेणारें देवालय आहे, तें देवालय शके १८१२ म्हणजेच इसवी सन १८९१ सालीं बांधून पूर्ण झालें असल्याचें त्या देवालयाच्या महाद्वाराच्या पाषाणी कमानीवर कीर्तीमुखाचे शेजारीं असलेल्या पाषाणी कोरीव शिलेवरून लक्षांत येतें. शके १८१२ पूर्वी तें देवालय कशा पद्धतीचें होतें तें त्या वेळच्या देवालयाच्या इमारतीचा दुर्मिळ फोटो आज देवस्थानच्या दप्तरीं आहे त्यावरून समजतें. शिवाय श्रीमंगेशाच्या मुख्य देवालयाची इमारत जी सध्यां दिसत आहे त्या इमारत बांधणीचे कंत्राट यावेळच्या सरकारी मंजुरीसह जाहीर लिलांव करून तारीख ८ जुलै १८८९ रोजीं श्री. विश्वनाथ शेणवी केंकरे मुक्काम कुंकळी, सासष्टी तालुका, या गृहस्थानें घेतलें होतें असें श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांत आढळते. हें कंत्राट, करार तेर्म पृष्ठ ३९, लिव्र क्र. २५, यावर असून, बांधकामाचा सुरवातीचा अंदाज, २०,५७० रुपये होता.

□ □ □

# ३ | कुशस्थलीहून स्थलांतर

सासष्टींतून अंत्रूज महालांत आजच्या फोंडें तालुक्यांत, हिंदु दैवतांचें स्थलांतर नक्की कोणत्या सालीं झालें असावें, याबद्दल नानाविध मतें व तर्कवितर्क अनेक ठिकाणीं वाचनांत येतात. पण, एक गोष्ट निश्चितपणें ग्राह्य मानिली पाहिजे व ती ही कीं, कुशस्थलीच्या बाबतींत तरी असें क्रमप्राप्त ठरतें कीं, कुशस्थलींत ख्रिस्ती धर्मीयांचीं जीं इग्रेज म्हणजे चर्च बांधली गेलीं, ती प्रत्यक्षपणें पूर्वी ज्या जागेवर श्रीमंगेशाचें देवालय होतें, त्या जागेवरच बांधली गेली आहे. याबद्दल सरकारी म्हणजे त्यावेळच्या झेझुइत पाद्रीमंडळ ज्यानें ही बाटाबाट व ख्रिस्ती धर्मप्रसाराचे सत्र चालू केलें, छळ आरंभिला व हें कार्य सरकारच्या कुमकीसह तडीस नेलें, त्या मंडळाच्या, त्या काळच्या पत्रसंग्रहावरून व इतरही पुराव्यांवरून स्पष्ट व नि:संशयपणें सिद्ध होतें. त्यासाठीं, त्या अस्सल कागदपत्रांतील मजकुराचा आवश्यक भाग, त्याचप्रमाणें कुशस्थलींत जी इग्रेज किंवा चर्च आहे त्या चर्चच्या इतिहासांतील आवश्यक भाग, तसेंच हे ख्रिस्ती धर्मवेडे जेजुइत पाद्रीमंडळ नक्की कोणत्या सालीं, कोणत्या दिवशीं, सासष्टींतील कुशस्थली गांवांत, कोणत्या मार्गानें आले व त्यांनीं पहिल्याच खेपेस कुशस्थली गांवांत कोणत्या दिवशीं पाय ठेविला, याचें साद्यंत सविस्तर पृथक्पृथक् वर्णन त्याकाळीं त्याच झेझुइत पाद्री मंडळानें गोव्याहून पोर्तुगालास जीं पत्रें पाठविलीं होतीं, तो सर्व पत्रसंग्रह लिस्बन शहरांत एकत्र करून त्यांत त्या वेळच्या गोव्याच्या सरकारी दप्तरांतील अनेक घटना समाविष्ट करून कोंपाजीय दे झेझुसचा समग्र इतिहास त्या कोंपाजीय दे झेझुसच्या पाद्री लोकांनीं पोर्तुगालची राजधानी लिस्बन शहर येथें 'ओरियेंतु कोंकिस्तादु' या नांवाचा मोठा ग्रंथ इ. सन १७१० सालीं (M.D.C.C.X.) त्या वेळच्या पोर्तुगीज राजघराण्याचा जो छापखानदार 'व्हालेंती दा कोस्त दिस्लांदिस' या कडून प्रसिद्ध केलेला आहे, त्या ग्रंथात विशेषतः ज्या पाद्री इसमांनीं सासष्टी

प्रांतांतील कुड्डाळ ( कुशस्थली ) गांवांत प्रथमत:च प्रवेश केला होता. त्याच पाद्री इसमांची तपशीलवार कृत्यें त्यांत सविस्तर प्रकारें त्या वेळच्या माहितीपूर्ण पत्रां-वरून पूर्णपणें लक्षांत येतात. 'ओरियेंतु कोंकिस्तादु' या इतिहास ग्रंथाच्या पहिल्या भागांत इ. स. १४९८ ते १५६३ व दुसऱ्या भागांत इ. स. १५६४ ते १५८५ पर्यंतच्या कालांत ज्या ज्या घटना त्यावेळीं कोंपाजीय दे झेझुसच्या पाद्री मंडळानें घडवून आणल्या, त्यांचा समग्र वृत्तांत त्यांत आहे. त्या ग्रंथाच्या पहिल्या भागाच्या पृष्ठ १६९ वर जो मजकूर आहे, तो जशाचा तसा, त्याच भाषेंत व त्याच लिपींत खालीं दिला आहे:–

'Da ilha de Goa naveguemos mais ao Sul paſſemos a terra firme de Salfete, na qual ao primeyro de Mayo déſte anno em que andamos de mil quinhentos & ſeſſenta, entrarão com feliciſſmo auſpicio os primeyros Miſſionários de COMPANHIA o Padre Pedro Maſcarenhas & o Irmão Manual Gomes manda-dos pelo Padre Provincial Antonio de Quadros a inſtància do Viſo-Rey D. Conſtàntino de Bragança. Diſta a ponta mais setentrional de Salfete, onde eſtà a fortaleza de Mormugão. da ponta de Noſſa Senhora do Cabo, a mais Occidental de Goa, o eſpaço de hum braço de mar, que com boa mare ſe atraveſſa em meya hora...'

यानंतर त्याच ग्रंथाच्या पहिल्या भागाच्याच पृष्ठ १७६ वर खालीलप्रमाणें मजकूर आढळतो:–

PRIMYRO MISSIONARIO & PRIMYRO CRISTÃO DE SALCETE)·

'61-Entrando pois em Salfete o Padre Pero Maſcarenhas com ſeu companheyro dia dos Apóſtolos São Philipe, & Santiago pela manhãa, mandou levantar huã pequena ramoda na Aldeia Cortali porque eſta foy a primeyra, em que pôz os pés, & nella diſſe Miſſa, ſacrificando-ſe todo a Deos pela ſalvação de tantas almas,e pedindolhe valor, & conſtancia para dar hum bom Santiago nas Idolatrías deſtas terras. Daqui caminhou para o forte de Rachol, dentro do qual huma Capella onde ouvião Mſſa os ſoldados Portugueses, & alguns poucos chriſtãos naturais de Goa que tinhão ſeus officíos no forte.

Affiftia nêlle hum Clerigo por Capellão do prefídio & não por Vigário dos Chriftãos da terra, porque em todo Salfete não havia naquelle tempo hum fó paysano bautizado. Mas ou tiveffe êfte, ou aquelle título, elle fe retirou,& o Padre Pero Mafcarenhas tomou poffe da Capella, & faindo do forte bem armado de zêlo Apoftólico, & confiança em Deos a pregar a Fé pelas Aldeas do contôrno converteo alguns gentíos até o fim do anno de mil quinhentos feffenta e hum em que partin para a miffão das Malucas e dar a vida por Christo como diremos na segunda Parte defta história Conquifta III anno 1582.'

याच 'ओरियेंतु कोंकिस्तादु' ग्रंथाच्या दुसऱ्या भागाच्या पृष्ठ २० वर खालीलप्रमाणें मजकूर आहे. तोही जशाचा तसा व त्याच लिपींत पुढें दिला आहे.

Ano 1566.—Notícias de Curtalim.—13¶

'Havia já Igreja & Vigário de Companhia em Curtalim no anno de mil quinhentos feffenta & feis, & no primeiro de mayo fe cantou nella a primeira Miffa. Curtalim Aldeia de Salfete defronta com a Ilha de Goa, & hé huma das doze de Camara Geral & como já advertí na Primeira Parte, foy a primeira, em que puzerão os pés os noffos Miffionários no anno de mil quinhentos e feffenta, dia dos Apóftolos S. Filipe & Santiago, que fão o Orago da fua Igreja. Forão os Curtalós antigamente muy devotos dos seus idolos; porque não fendo Curtalim muito grande, tem muitas terras pertencentes aos pagodes, & a caufa difto era, porque ferfião aos leeys de terra firme em officios de penna & como efta cafta de gente fempre acha que deppenar. voltavão ricos a fua Aldeia, & compravão cháos, que davão aos pagodes para confervar a memória de feu nome. Todos tem título de xenens; ifto hé, Meftres porque nas terras do Concão elles mefmos fão os que enfinão aos mais Brámanes a ler, efcrever & contar.'

वरीलप्रमाणें मजकूर तीन वेगवेगळ्या परिच्छेदांत, उल्लेखित 'ओरियेंतु कोंकिस्तादु' या ग्रंथांतून उद्धृत केले आहेत. हा मजकूर, जुन्याकाळीं पोर्तुगीज लिपी ज्या पद्धतीने लिहिली जाई, त्या लिपींत आहे. आजच्या काळांत ती

लिपी जरा बदललेली आहे. वरील पोर्तुगीज भाषेंत जो मजकूर तीन वेगवेगळ्या परिच्छेदांत आहे, त्यांतील मजकुराचें वेगवेगळें असें मराठी भाषांतर वाचकांच्या सोईसाठीं क्रमशः संक्षिप्तपणें खालीं दिलेलें आहे. पृष्ठ १६९ वरील मजकूरः—

'आम्ही गोवा बेटाच्या दक्षिण बाजूस जलप्रवासानें सासष्टीकडे चाललों. जेथें ता. १ मे १५६० रोजीं पहिलेच मिशनरी कंपनीचे पाद्री पेद्रु मास्कारेंजस आणि त्याचा सोबती मानुयेल गोमिस या दोघांनीं समाधानपूर्वक पाय ठेविला. हे दोघे पाद्री, पेद्रु मास्कारेंजस आणि मानुयेल गोमिस, यांस पाद्री प्रोव्हिंसियाल (पाद्री वरिष्ठ अधिकारी) आंतोनियु दे क्वाद्रुस यानें व्हिस्तु रै दों कोंस्तांतिनु दे ब्रागांस यांच्या आग्रहावरून पाठविलें होतें. सासष्टीचें दक्षिण दिशेचें शेवटचें टोंक, जिथें मुरगांवचा किल्ला आहे, तें नोस सिंजोर हें काबु टोकापासून म्हणजे गोवा बेटाच्या पश्चिम टोंकापासून मध्यंतरी समुद्राचा फांटा व तो पाण्याचा प्रवाह अनुकूल असल्यास अवघ्या अर्ध्या तासांत ओलांडतां येईल....'

पृष्ठ १७६ वरील मजकूरः—

'(सासष्टींतील पहिला मिशनरी आणि पहिला ख्रिश्चन)

पाद्री पेरु मास्कारेंजस व त्याचा सोबती यांनी सां फिलीप आणि सां तियागु या संतांच्या दिवशीं सासष्टींतील कुडथाळ गांवांत सकाळच्या प्रहरीं एक लहान-सा मंडप झाडाच्या फांद्यांनी उभारला. कारण, हाच पहिला गांव ज्या गांवांत पहिल्यानेंच त्यांनी पाय ठेविले व तेथें मिस्स म्हणजे ईश प्रार्थना करून आपण चालविलेल्या धर्मकार्यांत परमेश्वराची, यश संपादन होण्याबद्दल मागणी चालविली. या गांवाहून पुढें ते राशोल (रायतूर) किल्ल्याकडे गेले. ज्या किल्ल्यांत एक लहान कपेल (छोटेंसें चर्च) होतें व तेथें पोर्तुगीज मिलिटरी सोल्जर व कांहीं स्थानिक ख्रिश्चन, ज्यांचा व्यवसाय त्या किल्ल्यांतच असे ते सर्व लोक मिस्स (ईश प्रार्थना) ऐकत असत. तिथें एक क्लेरिगु म्हणजे ईश प्रार्थना करण्यास परवानगी दिलेला इसम त्या ईश प्रार्थनेसाठीं हजर राहात असे. कारण त्यावेळेपर्यंत सबंध साष्टीमध्यें बातिस्मा घेतलेला एकही बिनलष्करी इसम नव्हता. व कदाचित तसा मनुष्य किंवा धर्मोपदेशकचा किताब मिळालेला एखादा इसम तिथे होता असें जरी गृहीत धरलें तरी तोही तेथून परत गेलेला असावा. आणि म्हणून पाद्री पेरु मास्कारेंजस यानें त्या कपेलाचा ताबा घेतला. नंतर त्या किल्ल्यांतून निघून ईश्वरी विश्वासाच्या जोरावर सभोंवतालच्या गांवांत

ख्रिस्ती धर्मप्रचार करून बरेच हिंदु बाटविले. इ. स. १५६१ च्या शेवटास तो 'मालुकस' येथें आपल्या मिशनचें कार्य व आपलें जिवीत ख्रिस्त सेवेस अर्पण करण्यासाठीं गेला. त्याचा इतिहास पुढें कोंकिस्त III दुसऱ्या भागांत– इ. स. १५८२– मध्यें कथन करीन.'

पृष्ठ २० वरील मजकूरः—

'इ. स. १५६६–कुडथाळ गांवच्या बातम्याः–१३ § इ. स. १५६६ सालीं कुडाळ गांवांत चर्च आणि मिशनरी कंपनीचा धर्मोपदेशक (व्हिगारियु) होता व ता. १ मे रोजीं त्या चर्च मध्यें पाहिलेंच मिस्स् (ईश प्रार्थना) त्यांनीं केलें. कुडाळ हा सासष्टींतील गांव गोवाबेटाच्या समोर आहे व तो काम्र जेरालच्या बारा गांवांपैकीं एक होय. याच गांवांत आमच्या मिशनऱ्यांनीं पहिल्यानेच आपले पाय इ. स. १५६० सालीं सां फिलीफ व सां तियागु या संतांच्या दिवशीं (१ मे रोजीं) रोविले व तीच देवता त्या चर्च (इगर्ज) मध्यें स्थापिली. कुडाळकर इसम जुन्या काळीं फार देवभक्त असून आपल्या देवाची फार निष्ठेनें भक्ती करीत. कुडाळ हा गांव म्हणण्यासारखा एरवी मोठा विस्तीर्ण नव्हे. पण, असें असूनही तेथील पुष्कळ जमिनी देवालयांच्या मालकीच्या आहेत. आणि याचें कारण, कुडाळकर कायद्याचें ज्ञान व लेखणीबहाद्दर असल्यामुळें ते आपल्या कर्तबगारीवर पैसा कमावून परत आपल्या गांवीं श्रीमंत होऊन कुडाळ येथे परतत. आणि आल्यानंतर जमिनी विकत घेऊन देवालयास अर्पण करीत व अशा प्रकारें आपलें नांव चिरस्मरणीय करीत. या सगळ्या कुडाळकर लोकांस शेणै [शेणवी] हा किताब आहे. याचा अर्थ विद्वान शिक्षक. कोंकणांतील गांवांमध्यें हेच लोक इतर ब्राह्मण लोकांस लिहिणें, वाचणें व गणित शिकवीत असत.'

वर उल्लेखिलेल्या 'कोंपाजीय दे झेझुसच्या' त्या काळीं लिहिलेल्या व गोव्याहून पोर्तुगालास पाठविलेल्या अत्यंत महत्वाच्या कागदपत्रांतील मजकुरावरून स्पष्ट व निःसंदिग्धपणे खालील गोष्टी समजून येतातः–

१. ख्रिस्ती धर्म प्रसारार्थ 'कोंपाजीय दे झेझुस'चे पाद्री मंडळ गोवा बेटांतून सासष्टी प्रांताकडे जे गेले ते प्रथमतःच इ. स. १५६० सालीं. त्या पाद्रीमंडळाचा प्रवास गोवा बेटापासून सासष्टी प्रांताकडे जलमार्गानें झाला. त्या पाद्रींनीं सासष्टी प्रांताच्या मुरगांव टोंकाकडे किल्ला आहे, तेथून ते काबोच्या समुद्र फांट्यातून प्रवास करीत सां फिलीप व सां तियागु या संतांच्या दिनीं

म्हणजे ता. १ मे रोजीं सकाळच्या प्रहरीं प्रथमच कुठ्ठाळ गांवांत पाय ठेविला. ही (तारीख १ मे) दिवस त्यादोन संतांचा दिवस असल्यामुळें त्या कुठ्ठाळ गांवांत जी चर्च ( इंग्रेज ) उभारली गेली, त्या चर्चमध्यें आराध्यदेवता म्हणून त्याच दोन संतांची स्थापना केली.

२. इ. स. १५६६ सालांत कुठ्ठाळ गावांत चर्चची इमारत पूर्णावस्थेंत होती व तेथें कोंपाजीय दे झेझुसचा व्हिगारियु ( पाद्री धर्मोपदेशक ) होता. त्या व्हिगारियु धर्मोपदेशकानें ता. १ मे १५६६ या दिवशीं त्या इगर्जमध्यें म्हणजे चर्चमध्यें मिस्स ( ईश प्रार्थना ) सांगितली. कारण ती १ मे तारीख म्हणजे त्या तारखेस सासष्टी प्रांतांत व तेंही कुठ्ठाळ गांवांतच प्रथमच मिशनरी पाद्री मंडळानें आपला पाय ठेविलेला स्मारक दिन.

आतां यापुढें, आणखी याच्याही पेक्षां महत्वाच्या घटनांवर पूर्णपणें प्रकाश पाडणारे दाखले–कागदपत्र–पुरावे पाहिल्यानंतर कुडथाळी गांवांतून श्रीमंगीश देवाचें शिवलिंग लपवून सासष्टी प्रांताच्या हद्दीबाहेर आदिलशाही–मुसलमानांच्या हद्दींत नेलें. श्रीदेवाचे तेथून स्थलांतर झाल्यावर त्या देवालयाची रिकामी इमारत त्या वेळीं झेझुईत पाद्रींनीं चर्च स्थापन करण्यास सरकारकडून मंजूरी मिळविली व चर्चच्या उपयोगांत आणली व नंतरच्या काळांत त्याच जागीं मूळची इमारत मोडून नवी चर्चसाठी इमारत केव्हां, कोणी, कोणाच्या खर्चानें बांधिली वगैरे बद्दल स्पष्टपणें समजून येतें.

Monumenta Histórica Socielatis Iesu — DOCUMENTA INDICA: Edit—Ioseph Wicki S. I. (Vol. VII) (1566-1569) Romae—Apud 'Monumenta Histórica Soc. Iesu' Via Dei Panitenzieri 20.—1962. हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ रोम शहरांत छापलेला असून त्या ग्रंथाचे कांहीं भाग आहेत. हा ग्रंथ म्हणजे मिशनरी सोसियेदाद दे झेझुसच्या समग्र इतिहासाचा भक्कम पुरावाच मानला जातो. त्या ग्रंथांत सोसियेदाद दे झेझुसच्या मिशनरी पाद्री मंडळानें सुरवातीपासून शेवटपर्यंत ज्या ज्या भूमींत पाय ठेविले, जीं जीं कृत्यें केली, ज्या ज्या घटना घडविल्या त्यांची तारीख, महिना, सन, जागा वगैरे साद्यंत रिपोर्ट लिहून त्या पाद्री मंडळाच्या रेक्टरनें किंवा रेक्टरच्या हुकूमानुसार व परवानगीनें कार्यकर्त्या दुसऱ्या पाद्रीनें गोव्याहून पोर्तुगालास जीं पत्रें पाठविलीं तो सर्व अस्सल पत्रसंग्रह या ग्रंथांत छापलेला आहे. या ग्रंथाच्या भाग ७ वा, पृष्ठ ६३ वर मार्जीन नंबर ७४५ वर जो मजकूर आहे तो असा आहे :-

'Tem já levados alguns escondidamente (283 r) pera outras terras deixando as casas desemparadas.'

'Os nossos Padres pediram huma casa, de hum dêstes pagodes que se lavarão, pera nella fazerem huma Igreja, por estar em muyto bem lugar, pera isso, e Sua Senhoria a concedeo (e) juntamente a renda que o pagode tinha pera a fábrica de Igreja.

A casa está já feita a modo de igreja e limpa. Forão daquy hum dia o Padre Provincial e o Padre Francisco Radrigues a vê-lla e vierão muito contentes. Espera-se que daqui a poucos dias com o fovor divino se dará nella a primeira miss, Está esta igreja de outra banda desta ilha nas terras de Salcete, em lugar fresco. 94 (94-Loquitur de Curtalim Cf. Souza II 1,1,13-15; Vide etiam infra doc. 90, 65). (Êste trecho é de página 63 do documento numero 16. datado de 29 Novembro de 1566, isto é da carta escrita pelo Gomes Vaz por commissão do P. Reytor Antonio de Costa, do Collégio de S. Paulo de Goa, publicada desde página 38 até página 71 do Documenta Indica edidit Ioseph Wicki S. I. Vol. VII (1566-1569) Impresso em Roma em 1962 por Apud 'Monumenta Histórica Soc. Iesu' Via Dei Penitenzieri, 20.'

याच ग्रंथाच्या उल्लेखित ७ व्या भागाच्या पृष्ठ ३९८ वर व त्या पृष्ठावरील मार्जीन नंबर ७६५ पुढें खालील प्रमाणें मजकूर आहे:—

'65— O anno passado escrevi como naquellas terras se fez por indústria dos Padres novamente huma Igreja em hum pagode cujo ídolo tinhão os gentíos levado para terra de mouros, 110 (110-Cf. supra doc. 16-59 Idolum dei Manguesh (Manganath) e pago Cortalim oblatum, hodie invenitur in loco Priol (Pondá) qui est in Novas Conquistas (Cf. Bragança Pereira in A India Portuguesa, I-45-Pissurlencar Tombo 172).

Êste Mayo passado disse nella a primeira missa cantada com diácono e sub-diácono e officiada com canto de orgão charamellas e outros instrumentos músicos o Padre Provincial e pregou a ella o Padre Francisco Rodrigues.'

त्याच पृष्ठ ३९८ वर मार्जीन नंबर ७८५ पुढें असा मजकूर आहे :—

E o que sobretudo ornou a festa e acrescento a alegria dos presentes foi hum bautismo solenne que o mesmo dia a tarde se fez, de que adeante farei menção. Foi isto dia dos bem aventurados apóstolos S. Tiago e S. Philipe 111 de cuja vocação hé a Igreja. (lll Die 1 Maii).

वरील पोर्तुगीज भाषेंतील मजकुराचें जरुरीपुरतें मराठी भाषांतर सारांश रूपांत खालीलप्रमाणें आहे :—

पृष्ठ ६३ मार्जीन नंबर ७४५ वरील मजकूर :—

'यापूर्वीच कांहीं (देव) लपवून दुसऱ्या राज्यांत (हद्दींत) नेले असून त्यांचीं देवालयें निराधार स्थितींत ठेवलीं आहेत. आमच्या पाद्रींनीं त्यांतील एका देवालयाचे इमारतीची मागणी केली. कारण, त्या इमारतींत चर्च स्थापन करण्याचें योजलें. ती इमारत चर्चसाठीं वापरण्यास मंजूरी तर दिलीच, पण त्याबरोबर देवालयास जें उत्पन्न होतें, तेंही चर्चच्या भोगवट्यासाठीं बहाल केलें. मूळ देवालयाची इमारत आतां चर्चसाठीं योग्य अशा प्रकारें केली व स्वच्छही केली. एक दिवस त्या जागेवर पाद्री प्रोव्हींसियाल (वरिष्ठ अधिकारी पाद्री) व पाद्री फ्रांसिस्क रुद्रीगीस हे दोघे स्वतः जाऊन ती इमारत व स्वच्छता वगैरे पाहून आनंद व समाधान व्यक्त करून परतले. परमेश्वरी कृपेन नजीकच्या दिवसांत त्या चर्चमध्यें पहिलें मिस्स गायन केलें जाणार आहे. ही चर्च या [गोवा] बेटाच्या पैलतीरावर सासष्टींतील जमिनींत, एका थंड ठिकाणीं आहे. (हा मजकूर पाद्री गोमिस व्हाज यानें सां पावलु कॉलेज, गोवाचे रेक्टर पाद्री आंतोनियु दे कोस्त यांच्या तर्फे सही करून गोव्याहून तारीख २९ नोव्हेंबर १५६६ रोजीं जें पत्र लिहिलें—(म्हणजे दाखला नं. १६) त्या पत्रांतील असून तें समग्र पत्र पृष्ठ ३८ ते ७१ पर्यंत, भाग ७ वा, "दोकुमेंत इंदिका" या ग्रंथांत छापलेलें आहे.)

या पुढच्या मार्जीन नंबर ७६५ पुढें असलेला मजकूर :—

'६५) गेल्या सालीं म्हणजे इ. स. १५६६ सालीं, आपण कळविलेंच आहे कीं, ज्या देवालयांतील देव हिंदुनीं यापूर्वीच दुसऱ्या मुसलमानी राज्यांच्या हद्दींत नेले होते, त्या देवालयाच्या मूळ जागेवरच पाद्रीच्या प्रयत्नांनीं नवीन इग्रेज (चर्च) बांधिली आहे. [हा देव म्हणजे मंगेश (मंगनाथ) मूळ कुडथाळीचा, आतां जो प्रियोळ- फोंडा नवीन कात्रिजादीत आहे—ब्रागांस पेरैर यांनीं लिहिलेले अ इंदिय पोर्तुगेझ १—४५ पिसुर्लेकर, तोंब १७२]

गेल्या मे महिन्यांत तिथें पहिलें मिस्स् गायन, दियाकोनु, सुब्र-दियाकोनु या अधिकारी पाद्रीसह, ऑर्गन, चर्मेला व इतर म्युझिक वाद्यांसह झालें. व तें पाद्री फ्रांसिस्क रुद्रीगीस यांनीं कथन केलें.'

त्यापुढील मार्जीन नंबर ७८५ पुढे असलेला मजकूर :–

'एकंदरींत हा उत्सव उपस्थित मंडळीच्या आनंदांत भर घालणारा झाला. व त्याच दिवशीं संध्याकाळीं एक बाप्तिस्मा समारंभही झाला. त्याबद्दल उल्लेख पुढें करीन. ही घटना त्या नशिबवान सां तियागु आणि सां फिलीप या दोन संतांच्या दिवशीं झाली, ज्या संतांच्या स्मरणार्थ व गौरवार्थ ती इग्रेज (चर्च) उघडी आहे. (तो संतांचा दिवस : १ मे)'

कुठ्ठाळ येथें पूर्वीच्या देवालयाच्या जागेवरच इग्रेज (चर्च) उभारलें व सध्या तेथें असलेली इग्रेज (चर्च)ची इमारत केव्हां, कोणी खर्च करून बांधली, याबद्दल आणखी कांहीं जास्त पुरावा आहे. गोमंतकांत जुन्या काळापासून ज्या ग्रामसंस्था, म्हणजे आज ज्यांना आपण कोमुनिदादी म्हणून ओळखतों, त्या प्रत्येक ग्रामसंस्थेच्या गांवांत त्या गावकऱ्यांचे देवालय होतें व त्या देवालयाचा खर्च, उत्सव वगैरे त्या त्या ग्रामसंस्थेच्या उत्पन्नांतून होई. बाटाबाटीनंतर हिंदु देवतांचे स्थलांतर झालें. देवालयाच्या मूळ जागेवर ख्रिश्चनांनी चर्च स्थापिली. देवालयाचें उत्पन्न चर्चसाठीं बहाल झालें. पण या ग्रामसंस्था किंवा कोमुनिदादी-संबंधी जास्तींत जास्त माहिती एकत्र जमवून, फार वर्षांपूर्वी फिलीप नेरी शाव्हियेर या इसमानें 'बोस्केजु इस्तोरिकु दस कोमुनिदादीस' नांवाचा, सर्व कोमुनि-दादींचा एक इतिहास लिहिलेला आहे. या पुस्तकांत कुठ्ठाळ गांवच्या कोमुनि-दादीच्या संदर्भात जी माहिती प्रसिद्ध झालेली आढळते ती पुढें दिली आहे. त्या पुस्तकाच्या पृष्ठ ३२१ वर खालीलप्रमाणें मजकूर आहे :–

Bosquejo Histórico dos Comunidades, por Filipe Nery Xavier. A página 321.— '*Cortalim.*' 'A igreja ocupa o terreno do antigo pagode de Manguexa (V. Not. espe.) e foi construida à custa das aldeias reunidas sob a direcção do pe. Francisco de Aranha (sobrinho do primeiro Arcebispo de Goa, D. Gaspar, o qual entrou depois na Companhia de Jesus e foi um dos mártyres de Cuncolim sendo nela cantada a primeira missa em 1566.'

*A pagina 322*:—

A distância duns 125 passos da igreja havia uma cruz com lápide no peanha, com a seguinte legenda:—'NÊSTE LUGAR SE DISSE A PRIMEIRA MISSA E SE PÔZ A PRIMEIRA CRUZ EM SALCETE. AS ALMAS DO PURGATÓRIO PEDEM A SEUS DEVOTOS SE LEMBREM DELLAS COM PADRE NOSSO E AVE MARIA.'

Consta que esta missa foi celebrada em 1 de Maio de 1553.—A lápide foi transferida para sachristia da igreja depois que a cruz se arruinou.

*A pagina 323*:—

'Pedro Francisco Mascarenhas, primeiro natural de Salcete convertido ao christianismo, em 1 de Maio de 1553 pelo Jesuita do mesmo nome, era gancar do segundo vangor desta Comunidade e escrivão proprietário de Camara Geral, cujos descendentes vivem no bairro Ozoró de Aldeia Raia'...

Das certidões jantas ao processo pelo qual o Padre Mariano Rodrigues e Salvador do Rozário Rodrigues pretendiam habilitar-se gancares do quinto vangor denominado de 'Vaglós' habilitação julgada improcedente por Acc. de Relação de 23 de julho de 1802.—

वरील पोर्तुगीज भाषेतील मजकुराचें भाषांतर :

'बोस्केजु इस्तोरिकु दस कोमुनिदादीस–कर्ता–फिलीप नेरी शाव्हियेर. पृष्ठ ३२१ 'कुडाळ' चर्चची इमारत जुन्या श्रीमंगेश देवालयाच्या भूमीनें व्यापिलेली आहे. तिची बांधणी गांवांच्या जमावानें स्वखर्चानें केली गेली. व तिचें नेतृत्व पाद्री फ्रांसिस्क आरांज, म्हणजे गोव्याचा पहिला आर्चबिशप दों गास्पार, त्याचा भाचा, जो नंतरच्या कालांत कोंपाजीय दे झेझुस या संघटनेत शिरला व कुंकळ्ळी येथें हुतात्मा ठरला. त्या इसमानें केलेलें त्या चर्चमध्यें पहिलें मिस्स गायन इ. स. १५६७ सालीं झालें.

पृष्ठ ३२२ – चर्चच्या इमारतीपासून अवघ्या सव्वाशें पास्सांच्या अंतरावर (पास्स म्हणजे मनुष्य चालत असतांना एका पावलापासून दुसरें पाऊल जिथें टाकतो, त्यामधील अंतर) एक क्रॉस होता व त्याच्या पायाजवळच्या चौथऱ्याकडे एका शिलेवर खालीलप्रमाणें मजकूर कोरलेला होता.

'या जागेवर पहिलेंच मिस्स गायन ( ईशप्रार्थना ) सांगितलें व इथेंच सासष्टींत पहिला क्रॉस ठेविला. शुद्धपावन आत्मे देवभक्तांकडे याचना करतात कीं, त्यांनीं आपली सदैव आठवण ठेवावी.'

सदर मिस्स ता. १ मे १५५३ रोजीं झालें असें कळतें. व वर लिहिलेला मजकूर, ज्या शिलेवर होता, ती शिला तो क्रॉस मोडून गेल्यामुळें ( जमीनदोस्त झाल्यामुळें ) चर्चच्या इमारतींत जिथें धार्मिक वस्तु ठेवण्यांत येतात त्या जागेंत ठेवण्यांत: आली.'

सध्याच्या कालांत ( इ. स. १९७० मे महिन्यांत ) मुद्दाम कुशस्थली ( कुठ्ठाळ ) या गांवांत स्वतः जाऊन तेथें सद्यस्थिति पाहतां असें आढळून आलें कीं, हा क्रॉस मूळच्याच जागीं परत नवीन बांधणी करून उभा केला आहे. त्या क्रॉसवर जुनी पाषाणी शिला ( म्हणजे उल्लेखित शिलालेख ) परत बसविलेली आहे. पण, ती त्या क्रॉसच्या पायाजवळ नसून क्रॉसचा जो चबुतरा आहे, त्या चबुतऱ्याच्या मध्यभागीं बसविलेली आहे. या चबुतऱ्याच्या शिरोभागीं क्रॉसच्या खालींच १८५६ असें कोरलेलें आहे. यावरून हा क्रॉस प्रारंभी इ. स. १८५६ सालीं बांधला होता असें दिसतें. चबुतऱ्याच्या खालच्या भागावर १–५–१५६०—१–५–१९६० असे चुन्याच्या गिलाव्यावर कोरलेलें आहे. त्यावरून या क्रॉसची पुनर्बांधणी ता. १ मे १९६० रोजीं केली असावी. हा क्रॉस कुठ्ठाळ फेरीबोट बंदरावरून कुठ्ठाळच्या चर्चकडे जातांना चर्चच्या अलीकडे प्रमुख रस्त्याच्या उजव्या बाजूस एक लहान कपेल ( अगदी लहानशें चर्च ) आहे, त्या कपेला शेजारीं असून त्या क्रॉसपासून कुठ्ठाळ गांवची इग्रेज ( चर्च ) म्हणजे जुन्या काळीं ज्या जागेवर श्रीमंगेश देवाचे देवालय होते, ती जागा एकशें पंचवीस पावलांवर आहे.

'पृष्ठ ३२३– 'पेद्रु फ्रांसिस्क मास्कारेंजस, सासष्टींत जन्मलेला, याला ता. १ मे १५५३ या दिवशीं, पहिलाच हिंदु यास खिस्त धर्माची दीक्षा देण्याचें काम, त्याच नांवाचा झेझुइत पाद्रि याने केलें. हा पेद्रु फ्रांसिस्क मास्कारेंजस कुठ्ठाळ ग्रामसंस्थेच्या दुसऱ्या वांगडाचा गांवकरी होता व शिवाय तो 'कामर-जेराल'चा कायम लेखनिक ( चिटणीस ) होता, त्याचे वंशज आज राय गांवांत 'वजोरो' या वाड्यावर रहातात....'

पाद्री मारियानु रुद्रीगीस आणि साल्हादोर दु रोझारियु रुद्रीगीस हे दोघे इसम, आपआपले दाखले ( सर्टिफिकिटें ) सादर करून आपण कुठ्ठाळ

ग्रामसंस्थेच्या पांचव्या वांगडाचें म्हणजे 'वागळे' नामक वांगडाचे वारस व हक्कदारपणाची मागणी केल्याचें व ही मागणी नामंजूर केल्याचें ता. २३ जुलै १८०२ सालीं हायकोर्टानें दिलेल्या निकालावरून कळतें.

आणखी थोडीशी माहिती अशी:– कुठाळ गांवांत जी इग्रेज किंवा आतां सध्या चर्च आहे त्या चर्चच्या संबंधीची, तेथील खिश्चन ग्रामस्थांनीं इ. स. १९५९ सालीं, त्या वेळचे गोव्याचे मुख्य खिस्ती धर्माधिकारी गोव्याचे पात्रीयार्क दों जुजे व्हियैर आल्व्हेर्नाज यांनी कुठाळच्या चर्चला भेट दिली, त्या भेटीचे वेळीं मोठा जाहीर समारंभ व उत्सव केला; त्या भेटींत ता. ४ डिसेंबर १९५९ रोजीं एक छापील पुस्तिका चर्चच्या उत्सवास हजर असलेल्या खिस्ती इसमास वाटली होती. ही पुस्तिका अवघ्या चार पानांची असून ती कुठाळ गांवाचा एक ग्रामस्थ जुजे मारीय जास्तु क्रूज या इसमानें लिहिलीं व छापून वांटली. व त्या पुस्तिकेचें नांव 'क्रोनिक दा आल्देय दे कोर्तालीं' असें आहे. या पुस्तिकेंतील कांहीं अवघ्याच ओळी खालीं देण्यांत येत आहेत. याचें कारण, त्या पुस्तिकेस ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व नाहीं. पण ही पुस्तिका ज्या समारंभांत, गोव्याचे त्या वेळचे युरोपियन पात्रीयार्क कुठाळ गांवच्या चर्चला भेट दिलेल्या प्रसंगीं, त्यांच्या उपस्थितींत वाटली आहे, तो समारंभ व वेळ, काल, परिस्थिति लक्षांत घेतां त्या पुस्तिकेंतील मजकुरावर त्या चर्चमधील पुरातन कांहीं कागदपत्रांची छाया पडणें असंभवनीय नाहीं असें वाटल्यावरून व विशेष करून आतापर्यंत वर उल्लेखित पोर्तुगालच्या लिस्बन शहरांत इ. स. १७१० सालीं सरकारी इसमाच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध झालेला 'ओरियेंतु कोंकिस्तादु' हा ग्रंथ व इटालींतील रोम शहरांत १९६२ सालीं प्रसिद्ध झालेला 'दोकुमेंता इंदिका' हा प्रचंड ग्रंथ या दोन्हीं ग्रंथांत जीं त्या वेळच्या जेजुइत पाद्रींची अस्सल पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत, ज्यांतील अत्यावश्यक व जरूरीपुरता मजकूर मागें दिलेला आहे, त्या सर्व मजकुराशीं पूर्णपणें जुळत असल्यानें त्या पुस्तिकेंतील आवश्यकतेपुरता मजकूर खालीं देण्यांत येत आहे.

'CRÓNICA DA ALDEIA DE CORTALIM' por José Maria Jasso Cruz.—Oferecida por autor por ocasião da visita pastoral de S. Exa Rev. ma o Patriarca das Índias Orientais, D. José Viciro Alvernaz a paróquia da Cortali. Cortalim, 4-XII-1959.

'A paróquia de Cortalim tem por seus patrónos—S. Filipe e

S. Tiago, por no dia dêstes Santos apóstolos terem os padres de Companhia de Jesus posto os pés na primeira terra de Salcete no ano de 1560, tendo sido a respectiva igreja construida no ano de 1566, no mesmo lugar, onde se adorava o ídolo Manguexa à custa de duas aldeias reunidos sob a direcção do padre Francisco Aranha, sobrinho do primeiro Arcebispo de Goa, D. Gaspar de Leão Pereira, o qual entrou na Companhia em 1 de Janeiro de 1571 e recebeu em 1583 a corôa de martírio em Cuncolim sendo beatificado pelo Papa Leao XIII e se contou nela a primeira missa em 1 de Maio de 1566.

Foi desta freguesia um primeiro hindú brámane convertido ao catolicismo depois de conquista de Salcete, e para comemorar êste facto histórico foi erigida a Capela de S. Coração de Jesus (Previsão de 22-2-1892) do Patriarca das Índias Orientais D. Antonio Sebastião Velente, de saudosa memória, junto da qual existe uma cruz constando dum padrão a seguinte inscrição hoje um tanto apagada: "Nêste lugar se disse a primeira missa e se pôs a primeira cruz em Cortalim. As almas do purgatório pedem aos seus devotos Padre Nosso e Ave Maria."

वरील पोर्तुगीज भाषेंतील मजकुराचें मराठी भाषांतर सारांशरूपानें खालील-प्रमाणें आहे–

क्रेनिक दा आल्देय दे कोर्ताली [कुठ्ठाळ गांवचा जुन्याकाळचा इतिहास] लेखक जुजे मारीय जास्सु क्रूज–

पात्रीयार्क दस इंदियस ओरियेंताइस दों जुजे व्हियैर आल्हेर्नाज यांची भेट कुठ्ठाळच्या चर्चला झाली, त्या प्रसंगीं लेखकाकडून अर्पण. कुठ्ठाळ, ४ डिसेंबर १९५९–

कुठ्ठाळ या गांवाचे व चर्चचे दैवत सां फिलीप आणि सां तियागु, कारण, या संतांच्या दिनीं कोंपाजीय दे झेझुसचे पाद्री मंडळ, सासष्टींतील याच पहिल्या गांवांत आपले पाय इ. स. १५६० सालीं ठेवितें झालें. येथील इग्रेज (चर्च) बांधणी इ. स. १५६६ सालीं झाली, ज्या जागेवर जुन्या कालीं मंगेश देवाची

आराधना करीत असत, त्याच जागेवर करण्यांत आली. त्या चर्च बांधणीचा खर्च दोन गांव एकत्र जमून त्यांनी केला. त्याचें नेतृत्व व पुढाकार पाद्री फ्रांसिस्क आरांज, गोव्याचे त्यावेळचे पहिले आर्चबिशप दों ग्रास्पार दे लेयांव पेरैर यांचा भाचा, जो त्या कोंपाजीयमध्यें तारीख १ जानेवारी १५७१ रोजीं प्रवेश करता झाला, व पुढें कुंकळ्ळी गांवांत हुतात्मा ठरला, व ज्याचा पोप लेयांव १३ वा, यानें गौरव केला अशा इसमानें स्विकारलें होतें. त्या चर्चमध्यें पहिलें मिस्स [ ईश प्रार्थना ] ता. १ मे १५६६ रोजीं करण्यांत आलें. सासष्टी प्रांत काबीज केल्यानंतर याच गांवांत पहिला हिंदु ब्राह्मण धर्मांतर करून ख्रिस्ती धर्मांत आणला गेला व ही ऐतिहासिक घटना चिरकाल स्मरणात रहावी, एतदर्थ या गांवांत ' सां कुरासांव दे जेझुस ' या देवाच्या नांवें एक कपेल म्हणजे अगदी लहान चर्च किंवा प्रार्थना मंदिर, त्या वेळचे गोंव्याचे आर्चबिशप दों आंतोनियु सेबास्तियांव व्हालेंती, यांच्या ता. २२ फे ुआरी १८९२ रोजीं निघालेल्या हुकुमान्वयें बांधलें गेलें व त्या कपेला शेजारींच एक क्रॉस बांधण्यांत आला. व क्रॉसवर एक शिला स्मरणिका बसविली असू तीवर खालीलप्रमाणें मजकूर कोरलेला आहे. पण तो मजकूर आज जरासा पुस स्थितींत सांपडतो. ' या जागेवर पहिलें मिस्स ( ईश प्रार्थना ) सांगितलें आणि पहिला क्रॉस कुठ्ठाळ गांवांत रोवला गेला. शुद्ध पावन आत्मे देवभक्तांकडे याचना करतात कीं, त्यांनीं आपली सदैव आठवण ठेवावी. '

वरीलप्रमाणें माहिती लक्षांत घेतां खालील घटना सत्य ठरतात :–

१. कुशस्थली (कुठ्ठाळ) येथें कोंपाजीय दे झेझुसचें पाद्री मंडळ पहिल्यानेंच शिरलें, तें ता. १ मे इ. स. १५६० रोजीं सकाळीं व तेथें पोचल्यानंतर एक झाडाच्या फांद्यांचा तात्पुरता मंडप उभारून पहिलें मिस्स कथन केलें व संध्याकाळीं एका हिंदु मनुष्यास बाटवून त्यास बाप्तिस्मा दिला.

२. त्या रोजीं कुशस्थली येथील श्रीमंगेश देवालयाच्या इमारतींत देव नव्हता व तो त्या पूर्वी कोणास चाहूल न लागूं देतां लपवून सासष्टी प्रांताच्या हद्दीच्या बाहेर मुसलमानांच्या राज्यांत केव्हांच पळवून नेण्यांत आला होता.

३. जुन्या देवालयाची इमारत तात्पुरत्या चर्चस्थापनेसाठीं, सरकारी मंजुरी मिळवून वापरण्यांत आली. सरकारनें चर्चच्या स्थापनेसाठीं ती इमारत वापरण्यास मंजुरी तर दिलीच. शिवाय देवालयाचें सर्व उत्पन्न चर्चला बहाल केलें.

४. नंतरच्या कालांत, जुन्या देवालयाची इमारत मोडून त्याच जागीं इंग्रेज

(चर्च) नवीन इमारत बांधणी, गोव्याचे जुन्या काळचे पहिलें आर्चबिशप यांच्या भाच्यानें म्हणजे पाद्री फ्रांसिस्क आरांज यानें कुट्ठाळ व शेजारचा गांव या दोन गांवांतील लोकांकडून पैसे जमवून, आपण पुढाकार घेऊन व नेतृत्व करून ती इमारत बांधणी पूर्ण इ. स. १५६६ सालीं केली व त्याच सालीं १ मे रोजीं नवीन चर्च बांधणीनंतर पहिलें मिस्स गायन मोठ्या उत्सवानें केलें गेलें.'

या सत्य घटनानंतर व उल्लेखित अत्यंत खात्रीच्या विश्वसनीय तत्कालीन पुराव्यानंतर एक गोष्ट निसंःशयपणें सिद्ध होते कीं, कुशस्थलीहून श्रीमंगेशशिवलिंगाचें स्थलांतर ता. १ मे इ. स. १५६० दिवसापूर्वी खचित फोंडे तालुक्याच्या प्रियोळ गांवांत अंत्रुज महालांत, आजच्या मंगेशी वाड्यावर झालें आहे, यांत मुळींच संशय नाहीं. व ही घटना निर्विवाद होय. आतां हे स्थलांतर बरोबर इ. स. १५६० या वर्षीच ता. १ मे पूर्वी म्हणजे जानेवारी ते एप्रिल पर्यंतच्या कालांत झालें, कीं त्या पूर्वी झालें आहे, याबद्दल अद्याप खात्री ठेवण्यासारखा सरकारी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा लेखी पुरावा उपलब्ध झालेला नाहीं. पण मंगेश देवस्थानच्या जुन्या कागदपत्रांत व विशेषें करून त्या देवालयाची संस्थापना, महाजन समुदाय व कारभाराचा कर्तव्यनिर्बंध या संबंधी मसुदा, त्या वेळच्या सरकारकडे मंजुरीकरता पाठविण्याचे कागदपत्र, यांची तपासणी करतां, त्यांत स्पष्टपणें, त्या वेळच्या महाजन मंडळीनें आपल्या सभेंत एकमतानें ठराव केलेला आढळत असून त्यांत श्रीमंगेश देवाचें कुशस्थली उर्फ कुट्ठाळ येथून प्रियोळ येथें, सध्याचे जागीं इ. स. १५६० सालीं स्थानांतर झालें असा उल्लेख आहे. व हा महाजन लोकांनीं केलेला ठराव तारीख ३० ऑक्टोबर सन १८८५ या दिवशीं केलेला असून त्या ठरावांत ज्या महाजन इसमांनी आपआपल्या स्वाक्षऱ्या केलेल्या दिसतात. ते किंवा त्यांतील कांहीं इसम आज तागायत जर हयात असते तर, त्यांचें यावेळी वय निदान एकशें पंचाहत्तर (१७५) वर्षांपेक्षा जास्त ठरली असती, हे त्यांच्या कुटुंबियांकडून समजूत येतें.

कुशस्थलीहून प्रियोळ गांवीं श्रीदेव मंगेशाचे स्थलांतर कोणत्या महिन्यांत व कोणत्या तिथीस किंवा तारखेस निश्चितपणें झालें याबद्दल जसा कांहींच विश्वसनीय पुरावा नाहीं, त्याचप्रमाणें सध्याच्या प्रियोळ गांवांत मंगेशी वाड्यावर श्रीदेव मंगेश शिवलिंगाची प्रतिष्ठापना कोणत्या महिन्यांत कोणत्या दिवशीं झाली याबद्दलही कांहीं लेखी पुरावा अद्याप तरी उपलब्ध झालेला नाहीं. परंतु या दोन्ही घटना केव्हां झाल्या असाव्यात, याबद्दल संभाव्य दिवस ठरवितां येतील

असें वाटतें. कोणत्याही देवाची प्रतिष्ठापना करावयाची झाल्यास, हिंदुधर्मशास्त्र, ज्योतिष वगैरेंचे नियम लक्षांत घेतां ही प्रतिष्ठापना दक्षिणायनांत कधीच होणें शक्य नाही. कारण ते अशुभ मानलें जातें. व देव प्रतिष्ठा उत्तरायणातच करणें शुभ आहे, असा धर्मशास्त्र, ज्योतिष, मुहूर्त, या सर्वांचा संकेत आहे. यावरून ती प्रतिष्ठा उत्तरायणांतच झाली असली पाहिजे. उत्तरायणाचा काल सर्वसाधारणपणें मार्गशीर्ष महिन्यापासून ज्येष्ठ–आषाढ महिन्यापर्यंत, म्हणजे डिसेंबर किंवा जानेवारीपासून जूनपर्यंत बहुधा असतो. ही परिस्थिति लक्षांत घेतां,व तारीख १ मे १५६० दिवसापूर्वी कुशस्थलीहून श्रीमंगेश शिवलिंग प्रियोळ गांवीं स्थलांतर झाल्याचा पुरावा मिळतोहें लक्षांत घेतां, तसेंच श्री मंगेश देवालयांत दर वर्षी फक्तच कार्तिक शुक्ल त्रयोदशी दिवशीं होणाऱ्या उत्सवासच प्रतिवर्षी श्रीमंगेश देवाची पालखी खांद्यावरून वाहविण्याचा बहुमान त्या देवाचे वत्सगोत्री कुळावी महाजनास देण्यात येतो, या गोष्टीचाही बारकाईने विचार करतां, असें दिसतें कीं, कुशस्थलीहून रातोरात, गुप्तपणें, श्रीमंगेश शिवलिंग जे प्रियोळ गावात आणले गेलें, तो दिवस कार्तिक शुक्ल द्वादशी रात्रौपासून कार्तिक शुक्ल त्रयोदशीचा दिवस असणें शक्य आहे व कार्तिक महिना दक्षिणायनात येत असल्यामुळें, ते श्रीदेवाचे शिवलिंग मंगेशीस आणल्यानंतर कांहीं दिवस नित्य नैमित्यिक पूजा अर्चन विधी चालू झाल्या. पण, सर्व महाजन एकत्र जमून पुढील विचारविनिमय, इमारत बांधणीची व्यवस्था, प्रतिष्ठापना करण्यासाठीं उत्तरायणाची मार्गप्रतिक्षा व सुमुहूर्त इत्यादि कार्यक्रम पार पाडणेस अत्यावश्यकपणें व साहजिकच निदान कमीत कमी तीन महिने तरी गेले असले पाहिजेत. व अशा आखणीनें विचार करतां, ती सुप्रतिष्ठापना माघ शुक्ल पौर्णिमा याच रोजीं झाली असावी असें वाटतें. कारण, श्रीस्थळ मंगेशीं माघ शुक्ल पौर्णिमा हाच दिवस महोत्सव महापर्वणीचा. सार्वजनिक गाऱ्हाणे श्रीकडे घालणें, वार्षिक कौलाचा प्रसाद देणें, वगैरे सर्व महत्वपूर्ण कार्यक्रम, त्या एकाच दिवशीं वर्षांतून एकदांच होतात. त्याच दिवशीं सर्वांत मोठा रथोत्सव होतो व श्रीमंगेश देवस्थानचा सर्वांत मोठा वार्षिक महोत्सव हाच मानला जातो. या देवाचे कुळावी महाजन याच महोत्सवास शक्यतों गैरहजर न राहतां श्रीमंगेश देवाच्या भेटीस येऊन रथावर नारळ फोडतात. या महोत्सव महापर्वणीचा सर्व खर्च महाजनांतर्फे देवस्थानच्या भांडारांतूनच खर्च होत असतो. शास्त्रकारांनी देव प्रतिष्टेस मुहूर्त सांगतांना माघ मासांत श्रीविष्णु मूर्तीवाचून अन्य देवतेची प्रतिष्ठा करावी असेही सांगितलेले आहे. या

सर्व गोष्टींचा अभ्यास करतां श्रीमंगेश शिवलिंगाची सुप्रतिष्ठापना प्रियोळ गांवीं, प्रस्तुतच्या जागीं उत्तरायण कालांत, माघ शुक्ल पौर्णिमा या शुभदिनीं झाली असावी असा बहुतांशी समज होतो.

आतां श्रीमंगेश शिवलिंग कुशस्थलीहून अंत्रुज महालांत प्रियोळ गांवांत जें रातोरात खांद्यावरून वाहवून आणलें गेलें, तो दिवस कार्तिक शुक्ल द्वादशीची रात्र व त्रयोदशीचा दिवस असावा, हें मागें नमूद केलें असून त्याचीं कारणेंही सांगितलीं.

कार्तिक शुक्ल द्वादशी–त्रयोदशीचा दिवस सर्वसाधारणपणें आक्टोबर महिन्याच्या शेवटीं किंवा नवंबर महिन्याच्या सुरुवातीस येत असतो व अशा स्थितींत हें स्थलांतर इ. स. १५६० सुरू होण्याच्या आसपास साधारणपणें दोन महिने पूर्वी झालें असणें असंभवनीय वाटत नाहीं. कारण, कार्तिक शुक्ल त्रयोदशीस श्रीमंगेश शिवलिंग प्रस्तुतच्या जागीं पोंचल्यानंतर त्या नंतरच्या माघ शुक्ल पौर्णिमेच्या शुभदिनीं सुप्रतिष्ठापना झाली असें गृहीत धरलें तर मध्यंतरीचा अवधी फक्त तीनच महिन्यांचा ठरतो व हा अत्यल्प काल सर्व महाजन जमून देव प्रतिष्ठापनेची व्यवस्था व लहानशी तरी अत्यावश्यक देवालयाची इमारत पूर्ण होण्यास अत्यंत गरजेचा ठरतो.

□ □ □

# ४ | स्थलांतरपूर्व देवालयाची मालमत्ता

कुड्डाळ येथें श्रीमंगीशाचें देवालय असतांना, त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या बागायती, शेतजमिनी, कुळागरें खुद्द कुड्डाळ गांवांत, तसेंच कुवेली, कांसावली, पाली वगैरे गांवांत ज्या होत्या, त्याबद्दल जी माहिती पणजी येथील सरकारी 'आरकिव्हु इस्तोरिकु' मध्ये असलेल्या 'फोराल दे सालसेत' या सन १५६८ सालच्या वहीवर पृष्ठ ४५६ ते ४६४ पर्यंत मिळते ती पुढें दिली आहे.

## मंजीनाथ देवालयाच्या जमिनी

१. एक जमीन ज्यांत कांहीं नारळीचीं झाडें, आंबे, फणस व इतर फळांचीं झाडें आहेत व जी जमीन मंगूभट, नारायणभट, दुगोभट, मांगोरस (मांगिरीश) भट, दुलोभट रामुभट इत्यादि भट जमिनींत राहात व जी जमीन उपभोगित असत. नंतर ती जमीन व्हिस्सरेय दों आंतांव दे नोरोंज यानें कुड्डाळ येथील सां तियागु व सां फिलीपच्या चर्चला दिली.


२. एक जमीन 'दुआलिचें भाट' नामक, जी जमीन मल्लू धुमाळी उपभोगित असे व नंतर ती जमीन उल्लेखित चर्चला दिली.

३. एक जमीन 'मालाराचें भाट' नामक जी जमीन केशव नांवाचा इसम, देवस्थानचा सेवेकरी नोकर असे, त्याच्या भोगवटीचें व नंतर ती जमीन चर्चला दिली.


४. एक जमीन 'अभिषेक्यांची नमशी' नामक, जी जमीन बाळोभट अभिषेकी उपभोगित असे व नंतर ती चर्चला दिली.

५. एक बागायत नारळीची 'देवसा वारे' नामक, जी जमीन आबुलोभट व मंगूभट उपभोगित असत व नंतर ती बागायत चर्चला दिली.

६. एक बागायत नारळीची 'सिंधु पदीं तळें' जी जमीन बाळभट व झुलभट उपभोगित असत व नंतर ती चर्चला दिली. याच बागायतीस 'शिरवड पांडीतळें' असेंही म्हणत असत.



श्रीगणपती




श्रीभगवती




श्रीसांतेरी




श्रीमूळकेश्वर




श्रीवीरभद्र



श्रीलक्ष्मीनारायण



श्रीकौंडिण्यपुरुष



श्रीकाळभैरव

७. एक जमीन ' मंगा शेणैयलें कुळागर ' जी जमीन देवस्थानचा सेवेकरी दुलुभट उपभोगित असे, व नंतर ती चर्चेला दिली.

८. एक जमीन ज्या जमिनींत मंगनाथाचें देवालय होतें, ती जमीन व ज्या जमिनीच्या सभोंवतीं ' हरिजागराचें ' व ' जोतींचें ' नामक दोन वेगवेगळे जमिनीचे तुकडे आहेत. व नंतर ही जमीन चर्चला दिली.

९. एक जमीन ' मेर्गुऱ्याची नमशी ' जी मांगो मेर्गुरी उपभोगित असे.

## शेत जमिनी

१०. ' बोरीयाचो जांवों ' नामक शेत, दोन पिकांचे.
११. ' मायऱ्याकी अभिषेक्याचो जांवों ' नामक शेत, दोन पिकांचे.
१२. ' केसवाचें पंच ' व ' मोलवाचें आडेचें ' नामक शेत, दोन पिकांचे.
१३. ' बौयन्याकि जांवों ' नामक शेत, दोन पिकांचे.
१४. ' कुळतारीयाक देवरस ओडाराचो जांवों ' नामक शेत, दोन पिकांचे.
१५. ' तळजांवों ' नामक शेत, दोन पिकांचे.
१६. ' तावै जांवों ' नामक शेत, दोन पिकांचे.
१७. ' हर शेत ' नामक शेत, दोन पिकांचे.
१८. ' बामणा सांकेरी ' नामक शेत, दोन पिकांचे.
१९. ' बना घसासालें पंच ' नामक शेत, दोन पिकांचे.
२०. ' हरभटालें विकंडीची पंच ' नामक शेत, दोन पिकांचे.
२१. ' पाणी जांवों ' नामक शेत, दोन पिकांचे.

## कुवेली गांवांत असलेल्या शेत जमिनी

२२. ' व्हडली सांकेरी ' नामक शेत, दोन पिकांचे.
२३. ' धाकटी सांकेरी ' नामक शेत, दोन पिकांचे.

## कांसावली गांवांत असलेली शेत जमीन

२४. ' पांचे पातोळी ' नामक शेत.

## पाली गांवांत असलेली शेत जमीन

२५. ' तळें शेत ' नामक शेत.

## चिखली गांवांत असलेली शेत जमीन

२६. ' कमर पटी ' नामक शेत.

## सांतेरी व केंसूभू (केशव ?) देवालयांच्या जमिनी

२७. एक जमीन ज्यांत सांतेरी व केंसूभू या दोन देवतांचीं वेगवेगळीं देवालयें होतीं व जी जमीन त्या देवालयांचे सेवेकरी दुद्धभट, बाळोभट उपभोगित असत.

२८. एक जमीन 'सांतेरीची व केशवाची भाटां दोन्ही' ती जमीन लख्याभट, दुलोभट व बाळभट उपभोगित असत.

### शेत जमिनी

२९. 'बोरिदी सांतेरीची पंच' नामक शेत, दोन पिकांचे.

३०. 'कुळतांती सांतेरीची पंच' नामक शेत, दोन पिकांचे.

३१. 'पोमडु जांत्रों' नामक शेत, दोन पिकांचे.

## वीराच्या देवालयाच्या जमिनी

३२. एक जमीन 'वीराचो देव' ज्यांत वीराचे देवालयाची इमारत होती, ती जमीन.

### शेत जमीन

३३. 'आंबो केरी वीराचो पंच' नामक शेत, दोन पिकांचे.

## कपिलेश्वर देवालयाच्या जमिनी

३४. एक जमिनीचा लहान तुकडा, ज्यांत फक्त कपिलेश्वर देवालयाची इमारत होती तेवढी जमीन.

३५. 'धाकोलो वेणो' नामक शेत, दोन पिकांचे.

## नारायण व भगवती देवालयाच्या जमिनी

३६. एक जमीन 'सत्राचें भाट' व 'वेगे वैले मारे' नामक, जी शंकर भट नांवाचा देवालयाचा सेवेकरी उपभोगित असे. ती जमीन नंतर मानुएल आंतांव नांवाच्या स्थानिक ख्रिश्चन इसमास, व्हिसरेय दों आंतांव दे नोरोंज यानें दिली.

३७. एक जमीन 'शंकरभटाची नमशी' नामक, जी शंकर भट नांवाचा देवालयाचा सेवेकरी उपभोगित असे.

### शेत जमिनी

३८. 'वयलो वेगो' नामक शेत, दोन पिकांचे.

३९. 'पट चोर' नामक शेत, दोन पिकांचे.

## गोपीनाथ देवालयाच्या जमिनी

४०. एक जमीन जिथें गोपीनाथाच्या देवालयाची इमारत होती, व जी हरीभट उपभोगित असे.

४१. ' येपोर शेत ' नामक शेत, दोन पिकांचे.

## सांतेरी आणि चंद्रनाथ ज्याला नारायण म्हणतात त्या देवालयाच्या जमिनी

४२. एक जमीन ज्यांत वरील देवालयांच्या इमारती होत्या व जी जमीन गोरख गुरव उपभोगित असे.

४३. ' तळै ' नामक जमीन.

## शेत जमीन

४४. ' आंसुराल्यांत तळै ' नामक शेत.

## कुळागर

४५. एक कुळागर ' आझीपल ' नामक, जें फ्रांसिस्क कुतींज नांवाचा ख्रिश्चन इसम भोगित आहे.

४६. ' गुरु शेतांतील कुरुंगी ' नामक शेत. या जमिनीचा भोगवटदार त्यांतील एका कुणगीची रोवणी करी व त्या कुणगींत पिकलेलें भात देवालयांत व लोक, ' नवें भात ' म्हणून नेत असत.

४७. ' कमराचे पाच ' नामक शेत दोन पिकांचे.

१. गांवकार लोक (ग्रामस्थ) यांनीं प्रतिवर्षी सुपारीचीं सात झाडें (माड्या) प्रत्येक देवालयास एक माडी म्हणजे सुपारीचें झाड, याप्रमाणें दिलींच पाहिजे होतीं. (बहुतेक हें सुपारीचें झाड, देवालयासमोरील होलिकोत्सवासाठीं असावें असें वाटतें.)

२. गांवकरी किंवा ग्रामस्थ यांनीं प्रतिवर्षी ४८ तांगें पांढरीं-पैकीं ३३ तांगें पांढरीं नृत्यांगनांस आणि १५ तांगें पांढरीं वाजंत्री लोकांस-द्यावीं लागत.

३. शिवाय १२ गिडे तेल दर महिन्यास, मंगनाथाच्या देवालयास गांवकऱ्यांकडून दिलें जाई. या देवालयाशेजारीं एक भुसारी दुकान होतें, त्याचें उत्पन्न गांवकऱ्यांस मिळे. परंतु नंतर तें दुकान चर्चच्या शेजारीं झाल्यानें कोणीच भाड्यास करीनासे झाले व उत्पन्न येईनासें झालें. पुढें तें मोडूनही गेलें.

४. त्याचप्रमाणें गांवकरी लोक ( ग्रामस्थ ) यांनीं प्रतिवर्षी देवालयांत गायन करणाऱ्यांस १५ तांगें पांढरीं, तसेंच रथासाठीं ९॥ तांगें पांढरीं, पेर्णी म्हणजे जागर करणारांस २४ बाझारक्या, बरगणी, २५ सुपाऱ्या आणि १०० विड्याचीं पानें दिलींच पाहिजे होतीं.*

पोर्तुगीज राजवटींत व्हायसरॉयच्या हुकुमावरून देवालयाच्या मालकी हक्काच्या सर्व जमिनी होत्या; त्या सर्व जमिनींचा पंचनामा जज्जाच्या उपस्थितींत कुठ्ठाळ येथें ता. ५ मार्च १५६८ रोजीं केला होता. त्या पंचनाम्याचा सरकारी दप्तरांतून घेतलेला दाखला श्री मंगेश देवस्थानच्या दप्तरांत आहे. त्याची नक्कल खालीं दिलेली आहे :—

GAJANANA GANTCAR, conservador-intérprete do Arquivo Histórico o Estado da India.... . .... .... .. .................

Certifico, a requerimento da Mazania da Devalaia de Xri Manguexa de Priol do Concelho de Pondá, representada pelo seu procurador da mesa administrativa Gajanana Sinai Mulgãocar, rever o "Foral de Salcete" (1568) e dele a fls. 456 a 464 constar o auto e a discrição de prédios que segeum: . .... ........

" . ....... .. . . . .Alldeya de Qurtally.. ... .. ........... "

"Auto que se fez do juramento que se deu aos guamcares e escrivãis da alldeya Quortaly. . ... .. ..........................

* वरील सर्व जमिनींचीं नांवें व माहिती "फोराल द सालसेत" पृष्ठ ४५६ ते ४६४ वर जो पंचनामा तारीख ५ मार्च सन १५६८ रोजीं कुठ्ठाळ गांवांत केला गेला होता त्यांतील असून या दाखल्याचें कायदेशीर सर्टिफिकीट श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांत आहे. हा पंचनामा त्या सालीं गोव्यांतील पोर्तुगीज व्हायसरॉय यांच्या हुकुमानें केला गेला असून तो पंचनामा जज्जाच्या उपस्थितींत केला गेला व त्यांत ज्या जमिनी देवालयांच्या आणि त्यांच्या सेवेकऱ्यांच्या मालकीच्या आणि भोगवट्याच्या होत्या, त्या सर्व जमिनींची आणि मालमत्तेची तपशीलवार यादी केली गेली होती. या यादींत देवालयें व त्यांच्या सेवेकऱ्यांच्या जमिनी, गुरव, पेर्णी, जोशी, महार, सुतार, लोहार, रंगारी, मेर्गुरी, भट, घाडी, हिलामतदार, पालखी वाहविणारे, नऊ रात्री देवालयांत निजणारे, कुंभार, भांडारी (खजिनदार), अविवाहित नृत्यांगना, तसेंच देवालयांस अर्पण केलेल्या जमिनी (कुठ्ठाळ व कुठ्ठाळ गांवाबाहेर असलेल्या), तसेंच सोन्याचे दागिने, चांदीच्या वस्तू, रेशमी वस्त्रें, तांबें, पितळ व इतर धातूंच्या वस्तू, घंटा व त्या टांगण्यास वापरलेल्या चांदीच्या सांखळ्या वगैरे वगैरे सर्व वस्तूंची यादी त्या पंचनाम्यांचेवेळीं करण्याचा हुकूम त्या जज्जाकडून फर्माविला गेला होता.

Aos symquo dias do mes de Marso de myll e quynhentos e sesemta e oito anos em Salsete na aldeya de Quartally estamdo Ambrozio de Souza Juyz dos Orfãos da Jente da Terra fazendo tombo das fazendas que pertesyão aos paguodes e seus servydores por mãdado do Senhor Viso Rey com allsada etc. por seu mãdado forão jumtos todos os gamcares e escrivão da dita alldeya os quays são os segymtes a saber Narasa Synay-Matemea Synay-Loqu Synay-Mãgu Synay-Vytu Synay-outro Mamgorasa Synay-Vy Mãgana Nayque-e Lomu Synay-e Samtapa Nayque e Rama Nayque-Mãgu Deully (sic)-todos gamcares e Quensu Synay escrivão aos quays o dito Juyz mãdou dar juramento na roda segumdo seus custumes pera que bem e verdadeiramente dem nesfe Livro do Tombo e decrarem todas as fazendas que pertemsyam aos paguodes e a seus servydores a saber-as fazendas dos grous dos pernys, dos zousys dos jogues dos farazes dos carpymteiros dos ferreyros dos pymtores dos mergurys dos batas que são choquareyros que. . . namasis dos pagodes dos garis dos que fazem covas as aryqeyras dos que lavã a bãdeira do paguode dos que levã o paguode fora dos que dorme nove noytes nas cazas dos pagodes dos que erramão as cazas dos paguodes e dos gamcares dos oleyros que tem namasis do pagode dos bamdarys que são os tezoureyros das fazendas asi palmares como varzeas que as outras alldeyas derã aos paguodes da sua alldeya, dos molheres sollteiras servydoras dos pagu [odes] das bailadeiras das fazendas que [eles derão] aos paguodes doutras alldeyas de todalas joyas de ouro e prata panos de seda e outro todo fato todo o serviso de cobre metall latão campaynhas rabos encastoados de prata de todas outras mais fazendas asy do mevell como de raiz aquy escritas como por escrever que pertensão aos paguodese seus servydores todos desem neste lyvro de tombo sob pena que negando allguma couza de serem castigados cõforme nas penas comteudas na provizão a qual lhe toda foy lida e decrarada por my escrivão e limgoa Jorge de Menezes e asi que nõ darã nenhuas

fazendas que nõ pertemserem aos paguodes e seus servydores doutras pesoas allgumas por odios e maqueremsa que tenhã hus contra os outros sob pena de serem castigados nas penas comteudas na dita provizão do Senhor Vizo Rey e eles gamcares escrivão asy o prometerã e derã as couzas segymtes de que o dito Juyz mãdou fazer este auto de juramento domde se asynarã cõ o Juiz e Lymgoa e testemunhas prezentes Bastião Paiz e Joã Coutinho e Gaspar Fernandes crystãos da terra e Allvaro Gonsalves e outros eu Pero Cornejo escrivão que ho escrevi-e dq todo o gado vacas bufaras escravos escravas Pero Cornejo escrivão que ho fiz . . . assinou Manoel Ãtã que e guamcar-Pero Cornejo que o escrvy..............................

—Assinaturas em carcteres canareses arcaicos, traduzidos em português no original: ...............................................

—Vytu Synay-Mãgarsa Synay-Mãgu Synay-Matymo Synay-Loqu Synay-Mãgarsa Synay-Magana Nanygin(?)-Lomu Synay-/Sã/ tupa Naique-Mangana Nayque-Ramu Nayque-Mãgu Dellvy-Quesu Synay-João Coutinho... ...... ..... .............................

Assinaturas em português: /Bastião/Paiz-Ambrozio de Souza-Souza-Jorge de Menezes...... .. ...............................

...... ..... ..... ...Do pagode de Mamginato......................

—Hum chão que tem allgumas palmeyras mãngeyras jaqueyras e outras arvores de fruyto que pesuyão huns botos por nome Mãgu Boto Narayna Boto Dugo Boto Mãgorsa Boto Dulo Bot e Ramu Bot e outros botos em que todos moraã que parte co com o camynho do tamque e com o chão aode e com o chão de Molu e com a serra este chão nã se avalio nem lhe foy posto foro por ser feita merse dele a ygreja de São Tiago e São Felipe pelo Senhor Vyzo Rey Dom Ãtão de Noronha.... . ..............

—Outro chão por nome Duãlyche Bat que tem allgumas pallmeyras e mãgeyras e jaqueyras e outras arvores de fruyto que pesuya Molu Domaly que parte de huma bamda com o chão de Devary e com o chão Aodem e com o chão de Quensua e com a serra este chão tãbeeche(?) feita merse dele a dita ygreja

e por yso se nom avalyou ne foy posto foro........ ... ..........

—Outro chão por nome Malarache Bat que pesuya hum Quensua servydor do paguode que tem algumas pallmeyras mãgeyras tamaringeyros e outras arvores de fruyto que parte com a serra e com o chão dos devalys e com o chão odem e com o pallmar de Mãgu Synay este chão tambem he da dita ygreja por lhe ser feita merse e portanto nõ foy ava [liado] nem lhe foy posto foro..........................................................

—Hum pallmar por nome Abesequache namasy que pesuya Balo Boto Absequa que parte cõ a serra e com o pallmar de Mãgu Synay e com o chão Aodem e com o pallmar de Mãgu Synay este Tambem e feito merse para a dita ygreja pallmar nõ foy avalyado nem posto foro. .... ................. . ......... ...........

—Outro pallmar por nome Deusa Varem que pesuya Abulo Boto e Mãgu Boto que parte com a serra e com o pallmar de Madu Gasaso e com o chão Aodecazan e com o pallmar de Loqu Synay e paga de foro a gamcarya tres barganis cada ano este pallmar tambem e feito merse dele a dita ygreja nõ lhe foy posto foro ne avaliado o quall pallmar se chama Mãdoycaralem e o padre Diogo Mascahenhas que rezyde na ygreja de Quortaly dise ser feita merse dele e dos outros atras e diamtes a dita ygreja... ..... ....... ........................

—Outro pallmar que tem oyto nove pallmeyras e mãgeyras e outras arvores que parte com a serra e cõ o pallmar de Ari Boto e com o chão Aodycazan e com o pallmar de Madu Gasasu e paga de foro a gamcaria cada ano quatro barganys que pesuya Ball Boto e Jull Boto e chama se o pallmar Sindo Padymtalem este pallmar tambem e feyta merse a dita ygreja e nõ foy avalyado nem posto foro este pallmar se chama Sirvada Pãditalem que pesuya Dulu Boto e Ball Boto. .... .. ... ...... ... ........... ....

—Outro chão por nome Mãgasynyalem Culagor que pesuya Dulu Boto servydor dos pagodes em que tem allgumas pallmeyras e arvores de fruyto que parte com a serra e com o pallmar de Mãgu Synay e cõ o chão Aodecazan e com o pallmar de

Ary Boto paga de foro gamcaria dous barganys cada ano este chão tambem e dado a dita ygreja nõ foy avaliado nem posto foro.

—He obriguado o dito tezoureiro a paguar por os tres chãos aforados a Francisco dAguyar de treze de Dezembro de 1569-porque te o dito tempo esteve devoluto/senho pesuir senão os padres de alguma cousa/... ..........................................

—Outro chão em que estava o paguode Mãguanato em que ora esta nosa ygreja e o redor deste chão estão dous pedasos de chãos com allgumas pallmeyras hum por nome Arzagarachem e outro por nome Jotichem que parte cõ a serra e cõ oiteyro e com hum tãque e cõ o oiteyro outra vez-tudo e da ygreja pola mesma maneira atras e asyma........... .. ..... ....... ......................

—Hum chão em que estam allgumas pallmeyras mãgeyras e jaqueyras e outras arvores por nome Merguriache Namasi que pesuya um Mãguo Mergury que parte com a serra e com o camynho e com ho chão Aodi e com a orta de Vitu Synay/este chão pagua de foro em cada ano de foro para o cobrymento do paguode symquo tangas bramcas foi avalyado em doze pataquõys e de foro as symquo tangas que ja tem.... ..... ...........

.... ............................ Varzeas ...........................................

—Huma varzea por nome Boryacho Jaõo que he de duas novydades que parte com a varzea Samterichem pamcha e com a varzea Caliacho Jaoho e com o esteyro sallgado e com o caminho......

—Outra varzea por nome Mayryaquy Abasequacho Jãoho que parte cõ o ribeiro dose e cõ a varzea Udo e com a varzea Bãdyr e com varzea Ambejãoho e de duas novydades.........

—Outra varzea por nome Quensuachem Pmcha e Molvache Adeche que parte com os arecays da gamcarya e com a varzea Amba Jãoho e com a varzea Bamdiache e com a varzea Não Set pagua de foro a gancaria duas tangas brãcas e hum bargany cada ano de duas novydades..... .. .... ....................................

—Outra varzea por nome Boyniaquy Jãoho que parte com o ribeiro dose e com a varzea Ambo Jãoo e com ho ribeiro Arny e com a varzea Chouto Jãoho de duas novydades.... ....... .......

—Outra varzea por nome Culltariacuo Devorsa Odaracho Jãoho de duas novydades que parte cõ o valado Ado e com a varzea da gamcarya e com o ribeiro Arny e com a varzea Tall Jãoho.
—Outra varzea por nome Tall Jãovo de duas novydades que parte com o valado Ado e com a varzea Deusa Jãoho e com o ribeiro Arny e com a varzea Corpo Jãoho.........................
—Outra varzea por nome Tavei Jãoho de duas novydades que parte com Aodychy Symae com a varzea Pathe e com a varzea Patoly e com a varzea Camarache Pamcha....... .... ..... .....
—Outra varzea por nome Hara set que he de duas novydades que parte com a varzea Camorly e com a varzea Pondo Jãoho e com a varzea Patoly Bamdo e com o ribeiro.............. ... .
—Outra varzea por nome Bamnasãquery que parte cõ o chão do paguode Gopynato e com a varzea Moguo e com a varzea Pomdu Jãoho e com a varzea gamvyqua de duas novydades.
—Outra varzea por nome Banagasasalem Pamcha de duas novydades que parte duma bamda com Pathacho Bamdo e cõ a varzea Pan Jãoho e com o ribeiro Arny e com a varzea Gasasalem.
—Outra varzea por nome Arbatalem Vycandychy Pamcha de duas novydades que parte com Patacho Bamdo e cõ a varzea Gasasalem set e com o ribeiro Arny e com a varzea cayty.... ...
—Outra varzea por nome Pany Jãoho de duas novydades que parte cõ Pathacho Bamdo e com ho valado carãdi e com o ribeiro Arny e com a varzea Pamcha pagua de foro a gamcarya tres tangas bramcas quada. ano............ ... ..... ............ ..
—Outra varzea por nome orlysãqueri que esta na alldeya de Quoely de duas novydades que parte com o chão baty e cõ o arecall de Butu Nayquo e com a varzea Antopathe e cõ ribeyro esta varzea cõprou hum omem ãtyguo desta alldeya de Curtaly e deu a ao paguode de Maginato.. ....... . .. . .. ... .
—Outra varzea por nome Daquoti Sãqery que esta tambem na dita alldeya Quely de duas novydades que parte com o ribeiro e com o lymyte dalldeya de Nagoa e com a varzea Anto Pathe e com o chão Baty/esta varzea se deu tambem ao paguode pola

mesma maneira ............................................................
—Outra varzea por nome Pamche Patoly que esta na alldeya de Camsauly que lhe nõ sabe as comfromtacõis que cõprou hum omem desta alldeya e a deu ao dito paguode e o pesuydor desta varzea que he servydor do paguode pagava aos gãcares de Camsauly de foro duas tangas bramcas cada ano..............................
—Outra varzea por nome Talem Set que esta na alldeya de Pale que hum omem amtiguo desta alldeya de Curtaly comprou e a deu ao paguode desta alldeya e o pesuydor da dita varzea paguava de foro a gamcarya dadyta alldeya de Pale seis barganys cada ano e lhe nõ sabe as comfromtacõis..........................
—Outra varzea que esta na alldeya de Chyquyly per nome Camarpati que lhe nõ sabe as comfromtacõis comprou o dito omem e a deu ao dito paguode como se dis tras e arriba........

....... .... .. .Do pagode Samtery e Quensoo Boo................

—O chão em que estavã os ditos pagodes que tem allgumas pallmeyras e allgumas arvores de fruyto que pesuya Dulu Boto e Ballo Boto servydores dos pagodes que parte com a serra com o arecall de Mamgu Nayque e com hum tamque e com o ribeiro foy avalyado com dous pataquoys e foy lhe posto hum barguany de foro.........................................
—Outro chão por nome Samteriche Quensuache Batã Dony que tem allgumas pallmeyras e arvores de fruyto que pesuya Loquo Boto e Dullo Boto e Ball Boto que parte com a serra e com o arecall de Mallpo Nayque e com ha varzea e camynho e cõ o arequall de Sapata Nayque foy avaliado em oyto pataquõys e foy lhe posto de foro tres barganys..................................

.................................. Varzeas ..................................

—Huma varzea por nome Borydi Samterychi Pamcha e com a varzea Devazana com o camynho e com ha varzea Gambyto e com oiteyro de duas novydades... .... ......... ... . ..............
—Outra varzea por nome Burydãti Samterichy Pamcha que parte com ho valado e com a varzea da gamcarya e com a varzea Bandachy Ary Chão e com ho ribeiro Arny de duas

novydades ..........................................................................

—Outra varzea por nome Pomdu Jaõho que parte com o chão Aody e com a varzea dos maynatos e com a varzea Patoly e com a varzea Telasary(?) de duas [nov]ydades pagua de foro a gãcarya /du/as tamgas bramcas cadano........ .......... ......

.........................Do paguode Vyro......... .................

—Hum chão por nome Virache Deo em que estava o dito paguode que nõ tem nada que parte com o camynho e cõ a serra e outras comfromtasõys foy avalyado em tres tamguas e de foro quatro leays.........................................................

.............................. Varzeas ................................

—Huma varzea por nome Amboquery Virãcho Pamcho de duas novydades que parte com ho chão Aody e com a varzea Zale— Jãoho e com a varzea Patoly e com a varzea dos maynatos.—

.......... .... ..... .Do paguode Capelasor.. ..................

—Ho pedaso de chão em que esta o dito pagode que nõ he mais que o propyo chão em que esta o dyto pagoude nõ se avalyou nem lhe foy posto foro por nõ valer nada...... ... . ....... ......

—Huma varzea por nome Daquolo Veno que parte com o ribeiro e com o pallmar Venu Oyle e com o tamque e cõ a varzea Patho Set de duas novydades pagua de foro a guamcarya huma tamgua brãca cada ano............ . ............. . ... ....

............ .Dos pagodes Narayna e Bagomte...... .......... ....

—Hum Chão em que tem allgumas pallmeyras por nome Satrache Bat e Veneoylem Mare que pesuya hum Samcar Boto servydor do paguode que parte com a serra e com o chão Maynaquaralem e com a varzea Veno e com o camynho publico nã foy avalyado por ser feito merse dele a Manuel Amtão crystão da terra polo Senhor Vyso Rey Dom Amtão de Noronha foy lhe posto de foro duas tamgas brãcas e qynze leais por ter corenta e tres pallmeyras... ....... . .... ........ ... ....... ..... ...

—Outro chão por nome Samcar Batache Namasy que pesuya Samcar Boto servydor do pagode que parte com o chão de Malu Delvy e com o ribeiro e com o chão de Mãgy Synay e

com a serra foy avalyado em dous pataquõys foy lhe posto de foro symquo leais............ ..................................................

.............................. Varzeas ...................................

—Huma varzea por nome Oilo Veno que parte com varzea Patoly e com ho tamque e com o camynho e com ho ribeiro de duas novydades pagua de foro a gamcaria huma tamgua brãqua... .................. ....... ..... .. ...........

—Outra varzea por nome Pathechare que parte com a varzea patoly e com a varzea Veno e com o chão Aody e cõ /a v/arzea Taoy Jaõho de duas novy/dade/s pagua a gamcarya de foro /huma/ tamgua bramca cada ano..............................

.......... ..................Do pagode Gopynato........................

—O chão omde estava o paguode que tem allgua jaqyra e mãguyra e huma pallmeyra que pesuya Ary Boto que parte com a serra e com ho camynho e cõ o chão Aode e cõ o arecall de Mãgu Synay foy avalyado em symquo pataquõys foy lhe posto de foro dous barganys......... ...... ..............................

.............................. Varzeas ...................................

—Huma varzea por nome Eporset que parte cõ o chão Aodi e cõ o ribeiro Arny e com a varzea Pomdu Jãoho e com o valado e com o arecall de Mãgu Synay de duas novydades pagua de foro a guamcaria cada ano tres tãgas brãcas... ..... ....... ...

. . .... .. . Do paguode Samtery e Chandyrnato................

. ... . .. . .........que se chama Narayna................ ........

—Hum chão omde morava o grou e estava as casas dos paguodes que pesuya o grou Goroquo tê allgumas pallmeyras e mãgeyras e outras arvores de fruyto que parte com a serra e com o ribeiro e cõ o propyo ribeiro e com o arecall de Malu Synay foy avalyado em seis pataqumoys foy lhe posto de foro tres barganys ...... ..... ... ... ..........................................

—Outro chão manynho por nome Talei que nõ pesuye nymgem que he hum pedaso pequeno que parte com o arecall de Mãgu Nayque por duas bamdas e com o ribeiro e cõ o caminho nõ foy avalyado nem foy posto foro por ser chão ruy nem no querer

nugem o se allgum tempo pesuyr allgem paguara o foro que lhe for posto foy avalyado em hum pardao de foro meio bargany....

................................ Varzeas ................... .............

—Huma varzea por nome Amgurãleãto Taloy que parte cõ o pallmar Tallsay e com o camynho e com o ribeiro e cõ a varzea Terão Jaõho pagua de foro a gamcarya cada ano huma tamgua ........................ ...........................................

—Huma jaqueyra que esta no valado dalaguoa Amgoralem a quall jaqueyra comprou hum Vytu Synay Vagolo da dita aldeya e a deu ao pagode Ravallnato da alldeya de Naguoa cõ cõdicão que ho pesuydor que pesuya avya de dar huma jaqua cada ano da mesma jaqueyra ao omem que a comprou ou a seus erdeiros não se pos foro por que ora da fruyto e ora não.... .. .

—Hum arecall por nome Azypall que pesuya hum Francisco Coutynho que parte cõ a serra e cõ o ribeiro e cõ o arecall do dito Francisco Coutynho e com o chão conoso o pesuydor deste arequall era obrygado a dar de comer em cada hum ano a vymte e quatro gamcares e dous escryvays nõ foy avalyado porque pesuy o cristão arriba e dizerem /que/ ãtiguamente o tinha foy lhe posto foro /de quatro/ tamgas bramcas. ...........

—Huma varzea por nome Gurusetamtoli Qurungi que parte com o ribeiro e com o lymyte daldeya de Naguoa e cõ a varzea Ambely e com a varzea Aamcho Zaõho o pesuydor desta varzea semeava hum curunge de bate domde polo bate novo levavã bate ao paguode e ao povo. .... .... .. .... .... ........ . . .

—Herã obrigados os ditos gamcares a darem sete ariqueyras pera a festa dos sete pagodes e niso gastavã dous barganys cadano ........... ........... . ..... . ... .. .. ...... ...... . .... .

—Mais os gamcares herão obrigados a darem em cada hum ano corenta e oyto tamgas brãcas a saber trymta e tres tamgas brãcas pera as bayladeyras e camtores dos pagodes e quimze tamgas pera os tabaqueyros pera os autos dos pagodes. . ...

—Mais davã doze gides dazeyte cada mes ao paguode Mãguanato o qual davã do remdimento duma butiqua que esta junto

do paguode e do mais remdimento da butiqua ficava pera os gamcares esta butiqua o prezente esta derrubada e nõ rende nada por estar junto da nosa igreja e não na quizer arrendar nimgyem ........................................................

—Maia herã obrigados a darem aos Camtores dos paguodes que cantavã no paguode qynze tangas bramcas ê cada hum ano.. ..

—Pera os autos dos paguodes herã obrigados os gamcares a darem cada ano nov/e/ tamgas e meia bramcas para os pernys de vy/nte/ e quatro bazaruquos o bargany e a/si vimte/ e sinquo arecas e sem/folhas de betre/.............. .................

—Decrararã os gamcares e escrivãys que polo juramento que receberãm que nõ tinhão mais fazendas asy de movell como de raiz que pertemsyam aos pagodes e seus servydores somente as que tem dadas neste lyvro de tombo por asy o dizerem e sertyfiquarã mandarã ao dito Juiz que mandase fazer este termo de sertidão em que sertifiquavã que tudo quanto derã neste dito livro tudo hera namasys dos pagodes de que o dito Juiz mãdou fazer este termo de sertidão domde se asinarã com o dito Juiz e Lymgoa testemunhas prezentes os asynados no auto atras eu Pero Cornejo escrivão que ho escrevi..........................

—E amtes de se asynarem lhes lembrou huma varzea por nome Camarache Pacha que parte com o chão Aody e com a varzea Taoy Jaõho e cõ a varzea Toly e com a varzea Zalea Jaõho de duas novidades e dada asy a dita varzea asinarã aqy por dizerem nã ter mays nada Pero Cornejo Escrivão que ho escrevi . ... . . .... ... .... . ........... . .... ........................

—Seguem as assinaturas em caracteres canareses arcaicos transliterados no origial em português da seguinte maneira:

—Mãgua Deuly (sic)....... .Matymo Synay. ....Mãgu Synay...... /Mãga/na Nyquo. .......Nyq.. ......Mãgu Synay......Loqu Synay .Vytu Synay.... .Lomu Synay..... Mãgana Nayque......Mãgarsa Synay......Ramu Nayque......Joã Coutinho. ....Quensua Synay-Esvão(?)..... . ....Balltazar Dias.............................. ..........

—Assinaturas em português:............. ................................ ........

—Jorge de Menezes.. ...Mel Antam.. ...Ambrozio de Souza.. "
—Do que para constar se passou esta, em cumprimento do despacho do Excelentíssimo Director o dito Arquivo Histórico, exarado no requerimento do referido procurador. ........ .. ....
—E eu dito Gantcar a extraí e dactilografei........ ........ ......
—Desta de emolumentos onze rupias e oito tangas, pagas pelo recibo M/2, no. 19, desta data, passado por este Arquivo Histórico.... ......... ....... . ............. ... ..... ....... ..............
—Cidade de Goa, 27 de Novembro de 1958.
..................................................(a) Gajanana Gantcar

कुशस्थळी ( कुठ्ठाळ ) येथें श्री मंगेशाचें देवालय असतांना, त्या देवालयाच्या मालकीच्या जमिनी, शेती, बागायती, कुळागरें होतीं; तीं बहुतेक सर्व देवालयाच्या इमारतींसह नंतरच्या चर्चला, त्यावेळच्या सरकारनें, त्याकालीं बहाल केल्या, याची माहिती मागें दिली आहे. कुठ्ठाळ गांवांत आज जें चर्च आहे, त्याची इमारत, जुन्या कालीं ज्या जागेवर श्रीमंगीशाचे देवालय होतें, त्याच जागेवर बांधलें गेलें आहे याची पुराव्यानिशीं माहिती मागें दिली आहे. कुठ्ठाळचे चर्च, त्या सर्व जमिनी इ. स. १५६० पासून आजतागायत उपभोगित असलें पाहिजे व त्या जमिनींचे उत्पन्न घेत असलें पाहिजे यांत शंका असण्यास जागा नाहीं. म्हणून मुद्दाम सध्याच्या काळांत कुठ्ठाळ गांवची चर्च जें उत्पन्न घेते, व ज्या जमिनी उपभोगित असते, त्या सर्व जमिनींची नांवनिशी मिळवावी व जुन्या काळचीं त्या जमिनींचीं नांवें व सध्याचीं नांवें यांतील फेरफार काय आहे तो बघावा, ओळख पटवावी, म्हणूनच प्रयत्न करून सध्या कुठ्ठाळचें चर्च भोगित असलेल्या जमिनींची नांवनिशी मिळविली व ती तपासून जुन्या काळचीं नांवें व आतां त्या जमिनी ज्या नांवांनीं ओळखण्यात येतात तीं जुळविण्याचा प्रयत्न करू पहातां, त्यांतील एकाही जमिनीस मुळचें नांव किंवा थोड्या फार फरकानेंही आढळत नाहीं. कुठ्ठाळ येथील इग्रेज मुख्य चर्चचे नांव 'फाब्रिक दे इग्रेज दे कोर्तालीं (Fabrica de Igreja de Cortalim) असें आहे व त्या इग्रेजचीं दोन वेगवेगळीं आनुषंगिक कपेलां ( लहान चर्च ) 'कोफ्रारीय दे नोस्स सिंजोर दस आऊगुस्तीयस इ सांतुस आल्मस' (Confraria de Nossa Senhora das Augustias e Santos Almas) एक व दुसरें 'सांतिस्सिमु साक्रामेंतु इ सेंजोर दे लिव्रामेंतु दे इग्रेज दे कोर्तालीं (Santissimo Sacramento e Nosso

Senhor de Livramento de Igreja de Cortalim) अशीं त्यांचीं नांवें आहेत. व त्यांच्या वार्षिक उत्पन्नाच्या बजेट बुकावरून त्या प्रत्येकाच्या स्वतःच्या जमिनीची नांवनिशी पहातां, त्या जमिनींची नांवनिशी खालील प्रमाणें आढळते. व ती मुळच्या जुन्या काळांतील नांवांशीं मुळींच जुळत नाहीं.

मुख्य चर्च 'फाब्रिक दे इग्रेज दे कोर्तालीं' च्या जमिनी :–

प्रेदियु पालमार दे इग्रेज इ कारैंर दे पोर्ताइस.

पार्ति आन्होझाल दु दीतु प्रेदियु ओर देस्तिनादु पर ऊ कांपु दे ज्योगु-व्हारझेय सापाल.

प्रेदियु पुरशोलें.

प्रेदियु झरीभाट.

लोज वोवु काझ येझिस्तेंति वु प्रेदियु कोणियो.

व्हालादु ज्यंतु दे पोर्ताइत सितु यें कोर्तालीं.

'कोंफ्रारीयु दे नोस्सु सेंजोर दस आगुस्तीयस इ सांतुस आलमस' यांच्या जमिनी.

प्रेदियु आलमा भाट.

प्रेदियु बायणाकारांचो वोळो व्हुलगारमेंति व्होळो.

प्रेदियु वोस्तोलची पातोळी.

प्रेदियु पिंग्यालें.

प्रेदियु नाऊनाभाट वोवु कांदीभाट.

'सांतिस्सिमु साक्रामेंतु इ नोस्सु सिंजोर दे लिव्रामेंतु दे इग्रेज दे कोर्तालीं' याच्या जमिनी.


प्रेदियु सिमेभाट.

प्रेदियु गालियो.


प्रेदियु माल्पा नाईक.

× × ×

'बोस्केजु इस्तोरिकु दस कोमुनिदादीस' कर्ता फिलीफ नेरी शान्हीयेर या पुस्तकाच्या पृष्ठ २६२ वर असलेल्या माहितींत असें लिहिण्याचें आढळतें कीं, जुना फोराल (इ. स. १५६७) सरकारी दप्तरांत असून त्यांत असा मजकूर आहे कीं, जुन्या कालांत सासष्टी प्रांतांतील प्रत्येक कोमुनिदाद (ग्रामसंस्था) आपापल्या गांवांत जीं देवालयें आहेत त्यांचा सर्व खर्च करी. त्याचप्रमाणें पृष्ठ २६३ वर




शके १८१२ (इ. स. १८९०) पूर्वीचें देवालय



शके १८१२ (इ. स. १८९०) नंतरचें देवालय



चौघडा बुरूज (नगारखाना)



तीनदारी पुजा

असेंहि आढळतें कीं, कुट्ठाळ गांवची कोमुनिदाद आपल्या गांवांत असलेल्या सहा देवाल्यांचा सर्व खर्च करी. तीं सहा देवालयें अशीं :– मंजीनाथ, सांतेरी, खेरीयोबुस [ केशव ? ] रामेश्वर, नारायण आणि भगवती.

या दैवतांमध्यें रामेश्वर हें एक नवें दैवत कुट्ठाळीस असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. पण यांत कांहीं तरी लिखाणाची चुकभूल असावी असें वाटतें. कारण, मागें 'फोराल दे सालसेत' (इ. स. १५६८ चा) वर कुट्ठाळचीं देवालयें व त्यांच्या जमिनी वगैरे जी पंचनाम्यांतील माहिती मिळाली, त्यांत रामेश्वर या नांवाचा उल्लेखहि नाहीं.

कुट्ठाळ गांवांत श्रीमंगीशाचें देवालय होतें त्या वेळीं कुट्ठाळ गांवची कोमुनिदाद, म्हणजे ग्रामसंस्था, तेथील देवालयांचा खर्च करी. कारण, ग्रामसंस्थेचे सभासद (ग्रामस्थ) तेच मंगीश देवालयाचे कुळावी महाजन होते व देवच सर्व ग्रामस्थांचा म्हणजे गांवचा मानला जाई पण पुढें देवाचें स्थलांतर झालें, ग्रामस्थ हिंदु कांहीं पळाले व म्हणून हिंदु राहिले. कांहीं पळण्यापूर्वी पकडून वळजवरीनें बाटविले गेले. बाटविल्यानंतर त्यांचीं मुळचीं हिंदु उपनांवें व बाटवून ख्रिस्ती केल्यानंतर त्यांस दिलेलीं उपनांवें पाहतां, मंगीश देवालयाचे त्यावेळचे व आजच्या काळांत जे हिंदु कुळावी महाजन आहेत, त्यांच्याबद्दल बरीच माहिती मिळते. पणजी येथें सरकारी दप्तरखान्यांत पोर्तुगीज राजवटींतील कुट्ठाळ कोमुनिदादीच्या जुन्या काळांतील ज्या वह्या आहेत, त्यांतील इ. स. १६४१ सालच्या वहींत त्या काळांतील अनेक इसमांचीं नांवें पाहावयास मिळतात, तीं खालीं दिलीं आहेत. त्यांवर चौकस दृष्टीनें नजर फिरविल्यास त्यांचें पूर्वाश्रमीचें उपनांव, बाटविल्यानंतर उपनांव, व त्यांच्या वडिलांचें नांव हें पाहावयास मिळतें. कोणतें नांव कोणत्या पृष्ठावर आहे वगैरे माहिती मुद्दाम दिली आहे. ही सर्व माहिती 'रौतैस दुस आरकिव्हुस द इंदिय पोर्तुगेझ' या कै. डॉ. पांडुरंग स. शेणवी पिसुर्लेकर यांनीं पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत [ इ. स. १९५५] पृष्ठ २२४ व २२५ वर आढळते.

कुट्ठाळच्या कोमुनिदादीच्या, इ. स. १६४१ सालच्या वहीवर कांहीं गांवकार इसमांचीं नांवें खालीलप्रमाणें असल्याचें समजून येतें :–

१. आंद्रे दे मिनेझीस, दियोगु दे मिनेझीस मेंडो (मेंडे) याचा पुत्र. (पृष्ठ ४९ पाठी)

२. आंतोनियु आंतांव, फेर्नांव आंतांव लाडू (लाड) याचा पुत्र (पृष्ठ ४८ पाठी)

३. आंतोनियु फेर्नांदिस, सांतु शेणवी कैसरो (कैसरे) याचा पुत्र (पृष्ठ ५० पाठी)
४. आंतोनियु फुर्ताद माइलिचो ( पृष्ठ ४५ पाठी )
५. आंतोनियु रुद्रिगीस व फ्रांसिस्क रुद्रिगीस, सिमांव रुद्रिगीस कैसरो ( कैसरे ) याचे पुत्र. ( पृष्ठ ५१ )
६. आंतोनियु व्हियैरु, फ्रांसिस्क व्हियैरु राजादेकु (राजाध्यक्ष) (पृष्ठ ५१ पाठी)
७. चंदू शैणे नेत्रावळी ( नेत्रावळकर ) पृष्ठ ४५
८. कृष्ण शेणै व फटकिऱ्या शेणै, काळू शेणै भेंडो ( भेंडे ) याचे पुत्र ( पृष्ठ ५१ पाठी )
९. कृष्ण शेणै आणि बंधू मांगू शेणै व लखू शेणै, म्हाळू शेणै राजा राजादेकू ( राजाध्यक्ष ) याचे पुत्र. ( पृष्ठ ५७ पाठी )
१०. दोमिंगुस फेर्नांदिस, आंद्रे फेर्नांदिस भेंडो ( भेंडे ) याचा पुत्र ( पृष्ठ ५० )
११. दोमिंगुस रेबेलु, फ्रांसिस्कु रेबेलु राजादेकु ( राजाध्यक्ष ) ( पृष्ठ ४१ पाठी )
१२. फिलीपि दे मिस्कीत–बाबुसो नायक याचा पुत्र ( नायक ) (पृष्ठ ५१ पाठी)
१३. फ्रांसिस्कु दे कोस्त–भानु दालुय राजादेकू ( राजाध्यक्ष ) याचा (पुत्र ४३)
१४. फ्रांसिस्कु पेरैर–जुवांव पेरैर वागुलो ( वागळे ) याचा पुत्र ( पृष्ठ ४७ )
१५. जेरोनिमु मास्कारेंजस किता नायक काराडो ( करंडे ) ( पृष्ठ ४९ )
१६. पाद्रिजुवांव फेर्नांदिस–आंतोनियु फेर्नांदिस कैसरो ( कैसरे ) ( पृष्ठ ५० )
१७. जुवांव लोबु–आंतोनियु लोबु कोंटंकु ( कंठक ) याचा पुत्र ( पृष्ठ ४० )
१८. लुइस आल्व्हारिस–फ्रांसिस्क व्हियैरु राजादेकु ( राजाध्यक्ष ) याचा पुत्र
१९. लुइस दे मिनेझिस भेंडो ( भेंडे ) ( पृष्ठ ५० पाठी )
२०. मानुयेल कुलासु–सांतु शेणै कैसरो ( कैसरे ) याचा पुत्र. (पृष्ठ ५१ पाठी)
२१. मानुयेल कुतिंजु–दियोगु बोर्जिस आझु नायक ( नायक ) (पृष्ठ ५४ पाठी)
२२. मानुयेल जिरालित–आंतोनियु जिरालित राजादेकु ( राजाध्यक्ष ) ( पृष्ठ ४१ पाठी )
२३. मानुयेल रुद्रिगीस–दियोगु रुद्रिगीस वागुलो ( वागळे ) याचा पुत्र ( पृष्ठ ४८ )
२४. मानुयेल दे साल्दांजु–फ्रांसिस्कु रेबेलु राजादेकू ( राजाध्यक्ष ) ( पृष्ठ ४१ )
२५. मानुयेल दे सा सातेवंतु ( सत्यवंत ). ( पृष्ठ ४१ )
२६. मानुयेल दे साल्दांजु–मांगु शैणे धुमो ( धुमें ) याचा पुत्र ( पृष्ठ ५४ )

मु. प्रवास
31-3-02



२७. नारायण शेणै–हरिया शणै धुमो (धुमें) याचा पुत्र. (पृष्ठ ५४ पाठी)
२८. राम शेणै उर्फ फटू शेणै–लखमंद्र शेणै धुमो (धुमें) याचा पुत्र (पृष्ठ ५४ पाठी)
२९. रुद्रा शेणै–विठ्ठल शेणै धुमो (धुमें) यांचा पुत्र, हरिया शेणै धुमो (धुमें) याचा नातू. (पृष्ठ ५४ पाठी)
३०. सेबास्तियांव दे मिनेझिस भेंडो (भेंडे) (पृष्ठ ५०)
३१. सिमांव दे सा-अंता शेणै नेत्राउली (नेत्रावळकर) याचा पुत्र. (पृष्ठ ४४)
३२. व्हिसेंतु व्हाज–दियोगु व्हाज याचा पुत्र व दुमिंगिस फेर्नांदीस रवळू शेणै केकोरोस (कैंकरे). (पृष्ठ ४६ पाठी)
३३. विठू शेणै व मांगू शेणै–गोपू शेणै भांडारी (भांडारी) याचे पुत्र (पृष्ठ ४०)

वरील नांवांमध्यें भेंडे, लाड, कैसरे, राजाध्यक्ष, नायक, वागळे, करंडे, कंठक, सत्यवंत, धुमें, नेत्रावळी, कैंकरे, भांडारी वगैरे उपनांवांचे इसम जुन्या कालीं कुठ्ठाळ कोमुनिदादी (ग्रामसंस्था) मध्यें गांवकरी म्हणून होते. परंतु नंतरच्या काळांत, त्या कुठ्ठाळ गांवच्या कोमुनिदादीच्या गांवकर हिंदु कोंपोनेंति जणकार म्हणजे तहहयात वंशपरंपरेनें चालत आलेला अधिकार फक्त आजतागायत, चालू स्थितींत, धुमे उपनांवाचे गांवकरी आहेत त्यांसच आहे. याशिवाय इतर कोणत्याही हिंदु धर्मीय उपनांवाच्या इसमास कोंपोनेंत जणकार गांवकार हा हक्क नाहीं याचें कारण असें असणें संभवनीय वाटतें कीं, 'धुमें' उपनांवाच्या घराण्याचे कांहीं इसम कुठ्ठाळींत स्थायिक होऊन राहिले असावेत किंवा कुठ्ठाळ गांवाबाहेर जरी राहिले तरी ते व परंपरेनें त्यांचे वंशज ग्रामसंस्थेच्या सरकारी कायद्याप्रमाणें आपआपली नोंद पद्धतशीरपणें करून घेत राहिले असावेत व बाकी कुटुंबांनीं किंवा त्यांच्या वंशजांनीं पूर्ण बेफिकीर वृत्तीने किंवा दुर्लक्ष्य करून कायदेशीरपणें आपला हक्क वेळोवेळीं शाबीत करून नोंद करून घेतली नसावी.

शिवाय असेंहि घडलें असेल कीं, 'धुमें' घराण्यास बाटाबाटीनंतर पोर्तुगीज सरकारांत बरेंच वजन व मान होता. कारण, त्या घराण्यांतील पुरुष अठराव्या शतकांत पोर्तुगीज आमदानींत वकील या नात्यानें पेशव्यांच्या दरबारांत होते. कुंभारजुवें येथील श्रीमंत व्यापारी विठोबा शेणवी धुमें याचा नातलग नारोराम मंत्री हा शाहू छत्रपतीचा (इ. स. १७१२) एक मंत्री होता. नारोरामाच्या घनःशाम नांवाच्या पुतण्याची मुलगी विठोजी शेणवी धुमें याच्या

एका चिरंजिवास दिली होती. नारोराम मंत्री श्री शांतादुर्गा-कवळेंचा मोठा भक्त होता. पोर्तुगीजांच्या दरबारांत त्याचें फार वजन असल्यामुळें अंत्रुजेंतील श्री शांतादुर्गा, श्रीमंगेश इत्यादि सारस्वतांच्या देवस्थानांस फिरंगी पोर्तुगीज लोकांकडून फारसा उपसर्ग झाला नाहीं. शिवाय नारायण विठ्ठल शेणवीं धुमें हे पोर्तुगीज सरकारचे वकील ह्या नात्यानें पेशव्यांचे दरबारीं होते. 'धुमें' घराण्यांतील नामांकित मुत्सद्दी पुरुष श्री. विठोबा शेणवी धुमें, श्री. नारायण विठ्ठल शेणवीं धुमें अशा पुरुषांच्या प्रयत्नामुळेंच पोर्तुगीज व पेशवे यांच्यांत तह घडून आले असें इतिहास सांगतो. या परिस्थितीमुळें 'धुमें' घराणें कुठ्ठाळ ग्रामसंस्थेच्या गांवकरी हक्कापासून अलग करण्याची बेकायदेशीर कारवाई तडीस गेली नसावी. वास्तविक पोर्तुगीज सरकारच्या कोंदि दे लिंजारीस या व्हायसरॉयनें ता. ११ जानेवारी १६३३ रोजीं कायदा प्रसिद्ध करून फर्माविलें कीं, जे हिंदुधर्मीय सासष्टी प्रांतांतून ख्रिस्ती धर्म स्विकारूं नये या हेतूनें पळून गेले आहेत, त्यांना आपलीं मुळची घरें, जमिनी, मान, हक्क व कोमुनिदादींत गांवकरपणाचे अधिकार वर्ज्य केले आहेत व जे कोणी या कायद्याचें उल्लंघन केल्याचें दिसेल, त्यांस देहांत शासन होईल व सर्व इस्टेट सरकार जमा होईल. असा कायदा जारी झाल्यानंतर अर्थातच कोणीहि हिंदुधर्मीय पळून गेलेला परत त्या वेळीं सासष्टीच्या आपल्या गांवांत येणें म्हणजे एक तर ख्रिस्ती धर्म स्वीकारणें किंवा न पेक्षां देहांत शासन प्राप्त करून घेणें हें उघड असल्यामुळेंच कोणीही परत येण्यास धजणें अशक्य होतें. या परिस्थितीमुळें इतर उपनांवांच्या इसमांचा हक्क कोमुनिदादींतून निकालांत काढला गेला असावा.

कुठ्ठाळ येथें श्रीमंगीश देवस्थान असतांना, त्या देवस्थानाच्या मालकीचीं ठिकाणें तसेंच त्या देवस्थानचे कांहीं सेवेकरी उपभोगित असलेलीं ठिकाणें (जमिनी) बहुतांशीं सर्वच त्या कालीं सरकारनें (इ. स. १५६० सालीं) कुठ्ठाळ येथील चर्चला दिल्या. कांहीं इतर ख्रिश्चन कुटुंबियांच्या भोगवटींत होत्या त्या ठिकाणांस किंवा जमिनींस 'नमसी' असें म्हणत. एकोणिसाव्या शतकांत, कुंभारजुवें गांवांत रहिवासी असलेल्या 'धुमें' घराण्यांतील कांहीं पुरुषांनीं या नमसी परत मिळविण्याबद्दल सरकार दरबारांत मामलेदारींत व कोर्टांत दावे लावून बरेच दीर्घ प्रयत्न चालविले व या कामीं श्रम व बराच खर्च केला गेला याबद्दल कागदोपत्रीं पुरावे मिळतात. पण या कामीं त्या पुरुषांस यश आलें नाहीं.

□ □ □

# ५ | प्रियोळला आगमन

कुशस्थळीहून श्रीमंगीश व परिवार दैवतें प्रियोळास आणली गेलीं; त्यांची तात्पुरती व्यवस्था प्रस्तुत श्रीमंगेश देवालयाच्या प्राकाराबाहेर उजव्या बाजूस एक दोन मिनिटांच्या अंतरावर, देवस्थानचे सध्याचे भटजी अभिषेकी यांचीं घरें आहेत, त्या घरांसमोर एक तुलसीवृंदावन आहे, तेथें केली होती असें सांगतात. परंतु या बद्दल देवस्थानच्या दप्तरांत किंवा दुसरीकडे कसल्याच प्रकारचा पुरावा नाहीं. पण, प्रतिवर्षी कार्तिक शुक्ल द्वादशी रोजीं श्रीमंगेश देवस्थानांत 'काला' उत्सव होत असतो. त्या उत्सवाप्रित्यर्थ श्रीमंगेशाची उत्सवमूर्ती व बरोबर श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ती एकाच पालखींतून मिरवणुकीनें व वाटेंत नानाविध तोरणें, रांगोळ्या दीपाराधना, वगैरे थाटांत प्राकाराबाहेर, प्राकाराच्या मुख्य महाद्वारांतून निघून तलावावर जाते व तलावाच्या कांठावर अभिषेकादि पूजा होते.

नंतर ती पालखी त्या तलावास फेरा घेऊन प्रदक्षिणेनें नगारखान्याच्या खालच्या वाटेनें श्री नाईकस्वामींच्या पादुका असलेल्या मंदिरासमोर येऊन पुढें भटवाडींतील त्या तुलसीवृंदावनाकडे जाते. पालखी तुलसीवृंदावनाकडे पोंहोंचण्यापूर्वी वृंदावनाशेजारी निवासस्थान असलेल्या त्या भटजी अभिषेकीकडून त्या तुलसीवृंदावनापाशीं तुलसी विवाहाची पूजा सुरू होऊन आरतींचा समय आलेला असतो, अशा वेळीं श्रींची पालखी तुलसीवृंदावनाकडे पोंहोंचते व एका उच्चासनावर ती पालखी ठेवण्यांत येते. सभोंवार दीपोत्सव, तुलसीविवाहोत्सवानिमित्त जमलेली मंडळी, सुवासिनी, वाद्यें अशा कार्यक्रमांत तुलसीवृंदावनाची श्रीकार्तिक राधा दामोदराची व पालखींत बसलेल्या श्रीमंगेश-श्रीविठ्ठलरखुमाईची आरती, मंत्रपुष्प, पुढें नैवेद्य वांटणी, सुवासिनींसह हळदी-कुंकूं वाटणें वगैरे समयानुरूप आनंदोत्सव साजरा केला जातो व अशा प्रकारें ती पालखी तेथून मिरवणुकीनें श्रीकौंडिण्य पुरुषाच्या देवालयाच्या बाजूस जाऊन तेथून प्राकाराच्या उजव्या बाजूच्या महाद्वारांतून

परत प्राकारांत येते. काल्याचा उत्सव करण्यासाठीं मंडप उभारलेला असतो. मंडपांत मखर श्रृंगारलेलें असतें. त्या मखरांत श्रींची व श्रीविठ्ठलरखुमाईची मूर्ति स्थानापन्न होऊन नंतर काला सुरू होतो व तो काला पहाटेंपर्यंत चालतो.

या उत्सवांत ती पालखी वर सांगितल्याप्रमाणें कार्तिक शुक्ल द्वादशी रोजीं रात्रौ मिरवणुकीनें व दीपोत्सवांत त्या तुलसीवृंदावनाकडे तुलसीविवाहाच्या आरती होईपर्यंत थांबते व तेथें वाटेंत असलेल्या प्रत्येक घरासमोर पूजा-आरत्या घेऊन काल्याच्या मंडपांत येऊन स्थानापन्न होते. पालखी मिरवणुकींत येतांजातां वाटेंत प्रत्येक घराचा प्रमुख पालखीची पूजा-आरती करीत असतो, त्याप्रमाणेंच तुलसीवृंदावनाकडे पालखी पोहोंचतांच तेथेंहि तेथील तुलसीवृंदावनाशेजारी ज्या भटजी अभिषेकीचें निवासस्थान आहे ते भटजी आपल्या घरची त्या तुलसी वृंदावनाची तुलसी विवाहोत्सवानिमित्त जी पूजा करतात, त्या पूजे-बरोबरच श्रींच्या पालखीस आरत्या ओंवाळतात. कारण तो तुलसीविवाहाचा कार्यक्रम देवस्थानकडून होत नसून देवस्थानच्या कार्यक्रमांत किंवा खर्चांत येत नाहीं, असें पूर्वापार चालत आलें आहे. कारण श्रीमंगेश देवस्थानचा वेगळा तुलसीविवाहाचा उत्सव श्रीमंगेश देवालयाच्या डाव्या बाजूस जें शोभिवंत तुलसी वृन्दावन आहे त्या तुलसी वृन्दावनाजवळ कार्तिक शुद्ध पौर्णिमा रोजीं होत असतो व त्याचा सर्व खर्च देवस्थानकडून होत असतो. एवढें सविस्तरपणें नमूद करण्याचें कारण, कार्तिक शुक्ल द्वादशीच्या काल्याच्या उत्सवाचे रात्रौ श्रींची पालखींतून मिरवणूक, दीपोत्सव वगैरे होऊन जी पालखी फिरत असते, ती वाटेंत प्रत्येक घरापुढें पूजा आरती घेते तशीच उल्लेखित तुलसीवृंदावनाकडे तुलसी-विवाहोत्सवाचे वेळीं थांबून तिथेंही आरतींचा स्वीकार करून येतांनाहि स्थलवासियांकडून प्रत्येक घरासमोर पूजा आरती घेत घेत काल्याच्या मंडपांत येऊन तेथें सुशोभितपणें शृंगारलेल्या मखरांत श्रींची स्वारी स्थानापन्न होते. तेव्हां ज्यावरून ती पालखी उल्लेखित तुलसीवृंदावनाकडे जाऊन आरतींचा स्वीकार करून परत फिरते, त्यावरून त्या जागेवर कुशस्थलीहून येतांना श्री देव तात्पुरते थांबले व मग सोयीस्करपणें दिवस पाहून आतांच्या जागीं सुप्रतिष्ठापना केली असें सांगण्यांत येतें या आख्यायिकेंत तथ्य दिसत नाहीं.

याचें कारण त्या तुलसीवृंदावनाच्या जागेवर जर प्राचीन कालीं श्रीदेव कुशस्थलीहून येतांना थांबून तिथें क्वचितकाल वास्तव्य केलें असतें, तर आमचे त्या कालचे पूर्वज खचितच त्या स्मरणार्थ, त्या जागीं, देवस्थानतर्फे कांहीं तरी

प्रतिवार्षिक उत्सव, अगदीं साध्या पद्धतीनें तरी पूर्वापार आजपर्यंत करीत आले असते हें उघड आहे. शिवाय कुशस्थलीहून श्रीमंगीश-शिवलिंग प्रियोळ गांवीं आणल्यानंतर तें पूर्व ईश्वरी दृष्टांतानुसार जिथें जास्त जड वाटून एका जागेवर ठेविलें त्याच जागीं त्याची सुप्रतिष्ठापना केली असली पाहिजे. विशेषतः ती पाषाणी तयार केलेली मूर्ति नव्हे व म्हणून तें शिवलिंग एका सांकेतिक जागेवर एकदां ठेवल्याबर किंवा तत्पुरतेंसुद्धां स्थापन केल्यावर तेथून दुसरीकडे हलविलें असणें पूर्णपणें अशक्यच वाटतें व ही गोष्ट श्रीशिवलिंगाच्या बाबतींत तरी मनाला पटणारी नाहीं. असो.

प्रियोळ गांवांत सध्याच्या 'मंगेशीं' वाड्यावर आमच्या पुण्यवान पूर्वजांनीं श्रीमंगेश कुलदैवत व इतर पंचायतन परिवार देवतांची विधिपूर्वक सुप्रतिष्ठापना केली तीं सर्व दैवतें आज तागायत तिथें आहेत, तीं अशीं:—

मुख्यस्थानीं गर्भागारांत श्रीमंगेशदेवाचें लिंग. गर्भागाराच्या समोरच्या संगमरवरी चौकावर श्रीमंगेश देवासमोर श्रीदेवशर्माची पाषाणी मूर्ति. ही ध्यानस्थ मूर्ति श्रीमंगेशदेवासमोर हात जोडून नमस्कार करीत आहे व दोन्ही हातांच्या ओंजळीत श्रीफल घेऊन दिसत आहे. या श्रीदेवशर्मासच श्रीग्रामपुरुष किंवा वत्सगोत्री यांचा मूळ पुरुष असें म्हणतात. या श्रीदेवशर्माच्या पाठीमागें, साधारणपणें साडेआठ इंच उंच, साडेपंचवीस इंच लांब व सतरा इंच रुंद अशा आकाराच्या काळ्या पाषाणाच्या उंचासनावर पितळेचा श्रीनंदिकेश्वर बसलेल्या स्वरूपांत आहे. पूर्वींच्या काळीं याच पाषाणी आसनावर पाषाणी नंदी बसलेल्या स्थितींत होता असें निश्चितपणें वाटतें व हा पाषाणी नंदी मागाहून कधीं तरी कोणत्या तरी कारणपरत्वें, बहुतकरून देवालयाच्या जीर्णोद्धारसमयीं मुखाकडे जरासा तडा गेल्यामुळें असेल, तेथून हलविला गेला असावा व तो सध्या प्राकारांत नगारखान्याशेजारीं डाव्या बाजूस तशाच स्थितींत असून, त्याऐवजी देवालयांत चौकावर मुळच्या पाषाणी नंदीच्या आसनाच्या जागेवर पितळेचा नंदी आहे. श्रीमंगेश देवाच्या उजव्या बाजूस चौकावर श्रीगणपतीची पाषाणी मूर्ति व डाव्या बाजूस श्रीभगवतीदेवीची पाषाणी मूर्ति असून देवालयाच्या पाठीमागें एका देवालयांत श्रीमुलकेश्वर देव शीलारूपांत आहेत.

या श्रीमुलकेश्वर देवाच्या उजव्या बाजूस, दोन वेगवेगळ्या पण शेजारीं असलेल्या मंदिरांत, एकांत म्हणजे पहिल्यांत श्रीवीरभद्र लिंगरूपी व श्रीसांतेरी पाषाणी मूर्ति, व दुसऱ्यांत श्रीलक्ष्मीनारायण पाषाणी मूर्ति, श्रीसूर्यनारायण चांदीनें

मढविलेल्या शीलारूपांत व श्रीगरुड पाषाणी मूर्ति, याप्रमाणें परिवार देवता स्थापित आहेत. याशिवाय श्रीमंगेश देवालयासमोरच नगारखान्याची इमारत असून त्या इमारतीच्या तळमजल्यावर श्रीकालभैरवाची उभी पाषाणी मूर्ति श्रीमंगेश देवासन्मुख आहे. यापुढें तलावाच्या उजव्या बाजूस उंचवट्यावर एक टुमदार देवालय असून त्या देवालयांत श्रीसांतेरी देवी वारुळाच्या रूपांत, श्रीनिरंकार लिंग रूपांत व या देवालयाच्या महाद्वारापुढें श्रीक्षेत्रपाळ पाषाणी शीलारूपांत आहेत. तलावाच्या उजव्या बाजूच्या या देवालयांत श्रीसांतेरी देवी जी वारुळ रूपांत आहे ती श्रीसांतेरी देवी सर्व महाजनांची आराध्य ग्रामदेवता होय, असें श्रीमंगेश देवस्थानच्या पुरातन कागदपत्रांवरून कळतें.

श्रीमंगेश देवालयाच्या उजव्या बाजूस प्राकाराबाहेर एक दोन मिनिटांच्या अंतरावरच सुंदर, आधुनिक पद्धतीचें एक देवालय असून त्यांत श्रीशिवशर्मा ( कौंडिण्य गोत्री यांचा मूळ पुरुष ) लिंग रूपांत स्थापित आहे. वर उल्लेखित देवतांपैकीं श्रीमुलकेश्वर देवालयाच्या उजव्या बाजूस असलेल्या एका मंदिरांत श्रीवीरभद्र व श्रीसांतेरी देवीची पाषाणी मूर्ति असल्याचें लिहिलें आहे. ही श्रीसांतेरीची पाषाणी मूर्ति श्रीमंगेश देवालयांतील परिवार दैवतांपैकीं नसून ती मूर्ति एके काळीं श्रीमंगेश देवालयाचे कोणी कुळावी महाजन ( भेंडे उपनांवाचे म्हणून ऐकिवांत येतें ) यांच्या घराण्यांत होती. ती त्यांनीं आपल्या घराण्यांत अपरिहार्य कारणामुळें ठेवतां येणें शक्य न झाल्यामुळें, आपलें कुलदैवत श्रीमंगेश देवासन्निध आणून ठेविली होती, अशी आख्यायिका ऐकण्यांत येते. याबद्दल कांहीं विशेष खुलासा, गैरसमज परिहारार्थ मुद्दाम करण्याची आवश्यकता भासल्यानें पुढें करण्यांत येत आहे तो असा:– कै. विष्णु रंगाजी शेळडेंकर व कै. मुकुंद सदाशिव शेळडेंकर, (मुक्काम असोळडें गोवा ) या दोन सद्गृहस्थांनीं 'गोमंतकांतील कैवल्यपूर येथील श्रीशांतादुर्गा संस्थानचा संक्षिप्त इतिहास ( श्रीमंगेश देवस्थान व पालवी दैवतांच्या उपयुक्त माहितीसह )' हें पुस्तक– ( आवृत्ती दुसरी ) शके १८५६ म्हणजे सन १९३५ मध्यें प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत त्यांनीं पृष्ठ ८४ वर अधिष्ठित दैवतांचा उल्लेख करतांना, श्रीमंगेश देवालयाच्या पाठीमागें अग्रशाळेंत श्रीमुळकेश्वर, श्रीवीरभद्र, श्रीलक्ष्मीनारायण, श्रीसूर्यनारायण, व श्रीशांतादुर्गा असल्याचें लिहिलें असून पुढें तळीच्या उजव्या बाजूस श्रीसांतेरी देवीचें ( श्रीशांतादुर्गा ) व समोर श्री क्षेत्रपाळ अशीं देवस्थानें आहेत, असा मजकूर लिहिला आहे. खालीं टीप नंबर १ मध्यें ही कुडथाळी

गांवची ग्रामदेवी, असें लिहून टीप नंबर २ मध्यें ही प्रियोळ गांवची ग्रामदेवी, असा उल्लेख केला आहे.

वरील मजकूर त्यांनीं कोणत्या माहितीच्या आधारें लिहिला असावा, हें ते दोघेहि लेखक हयात नसल्यामुळें कळण्यास मार्ग नाहीं. पण तो मजकूर पूर्णपणें चुकीच्या माहितीवर व प्रत्यक्ष वस्तुस्थिति न पाहतां लिहिलेला आहे यांत संशय नाहीं. याचा पुरावा असा कीं, श्रीमंगेशदेवस्थानांत तलावाच्या उजव्या बाजूस जें देवालय आहे व त्यांत वारुळरूपी जी सांतेरी देवी आहे ती सर्व महाजनांची आराध्य ग्रामदेवता आहे, असा श्रीमंगेशदेवस्थानच्या पुरातन कागदपत्रांत, व जुन्या काळच्या नियमावलींत (कोंप्रोमिसांत) स्पष्टपणें उल्लेख आहे. त्या श्रीसांतेरी देवीचा श्रीमंगेश देवाच्या परिवार दैवतांत समावेश असून देवस्थानांतून सर्व देवकृत्यांबरोबर या देवीस दैनिक नंदादीप, नैवेद्य, पूजा व 'काल्ट' नांवाचा वार्षिक उत्सव माघ शुक्ल पंचमीच्या दिवशी केला जातो. या उत्सवांत रात्रौ श्रीसांतेरी देवीच्या रंगपूजेनंतर श्रीमंगेशदेवालयाच्या चोवीस वांगडांच्या महाजनांस प्रत्येक वांगडास एक विडा बहुमान म्हणून देण्यांत येतो. तसेंच महाजन कुळावी लोक आपआपल्या देवकृत्यांबरोबर या देवीस नैवद्य अर्पण करतात. तसेंच देव-स्थानांत आपलें कुटुंब घेऊन येऊन महारुद्रादि देवकृत्ये करून आपल्या स्वगृहीं परततांना शेवटीं 'श्रीसांतेर भोजन' या नांवानें त्या देवीप्रित्यर्थ बहुमान म्हणून एक नारळ, तांदूळ व कांहीं दक्षिणा ठेवून त्या देवीचा निरोप घेऊन येतात. एकंदरींत श्रीसांतेरी देवीचा, सर्व दैनंदिन पूजा-अर्चा-उत्सव व देवालयाचा सर्वच खर्च श्रीमंगेश देवस्थानच्या भांडारांतून चालतो.

या श्रीसांतेरी देवीचा कांहीं एक संबंध प्रियोळ गांवच्या श्रीसांतेरी देवीशीं नसून प्रियोळ ग्रामस्थांची वेगळी श्रीसांतेरी देवी व तिचें वेगळें देवालय प्रियोळ गांवांतच दुसरीकडे, मंगेशी वाड्यापासून बरेंच दूर आहे व तेथेंच प्रियोळ गांवचे गांवकरी ग्रामस्थ लोक आपली ग्रामदेवता इतर प्रमुख ग्रामदैवतांसह भजतात. या उलट अशाच प्रकारचा गैरसमज श्रीसांतेरी देवी संबंधांत श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव ग्रंथांत पृष्ठ १२४ व पृष्ठ १२६ मध्यें म्हणजे, श्री. अनंत रामकृष्ण धुमे यांनीं 'श्रीमंगेश देवस्थानची संक्षिप्त माहिती' या शिर्षकाखालीं जो लेख लिहिला आहे त्यांत आढळतो. त्यांत पृष्ठ १२४ वर पुढील मजकूर आहे :–
'कुठाळचीं दैवतें या जागेवर येण्यापूर्वी तेथें तीन दैवतें होतीं. वारुळ प्रतीकात्मक सांतेरी व तिच्या समोर क्षेत्रपाळ व जय, दुसरीकडे श्रीगणपतीची मूर्ती. सांतेरीच्या

वारुळावर या ८–१० वर्षांत मूर्ति प्रतिष्ठापिलेली आहे. हिची, तसेंच क्षेत्रपाळाची पूजा अर्चा श्रीमंगेश देवस्थानाकडून चालते. श्रीगणपतीची पूजाअर्चा प्रियोळ ग्रामसंस्थेमार्फत चालते.

तसेंच पृष्ठ १२६ वर 'मुख्य व परिवार दैवतें' या सदरांत पुढील मजकूर आहे :– 'पुढें तळीच्या उजव्या बाजूस उंचवट्यावर श्रीसांतेरीचें (मुळच्या वाड्याच्या देवतेचें) देवालय असून, समोर क्षेत्रपाळ अशीं देवस्थानें आहेत.'

श्रीमंगेश देवस्थानांत तळीच्या बाजूस उंचवट्यावर जें श्रीसांतेरीचें देवालय आहे ती श्रीसांतेरी देवी (वारुळ स्वरूपांत) श्रीमंगेश देवस्थानच्या सर्व महाजनांची आराध्य ग्रामदेवता होय असें श्रीमंगेश देवस्थानच्या पुरातन दप्तरावरून व कोंप्रोमिसावरून (देवस्थानच्या जुन्या नियमावलीवरून) स्पष्टपणें कळतें.

कुठ्ठाळ दैवतांचें स्थलांतर प्रियोळ गांवीं आजच्या जागीं झालें, त्या संकट काळीं फक्त मुख्य देव श्रीमंगेश शिवलिंग तेथून जशाचें तसें उचलून आणलें. पण, इतर पंचायतन परिवार देवता तेथून उचलून आणणें त्या वेळच्या परिस्थितींत अशक्यच होतें; म्हणून त्या प्रत्येक देवतांचें प्रतीक तेवढें तेथून आणलें गेलें व त्या प्रतिकांत श्रीसांतेरी देवीचेंहि प्रतीक आणलें असणें साहाजिकच आहे. ही श्रीसांतेरी देवी प्रियोळच्या मुळच्या वाड्याची देवता नव्हे. तसें असतें तर त्या श्रीसांतेरी देवीचा समावेश श्रीमंगेशपरिवार दैवतांत असणें पूर्णपणें अशक्य ठरलें असतें. याच्या उलट, श्रीगणपती मूर्ती. ही श्रीगणपती मूर्ति व तिचें स्वतंत्र देवालय श्रीमंगेशदेवस्थानाच्या सर्व देवळांपासून स्वतंत्रपणें वेगळ्या, कांही मिनिटांच्या अंतरावर, एका खाजगी जमिनींत (श्रीमंगेश देवस्थानाच्या मालकीच्या नव्हे) वेगळ्या देवळांत असून त्या श्रीगणपती मूर्तीची पूजा अर्चा, त्या देवालयाची देखभाल, प्रियोळ ग्रामसंस्था कोमुनिदादीकडून व ग्रामस्थांकडून चालते. तशी तलावा जवळील श्रीसांतेरी देवीची नसून तिची पूजा अर्चा, उत्सव, देवालयबांधणी खर्च श्रीमंगेश देवस्थानाकडून चालतो. शिवाय प्रियोळ ग्रामस्थांच्या ग्रामदैवतांत वेगळी श्रीसांतेरीदेवी आहे, तिचें वेगळें देवालय प्रियोळ गांवांत बरेंच दूर असून त्या देवालयाचा व श्रीमंगेशदेवाल्याकडील तलावाजवळ असलेल्या श्रीसांतेरी देवीचा काडीमात्र संबंध नाहीं. हें सर्व गैरसमज निराकरणासाठीं खुलासेवार नमूद करणें प्राप्त आहे. श्रीमंगेश देवस्थानांतील तलावाशेजारीं असलेल्या देवालयांतील श्रीसांतेरी देवीस, प्रियोळ गांवचे ग्रामस्थ गांवकरी वर्षांतून एक वेळसुद्धां पूजाअर्चा किंवा कसलाच धार्मिक देवकृत्याबद्दल संबंध ठेवीत

नसतात हें मुद्दाम लक्षांत घेणें जरूरीचें आहे. त्याचबरोबर श्रीमुलकेश्वराच्या देवालयांतील शेजारीं असलेल्या मंदिरांत श्रीवीरभद्र देवाशेजारीं जी सांतेरी देवीची पाषाणी मूर्ति आहे, या मूर्तीसही, देवस्थानच्या परिवार दैवतांप्रमाणें दैनिक, नैमित्तिक किंवा वार्षिक कसलीच पूजाअर्चा नैवेद्य नाहीं, या परिस्थितीकडे लक्ष्य देणें आवश्यक आहे. कै. श्री. शेळडेंकर यांनीं वर उल्लेखित पुस्तकांत टीप नंबर १ मध्यें ही कुळथाळी गांवची ग्रामदेवी आहे असें लिहिलें, हेंही विधान वस्तुस्थितीस धरून नाहीं. कारण श्रीवीरभद्र देवाशेजारीं असलेली श्रीसांतेरीदेवी पाषाणी मूर्ति खरोखरच कुडथाळी गांवची ग्रामदेवी असती, तर कुडथाळ गांवच्या देवांचे कुळावी आज श्रीमंगेश देवाचे महाजन कुळावी या श्रीसांतेरी देवीची नित्य दैनंदिन पूजा-अर्चा-नैवेद्य व वार्षिक उत्सव केल्याशिवाय राहिले असते काय ? श्रीमंगेश देवाची पूजाअर्चा केल्यानंतर परिवार पंचायतन इत्यादि दैवतांची पूजाअर्चा नैवेद्य अर्पण करतांनाच या श्रीसांतेरी देवीच्या मूर्तीवर फक्त गंधफूल अक्षता अर्पिलें जातें तें जवळच एक देवीची मूर्ति आहे तिच्यावर गंध फूल ठेविल्याशिवाय पुढें जाणें मनाला बरें वाटत नाहीं यासाठींच.

वरील सर्व परिवार दैवतें व त्यांच्या मंदिरांव्यतिरिक्त आणखी एक लहान टुमदार मंदिर प्राकारांतून भटवाडीकडे जातांना उजव्या बाजूस आहे. या मंदिरांत, 'श्रीनाईक स्वामी' या नांवाचे श्रीमंगेशदेवाचे परमभक्त आपल्या ह्यातींत आपलें देवतार्चन करण्याकरितां श्रीशिवलिंग, देवांच्या मूर्ति वगैरे जें काहीं बाळगीत, तें सर्व त्यांच्या पश्चात् एका देव्हाऱ्यांत ठेवून त्यांची पूजा अर्चा तसेंच 'श्रीनाईक स्वामीं'च्या पादुकांची पूजा अर्चा, श्रीमंगेशदेवस्थानमार्फत करण्याची व्यवस्था श्रीमंगेश देवस्थाननें आपल्या शिरावर घेतलेली आहे व त्यासाठीं तें श्रीशिवलिंग, देवांच्या मूर्ति व श्रीनाईक स्वामींच्या पादुका वगैरे ज्या ठिकाणीं आहेत तें मंदिर व त्या मंदिरा सभोंवार असलेल्या सर्व इमारत बांधणीचा एकंदर खर्च श्रीमंगेश देवस्थानच्याच भांडारांतून केलेला आहे. हें मंदिर व सभोंवार असलेल्या इमारतीचें बांधकाम इसवी सन १९४० सालीं सरकारी मंजुरीसह केलें असून त्या बांधकामाचें कंत्राट जाहीर लिलांव पद्धतीनें फोंडे तालुक्याच्या मामलेदारींत लेखी करार करून श्री. श्रीपाद मंगेशभट करंडे, मुक्काम मंगेशीं, या सद्गृहस्थानें घेऊन तें बांधकाम केलें. व तें मंदिर व इमारत श्रीमंगेश देवस्थानाच्या भांडारांतून खर्च करून बांधलेली आहेत याबद्दलचा स्मरणशिलालेख संस्कृत भाषेंत कोरून त्याच मंदिरांत गर्भागारांत सिमेंटच्या देव्हाऱ्याच्या

खालीं बसविलेला असून त्या संगमरवरी शिलालेखावर खालील मजकूर कोरलेला आहे :—

'श्रीमन्मङ्गीश देवस्थानीयाद्भाण्डारव्ययाद्देवागारस्यास श्रीशालिवाहन शके १८६१ प्रमाथी संवत्सरे जीर्णोद्धतिरभूत ।
अस्मिन्नेवत्सरे माघ सुदि १३ बुधे चास्मिस्थित पूज्यपाद श्रीनायकस्वामीनां पादुकयोः पुनः प्रतिष्ठाचा भवत् ॥

श्रीनाईक स्वामींच्या पादुकांची पुनः प्रतिष्ठा शके १८६१ माघ शुद्ध त्रयोदशी बुधवार तारीख २१ फेब्रुवारी सन १९४० रोजीं शुभ मुहूर्तावर उल्लेखिलेल्या नवीन मंदिरांत करण्यांत आली. श्रीनाईक स्वामींची समाधी, पणजी-फोंडा प्रमुख डांबरी रस्त्यावर श्रीमंगेश देवालयाकडे जाण्यासाठीं महाद्वार आहे, तेथून देवालयाकडे जाताना वाटेंत डाव्या बाजूस एक 'मठ' नांवाची देवस्थानच्या मालकीची इमारत आहे, त्या मठाच्या डाव्या बाजूस म्हणजे देवालयाच्या दिशेकडे भिंतीशेजारीच आहे. मोठ्या तुलसीवृन्दावनाच्या आकाराची ही समाधी आहे. श्री नाईक स्वामी हे साक्षात्कारी साधुपुरुष मूळचे कारवार जिल्हा, कुमठा तालुका, दिवगीनजीक अंत्रवळ्ळी या गांवीं राहणारे होत. यांचें मुळचें नांव मंगेश शंकर नाईक करंडे देसाई असें होतें. त्यांची पुण्यतिथी वैशाख वद्य द्वादशी रोजीं होत असून तत्संबंधीचा खर्च श्रीमंगेश देवस्थानांतून चालतो. श्री नाईक स्वामींनी आपल्या हयातीत कित्येक कविता, शिवगीतेवर प्राकृत टीका, तसेंच झुलवे नांवाची सोळा गाणीं केली. श्रीमंगेश देवाच्या शिबिकोत्सवांत जीं सोळा पेणीं (मुक्काम) होतात, त्या प्रत्येक पेण्याचे सुरुवातीस नित्यकिर्तनी यानें आपला अभंग किंवा पद म्हटल्यानंतर लगेच नृत्यांगनांनीं नृत्य गायन करावयाचें असतें. त्याच्या आरंभी या नृत्यांगना स्तुतीपर पदें झुलवे म्हणतात. प्रत्येक पेण्याचे वेळीं एक झुलवा म्हणतात.

□ □ □

# ६ | देवस्थानचे आद्यकालीन संस्थापक

श्रीमंगेश देवस्थान ( श्रीमंगेशाचे मुख्य देवालय आणि वर उल्लेखित परिवार देवतांचीं देवालयें ) याचे आद्य कालीन संस्थापक आणि विधायक गौड सारस्वत वृंदाचे ब्राह्मण, चोवीस वांगडांचे म्हणजे उपनांवांचे वर्गी होत. यांची बहुप्राचीन कालीं जीं अभिदानें होतीं तीं खालीं दिलेलीं आहेत. या अभिदानांत 'वत्स' व 'कौंडिण्य' या दोनच गोत्रांचा म्हणजे ऋषीकुलांचा समावेश आहे. तीं अभिदानें अशी :–

१. लाड पुरुष सत्यव्रंत ( दुभाषी, सांगडेकर )
२. केंडारी
३. भांडारी ( पतावरकर )
४. सत्यव्रंत भांडारी.
५. दळवी.
६. राजाध्यक्ष दळवी ( धायमोडे, गडणीस, मणेरकर, नाडकर्णी, रांगणेकर, गुडे, मंडुरकर, नगर्सेकर, सालेलकर, पिळगांवकर, पावसे, देशपांडे, उसपकर, मुळगांवकर, मयेकर, कर्णिक, देशकुलकर्णी.
७. शिंगण दळवी ( शिंगबाळ, आरस )
८. कंटक ( टांकी, साळकार, उसगांवकर, काकोडकर )
९. ब्रह्मे ( शिरपुरकर )
१०. पालेकर ( आंबये, कोळमुळे, नेर्लीकर, कायसुलकर, बस्तोडकर )
११. मिसे ( आठवणकर, बोंडरे, पाटकर, भाटीकर )
१२. नेत्रावळीकर
१३. कैसरे ( कैसरी )
१४. तिनईकर

१५. वागळे ( वाघ, वैष्णव, नाडकर्णी, माजाळकर, अऊसेंकर, आजगांवकर )
१६. तेलंग ( देवनळी )
१७. भेंडे ( पागनीस )
१८. केंकरे ( लावणीस, आगशीकर, अडवळपालकर, तोरसेकर, प्रियोळकर, कोनेकर, कवडे, गुंजीकर, खोत, फडणीस, आंब्ये )
१९. नाईक कोलंबे ( करंडे )
२०. नाईक माईकर ( भाटकी, म्हाईमे, सराफ )
२१. धुमें
२२. काबाडी ( नाडकर्णी, रेडकर )
२३. नाईक हिंगटे ( देऊलकर )
२४. नाईक संजगिरी ( केरकर, मोरजकर, हरमलकर, नाडकर्णी, देशपांडे हल्याळकर, संझगिरी )

## ' वत्स ' गोत्री : १४ वांगड :–

१ लाड, २ केंडारी, ७ शिंगणदळवी, ८ कंटक, ९ ब्रह्मे, ११ भिसे, १२ नेत्रावळीकर १४ तिनईकर, १६ तेलंग, १८ केंकरे, १९ नाईक कोलंबे २१ धुमें, २३ नाईक हिंगटे, २४ नाईक संजगिरी.

## ' कौंडिण्य ' गोत्री : १० वांगड :–

३ भांडारी, ४ सत्यवंत भांडारी, ५ दळवी, ६ राज्याध्यक्ष दळवी, १० पालेकर, १३ कैसरे, १५ वागळे, १७ भेंडे, २० नाईक माईकर, २२ काबाडी.

याशिवाय बोरकर व वालावलीकर या उपनांवांचे गृहस्थ कवळें येथील श्रीशांतादुर्गा देवीस व श्रीमंगेश देवासही भजत असतात. हे दोन्ही उपनांवांचे गृहस्थ ' वत्स ' गोत्री असून ते मूळचे श्रीमंगेश देवाचे महाजन होते. पण पुढें श्रीशांतादुर्गेच्या उपासनेनें त्यांस त्या देवतेपासून वर मिळाला व ' वर दे ' हें उपनांवही तेव्हांपासून प्रचारांत आलें अशी समजूत आहे. कवळें येथील श्रीशांतादुर्गा देवस्थानच्या महाजनांचे बारा वांगड आहेत व ते सर्व ' कौशिक ' गोत्री आहेत. या बाराही वांगडांत बोरकर व वालावलीकर यांचा समावेश नाहीं हें त्या देवस्थानच्या नियमावली ( कोंप्रोमिस ) वरून लक्षांत येतें.

वर उल्लेखिलेल्या उपनांवांचे महाजन श्रीमंगेश देवस्थानचे आहेत पण याशिवाय चंदावरकर, नाळकूळ, कायसूवकर, कोळसकर, विडीकर, चक्रमनी, तलगरे,

सलगर, कारकोळ, पुणेकर, गोकर्ण, कल्याणपुरकर, कबाडकर, इसलुलकर, गुळवडी, धमे, मुजुमदार, गुळगुळे, हेरवाडकर इत्यादि आहेत. पण ते कोणत्या वांगडाचे हें कळत नाहीं. धमें (कौंडिण्य गोत्री) हे गोमंतकांतील धुमें उपनांवाशीं सादृश्य दिसले, तरी धुमें वत्स गोत्री आहेत हें लक्षांत घेणें जरूरीचें आहे.

यापूर्वी दिलेल्या माहितींत कुशस्थली (कुट्ठाळ) ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादीच्या इ. स. १६४१ सालच्या वहीमध्यें त्या जुन्या कालीं जे ग्रामस्थ हिंदु होते व त्यांतील कांहीं हिंदु खिस्ती धर्मियांच्या छळांत सांपडून बळजबरीनें बाटविले गेले, त्यांचीं मूळ हिंदु उपनांवें व खिस्तीकरणानंतरचीं उपनांवें दिलीं आहेत. तीं हिंदु उपनांवें व सध्याच्या श्रीमंगेश देवालयाच्या चोवीस वांगडांतील उपनांवें यांची एकमेकांशीं जुळवणी करून पाहतां, त्यांत लाड, कंटक, नेत्रावळीकर, केंकरे, नाईक करंडे, धुमें या सहा उपनांवांचे वत्सगोत्री व राजाध्यक्ष, कैसरे, वागळे, भेंडे या चार उपनांवांचे 'कौंडिण्य' गोत्री वांगडी मिळून दहा उपनांवांचे वांगडी यांचा उल्लेख वाचावयास मिळतो. राहिलेले चौदा वांगडी उपनांवांचा उल्लेखही त्या जुन्या दप्तरांत कुट्ठाळ कोमुनिदादीच्या कोणत्या तरी वर्षांच्या वहींत मिळणें संभवनीय आहे असें वाटतें.

× × ×

इ. स. १८८५ सालच्या सुमारास श्रीमंगेश देवस्थानचे महाजन आपआपलीं उपनांवें कशीं धारण करीत, यांचे नमुने पाहिले तर असें दिसून येतें कीं, ते आपल्या मूळ वांगड उपनांवाचा जोड उपनांव, धारण करून मुद्दाम वापर करीत असल्याचें दिसून येतें. खालील उपनांवें, देवस्थानच्या दप्तरांत महाजन लोकांची एक यादी आहे त्यावरून घेतलेली असून त्या यादींतील उपनांवें, व सध्याच्या काळांत वापरांत असलेली उपनांवें यांतील फरक दिसून येतो. त्यावेळीं उपनांवें दोन, तीन किंवा चार जोड नांवांनीं घेतलेलीं दिसतात :—

| | |
|---|---|
| शिंगण दळवी शिंगबाळ | राजाध्यक्ष दळवी मंडुरकर |
| शिंगबाळ दळवी बेतकीकर | राजाध्यक्ष दळवी रांगणेकर |
| शिंगण दळवी आरस | राजाध्यक्ष दळवी नाडकर्णी |
| राव राजाध्यक्ष दळवी देशपांडे | राजाध्यक्ष मणेरकर |
| धायमोडे राजायध्यक्ष दळवी | राजाध्यक्ष दळवी मणेरकर |
| राजाध्यक्ष दळवी धायमोडे | राजाध्यक्ष दळवी नगर्सेकर |
| राजाध्यक्ष दळवी गुडे | राजाध्यक्ष दळवी सालेलकर |

संजगिरी नाडकर्णी
संजगिरी केरकर
केंकरे उर्फ कवडे
केंकरे आगशीकर
केंकरे अडवालपालकर
केंकरे कोनेकर
केंकरे लावणीस
केंकरे तोर्सेकर
केंकरे कोंडीवाग
पालेकर नेर्लीकर
पालेकर कोलमुले
भांडारी पतावरकर
करंडे कोलंवे
कंटक साळकार
कंटक उसगांवकार
कंटक टांकी
कंटक काकोडकार
दुभाषी लाड
भट पावसे
नाबर शिरोडकर

□ □ □

# ७ | देवस्थानची स्थावर मालमत्ता

श्रीमंगेशदेव कुशस्थळीहून प्रियोळ गांवीं आल्यानंतर श्रीमंगेश देवालयाच्या मालकीच्या जमिनी, वतनें, हक्क यासंबंधी माहिती :—

पेशवाईतील कर्तबगार मुत्सद्दी श्री. रामचंद्र मल्हार सुखठणकर हे सुरवातीस सावंतवाडी संस्थानांतील आखली गांवचे कुलकर्णी होते. पुढें ते आपलें घर सोडून सातार्‍यास गेल्यानंतर बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं त्याला आपल्या पदरीं नोकरीस ठेविलें. तेथें त्यांच्या मुत्सद्दीपणाची ख्याती लवकरच पसरली व त्यामुळें ते नानासाहेब पेशव्यांच्या कारभारांत, प्रमुख म्हणून लौकिकास आले. त्या वेळच्या राजकीय घडामोडी बर्‍याचश्या श्री. रामचंद्र बाबांचे मसलतीनें चाललेल्या होत्या. कै. डॉ. गोविंद सरदेसाई, रियासतकारांनीं श्री. रामचंद्रबाबांविषयीं लिहिलेलें 'विविधज्ञानविस्तार' ( मार्च १९२१ ) मध्यें प्रसिद्ध झालेलें आहे. तसेंच श्री. रामचंद्रबाबांविषयीं पोर्तुगीज मुत्सद्यांनीं बर्‍याच वेळीं लिहिलेलें आहे.

इ. स. १७४६ सालीं श्री. रामचंद्रबाब कवळेस आले होते. त्या वेळीं त्यावेळच्या पोर्तुगीज व्हाईसरॉय तर्फे नजराणा घेऊन श्री. विठोजी शेणवी धुमें, ता. २९ जानेवारी दिवशीं, कवळेंस श्री. रामचंद्रबाबांकडे गेले होते. या श्री. रामचंद्रबाबांच्या प्रयत्नामुळें श्रीमंगेशदेवस्थानास पेशवे सरकारकडून व तत्कालीन पेशव्यांचे मांडलिक सौंधेकर राजे सवाई इमडी सदाशिव राजेंद्र यांच्याकडून प्रियोळ गांवचा एक वाडा, आज ज्या वाड्यास 'श्रीमंगेशस्थळ' म्हणून आपण ओळखतों, किंवा मंगेशीं गांव म्हणून संबोधित असतों, तो वाडा मोकासा करून दिला. शिवाय, श्रीमंगेश देवाचे उर्जेस तेल, फुलें, आणि द्रव्यें पाहिजे होतीं, त्यांच्या खर्चाबद्दल नगदीं सालीना अडिचशें रुपये इनाम संपादून घेऊन सनदी बहाल केल्या. ज्या सनदेनें श्रीमंगेश देवास प्रियोळचा एक वाडा मोकासा करून दिला व सालीना अडिचशें रुपये इनाम म्हणून देण्याची व्यवस्था केली, त्याच सदनेनें कवळेंग्राम श्रीशांतादुर्गा देवीस व प्रियोळ गांवांतीलच दुसरा एक

वाडा श्रीम्हाळसा देवीस, याप्रमाणें तीं इनामें करून सरकारचीं पत्रें दिलीं. श्रीमंत पेशव्यांचें वरील मजकुराचें पत्र पोर्तुगीज सरकारास जें पाठविलें होतें त्यावर मिती 'रवाना छ १८ माहे शीबान (११ माहे जून)' अशी आहे. श्री. रामचंद्रबाबा ता. ४ ऑक्टोबर सन १७५४ रोजीं स्वर्गवासी झाले.

पेशवे सरकारांतून श्रीमंगेशदेवास दिलेल्या या सनदा विषयींचे कागदपत्र श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांत आहेत. श्रीमंगेश देवस्थानास प्रियोळ गांवाचा एक वाडा मोकासा व इनाम मिळण्यापूर्वी या देवस्थानचा खर्च सर्व महाजन मंडळी किंवा तत्कालीन श्रीमंत घराणीं आपापल्या कुवतीप्रमाणें चालवीत असत. इ. स. १७३० च्या सुमारास श्री. विठोबा शेणवी धुमें यांच्या कारकिर्दींत, पोर्तुगीज सरकारच्या दरबारांत 'धुमें' घराण्यास विशेष मान प्राप्त झाला. श्रीचें भांडार म्हणजे नगद रक्कम, चीजवस्तु, दागदागिने इत्यादि सर्व कुंभारजुवें गांवांत 'धुमें' घराण्यांत त्या कालीं असे, अशी माहिती आढळते. श्री. रामचंद्र मल्हार सुखठणकर यांच्या प्रयत्नानें ज्या प्रमाणें पेशव्यांकडून देवालयाच्या सभोंवार असलेल्या प्रियोळ गांवांतील एका वाड्याची सनद मिळाली व सालीना अडिचशें रुपये रोख इनाम मिळालें. त्याचप्रमाणें फोंडें, सांगें, हेमाडबार्से, केपें इत्यादि महालांतील ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादींकडून 'कालेपटी' 'रथपटी' या नांवानें वार्षिक वतनही मिळालें. पेशवे सरकारनें दिलेल्या वतनांची परिपूर्ती करण्याचे करार नंतरच्या पोर्तुगीज सरकारनें केल्यामुळें, पोर्तुगीज सरकारच्या तिजोरींतून ज्या वार्षिक रकमा श्रीमंगेश देवस्थानास कायदेशीर हक्कांप्रमाणें गोव्यात पोर्तुगीज राजवट चालू होती त्या कालांत मिळत, त्या रकमा व कोणकोणत्या तिजोरींतून मिळत असत, त्याचा तपशील खालील प्रमाणें आहे :–

फोंडें येथील रेव्हेन्यु ऑफिसच्या तिजोरींतून म्हणजे पूर्वीच्या रेसेबेदोरीय दे फाझेंद दु कोंसेल्यु दे फोंडा या तिजोरींतून :–

—"Mercê do pagode de Xri Manguexa de aldeia Priol de Pondá: Mocassó—O bairro Manguex de Aldeia Priol de Pondá. Pensão paga pela Fazenda Pública na Importância de Rupias 14-14-09 (Regulamento para execução do Decreto com fôrça de Lei de 15 de Dezembro de 1880."

'देणगी मेर्सेनामक, श्रीमंगेश देवालय प्रियोळगांव येथील, यास मोकासा–मंगेशींवाडा, प्रियोळ गांवच्या फोंडा महालांतील.'

'हक्क, 'पेंसांव' नामक, चौदा रुपये, चौदा आणे, नऊ पैसे जें फाझेंद पुब्लिक (रेव्हेन्यू ऑफिस) देत असे तें. (डिक्री कायदा ता. १५ डिसेंबर सन १८८०, अंमलबजावणीसाठीं केलेला) या कायद्याला 'रेगुलामेंतु दे देस्सायादु' या नांवानें ओळखण्यांत येतें.'

याशिवाय फोंडा महाल, सांगेंमहाल, केपेंमहाल या तीन महालांतील ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादींच्या तिजोरींतून वार्षिक रकमा खालील प्रमाणें श्रीमंगेश देवस्थानास 'कालेपटी–रथपटी' या नांवानें पुरातन कालापासून येण्याचा हक्क पोंचतो व म्हणून श्रीमंगेश देवस्थान त्या रकमा प्रतिवर्षी घेत आलेलें आहे.

कोणत्या ग्रामसंस्था किंवा कोमुनिदादींतून प्रतिवर्षी किती रक्कम घेण्याचा हक्क आहे, त्याचा तपशील :–

## महाल फोंडा

| | रु. आ. पै. | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| बोरी | १–२४–३ | वेलींग | ०–१५–२ |
| मडकई | २–१३–४ | वळवई | ०– ७–७ |
| प्रियोळ | १– ६–८ | वागुर्बे | ०– ७–७ |
| सावईवेरें | ०–१५–२ | पंचवाडी | १–१४–३ |
| बेतकी | ०–१५–२ | | |

## महाल सांगें

| | | | |
|---|---|---|---|
| जानकीनुंदें | २– १–३ | हेमाडबारसें | २–१४–३ |

हेमाडबारसें ही कोमुनिदाद सरकारकडे असल्यानें ही रक्कम सांगें महालाच्या रेव्हेन्यु खात्याची तिजोरी म्हणजे रेसेबेदोरीय दे फाझेंद दु कोंसेल्यु दे सांगें, श्रीमंगेश देवस्थानास देत आली.

| | |
|---|---|
| अष्टाग्राहार | २– १–३ |

## महाल केपें

| | | | |
|---|---|---|---|
| बाळ्ळी | २– १–३ | काकोडें | ०–१५–२ |
| चंद्रवाडी (आज, असोळडें) | २–४–३ | | |

याशिवाय प्रियोळ गांवच्या कोमुनिदादींतून इनाम-हक्क मोकाशाचे नेमणुकी-प्रमाणें ३२६ रु. १ आ. ३ पै. दरवर्षी श्रीमंगेश देवस्थानास येणें असतात. परंतु श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काच्या कांहीं जमिनी ज्या

वाडा श्रीम्हाळसा देवीस, याप्रमाणें तीं इनामें करून सरकारचीं पत्रें दिलीं. श्रीमंत पेशव्यांचें वरील मजकुराचें पत्र पोर्तुगीज सरकारास जें पाठविलें होतें त्यावर मिती 'रवाना छ १८ माहे शीबान (११ माहे जून)' अशी आहे. श्री. रामचंद्रबाबा ता. ४ ऑक्टोबर सन १७५४ रोजीं स्वर्गवासी झाले.

पेशवे सरकारांतून श्रीमंगेशदेवास दिलेल्या या सनदा विषयींचे कागदपत्र श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांत आहेत. श्रीमंगेश देवस्थानास प्रियोळ गांवाचा एक वाडा मोकासा व इनाम मिळण्यापूर्वी या देवस्थानचा खर्च सर्व महाजन मंडळी किंवा तत्कालीन श्रीमंत घराणीं आपापल्या कुवतीप्रमाणें चालवीत असत. इ. स. १७३० च्या सुमारास श्री. विठोबा शेणवी धुमें यांच्या कारकिर्दीत, पोर्तुगीज सरकारच्या दरबारांत 'धुमें' घराण्यास विशेष मान प्राप्त झाला. श्रीचें भांडार म्हणजे नगद रक्कम, चीजवस्तु, दागदागिने इत्यादि सर्व कुंभारजुवें गांवांत 'धुमें' घराण्यांत त्या कालीं असे, अशी माहिती आढळते. श्री. रामचंद्र मल्हार सुखठणकर यांच्या प्रयत्नानें ज्या प्रमाणें पेशव्यांकडून देवालयाच्या सभोंवार असलेल्या प्रियोळ गांवांतील एका वाड्याची सनद मिळाली व सालीना अडिचशें रुपये रोख इनाम मिळालें. त्याचप्रमाणें फोंडें, सांगें, हेमाडबार्से, केपें इत्यादि महालांतील ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादींकडून 'कालेपटी' 'रथपटी' या नांवानें वार्षिक वतनही मिळालें. पेशवे सरकारनें दिलेल्या वतनांची परिपूर्ती करण्याचे करार नंतरच्या पोर्तुगीज सरकारनें केल्यामुळें, पोर्तुगीज सरकारच्या तिजोरींतून ज्या वार्षिक रकमा श्रीमंगेश देवस्थानास कायदेशीर हक्कांप्रमाणें गोव्यात पोर्तुगीज राजवट चालू होती त्या कालांत मिळत, त्या रकमा व कोणकोणत्या तिजोरींतून मिळत असत, त्याचा तपशील खालील प्रमाणें आहे :–

फोंडें येथील रेव्हेन्यु ऑफिसच्या तिजोरींतून म्हणजे पूर्वीच्या रेसेबेदोरीय दे फाझेंद दु कोंसेल्यु दे फोंडा या तिजोरींतून :–

—"Mercê do pagode de Xri Manguexa de aldeia Priol de Pondá: Mocassó—O bairro Manguex de Aldeia Priol de Pondá. Pensão paga pela Fazenda Pública na Importância de Rupias 14-14-09 (Regulamento para execução do Decreto com fôrça de Lei de 15 de Dezembro de 1880."

'देणगी मेर्सेनामक, श्रीमंगेश देवालय प्रियोळगांव येथील, यास मोकासा–मंगेशींवाडा, प्रियोळ गांवच्या फोंडा महालांतील.'

'हक्क, 'पेंसांव' नामक, चौदा रुपये, चौदा आणे, नऊ पैसे जें फाझेंद पुब्लिक (रेंव्हेन्यू ऑफिस) देत असे तें. (डिक्री कायदा ता. १५ डिसेंबर सन १८८०, अंमलबजावणीसाठीं केलेला) या कायद्याला 'रेगुलामेंतु दे देस्सायादु' या नांवानें ओळखण्यांत येतें.'

याशिवाय फोंडा महाल, सांगेंमहाल, केपेंमहाल या तीन महालांतील ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादींच्या तिजोरींतून वार्षिक रकमा खालील प्रमाणें श्रीमंगेश देवस्थानास 'कालेपटी-रथपटी' या नांवानें पुरातन कालापासून येण्याचा हक्क पोंचतो व म्हणून श्रीमंगेश देवस्थान त्या रकमा प्रतिवर्षीं घेत आलेलें आहे.

कोणत्या ग्रामसंस्था किंवा कोमुनिदादींतून प्रतिवर्षीं किती रक्कम घेण्याचा हक्क आहे, त्याचा तपशील :-

## महाल फोंडा

| | रु. आ. पै. | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| बोरी | १-२४-३ | वेलींग | ०-१५-२ |
| मडकई | २-१३-४ | वळवई | ०- ७-७ |
| प्रियोळ | १- ६-८ | वागुर्बे | ०- ७-७ |
| सावईवेरें | ०-१५-२ | पंचवाडी | १-१४-३ |
| बेतकी | ०-१५-२ | | |

## महाल सांगें

| | | | |
|---|---|---|---|
| जानकीनुंदें | २- १-३ | हेमाडबारसें | २-१४-३ |

हेमाडबारसें ही कोमुनिदाद सरकारकडे असल्यानें ही रक्कम सांगें महालाच्या रेंव्हेन्यु खात्याची तिजोरी म्हणजे रेसेबेदोरीय दे फाझेंद दु कोंसेल्यु दे सांगें, श्रीमंगेश देवस्थानास देत आली.

| | |
|---|---|
| अष्टाग्राहार | २- १-३ |

## महाल केपें

| | | | |
|---|---|---|---|
| बाळ्ळी | २- १-३ | काकोडें | ०-१५-२ |
| चंद्रवाडी (आज, असोळडें) | २-४-३ | | |

याशिवाय प्रियोळ गांवच्या कोमुनिदादींतून इनाम-हक्क मोकाशाचे नेमणुकी-प्रमाणें ३२६ रु. १ आ. ३ पै. दरवर्षीं श्रीमंगेश देवस्थानास येणें असतात. परंतु श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काच्या कांहीं जमिनी ज्या

प्रियोळ कोमुनिदादीच्या हद्दींत आहेत त्या जमिनींबद्दलचा व स्थळ कुटुंबणाची मिळून एकंदर महसूल ( फोर ) श्रीमंगेश देवस्थानकडून वार्षिक १६१ रु. ९ आ. प्रियोळ कोमुनिदादीस द्यावयाचा असतो. ती वजा जातां, श्रीमंगेश देवस्थानास प्रियोळ कोमुनिदादीकडून १६४ रु. ८ आ. ३ पै. प्रतिवर्षी येत असतात.

या खेरीज याच प्रियोळ कोमुनिदादींतून १० रु. ३ आ. २ पै. व वेलींग कोमुनिदादींतून ४ रु. ४ आ. प्रतिवर्षी येणेबद्दलचा हक्क कै. शंभू शिवराम शेणवीं धुमें, मुक्काम कुंभारजुवें, यांनीं श्रीमंगेश देवस्थानास अर्पण केलेला असून त्या रकमेंतून श्रीमंगेशचरणीं आपल्या नांवें देवकृत्य चालू ठेविलें आहे.

त्याचप्रमाणें कुंकळ्ये ( महाल फोंडा ) गांवांत 'माइनबाग इनाम' नामक बागायतीचा, दोमिनियु दिरेक्त वार्षिक फोर रक्कम ३ रु. ५ आ. ४ पै त्यांचेच पुतणे कुंभारजुवें येथील श्रीं. विनायक नारायण शेणवीं धुमें, यांच्या मालकीचा होता, तोही सदर विनायक ना. शे. धुमें यांनीं श्रीमंगेश चरणीं देवकृत्य चालू ठेवण्याच्या इच्छेनें ता. ३ मार्च १९५६ रोजीं कायदेशीर इस्क्रीतूर करून श्रीमंगेश देवस्थानास अर्पण केला आहे. उल्लेखित 'माइन बाग इनाम' पणजी-गोवा येथें जमीन मालकी हक्काचें रजिस्ट्रेशन खातें, कोंसेर्व्हातोरीयु दे रजिस्त प्रेदियाल या ऑफिसांत, बुक नंबर बी ३१ जुना, पृष्ठ ३४० नंबर २७४९ मध्यें रजिष्टर असून त्याचा हक्क श्रीमंगेश देवस्थानच्या नांवें त्याच रजिष्टर ऑफिसांत रजिष्टर झालेला आहे.

Inscrição de transmissão no Livro F 32 a fls. 142 sob o número 21079.

## श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काच्या इमारती मुख्य देव श्रीमंगेश, पंचायतन परिवार देवता इत्यादींचीं देवालयें, अग्रशाळा व इतर इमारती वगैरे

मुख्य दैवत श्रीमंगेश देवाचें प्रमुख देवालय.

श्रीमुलकेश्वर, श्रीलक्ष्मीनारायण, श्रीसूर्यनारायण, श्रीगरुड, श्रीविरभद्र, श्रीसांतेरी या दैवतांचें एक देवालय (श्रीमंगेश देवालयाच्या पाठीमागें अग्रशाळेंत).

श्रीमंगेश देवालयाच्या उत्तर बाजूस असलेली अग्रशाळा.

श्रीमंगेश देवालयाच्या समोर, थोडें डाव्या बाजूस असलेला मोठा उंच दीपस्तंभ.

श्रीमंगेश देवालयासमोर असलेला नगारखाना, ज्यांत तळमजल्यावर श्रीकालभैरवाचें मंदिर आहे.

श्रीकौंडिण्य पुरुष उर्फ श्रीशिवशर्माचें मंदिर, प्राकाराबाहेर श्रीमंगेश देवालयाच्या उजव्या बाजूकडे आहे.

श्री नाईक स्वामींच्या पादुकांचें मंदिर ( मध्यभागीं गर्भागार सभोंवार तीन बाजूंनीं चौक्या व मागच्या बाजूस एक हॉल वगैरे )

श्रीसांतेरीदेवी, श्रीनिरंकार यांचें देवालय. हें देवालय श्रीमंगेश देवालयासमोर नगारखान्याच्या मागच्या बाजूस विस्तीर्ण तलाव आहे, त्या तलावाच्या उजव्या बाजूस उंचवट्यावर असून त्या देवालयाच्या प्रमुख महाद्वारापुढील पायऱ्यांपुढें, श्रीक्षेत्रपालाची पाषाण–शीला आहे.

श्रीमंगेश देवालयाच्या डाव्या बाजूस एक सुंदर तुळसीवृंदावन आहे.

श्रीमंगेश देवालयाच्या सभोंवार विस्तीर्ण प्राकार व त्याच्या दोन्हीं बाजूंस उंच मोठीं महाद्वारें असून, प्रमुख दरवाजापासून राजरस्त्यानें सरकारी वाहतुक रस्त्याकडे पोंहोंचेपर्यंत सिमेंटचा रस्ता ( पांटो ) त्याच्या दोन्ही बाजूंस दगडी कठडा असून वाटेंत उजव्या बाजूस ‘ मठ ’ नांवाची मोठी इमारत, ज्यांत मध्यभागीं सुबक मंदिर, सभोंवार तीनही बाजूंस लांबलचक चौक्या, मागें खोल्या, स्वयंपाक घर, विहीर, तसेंच पुढच्या दरवाज्याच्या दोन्ही बाजूंस खोल्या व सर्व सुखसोई आहेत. या मठांत वार्षिक आंवळी भोजनें वगैरे सारखे उत्सव, सहस्र भोजन, ब्राह्मण संतर्पण, माघ पौर्णिमा महापर्वणी महोत्सवाच्या दिवसांत सार्वजनिक समाराधना इत्यादी देवस्थानचे उत्सव होतात. शिवाय या मठांत सर्व आवश्यक सोई असल्यामुळें महाजन व इतर ब्राह्मण वर्गांतील उपनयन संस्कार, विवाह समारंभ वगैरे होतात. या मठाच्या डाव्या बाजूस श्रीनाईक स्वामींची समाधी आहे.

मठाच्या इमारतीशिवाय या रस्त्याच्या उजव्या बाजूस सरकारी वाहतुक रस्त्याकडे पोंचण्यापूर्वी एक ओंवळीच्या झाडाचा पार ( पेड ) चतुःकोनी असून त्याच्या दोन्ही बाजूंस दोन दगडी सिंह आहेत. या पारावर ( पेडावर ) विजयादशमी रोजीं सीमोल्लंघनाची श्रीमंगेश देवाची चांदीची पालखी येत असते. त्याचप्रमाणें श्रीक्षेत्र काशीहून श्रीगंगाभागीरथी कावड प्रतिवर्षी श्रीमंगेश देवाकडे येत असते. ती कावड मंगेशीं गांवच्या हद्दींत पोंचल्यानंतर याच ओंवळीच्या पेडावर ठेवतात व तेथूनच ती गंगाभागीरथी कावड, देवस्थानची व्यवस्थापक कमिटी,

वैदिक ब्राह्मण, वाजंत्री, हिलामत, नृत्यांगनांसह वाजत गाजत श्रीमंगेश देवालयांत आणली जाते व तिची पूजा करून ती देवालयांत ठेविली जाते. कावड श्रीकाशी-क्षेत्राहून आणणाऱ्या ब्राह्मणास विदागी देणें वगैरे चालीरीतीप्रमाणें सर्व कार्यक्रम पार पाडला जातो.

श्रीमंगेश देवालयाच्या उजव्या बाजूस जी विस्तीर्ण अग्रशाळा आहे, त्या अग्रशाळेस दोन कमानी दरवाजे आहेत. पैकीं एक दरवाजा व्यवस्थापक कमिटी ऑफिसच्या जवळ असून त्या दरवाजांतून जो रस्ता जातो, तो थेट भटवाडींत असलेल्या मोठ्या उंच तुळसीवृन्दावनाकडून पुढें जातो. हें तुळसीवृन्दावन देवस्थान मालकीचें असल्यामुळें तें व त्याच्या सभोंवतालील जमिनीस काळी फरशी श्रीमंगेश देवस्थाननें स्वखर्चानें घातलेली आहे. वाटेंत उजव्या बाजूस श्रीनाईक स्वामींच्या पादुकांचें मंदिर आहे. या रस्त्यास दोन्हीं बाजूंस असलेला कठडा श्रीमंगेश देवस्थाननें बांधलेला आहे. या अग्रशाळेस दुसरा कमानी दर-वाजा प्राकारांतील विहीरीजवळ आहे. या दरवाजांतून जो रस्ता जातो तो रस्ता थेट श्री कौंडिण्य पुरुष उर्फ श्रीशिवशर्माच्या देवालयाकडे जातो. याही रस्त्याच्या दोन्ही बाजूंस असलेले दगडी कठडे श्रीमंगेश देवस्थानच्या खर्चानें बांधलेले आहेत.

श्रीमंगेश देवस्थानांत येण्याचा सरकारी रस्ता म्हणजे पणजी–फोंडा मार्ग होय. श्रीमंगेशींच्या महाद्वाराजवळ पणजी-फोंडा रस्त्यावरून जाणाऱ्या बसेस किंवा मोटारींतून उतरल्याबरोबर महाद्वाराची उंच दगडी कमान, त्यावर श्रीमंगेश देवाची सुंदर सुबक प्रतिमा, त्याखालीं श्रीसंस्थान मंगेश अशीं अक्षरें व या महा-द्वाराच्या दोन्ही बाजूंस डावी उजवीकडे दोन इमारती असून त्यांत प्रवाशांच्या सोईसाठीं गरजेच्या वस्तू मिळविण्यासाठीं विक्रीचीं दुकानें आहेत. या दोन्ही इमारती श्रीमंगेश देवस्थाननें स्वखर्चानें बांधलेल्या असून त्या देवालयाच्या मालकी हक्काच्या आहेत.

याशिवाय श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काची जमीन, बागायत व शेत जमीन, तिसवाडी (इल्यस) तालुक्यांत कुंभाजुवें गांवांत ‘कुंभारजुवें’ नामक ठिकाण आहे. या ठिकाणीं प्रमुख रहदारी होण्याच्या रस्त्यावर, गवंडाळच्या तारबंदरावर दोन्ही बाजूंस दोन इमारती, पैकीं एका इमारतींत चार दुकानें, दुसऱ्या इमारतींत सहा दुकानें, त्यापुढें रस्त्याच्या उजव्या बाजूस एक इमारत, त्यांत दोन दुकानें, त्यापुढें त्याच रस्त्यावर गांवच्या मध्यभागीं तिंठ्यावर डाव्या बाजूस एक इमारत,

त्यांत दोन दुकानें, तसेंच त्याच रस्त्यावर उजव्या बाजूस एक लांब दगडी इमारत, त्यांत पांच दुकानें व त्याच रस्त्याच्या शेवटच्या टोंकास एक इमारत, त्यांत दोन दुकानें, उजव्या (बाजूस माशेलकडे जाणाऱ्या तारबंदरावर) श्रीमंगेश देवस्थाननें स्वखर्चानें बांधलीं आहेत व तीं सर्व मासिक भाडेपट्टीनें देवस्थानांच्या सरकारी कायद्याप्रमाणें लिलांव करून दिलीं जात असतात.

× × ×

## श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काच्या व भोगवटीच्या जमिनी

'मोकासो' फोंडा महालांतील प्रियोळ गांवांत श्रीमंगेशवाडा, मेर्से म्हणजे देणगी, जुन्या काळीं मराठेशाहींत श्रीमंगेश देवालयास दिलेली, जी नंतर पोर्तुगीज सरकारच्या राजसत्तेंत तशीच कायम करण्यांत आली व त्याबद्दलचा सरकारी कायदा पुढील प्रमाणें सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झाला.

Decreto com fôrça de lei de 15 de Dezembro de 1880 e Decerto Provincial numero 144 de Outubro de 1896 e pensão paga pela Fazenda Pública na importância de Rupias 14-14-00.

उल्लेखित 'मोकासो' ज्याला नंतरच्या काळांत श्रीमंगेशवाडा किंवा 'मंगेशी' असें म्हणूं लागले, त्या वाड्यांत खालीलप्रमाणें देवालयाच्या जमिनी, देवालयांच्या इमारती, शेतजमिनी, बागायती, कुळागरें इत्यादि संभवतात. त्या प्रत्येकाचें नांव, चतुःसीमा, क्षेत्रफळ वगैरे एकंदर सर्व माहिती सरकारच्या जमीनमोजणी खात्या-तर्फे देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीच्या सहकार्यानें तयार करून त्याबद्दलचे सर्व कागदपत्र, नकाशे व रजिस्ट्रेशन, देवस्थानच्या दप्तरांत श्रीमंगेश देवस्थानांत असून त्यांच्या प्रति सरकारी संबंधित खात्यांत आहेत. शिवाय जमिनी-हक्क रजिस्ट्रेशन खातें, पणजी-गोवा, म्हणजे कोंसेर्व्हातोरियु दे रेजिस्त प्रेदियाल दे कोमार्क दस इल्यस दे गोवा येथें या सर्व जमिनी व इमारतींचा मालकी हक्क श्रीमंगेश देवस्थानच्या नांवावर रजिस्टर झालेला असून, त्याचे सरकारी दाखले देवस्थानच्या दप्तरांत आहेत. या दाखल्यांवरून खालील माहिती मिळते. पारोडें गांवांत (महाल केपें) असलेली जमीन अनुक्रमांक नंबर ६१, केपें येथील रजिस्ट्रेशन खात्यांत व सुर्ल गांवांत (महाल डिचोली) असलेल्या जमिनी अनुक्रम नंबर ६२ व ६३ डिचोली येथें रजिस्ट्रेशन खात्यांत श्रीमंगेश देवस्थानच्या नांवावर रजिस्टर झालेल्या आहेत.

| जमीन किंवा इमारतीचें नांव | कोंसेर्व्हातोरियु दे रेजिस्त प्रेदियाल ऑफिसांत जमीन किंवा इमारतीचा रजिस्ट्रेशन नंबर, बुक नंबर व पृष्ठ नंबर :– |
|---|---|

**महाल फोंडा : मंगेशीं गांवांत**

| | |
|---|---|
| १ श्रीमंगेश देवाच्या मुख्य देवालयाची इमारत, अग्रशाळा, देवालयासभोंवार असलेला प्राकार व तलाव. | 18856 a fls. 66 do Livro B 50 novo. |
| २ श्रीस्थळ या जमिनींत श्रीशिवशर्माचें, श्रीनाईक स्वामीच्या पादुकांचें व श्रीसांतेरी देवीचें देवालय, शिवाय खालील नांवाच्या वेगवेगळ्या बागायती अंतर्भूत आहेत. | 18857 a fls. 66 verso do Livro B 50 novo. |

परजुआड अल्तड,–सांतेरशीर,–कालभैरव शीर,–रावळशेत सोनार भाट,–भास्कर वृत्तीची शीर,–बांकियाची शीर,–शाबाघसास शीर,–शाम देवळी शीर,–नृत्य वृत्तीची शीर,– वीरभद्र शीर,–नारायणदेव शीर,–शिवपुरुप शीर,–तेन्हेनु वोइतेराल दे कुल्तुर दे पाल्मैरस इ वोवत्रस आर्व्हरिस सें देनोमिनासांव इस्पेसियाल (डोंगराळ जमीन नारळीचीं व इतर झाडें असलेली, वेगळें नांव नसलेली),–घसास शीर, घसास शीर दुसरी,– मळो हिरबा सिनाय धर्मेबाबत,–अभिषेकी शीर,–अभिषेकी शीर दुसरी,–सद्‌भट वृत्तीची शीर,–स्थळ कुटुंबण आणि शीर.

| | |
|---|---|
| प्रेदियु तेन्हेनु वोइतैराल दे कुल्तुर दे कोकैरुस कोंप्रेयेंदीदु नु प्रेदियु नंबर २ म्हणजे डोंगराळ जमीन, ज्या जमिनींत नारळीचीं झाडें आहेत व ती जमीन 'श्रीस्थळ' जमिनींत संभवते. | 17741 a fls. 43 do Livro B 47 novo da Conservatória do Registo Predial de Comarca das Ilhas de Goa. |
| प्रेदियु तेन्हेनु सें देनोमिनासांव इस्पेसियाल दे प्लांतासांव दे पाल्मैरींजस म्हणजे वेगळें नांव नसलेली, नारळीचीं लहान झाडें असलेली जमीन 'श्रीस्थळ' या जमिनींत संभवते. | 17742 a fls. 43 verso do Livro B 47 novo de mesma Conservatória Predial. |

| | |
|---|---|
| प्रेदियु सें देनोमिनासांव इस्पेसियाल दे प्लांतासांव दे पाल्मैरींजस कोंप्रेयेदीदु नु प्रेदियु नंबर २, म्हणजे वेगळें नांव नसलेली, नारळीचीं ल्हान झाडें असलेली जमीन व ती सर्व जमीन 'श्रीस्थळ' या जमिनींत संभवते. | 17743 a fls. 44 do Livro B 47 novo de mesma Conservaória Predial. |
| ३. 'मठ' नांवाची इमारत. | 18858 a fls. 67 do Livro B 50 novo. |
| ४. तेन्हेनु कामींञ्यु पाटो, म्हणजे पाटो रस्त्याची जमीन. | 18859 a fls. 67 do Livro B 50 novo. |
| ५. तेन्हेनु ओंदि फुंसियोन क्रेमातोरियु, म्हणजे स्मशानभूमीची जमीन. | 18860 a fls. 68 do Livro B 50 novo. |
| ६. कानाल दे इन्हीगासांव, म्हणजे शिंपण्याचा कालवा. | 18861 a fls. 68 verso do Livro B 50 novo. |
| ७. पास्ताजें नामक ठिकाण. | 18862 a fls. 69 do Livro B 50 novo. |
| ८. हर्डियें नामक ठिकाण, हर्डियें वाड्यावर, प्रियोळ गांवांत. | 18827 a fls. 51 verso do Livro B 50 novo. |
| ९. पोर्जुआड पल्तड नामक ठिकाण. | 18828 a fls. 52 do Livro B 50 novo. |
| १०. सोनालो जिरायत नामक शेतजमीन. | 18829 a fls. 52 verso do Livro B novo. |
| ११. प्रेदियु व्हालादु दे पाल्मैरस म्हणजे नारळीच्या झाडांचा बांध | 18830 a fls. 53 do Livro B 50 novo. |
| १२. नारगो देवळी शीर नामक ठिकाण. | 18831 a fls. 53 verso do Livro B 50 novo. |
| १३. प्रेदियु व्हालादु दे पाल्मैरस म्हणजे नारळीच्या झाडांचा बांध | 18832 a fls. 54 do Livro B 50 novo. |
| १४. प्रेदियु व्हालादु दे पाल्मैरस म्हणजे नारळीच्या झाडांचा बांध | 18833 a fls. 54 verso do Livro B 50 novo. |

| | |
|---|---|
| १५. कोतार्लो जिराइतात्रील माडांचो कुणंगो नामक ठिकाण. | 18834 a fls. 55 do Livro B 50 novo. |
| १६. कोतार्लो जिराइत नामक शेत. | 18835 a fls. 55 verso do Livro B 50 novo. |
| १७. मरड नामक शेत. | 18836 a fls. 56 do Livro B 50 novo. |
| १८. बाटोलेंतील मळ नामक शेत. | 18837 a fls. 56 verso do Livro B 50 novo. |
| १९. बाटोलेंतील मळ नामक शेत. | 18838 a fls. 57 do Livro B 50 novo. |
| २०. जायांचो मळो किंवा कुणगें नामक शेतजमीन व त्या शेतीचा बांध, बापसो नारोजी बांध नामक. | 18839 a fls. 57 verso do Livro B 50 novo. |
| २१. पेद्रासु दे पाल्मार नं. १ म्हणजे नारळीच्या बागायतीचा तुकडा नं. १. | 18840 a fls. 58 do Livro B 50 novo. |
| २२. पेद्रासु दे पाल्मार नं. २ म्हणजे नारळीच्या बागायतीचा तुकडा नं. २. | 18841 a fls. 58 verso do Livro B 50 novo. |
| २३. गणबाराव शीर नामक ठिकाण. | 18842 a fls. 59 do Livro B 50 novo. |
| २४. ओमनो मांड तुकडा नामक ठिकाण. | 18843 a fls. 59 verso do Livro B 50 novo. |
| २५. कुमारभाट पारपती नामक ठिकाण. | 18844 a fls. 60 do Livro B 50 novo. |
| २६. कुंबारभाट घसास नामक ठिकाण. | 18845 a fls. 60 verso do Livro B 50 novo. |
| २७. प्रेदियु तेन्हेनु सें देनोमिनासांव इस्पेसियाल म्हणजे वेगळें नांव नसलेलें ठिकाण. | 18846 a fls. 61 do Livro B 50 novo |

| | |
|---|---|
| २८. प्रेदियु तेन्हेनु सें देनोमिनासांव इस्पेसियाल म्हणजे वेगळें नांव नसलेलें ठिकाण. | 18847 a fls. 61 verso do Livro B 50 novo. |
| २९. प्रेदियु तेन्हेनु सें देनोमिनासांव इस्पेसियाल म्हणजे वेगळें नांव नसलेलें ठिकाण. | 18848 a fls. 62 do Livro B 50 novo. |
| ३०. कुरसें, धामुसमोळो, वांकडमुस, कोळमुस आणि कोटोलो नामक शेत जमिनी. | 18849 a fls. 62 verso do Livro B 50 novo. |
| ३१. नावेलकारालें नामक कुळागर. | 18850 a fls. 63 do Livro B 50 novo. |
| ३२. आत्मा निळंभट नामक कुळागर. | 18851 a fls. 63 verso do Livro B 50 novo. |

## वेलींग गांवांत

| | |
|---|---|
| ३३. रासें जिराइतात्रील माडांचा तुकडा. | 18852 a fls. 64 do Livro B 50 novo. |
| ३४. धाकू शेणवीं धर्मेबाबत शीर नामक ठिकाण. | 18853 a fls. 64 verso do Livro B 50 novo. |

## शिरोडें गांवांत

| | |
|---|---|
| ३५. पडताळ नामक ठिकाण. | 18854 a fls. 65 do Livro B 50 novo. |

## कुंडई गांवांत

| | |
|---|---|
| ३६. कामाझालें नामक ठिकाण. | 18855 a fls. 65 verso do Livro B 50 novo. |

## महाल तिसवाडी-इल्यस-गोवा : कुंभारजुवें गांवांत

| | |
|---|---|
| ३७. कुंभारजुवें नामक ठिकाण. | 978 a fls. 92 do Livro B 3 novo. |
| ३८. सापाल इंकुल्तु, माशेल खाडीच्या कुंभारजुवें तडीवर | 18568 a fls. 103 verso do Livro B 49 novo. |

| | |
|---|---|
| ३८(अ) सापाल सें देनोमिनासांव इस्पेसियाल यें त्रेस आदिसोंइस म्हणजे सापाल, वेगळें नांव नसलेला, तीन वेगवेगळ्या भागांत. | 19218 a fls. 68 verso do Livro B 51 novo. |
| ३८(ब) प्रेदियु उरबानु ( इमारत ). | Averbamento numero 3 à descrição predial numero 177 a a fls. 104 do Livro B 3 antigo. |

## मेरकुरीं गांवांत

| | |
|---|---|
| ३९. १/४ × ३/४ नारळीची बागायत 'पातियु दस काझस नामक' | 1585 a fls. 198 verso do Livro B 4 novo. |
| ४०. १/४ × ३/४ नारळीची बागायत 'पातियु दस काझस नामक' | 1586 a fls. 199 do Livro B 4 novo. |
| ४१. १/४ × ३/४ नारळीची बागायत 'पातियु दस काझस नामक' | 1587 a fls. 199 verso do Livro B 4 novo. |
| ४२. १/४ × ३/४ नारळीची बागायत 'पातियु दस काझस नामक' | 1588 a fls. 200 do Livro B 4 novo. |

## थोरलें नेवरें गांवांत

| | |
|---|---|
| ४३. लोवो नामक शेत जमीन, वेलफालीं खाजनांतील. | 3003 a fls. 286 do Livro B 33 antigo. |
| ४४. अंत्रालाचो उडो नामक शेतजमीनीचा एक भाग कोमुनिदादीचा, वेलफालीं खाजनांतील. | 18609 a fls. 127 verso do Livro B 49 novo. |

## खोर्ली गांवांत

| | |
|---|---|
| ४५. मोनिक सातुर्नीन गोंसाल्व्हिस नामक ठिकाण. | 5581 a fls. 179 do Livro B 15 novo. |
| ४६. मोनिक सातुर्नीन गोंसाल्व्हिस नामक ठिकाण. | 5582 a fls. 55 verso do Livro B 15 novo. |

## करंबळी गांवांत

| | |
|---|---|
| ४७. काझ दे मोराद कों सुअ सेन्हें-तीय इ किंताइस म्हणजे रहाण्याचें घर, सभोंवतालची जमीन आणि बाग ऊर्फ सिर्ने [पहिलें आदिसांव]. | 3866 a fls. 179 do Livro B 10 novo. |
| ४८. प्रेदियु कोंसिस्तेंति यें दोइस पेदासुस के फिकं लिगादुस कों अ प्रोप्रियेदाद दे जुवांव साल्हादोर नुनीस म्हणजे एक बागायत, दोन भाग एकमेकांस जुळलेले व जुवांव साल्हादोर नुनीस यांच्या बागायतीस लागून उर्फ सिर्ने [दुसरें आदिसांव]. | 3867 a fls. 179 verso do Livro B 10 novo. |

## फोंडा महाल : कुंकळीयें गांवांत

| | |
|---|---|
| ४९. जयापैकीं मळी नामक कुळागर. | 18825 a fls. 50 verso do Livro B 50 novo. |
| ५०. उडो नामक नारळीची बागायत, शेत–जमिनीसह. | 18826 a fls. 51 do Livro B 50 novo. |
| ५१. दांडे कुटुंबण जयापैकीं किंवा कथन्या दांडो नामक बागायत. | 18824 a fls. 50 do Livro B 50 novo. |
| ५२. कुळागर, वेगळें नांव नसलेलें, आमशें वाड्यावर असलेलें, आमशे वाडेवरील जया नाईक-बाबत, आदिसांव १–२. | 6962 a fls. 166 verso do Livro B 18 novo. |

## प्रियोळ गांवांत

| | |
|---|---|
| ५३. कुळागर वाडेंपैकीं तळई कडील तक्षिम आणि सटियाची, त्याच्या अठरा असुर्फी शिरस्त्यासहित. | 1456 a fls. 134 do Livro B 4 novo. |

| | |
|---|---|
| ५४. कुळागर पंचमे वाडेपैकीं घराचो दांडो आणि पडताळ नारबालें नामक एकंदरींत सात दांडले ( भाग ). | 1457 a fls. 134 verso do Livro B 4 novo. |
| ५५. कुळागर एक तुकडा रुईपैकीं घराकडील दांडो याचा. | 1458 a fls. 135 do Livro B 4 novo. |
| ५६. कुळागर आकार वाडेपैकीं नामक. | 1459 a fls. 135 verso do Livro B 4 novo. |
| ५७. कुळागर घराचो पडताळ पांच दांडे माजील वाडेपैकीं अर्जुन मळो, एक दांडो नागेश देवाच्या दांडयापैकीं. | 1460 a fls. 136 do Livro B 4 nono. |
| ५८. कुळागर लंगर वाडेपैकीं घर-भाट नामक. | 1461 a fls. 135 verso do Livro B 4 novo. |
| ५९. कुंबेप जिराइतावरील नामक ठिकाण. | 6912 a fls. 141 verso do Livro B 18 novo. |

## बांदिवडें गांवांत

| | |
|---|---|
| ६०. रायंगिणी नामक शेत जमीन त्याच्या बांधासहित. | 14446 a fls. 55 do Livro B 38 novo. |

## सासष्टी महाल : पारोडें गांवांत

| | |
|---|---|
| ६१. प्रिमैर लोति दे आलदेय पारोडा, म्हणजे पारोडें गांवाचा पहिला भाग. | 6577 a fls. 90 té 91 verso do Livro B 20 da Conservatóra do Reg. Pred. de Comarca de Quepém. |

## डिचोली महाल : सुर्ल गांवांत

| | |
|---|---|
| ६२. निगल फोड नामक बागायत. | 15717 a fls. 144 verso do Livro B 40 novo de Comarca de Bicholim. |

## पाळी गांवांत

६३. पूर्वे तुकडा नामक बागायत. 15718 a fls. 145 do Livro B 40 novo de Conservatória de Bicholim.

× × ×

श्रीमंगेश देवस्थानकडून अनेक इसमांस, देवस्थानचा हक्क फक्त वार्षिक ठराविक रक्कम पेसांव, फोर किंवा दोमिनियु दिरेक्तु नामक प्रत्येक जमिनीवर ठेवून ज्या जमिनी, बागायती, कुळागरें, शेती वगैरे अधिक धान्योत्पादन, पिकावळ करण्यास दिल्या आहेत, त्या जमिनी, त्यांचीं नांवें, नंबर, देवस्थानास वार्षिक रक्कम प्रत्येक जमिनीवरून मिळण्याचा हक्क, त्या जमिनी कोणा इसमास देण्यांत आल्या आहेत, त्याबद्दलची नोंद :–

## फोंडा महाल : मंगेशी गांवांत

६४. मुशी नामक कुळागर भोगवटदार सांतबा घन:श्याम शेणवीं कुंडईकर मु॥ कुंडई (वार्षिक रक्कम देवस्थानास येणेची : ३८ रु. ८ आ. ११ पै)
Descrito sob o numero 4565 do Livro B 12 novo a fls. 134 v. da Conservatória do Reg. Pred. de Comarca das Ilhas de Goa. Termo de reconhecimento datado de 14 de Outubro de 1902 a fls. 103 do Livro numero 4 de Termos e autos.

६५. घर भाट भोगवटदार गंगाराम भिकंभट पिळाले, मु॥ मंगेशीं (वार्षिक रक्कम ८ रु. ९ आ. १ पै)
Termo de reconhecimento datado de 21 de Abril de 1900 a fls. 64 verso do Livro numero 1 de Termos e autos.

६६. कुळागर झरीचें आगर नामक, भोगवटदार श्रीमत् पूर्णानंदसरस्वती स्वामी महाराज कैवल्यपूर मठाधिपती मु॥ कवळें.
(वार्षिक रक्कम ४७ रु. ११ आ. १० पै)
Descrito sob o numero 3765 a fls. 128 do Livro B 10 novo de Conservatória do Reg. Pred. de Comarca das Ilhas de Goa.

६७. दयाळ शेणवींभाट बाबत, भोगवटदार भिकू वासुदेवभट अभिषेकी मु॥ मंगेशीं यांचे वारसदार. (वार्षिक रक्कम ३६ रु. ८ आ. ८ पै)

Termo de Reconhecimento datado de 23 de Fevereiro de 1914 a fls. 92 té 93 do Livro de Termos e autos.

६८. हार्डिये वाडेयकीं ठिकागें आगर दांडि दोन, भोगवटदार रामचंद्र म. कामत मु॥ म्हाडदोळ. (वार्षिक रक्कम ९ रु. १४ आ. ८ पै)
Termos de Reconhecimento datado de 20 de Junho de 1897 a fls. 50 do Livro de Termos e autos numero 1.

६९. पडीक जमीन मोकाशांतील, भोगवटदार केशवभट विठ्ठलभट पाटणकर मु॥ मंगेशीं (वार्षिक रक्कम १ रु. १ आ. ० पै)
Termo de Reconhecimento datado de 13 de Dezembro de 1899 a fls. 60 verso do Livro de Termos e autos numero 1.

७०. कुळागर मुशेवरील मुर्डी उर्फ निवू आत्माराम भट, भोगवटदार भिकू गोविंद भट भावे, मु॥ मंगेशी. (वार्षिक रक्कम २३ रु. २ आ. २ पै)
Descrito sob o numero 13921 do Livro B 36 novo a fls. 183 verso de Conservatória do Registo Predial de Comarca das Ilhas de Goa.

७१. मोर्डी कावाडी मोर्डी शीर, भोगवटदार आत्माराम भिकंभट भावे, मु॥ मंगेशीं (वार्षिक रक्कम १८ रु. ५ आ. ६ पै)
Descrito sob o numero 14008 a fls. 29 verso do Livro B 37 novo da Conservatória do Registo Predial de Comarca das Ilhas.

७२. प्रेदियु काझस दे मोराद, म्हणजे रहाणेचें घर, भोगवटदार आत्माराम भिकंभट भावे, मु॥ मंगेशीं. (वार्षिक रक्कम २ रुपये)
Predio descrito sob o numero 14627 a fls. 148 verso do Livro B 38 novo da Conservatória do Reg. Pred. de Comarca das Ilhas.

७३. 'नारो मरड भाटुलें उर्फ नारोजी भाट' काशिनाथ दाजिबा भिडे (मोकाश्यांत), भोगवटदार भिकू गोविंद भट भावे, मु॥ मंगेशीं. (वार्षिक रक्कम २ रु. ९ आ. ७ पै.)
Predio descrito sob o numero 9974 a fls. 123 do Livro B 26 novo da Conservatória do Reg. Pred. de Comarca das Ilhas, de Goa.

## खांडोळें गांवांत

७४. ‘कुळागर तांबसुली उर्फ तामोसुली.’ भोगवटदार गोपाळ गोविंद भट सावईकर मु॥ खांडोळें.
(वार्षिक रक्कम २११ असुर्फी किंवा ९९ रु. १० आ. ११ पै.)
Predio descrito sob o numero 2786 a fls. 508 do Livro B 31 de Conservatória do Reg. Pred. de Comarca das Ilhas de Goa.

## डिचोली महाल : वेळगें गांवांत

७५. ‘प्रेदियु आरेकाल देनोमिनादु गोठण दे कोपिय दे कोयतोवाडो बोवु कोयतोवाड्यापैकीं गोठण’ भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोब्रे आणि इतर (वार्षिक रक्कम देवस्थानास येणेची ३३० असुर्फ्या किंवा १६५ रुपये अनुक्रम नंवर ७५ ते अनुक्रम नंबर ८६ या बारा ठिकाणांबद्दल)
Predio descrito sob o numero 7957 a fls. 193 do Livro B 20 novo de Conservatória do Reg. Pred. de Comarca de Bicholim.

७६. ‘प्रेदियु आरेकाल देनोमिनादु घरदांडो, भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोब्रे व इतर (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7958 a fls. 193 verso do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

७७. ‘प्रेदियु पाल्मार देनोमिनादु सव्हेण पुर वोवत्रु नोमि सिरव्हैयचें भाट’, भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोब्रे व इतर. (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7959 a fls. 194 do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

७८. ‘प्रेदियु व्हार्जेय देनोमिनादु रवळो रवळनाथ वोवु रवळनाथाचो रुवो भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोब्रे व इतर. (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7960 a fls. 194 verso do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

७९. ‘प्रेदियु व्हार्जेय उकल’ भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोब्रे व इतर.
(वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7961 a fls. 195 do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

८०. प्रेदियु दे व्हार्जेय देनोमिनादु 'आंबियाची वोझां' भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोंब्रे व इतर. (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7962 a fls. 195 verso do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

८१. प्रेदियु दे व्हार्जेय देनोमिनादु राजा कि चोर्नो पुर वोवत्रु नोमि 'रंगी चोरनो' भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोब्र व इतर (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7963 a fls. 196 do Livro B 20 Novo de Conservatória do Reg. Pred. de Bicholim.

८२. प्रेदियु दे व्हार्जेय देनोमिनादु 'मालमार्नो' वोवु 'मालमाचोर्नो' भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोंब्रे व इतर. (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7964 a fls. 196 verso do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

८३. प्रेदियु दे व्हार्जेय देनोमिनादु 'सोनोरें' भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोंब्रे व इतर. (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7965 a fls. 197 do Livro B 20 novo de Conservatória do Reg. Pred. de Bicholim.

८४. प्रेदियु दे व्हार्जेय देनोमिनादु 'वेंटशी गोळ सोरदत्त' भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोंब्रे व इतर. (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7966 a fls. 197 verso do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

८५. प्रेदियु दे व्हार्जिय देनोमिनादु 'सांवरीच्या सऱ्याकडील मळ' भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोंब्रे व इतर. (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7967 a fls. 198 do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

८६. प्रेदियु दे व्हार्जेय देनोमिनादु 'मळय सांवरीचें भाट उकल सरदत्त' पुर वोवत्रु नोमि 'सांवरीच्या भाटाकडील मळी सरदत' भोगवटदार रामचंद्र कृष्णभट गोंब्रे व इतर. (वार्षिक रक्कम : नंबर ७५ पहा)
Predio descrito sob o numero 7968 a fls. 198 verso do Livro B 20 novo de Conservatória de Bicholim.

## फोंडा महाल : प्रियोळ गांवांत

८७. 'कामुर्डे' नामक कुळागर, भोगवटदार पुंडलीक शेणवीं केळेकर, मुक्काम प्रियोळ. (वार्षिक रक्कम ३३ रु. ५ आ. ४ पै)

Predio descrito sob o numero 3066 a fls. 169 verso do Livro B 8 novo de Conservatória do Reg. Pred. de Comarca das Ilhas.

८८. 'सटियालें' नामक कुळागर, भोगवटदार भीमारती केळेकर भ्रतार पुरुषोत्तम शेणवीं केळेकर मु।। प्रियोळ. (वार्षिक रक्कम ७३ रु. ५ आ. ४ पै)
Predio descrito sob o numero 3067 a fls. 17 O do Livro B 8 novo (Termo de Reconhecimento de 19 de Fevereiro de 1933 lavrado no Livro de termos e autos numero 11 a fls. 169 verso. té 171).

८९. प्रेदियु मेताद दे आगर शिंवीं पुरुषाचो दांडो (कुळागर), भोगवटदार शिवराम विठोबा शेणवीं प्रियोळकर कोनेकर मु।। प्रियोळ. (वार्षिक रक्कम : दहा मण सुपारी किंवा बाजार भावाप्रमाणें सुपारीची किंमत.)
Termo de Reconhecimento de 8 de Dezembro de 1892 a fls. 5 do Livro de Termos numero 4.

९०. 'आगर हर्डियेंबाबत (तोर्सेकार) भोगवटदार सावित्री शेणवीं झिंगडे मु।। म्हार्दोळ. (वार्षिक रक्कम १० रु. २ आ. ६ पै.)

९१. आगर हर्डियें वाडेपैकीं नारायण शेणवीं झिंगडे बाबत. भोगवटदार सावित्री शेणवीं झिंगडे, मु।। म्हार्दोळ. (वार्षिक रक्कम ९ रु. ३ आ. २ पै.)

९२. 'हजामशीर' भोगवटदार गोविंद नारायण हजाम, मु।। म्हार्दोळ (वार्षिक रक्कम १५ आ. ३ पै.)

९३. 'शिमे पाळण' नामक ठिकाण भोगवटदार नारायण शेट सोनार, मु।। मंगेशीं (वार्षिक रक्कम ५ रु. ८ आ. १० पै.)

९४. 'शिमेपाळण ठिकाण' भोगवटदार विश्वनाथ सुब्राय प्रभू लवंदे मु।। रायबंदर. सध्याचा भोगवटदार सौ. लक्ष्मीबाई शांताराम नेथाळकर, मु।। म्हार्दोळ,
Predio descrito sob o numero 8149 a fls. 172 verso do Livro B 21 novo, de Conservatória do Reg. Pred. de Comarca das Ilhas.

## भोम गांवांत

९५. 'इस्कीन्हांव बाग' नामक ठिकाण.

## डिचोली महाल : सुर्ल गांवांत

९६. 'वेरीक' नामक शेत जमीन.

## श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काचे, ग्रामसंस्था किंवा कोमुनिदादींचे शेअर्स ( आक्सावां )

श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काचे शेअर्स म्हणजे आक्सावां, गोव्यांतील ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादींमध्यें आहेत. कोणत्या गांवच्या कोमुनिदादींत किती आक्सावां आहेत व त्या आक्सावांचे नंबर कोणते हे खालील माहितीवरून कळून येईल.

### फोंडा महाल

गांव कुंडई येथील कोमुनिदादींत २७९ आक्सावां आहेत, त्यांचे नंबर:– ३८०१ ते ३९३४, ४९९१ ते ५०२५, ६०५८ ते ६१०७, ६१०८ ते ६३३९, १०३६२ ते १०३७१ ज्यांचे तितुलु नंबर ११८B, ११९B, १४७, १७६B, १७९A, २५५E मिळून एकंदर १७ तितुलु.

नंबर ४२७५ ते ४२८४, ४३१७, ४३१८, ४३२४, ५२५६ ते ५२५८, ५२५९ आणि ५२६० ज्यांचे तितुल्ठ नंबर १३३C रेनोव्हादु, १३४A, १३४A, १३४A, १३४A, रेनोव्हादु; १५०A, १५०A, १५०A.

गांव मडकई येथील कोमुनिदादींत ४८ आक्सावां आहेत. त्यांचे नंबर:– ८२४५ ते ८२५४ तितुल्ठ नंबर ३१३C.

सहा आक्सावां तितुल्ठ नंबर ३३७ चीं, २२ आक्सावां तितुल्ठ नंबर ३२९C रेनोव्हादु आणि दिस्दोब्रादु, ५ आक्सावां नंबर ४३९३ ते ४३९७; पांच आक्सावां नंबर ४४१८ ते ४४२२ तितुल्ठ नंबर १६० आणि १६१.

गांव वेलींग येथील कोमुनिदादींत ३५ आक्सावां आहेत, त्यांचे नंबर:– ९८६ ते १०२० तितुल्ठ नंबर ८४ आणि ८५.

### सासष्टी महाल

गांव मडगांव येथील कोमुनिदादींत एकंदर १२० आक्सावां आहेत, त्यांचे नंबर:– ५३९३ ते ५४८२ ज्यांचे तितुल्ठ ९ आहेत व त्या तितुळांचे नंबर– ९११A ते ९१९A.

तसेंच आक्सावां नंबर ११३९० ते ११४०९ आणि २७५६९ ते २७५७८ ज्यांचे तितुल्ठ नंबर २१८३A, २१८४A, आणि ५७५१A.

गांव कुडतरी येथील कोमुनिदादींत ६३ आक्सावां आहेत, त्यांचे नंबर:– ७३११ ते ७३७३ ज्यांचे तितुल्ठ नंबर ८८०A, ८८१A, ८८२A, ८८३A, ८८४A, ८८५A, ८८६A, ८८६A, ८८६A. असे आहेत.

## मुरमुगांव महाल ( मार्गगोवा )

गांव कुठ्ठाळ येथील कोमुनिदादींत एक आक्सांव आहे. त्याचा नंबर १२९६, तितुल्ल नंबर ३१५ A.

गांव सांकवाळ येथील कोमुनिदादींत सात आक्सावां आहेत. त्यांचे नंबर ४८९ ते ४९४ आणि ४९८ ज्यांचे तितुल्ल नंबर २५५ A ते २६० A आणि २६४A.

याशिवाय खालील ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादींकडून वार्षिक रक्कम ( हक्क–इनाम ) श्रीमंगेश देवस्थानास मिळण्याचा हक्क आहे.

| | |
|---|---|
| फोंडा महालांतील वेर्लींग कोमुनिदादीकडून | ४ रु. ४ आ. ० पै. |
| फोंडा महालांतील प्रियोळ कोमुनिदादीकडून | १० रु. ३ आ. २ पै. |
| फोंडा महालांतील प्रियोळ कोमुनिदादीकडून (इनाम-हक्क) | ३२६ रु. १ आ. ३ प. |
| सांखळी-डिचोली महालांतील केळगें कोमुनिदादीकडून | २५ रु. ८ आ. ० पै. |
| मुरमुगांव महालांतील कुठ्ठाळ कोमुनिदादीकडून कुठ्ठाळ कोमुनिदादीचे वर्गी कोंपोनेंति जणकार हिंदू 'धुमें' (उपनांवाचे) यांनीं आपल्या स्वतःच्या 'जण' या वार्षिक रकमेंतून श्रीमंगेश देवस्थानांत परस्पर ही रक्कम येण्याची व्यवस्था सरकारी मंजुरीने केली आहे. ( नक्कद पन्नास रुपये ) | ५० रु. ० आ. ० पै. |

वरीलप्रमाणें शेअर्स किंवा आक्सावां व इनाम हक्क उल्लेखित कोमुनिदादींत श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काचे आहेत. त्यांचा वार्षिक डिव्हिडंड ( रेदितु ) दरवर्षी त्या त्या कोमुनिदादींच्या तिजोरींतून श्रीमंगेश देवस्थानास मिळतो व तो दरवर्षी नियमितपणें वसूल करण्यासाठीं श्रीमंगेश देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीचें अखत्यारपत्र घेऊन त्याच कमिटीचा कोणीही मेंबर किंवा इतर इसम सरकारी ग्यॉझेटवर आगाऊ प्रसिद्ध झालेल्या तारखेस त्या त्या गांवीं जाणें आवश्यक असतें.

× × ×

श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काच्या व भोगवट्याच्या जमिनींची यादी मागें दिली आहे. या जमिनींचा मालकी हक्क श्रीमंगेश देवस्थानास कसा आला, म्हणजे कोणत्या जमिनी इनाम म्हणून मिळाल्या, कोणत्या जमिनी देवस्थाननें आपल्या भांडाराच्या पैशांतून खरेदी केल्या, कोणत्या जमिनी देवाचे कुळावी महाजनांनीं देवस्थानास अर्पण केल्या, याबद्दल थोडी तरी माहिती असणें

उपयुक्त ठरेल. यासाठीं देवस्थानच्या दप्तरांत जे दाखले, कागदपत्र आहेत, त्यांतील माहिती खालीं दिलेली आहे.

क्रमांक १ पासून क्रमांक ३२ पर्यंतच्या जमिनी, पेशवेसरकारकडून सनदारुपानें मौजे प्रियोळ येथील जो एक वाडा श्रीमंगेश देवास इनाम मिळाला (व ज्या वाड्यास 'मोकासा' असें संबोधण्यांत आलें), त्या मोकाश्यांत अंतर्भूत आहेत. शिवाय क्रमांक ९ 'पोर्जुआड आल्तड' ही जमीन देवस्थाननें खरेदी केलेली आहे व त्या खरेदीची सनद ता. ३१ अक्टोबर सन १८३९ ची आहे.

क्रमांक ३३, वेर्लीग गांवांत 'रासें जिरायतावरील माडांचा तुकडा' देवस्थाननें विकत घेतला आहे. (सनद पौष शु।। द्वादशी, जय संवत्सर)

क्रमांक ३४, वेर्लीग गांवांत देवस्थाननें विकत घेतली.

क्रमांक ३५, शिरोडें गांवांत देवस्थाननें विकत घेतली.

क्रमांक ३६, कुंडई गांवांत देवस्थाननें विकत घेतली.

क्रमांक ३७, कुंभारजुवें गांवांतील बागायती व शेती देवस्थाननें पणजी येथें सिव्हिल कोर्टांत लिलांवावर ता. ८ अक्टोबर १९०६ रोजीं खरेदी केली.

क्रमांक ३८ 'सापाल', सरकारकडून जमीन मोजणी खात्यांत लिलांवावर खरेदी केली (आल्वारा ता. ९ जानेवारी १९११)

क्रमांक ३८ (अ) 'सापाल' सरकारकडून जमीन मोजणी खात्यांत लिलावांवर खरेदी केली. (आल्वारा ता. २६ सप्टेंबर १९४५)

क्रमांक ३८ (ब) ही जमीन श्री. वसंत वामन शेणवीं काकोडकर या महाजनानें इस्क्रीतूर करून (ता. ३ मार्च १९५६) देवस्थानास अर्पण केली व त्याच्या वार्षिक उत्पन्नांतून देवकृत्य व उत्सव होण्याची व्यवस्था केली आहे.

क्रमांक ३९–४०–४१–४२–४३, देवस्थाननें पणजी सिव्हिल कोर्टांत लिलांवावर तारीख २१ मे १९०० रोजीं खरेदी केल्या.

क्रमांक ४४, ४५, ४६, ४७, ४८, देवस्थाननें पणजी सिव्हिल कोर्टांत लिलांवावर तारीख १ फेब्रुआरी १९०४ रोजीं खरेदी केल्या.

क्रमांक ४९ 'जयापैकीं मळी नामक कुळागर, कुंकळियें गांवांत, देवस्थाननें खरेदी केलें.

क्रमांक ५० 'उडो नामक नारळीची बागायत शेतजमिनीसह, कुंकळियें गांवांत देवस्थाननें खरेदी केली.

क्रमांक ५१ 'दांडे कुटुंबण जयापैकीं कथन्या दांडो' नामक बागायत, कुंकळ्ळियें गांवांत देवस्थाननें खरेदी केली.

क्रमांक ५२, देवस्थाननें ता. १० एप्रिल १८३३ रोजीं खरेदी केली. (सनद ता. १० एप्रिल १८३३).

क्रमांक ५३ ते ५८, देवस्थाननें ता. १८ जुलै १८३७ रोजीं खरेदी केली.

क्रमांक ५९, देवस्थाननें ता. २९ नवंबर १८३६ रोजीं खरेदी केली.

क्रमांक ६० 'रायंगीण नामक शेत जमीन त्याच्या बांधासहीत' बांदिवडें गांवांत असलेली, देवस्थाननें सिव्हिल कोर्टांत जाहीर लिलांवावर तारीख १२ एप्रिल १८२२ रोजीं विकत घेतली आहे.

क्रमांक ६१, पारोडें येथील जमीन, (सरकारनें लिलांवावर काढलेल्या) जाहीर लिलांवात देवस्थाननें ता. १५ सप्टेंबर १८९९ रोजीं विकत घेतली आहे.

क्रमांक ६२, सुर्ले गांवांत असलेली, देवस्थाननें ता. ५ फेब्रुआरी १८३६ रोजीं विकत घेतली.

क्रमांक ६३, 'पूर्ण तुकडा' नामक पाळी गांवांत असलेली जमीन, 'दळवी' उपनांवाच्या घराण्याकडून ता. १४ अक्टोबर १९२७ रोजीं देवस्थानच्या कमिटीच्या ठरावांत करार करून अर्पण केली गेली. पण या जमिनीचें खतें यापूर्वी पाळी गांवच्या कोमुनिदादीच्या खतेंवहींत श्रीमंगेश देवस्थानच्या नांवावर तितुल्ह आहे. Livro de abertura de títulos dos Afazendados de Comunidade de Pale rubricado em 9-12-1848.

× × ×

क्रमांक ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५ ते ८६, ८७, ८८, ८९, ९० ते ९४ या जमिनींचा मालकी हक्क श्रीमंगेश देवस्थानचा. पण नंतर या जमिनी देवस्थानास वार्षिक ठराविक कायम रक्कम येणेच्या करारानें लोकांस कायम भोगवटयास दिल्या असून त्यांच्याकडून प्रतिवर्षी कायम कराराप्रमाणें रक्कम देवस्थानास येत असते. त्यांपैकीं क्रमांक ६४, ६५, ६६, ६७, ६९, ७०, ७२, ७३ या जमिनी मोकाशांत अंतर्भूत आहेत. क्रमांक ६८ (ता. ३१ अक्टोबर १८३९), क्रमांक ७१ (ता. ११ डिसेंबर १८२२), क्रमांक ७४ (ता. २५ सप्टेंबर १८२३, क्रमांक ७५ ते ८६ (ता. १२ मार्च १८६४) व क्रमांक ८७–८८

(ता. २२ नवंबर १८२०) देवस्थाननें खरेदी केल्या आहेत. क्रमांक ८९ सनद दे त्रेस्पास (ता. २७ जुलै १८३७) मुळें देवस्थानच्या मालकीची झाली.

वर उल्लेखित क्रमांक ७५ ते ८६ या बारा जमिनी वेळगें गांवांत (महाल डिचोली) आहेत. या बारा जमिनी श्रीमंगेश देवस्थाननें ता. १२ मार्च १८६४ रोजीं इस्क्रीतुरानें खरेदी केल्या व नंतर ता. ९ सप्टेंबर १८६७ रोजीं इस्क्रीतुर करून आरेंदामेंतु पेपेंतुअ म्हणजे कायम लागवडीचा करार करून वार्षिक तीनशें तीस असुर्फ्या म्हणजे एकशें पांसष्ट रुपये देवस्थानास देण्याच्या करारानें रामचंद्र कृष्णभट गोब्रे, अनंत हरीभट गोब्रे, गोपाळ हरीभट गोब्रे, (मुक्काम केरी, फोंडा) यांस दिल्या. सध्या त्यांच्या वारसदारांकडून श्रीमंगेश देवस्थानास उल्लेखित रक्कम येत असते.

जमीन क्रमांक ९५ 'इस्क्रीव्हांव बाग नामक ठिकाण' भोम या गांवांत (फोंडा महाल) ४ व जमीन क्रमांक ९६ 'वेरीक' नामक शेत जमीन, सुर्ल (डिचोली महाल) गांवांत असून त्या दोन्ही श्रीमंगेश देवस्थानच्या मालकीच्या आहेत, असें श्रीमंगेश देवस्थानच्या पुरातन कालापासून जी मालकी हक्काची जमिनींची नोंद आहे. त्या नोंदीवरून व इतर कागदपत्रांवरून कळतें. पण हल्लींच्या नोंदबुकांत या दोन जमिनींबद्दल कांहींच उल्लेख नाहीं. किंवा इतर सर्व जमिनींप्रमाणें त्रैवार्षिक उत्पन्नाची पावणी (लिलांव) वगैरे होत असते तशी पावणी या दोन जमिनींची होत नाहीं. बारीक चौकशी व सर्वसाधारणपणे त्याबद्दल अंदाज घेतां या दोन्ही जमिनी, त्या त्या जमिनी शेजारच्या जमीन मालकांनीं आपल्या खासगी जमिनींत विलीन केल्या असाव्यात असा संशय येतो. या गोष्टीकडे त्याकाळीं देवस्थानच्या कारभारी व्यवस्थापक कमिटीचें दुर्लक्ष्य झालें किंवा कोणत्याहि कारणामुळें देवस्थानच्या मालकी हक्काबद्दल कांहीं कायदेशीर इलाज करणेस अडचणी आल्या असाव्यात कीं काय याबद्दल आज तरी कांहींच माहिती उपलब्ध नाहीं.

---

श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनी, त्यांचीं नांवें, त्या ज्या गांवांत आहेत त्या गांवांचीं नांवें, कोंसेर्व्हातोरियु प्रेदियालमध्यें जमिनीचा रजिस्ट्रेशन नंबर व त्या जमिनींचा मालकी हक्क रजिस्ट्रेशन नंबर, तसेंच देवस्थानच्या दप्तरांत तोंबु नामक वही आहे, त्याचा नंबर वगैरेसंबंधीची माहिती देणारा तक्ता या पुस्तकाच्या शेवटीं जोडण्यांत आलेला आहे.

## सरकारी तिजोरींतून श्रीमंगेश देवास इनाम व हक्क येणें बद्दलची माहिती

पेशवे सरकारांतून श्रीमंगेश देवास पुरातनकालीं सनदा बहाल केल्या आहेत. या सनदांवर 'राजा शाहू नरपति हर्ष निधान बाळाजी बाजीराव प्रधान' असा शिक्का आहे. एका सनदेंत खालीलप्रमाणें मजकूर आहे :–

'राजश्री रामचंद्र मल्हार यांचे कुलदेवाचीं देवालयें अंत्रुज प्रांतीं आहेत. तेथील उर्जेस तेल, फुलें आणि द्रव्यें पाहिजेत त्यास खर्चाबद्दल, रफायत पन्हां सदाशिव नाईक, इमजी राजे सौंदे यांजकडून कवळेंग्राम श्रीशांतादुर्गा देवीस व मौजे प्रियोळ येथील श्रीम्हाळसा देवीस एक वाडा व श्रीमंगेश देवास एक वाडा व नगदीं महाल मजकुरीं अडिचशें रुपये इनाम संपादून घेऊन सनदी हांसकलेल्या आहेत, त्याप्रमाणें आम्हीं तीं इनामें करार करून सरकारचीं पत्रें दिली आहेत........(रवाना छ १८ माहे, शीवान)'*

दुसऱ्या सनदेंतील मजकूर:–

'अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री येसाजी

राम निसपत नारायणराव व्यंकटेश गोसावी यांसी

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुरसन समान समसेन मय्या अल्लफ, श्रीमंगेशदेव यास सरकारांतून इनाम रुपये तीनशें मौजे प्रियोळ प्रांत फोंडें या गांवीं करून दिले आहेत. त्यास मौजे मजकुराच्या पाटील कुळकर्णी यांनीं तीनशें रुपयांची जमा करून दिली आहे....'

तिसऱ्या सनदेंतील मजकूर:–

'राजश्री देसाई गांवकर कुळकर्णी मौजे प्रियोळ तर्पे अंत्रुज मामले फोंडा. भाव संवत्सर. श्रीदेवास अमृतपड नंदादीप चालावे याबद्दल महाराज स्वामीनीं मौजे मजकुरचीं ठिकाणें घालून द्यावीं म्हणून श्रीदेवास शिक्के रायस दिला असे व देसाई गांवकर यांचे नांवीं शिक्के रायस आला असे. त्या प्रमाणें रा. अधिकारी विसंमानवरु यांचें पत्र रा. फोंडें सुभेदार ज्ञान लिंगय्या नवरु यांस श्रीमुख संवत्सर युक्त भाव संवत्सर चैत्र बहूल ११ दशीचे मितीचें आलें तें भाद्रपद १४ शी दिवशीं पावलें. तेणेंप्रमाणें व दोन रायसांप्रमाणें सरसुभेची सनद मामलीं

* हें पत्र व्हिसी रै द इंदिय यांना ११ जून सन १७५४ रोजीं मिळालें
(Livro VII do tratado de Concertos de Pazes por J. Bicker)

सादर झाली ती पाहून मौजे मजकूर पैकीं ठिकाणा दुमाला करून दिलीं आहेत. येणेंप्रमाणें ६४० असर्फीची ठिकाणां श्रीदेवास घालून दिलीं आहेत. येणेंप्रमाणें साल दरसाल चालवून देणे. हे सनदींची तालीक लिहून घेऊन अस्सल सनद भोगवटेस फिरावून देणें. ताजे सनदीचा हुजूर न करणें. जाणिजे. रवाना कार्तिक शु. १५ मा. ( मोर्तब शुद्ध धाकटा शिक्का ).

या सनदांनंतर पोर्तुगीज राजवटींत या सनदांस पाळा देण्याबाबत जे करार, डिक्री, किंवा सरकारी नियमावली अंमलांत आली व ज्या सरकारी कायद्यान्वयें प्रियोळ गांवचा एक वाडा 'मोकासा' व इनाम हक्क, श्रीमंगेश देवाची मालकी हक्क विषयक मान्यता देण्यांत आली, तो सरकारी कायदा व त्यांतील श्रीमंगेश देवालयाच्या संबंधित उतारे पोर्तुगीज भाषेंत जशाचे तसे खालीं माहितीसाठीं दिले आहेत.

Regulamento para a execção do Decreto com fôrça de lei de 15 de Dezembro de 1880. (Vide Mapa numero 2 e Mapa número 3).

Regulamento de Dessaiados, Decreto Provincial numero 144 de 22 de Outubro de 1896.—;

"Mercê do pagode de Xri Manguex de Priol."

"Mocassó—O bairro Manguex de aldeia Priol de Pondá."

"Pensão paga pela Fazenda Pública na importância de Rupias 14-14-09."

□□□

# ८ | कुशस्थलीकरांचीं पालवी देवस्थानें

श्रीमंगेशदेवाचे कुळावी महाजन ' वत्स ' व ' कौंडिण्य ' या दोनच गोत्रांचे आहेत. मुख्य कुलदैवत श्रीमंगेशानंतर उपदैवत किंवा पालवी दैवताशीं त्या सर्व कुळावी महाजनांचा उपासक परंपरेने संबंध येतो. ' पाल ' ' पालव ' याचा अर्थ सहाय्य असा आहे. पालवी म्हणजे सहाय्यभूत किंवा उपकुल देवता. मुख्य कुलदेव श्रीमंगेश आपल्या कुळावी महाजनांचें कल्याण करतांना या पालवी देवतांचें सहाय्य घेत असतात अशी या मागची भावना आहे. त्यामुळें श्रीमंगेश देवस्थानांत येऊन श्रीमंगेश कुलदेवाचें दर्शन, पूजाअर्चा, देवकृत्यें पूर्ण केल्यानंतर प्रत्येकानें आपल्या कुटुंब कल्याणार्थ व वंशपरंपरेनें चालत आल्याप्रमाणें आपली जी पालवी देवता असेल त्या देवस्थानांत जाऊन, तेथें त्या देवतेचें दर्शन, पूजा-अर्चा, देवकृत्य, जें काय आपल्या इच्छेप्रमाणें करणें असेल तें करून, नंतर परत आपल्या कुलदेव श्रीमंगेशाकडे येऊन दर्शन घेण्याची पद्धत असते. म्हणजे कुल-परंपरेनें चालत आल्याप्रमाणें श्रीकुलदेव व पालवीदेवी यांचें दर्शन, देवकृत्य वगैरे करून यात्रा पूर्ण झाल्याचें मनास समाधान मिळतें.

श्रीमंगेश देवाच्या सर्वच कुळावी महाजनांची पालवी देवी एकच नसून जे कोणी कुळावी महाजन, लाड, केंडारी, भांडारी, राजाध्यक्ष, दळवी, पालेकर, कंठक, भिसे, वागळे, तेलंग, केंकरे, नाईक मांयकर, धुमें, काबाडी, नाईक संजगिरी या वांगडांचे असतील, त्यांची पालवी देवी बांदीवडें येथील श्रीमहालक्ष्मी देवी असून, राहिलेल्या शिंगणदळवी, ब्रम्हे, नेत्रावळकर, नाईक हिंगटे, सत्यवंत भांडारी, दळवी, कैसरे, भेंडे या वांगडांच्या उपनांवांच्या कुळावी महाजनांची पालवी देवी म्हार्दोळ येथील श्रीमहालसा देवी आहे. तसेंच, तिनईकर व नाईक कोळंबे ( करंडे ) यांची पालवीदेवी श्रीआर्यादुर्गा अंकोला ( कारवार ) येथें आहे.

× × ×

## श्रीमंगेश देवस्थान, मंगेशीं व श्रीशांतादुर्गा देवस्थान, कवळें यांमधील परस्पर संबंध

या दोन्ही देवस्थानांतील परस्पर ठिकाणच्या महाजन मंडळीस परस्परांत सर्व प्रकारचा अग्रेसरत्वाचा मान देण्याची वहिवाट आहे. श्रीमंगेश देवस्थानच्या नियमावली कायद्यांत ( कोंप्रोमिस कलम ५० वें ) श्रीशांतादुर्गा देवालयाचे महाजन एखाद्या उत्सवास ज्या ज्या वेळीं हजर असतील तेव्हां त्यांचे रिती-प्रमाणें स्वागत करून त्यांस अग्रमानपूर्वक वागविण्यांत येईल असा स्पष्ट आदेश आहे. अशाच प्रकारें श्रीशांतादुर्गा देवालयाच्या नियमावली कायद्यांत ( कोंप्रोमिस कलम ४२ वें ) श्रीमंगेश देवाच्या महाजनांस जो आजवर अग्रमान देण्याची वहिवाट आहे ती तशीच चालू असावी; श्रीमंगेश संस्थानीं श्रीशांतादुर्गेच्या महाजनांस उत्सवाचे प्रसंगीं अग्रमान देण्याची वहिवाट आहे तशाच रितीनें श्रीमंगेश देवाचे कुशस्थळीकर महाजन यांसही श्रीशांतादुर्गा संस्थानीं उत्सवादि प्रसंगीं तशाच रितीचा अग्रमान देण्यांत याचा असा स्पष्ट आदेश आहे. यामुळें माघ शुक्ल पौर्णिमेच्या महापर्वणीमहोत्सवाच्या दिवसांत किंवा महाशिवरात्री उत्सवांत श्रीमंगेशदेवाची स्वारी रथारूढ होत असते त्यावेळीं रथावर नारळ फोडणें, चौकावर मानाचे विडे वांटणें इत्यादि बाबतींत श्रीशांतादुर्गा-कवळेंच्या महाजनांस मान देण्याची वहिवाट आहे. त्याचप्रमाणें मुक्तद्वार असलेल्या दिवसांत देखील परस्पर देवस्थानांतील पुराणिक, हरिदास यांसही पहिल्यानें पुराण सांगण्याचा व कीर्तन करण्याचा मान दिला जातो.

□ □ □

# ९ | श्री कैवल्यपूर मठ : संक्षिप्त माहिती

श्रीसंस्थान कैवल्यपूर मठासंबंधानें जी आज माहिती उपलब्ध आहे व जी सदर मठांतून मिळालेल्या परंपरादर्शक पटावरून घेऊन 'श्रीसंस्थान कैवल्यपूर मठाचा संक्षिप्त इतिहास' ( लेखक कै. वे. शा. सं. भिषग्वर्य रामचंद्र वामन नायक करंडे शास्त्री ) या पुस्तकांत शके १८३२ सालीं प्रसिद्ध केली आहे, त्यांत खालीलप्रमाणें माहिती मिळते :

'सुमारें १४८६ शकाच्या अजमासीं गोंव्यांत फिरंगी लोकांनी सासष्टी प्रांत जाळून, लुटून बलात्कारानें बाटविला. त्यावेळीं केळोशी नजीक कुशस्थली ग्रामीं असलेल्या गौडपादाचार्य परंपरेच्या प्राचीन मठाचा सर्वस्वी नाश केला गेला. त्यांत असलेले जुने कागदपत्र व दुसरे महत्वाचे बहुतेक लेख आणि पुस्तक-संग्रह इ. सर्व, जादुगिरीचे लेख असतील अशा समजुतीनें, फिरंगी पाद्र्यांनीं आपल्या नेहमींच्या सांप्रदायाप्रमाणें अग्न्यर्पण केले. याप्रमाणें मठ उध्वस्त झाल्या-नंतर तत्कालीन परंपरागत स्वामी हे गोवा प्रांताच्या आसपास गोळवण, चिन्नर वगैरे मठांत कांहीं काळ राहून गोंव्यांत लवकर स्वस्थता होण्याचें चिन्ह न दिसल्यामुळें कोठेंतरी पुण्य क्षेत्रांत वास्तव्य करणें बरें, म्हणून श्रीक्षेत्र वाराणसी येथेंच जाऊन राहूं लागले. पुढें कांहीं कालानें म्हणजे शके १५२२ च्या अज-मासीं फिरंगी अंमलांत सर्वत्र स्वस्थता झाल्यानंतर तत्रत्य ब्रह्मवृन्दाला शिक्षादिक्षादि दानार्थ परंपरागत गतधर्म गुरूंची आवश्यकता वाटून शोध चालविला. व तदंतीं ( ६१ वे ) श्रीसदानंद स्वामींचे शिष्य ( ६२ वे ) श्रीमद्भावानंद सरस्वती श्रीकाशी क्षेत्रीं असत, ते परंपरागत धर्मगुरू आहेत असें समजून त्यांना गोवा प्रांतीं श्रीशांतादुर्गा देवतेच्या सान्निध्यांत पुन: मठ तयार करून राहाण्याची विनंती केली. पण त्यांस काशीवास विशेष श्रेयस्कर वाटून आपण स्वत: गोमंतकींत न येतां ( ६३ वे ) श्रीसच्चिदानंद सरस्वती या नांवाच्या आपल्या शिष्यास गोमंतकस्थ शिष्यवृन्दाला शिक्षादिक्षादि दानाचा अधिकार देवून रवाना केलें. पुढें कवळें

येथें नवीन मठ तयार झाला व काशींतून आलेले श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती हे त्या मठांत राहूं लागले. यांच्यानंतर ही परंपरा पुढें चालत येऊन सध्या ७७ व्या परंपरेचे श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती ( विद्यमान ), श्रीमत् गौडपादाचार्य श्रीसंस्थान कैवल्यपूर–कवळें मठ गादीवर आहेत.'

केळोशी कुशस्थलादि स्मार्त सांप्रदायी, श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा इत्यादि कुलदैवतांची महाजन गौडसारस्वत ब्राह्मण मंडळी या संस्थानच्या शिष्यत्वाखालीं येते. कवळें मठांत मध्यभागीं श्रीविठ्ठल देवाची स्थापना असून, प्राकारांत सहा समाधि आहेत.

वरील माहिती वाचल्यानंतर तसेंच श्रीकवळें मठाची संप्रदाय परंपरेची फार पुरातन कालापासून आजच्या कालापर्यंत सतत चालत असलेली बिरुदावली प्रदीर्घ आणि ठराविक आहे ती पाहातां श्रीगौडपादाचार्य आद्य मठ गोमंतकांत प्रारंभीं कुशस्थलीनगर ( कुठ्ठाळ ) येथें श्रीमंगेशदेवतासन्निधानींच होता हें समजून येतें व दैवतांच्या स्थलांतरांनंतर तो मठ सध्याच्या जागीं कवळें येथें बांधला गेला आहे हें लक्षांत येतें.

× × ×

## श्रीगुरुस्वामी श्रीमद्गौडपादाचार्य श्रीसंस्थान मठ, कैवल्यपूर (कवळें)

श्रीमद्गौडपादाचार्य श्रीसंस्थान मठ कैवल्यपूर ( कवळें ) स्वामी महाराजांची स्वारी आपल्या मुख्य मठांत कवळें येथें वास्तव्यास असल्यास, श्रीमंगेश देवस्थानच्या मुख्य यात्रेस म्हणजे महापर्वणी माघ शुक्ल पौर्णिमेस श्रीमंगेश देवस्थानांत अवश्य येत असते. त्यावेळीं, किंवा संचारोद्देशानें वगैरे श्रीस्वामी महाराजांचें आगमन श्रीमंगेश स्थलांत झाल्यास देवस्थानांत असलेल्या सर्व महाजन मंडळीनें देवाच्या एकंदर लवाजम्यासह श्रीस्वामी स्वारीच्या सामोरें जाऊन त्यांना देवस्थानांत सत्कारानें आणलें पाहिजे. देवस्थानांत श्रीस्वामीमहाराजांची पाद्यपूजा वगैरे झाली पाहिजे. ही पाद्यपूजा देवस्थानचे वैसास यांच्या हातून करण्याची वहिवाट चालत आली आहे. देवस्थान श्रीस्थलांत श्रीस्वामी महाराजांची स्वारी असतां उत्सवाचे वेळीं म्हणजे श्रीदेवाची स्वारी, रथ, पालखी वगैरे यानारूढ होऊन मिरवणूक निघते त्या सर्व प्रसंगींही श्रीस्वामी महाराजांच्या मुक्कामीं वाद्य, मशाल वगैरे पाठवून श्रीस्वामी महाराजांस आणलें पाहिजे.

श्रीमंगेश देवस्थानाच्या नियमावली कायद्यांत (कोंप्रोमिस कलम ४८ वें)

असा स्पष्ट आदेश आहे कीं, ज्या ज्या वेळीं श्रीकैवल्यपूर अगर चित्राव मठाधीश स्वामींची स्वारी श्रीमंगेश संस्थानीं यावयास निघेल तेव्हां श्रीआलया पर्यंत स्वारी बरोबर चालण्यास ठराविक टप्प्यांवर रितीप्रमाणें वाद्य व हिलामत सामोरे पाठविण्यांत यावी आणि संस्थानीं आल्यावर त्यांचा योग्य सन्मान करण्यांत यावा. उल्लेखित स्वामी महाराजांचा मुक्काम मोकाशाच्या हद्दींत असल्यास, वाद्य, मशाली वगैरे राजचिन्हें त्यांच्या निवासस्थानीं पाठवून त्यांस श्रीमंगेश देवाच्या मिरवणुकीस अगर कोणत्याही उत्सवास आणण्यांत यावें.

गौड सारस्वतांच्या कोणत्याही स्वामींशीं असेंच वर्तन ठेवलें जावें असाही स्पष्ट आदेश त्या कलमांत आहे.

तसेंच धार्मिक बाबतींत कदाचित लढा उपस्थित झाल्यास महाजन मंडळीनें विनंती केल्यावर कैवल्य मठाधीश श्रीस्वामी जो निकाल देतील तो मान्य केला जाईल, असाही आदेश उल्लेखित नियमावलीच्या ७२ व्या कलमांत दिलेला आहे.

□ □ □

# १० | श्रीमंगेश देवालयांतील प्रसाद-कौल

फार प्राचीन कालापासून परंपरेनें श्रीमंगेश देवस्थानांत चालत आलेली वहिवाट व तत्संबंधीं उपलब्ध झालेली माहिती:—

श्रीमांगिरीश तथा श्रीमंगेश देवस्थानांत, त्या देवाचे कुळावी महाजन व इतर भक्तजन प्रसंगानुसार श्रीकडे जाऊन आपली जी काय मनोच्छित कामना असते ती दर्शवून भक्तिभावानें श्रीचरणीं गाऱ्हाणें घालून व मागणी करून प्रसाद-कौल घेण्याची वहिवाट पुरातनकालापासून रूढ आहे. हे प्रसाद-कौल श्रीमंगेश देवालयांत, श्रीमंगेश देवाचे गर्भागारांतील शिवलिंग व त्या शिवलिंगावर महापूजेनंतर श्रीमंगेशदेवाचे सुवर्ण कवच ठेवतात, त्याच्यासमोरच चौकावर श्रीमंगेशदेवाकडे हात जोडून आपल्या हातांत श्रीफळ ( नारळ ) घेऊन प्रार्थना करीत ध्यानस्थ स्थितींत असलेली श्रीदेवशर्मा उर्फ श्रीग्रामपुरुषाची काळ्या पाषाणाची मूर्ती प्रतिष्ठापित केलेली आहे, या मूर्तीलाच प्रसादपूजा लावून मागणी करण्याची पद्धत आहे. हे जे प्रसाद-कौल घेण्यासाठीं प्रसादपूजा लावतात, ती पूजा फक्त तांबड्या पोटकुळीच्या फुलांच्या पाकळ्या व कळ्या यांचीच लावतात. या प्रसाद-कौल मागणीचा भावार्थ असा कीं, आम्ही भक्तगणांनी आपली जी काय इच्छा किंवा विचारणा असेल, ती श्रीमंगेशदेवास प्रार्थना करून, शरण जाऊन, श्रीदेवशर्मा किंवा श्रीग्रामपुरुष यांच्या चरणीं सादर करावयाची. श्रीदेवशर्मा उर्फ श्रीग्रामपुरुष हे आमचें गाऱ्हाणें श्रीमंगेशदेवाकडे पोहोचवून, तो श्रीमंगेशदेव जी काय आज्ञा-निरोप देईल, ती आज्ञा-निरोप श्रीदेवशर्मा उर्फ श्रीग्रामपुरुष आम्हां भक्तगणांस प्रसाद-कौल देऊन फर्मावतील.

हा भावार्थ, ज्यांची अढळ श्रद्धा, पूर्ण विश्वास व भक्तियुक्त अंतःकरणानें श्रीचरणीं आपली मनोच्छित कामना सादर करून प्रसाद-कौल मागणी करीत आले, त्या परंपरागत पिढ्यांपासून मानण्यांत आला आहे.

श्रीग्रामपुरुषाच्या पाषाणी मूर्तीस जी एकंदर प्रसादपूजा लावावयाची असते,




श्रीग्रामपुरुषाची प्रसादमूर्ति

( ४९ पाकळया व कळया लावलेली )


देवालयांतील चौक





श्री मंगेश देवालय

श्री मंगेश देवालयाचें विहंगम दृश्य





सुखासन



श्रीग्रामपुरुषाची मूर्ति
व
श्रीनंदिकेश्वर



श्री ग्रामपुरुषाची प्रसादमूर्ति

( ४९ पाकळया व कळया लावलेली )

त्यांत त्रेचाळीस जागीं पाकळ्या व सहा जागीं (छायाचित्रांत दाखविलेले नंबर— १०, ११, १२, १३, १४, १५.) फुलांच्या कळ्या मिळून एकंदर एकोपन्नास ठिकाणीं लावण्याची पद्धत पुरातन कालापासून चालत आलेली आहे. त्यांतील प्रत्येक कळीचा व पाकळीचा वेगवेगळा अर्थ त्या प्राचीन काळापासून पूर्वजांनीं स्वानुभवानें, किंवा श्रीमंगेश देवाच्या दृष्टांतानेंही असेल, ते ठरवून घेतलेला आहे त्यासंबंधीचा हस्तलिखित दस्तऐवज फार जुन्या दप्तरांत उपलब्ध झालेला (व सन १९१९ सालीं त्याची प्रत मिळविलेला) जशाचा तसा पुढें दिलेला आहे.

हस्तलिखित उपलब्ध झाल्यास आज जवळजवळ अर्ध शतकाचा अवधि होत आला, या पण अवधींत किंवा तत्पूर्वीं ती कुठेंच छापून प्रसिद्ध केली नसेल. प्रसाद-कौल हा विषय केवळ भावार्थी, दृढनिष्ठा असलेला भक्तजन या संबंधीचाच असल्याचें गृहीत मानून त्याची छपाई प्रसिद्धि वगैरे केल्यास चिकित्सक वादास, एक कारण होईल अशा संदर्भात कोणीही त्यास प्रसिद्धि दिली नसेल, किंवा प्रत्येक देवालयांत प्रसाद घेण्याची तऱ्हा त्याचे अर्थ किंवा परिभाषा वेगवेगळी असणें शक्य आहे, तेव्हा ही एकाच देवालयाबद्दल सांकेतिक प्रसाद परिभाषा कां म्हणून प्रसिद्ध करावी, अशी एक किंवा अनेक कारणें तें प्रसिद्ध न होण्यामागें असणें अशक्य म्हणतांही येणार नाहीं. शेंकडों वर्षांचा काल ही परिभाषा प्रसिद्ध न होतां त्यावरून उलटला व आतां पुढेंही उपलब्ध झालेलें हें दुर्मिळ हस्तलिखित प्रसिद्धिअभावीं पडून राहिल्यास, अशा दुर्मिळ माहितीचा उपयोग प्रसंग विशेषें होणें कठीणच होईल, या हेतूनें व ही माहिती प्रसिद्ध केल्यास असंख्य गरजू, निष्ठावान, श्रद्धाळू भक्तजनांस याचा प्रसंग विशेषीं उपयोग होऊं शकेल, या एकाच भावनेनें हस्तलिखित माहिती श्रीमंगेशदेवापुढें श्रीग्रामपुरुषाची पाषाणी मूर्ती चौकावर आहे, त्या मूर्तीच्या चरणांसान्निध ठेऊन प्रार्थना मागणी करून प्रसाद-कौल मागितल्यानंतर श्रीची पूर्ण संमतीची आज्ञा ती प्रसिद्ध करण्यासाठीं झाली व तो तसा स्पष्ट निःसंदिग्ध प्रसाद-कौल झाल्यामुळेंच ही पुढें दिलेली प्रसाद-कौलाची परिभाषा, किंवा विवरण, प्रसिद्धीसाठीं उपयोगांत आणण्याची तजवीज केली. भक्तजन हे परिश्रम श्रद्धाळू भावनेनेंच पाहतील असा विश्वास वाटतो. दिवसेंदिवस भाविक भक्तजनांची प्रसाद-कौल घेण्यास गर्दी होत असल्या-मुळें प्रत्येक वेळीं वर उल्लेखिल्याप्रमाणें एकोण पन्नास (पैकीं चाळीस पाकळ्या व सहा कळ्या) प्रसाद फुलें लावून प्रसाद घेणें शक्य होत नसल्यामुळें जरूरी-

पुरते प्रसाद-कौल घेण्यासाठीं श्रीदेवशर्मा उर्फ श्रीग्रामपुरुषाचे मूर्तीस सात पाकळ्या व सहा कळ्या लावून प्रसाद-कौल घेण्याची बऱ्याच वर्षांपासून वहिवाट आहे. असें जरी झालें, तरी सर्व भाविक श्रद्धाळू भक्तजनांस आपले प्रसाद-कौल निःशंकपणं घेण्यांत अडचण पडत नाहीं असें सांगण्यात येतें.

× × ×

## प्रसाद-कौलाचें विवरण किंवा परिभाषा

१. मुकूट ॥ वर्धनीरूप सर्वांत श्रेष्ठ–बरेपणास अथवा वाईटपणास–तसेंच वाईट आहे.

२. मस्तक ॥ मान्य आहे किंवा अमान्य.

३. ललाट ॥ प्रारब्ध–दुष्ट–सुष्ट.

४. केशी उजवी ॥ पालवी देवी किंवा घरांतील समंधी स्त्री.

५. डावी केशी ॥ ग्रामदेवी–अन्य देवता–अन्य समंधीक स्त्री.

६. उजवा कर्ण ॥ कर्तृत्व घरांतील दायाद समंधी–बाहेरील दायाद लोकांचे

७. डावा कर्ण ॥ बाहेरील द्वेषिक लोकांचे कर्तृत्वापासून.

८. उजवा भूज ॥ स्वकीय समंधी भुजबळ.

९. डावा भूज ॥ परकी समंधी भुजबळ.

१८. हृदय ॥ समज घेणें.

२१. जठर ॥ उदरनिर्वाह करतो–उदरांत घालून संरक्षण करतो.

१०. उजवी स्थानक प्रथम ॥ शीघ्रकार्य–होत नाहीं–स्थान मान पूर्वी किंवा मर्यादा.

१२. स्थानक दुसरी उजवी ॥ मध्यमकार्य. बाकी सर्व वरील प्रमाणें.

१४. स्थानक तिसरी उजवी ॥ विलंब कार्य. बाकी वरीलप्रमाणें.

११. डावी स्थानक प्रथम ॥ नंबर १० चे प्रमाणें.

१३. डावी दुसरी स्थानक ॥ नंबर १२ चे प्रमाणें.

१५. डावी तिसरी स्थानक ॥ नंबर १४ प्रमाणें.

१६. हात जोडी ॥ हात जोडतों पुरे कर–तुझे कार्यांत विघात करणेबद्दल दुसरा हात जोडतों.

१७. फल आहे किंवा नाहीं.

१९. उजवा मनगट ॥ स्वकीय मनगटीस धरून कार्यसिद्धि.

२०. डावा मनगट ॥ परकीय लोक.
२२. उजवा कोपर ॥ घरगुती प्रतिबंध.
२३. डावा कोपर ॥ बाहेरील प्रतिबंध.
२४. उजवी जांग ॥ कास भास घरगुती.
२५. डावी जांग ॥ कास भास परकीय.
२६. प्रजापती ॥ प्रजापतीकडे विचार–खोद्धन टाकितो प्रजापतीनें.
२७. उजवा चरण ॥ घरगुती लोक कार्य करूं नको म्हणतात–पाय धरतात–अथवा पायानें मर्दन करतो.
२८. डावा चरण ॥ बाहेरील लोक सदर प्रमाणें.
२९. उजवे ढोपर पायाचें ॥ धोपर धड्यावर–मोहगम–घरांतील.
३०. डावे ढोपर पायाचें ॥ धोपर धड्यावर–सदर पाठीवरचेप्रमाणें.

| | | |
|---|---|---|
| ३१.<br>३२.<br>३३. | उजवी प्रभावळीचे मुळचीं तीन त्रिकुटें | समंधीक उपद्रव.<br>घरगुती लोकांचे उपद्रव. |
| ३४.<br>३५.<br>३६. | उजवे प्रभावळीबाबत तीन त्रिकुटें मधलीं | स्थानकांप्रमाणें<br>(१०-१२-१४ प्रमाणे) |
| ३७.<br>३८.<br>३९. | उजवे प्रभावळी वरील त्रिकुटें तीन | घरच्या पुरुषाचे उपद्रव. |

४०. मस्तक प्रभावळ ॥ मूळ देवताक्षोभ–संतोष–कीर्ति–अकीर्ति.

| | | |
|---|---|---|
| ४१.<br>४२.<br>४३. | डावे प्रभावळीवरील तीन त्रिकुटें | श्रीमुळकेश्वर–श्रीरवळनाथ.<br>श्रीग्रामदेवता वगैरे.<br>बाहेरील उपद्रव. |
| ४४.<br>४५.<br>४६. | डावे स्थानक तीन | प्रभावळ स्थानकाप्रमाणें.<br>( ११–१३–१५ प्रमाणें. ) |
| ४७.<br>४८.<br>४९. | खालील तीन त्रिकुटा | बाहेरील समंधीक उपद्रव.<br>परकी लोकांचे उपद्रव. |

श्रीमंगेश देवस्थानांत प्रसाद-कौल, वर्षाचे एकंदर दिवशीं घेण्याची वहिवाट नाहीं. म्हणजे देवस्थानांत होणाऱ्या विशेष महोत्सव प्रसंगीं व इतर कांहीं ठराविक दिवशींही प्रसादपूजा लावण्याची पुरातन कालापासून वहिवाट नाहीं. ज्या ज्या दिवशीं प्रसाद-कौल त्या देवस्थानांत घेण्यांत येत नसतात, ते ते सर्व दिवस मुद्दाम खालीं नमूद करण्यांत येत आहेत.

**चैत्र महिना** : शुक्ल प्रतिपदा (संवत्सर प्रतिपदा), शुक्ल नवमी (श्रीरामनवमी), शुक्ल दशमी.

**वैशाख महिना** : शुक्ल तृतिया (अक्षय्य तृतिया.)

**आषाढ महिना** : शुक्ल एकादशी, शुक्ल द्वादशी, व कर्कसंक्रांत येईल त्या दिवशीं.

**श्रावण महिना** : प्रत्येक सोमवारीं, शुक्ल पंचमी (नागपंचमी), शुक्ल पौर्णिमा (नारळी पौर्णिमा), वद्य अष्टमी (श्रीकृष्ण जयंती).

**भाद्रपद महिना** : शुक्ल चतुर्थी (श्रीगणेश चतुर्थी), शुक्ल पंचमी (ऋषी पंचमी), शुक्ल चतुर्दशी (श्रीअनंत चतुर्दशी).

**आश्विन महिना** : नवरात्र शुक्ल प्रतिपदा ते दशमी (विजयादशमीपर्यंत), वद्य द्वादशी, वद्य चतुर्दशी.

**कार्तिक महिना** : शुक्ल एकादशी ते पौर्णिमेपर्यंत, परंतु त्यांत त्रयोदशी तिथी एकच दिवशीं आल्यास त्या दिवशीं संध्याकाळीं प्रसाद-कौल घेण्याची वहिवाट आहे.

**मार्गशीर्ष महिना** : शुक्ल पौर्णिमा (श्रीदत्तजयंती).

**पौष महिना** : मकर संक्रांत (तारीख १४ जानेवारी), शिवाय शेवटच्या सोमवारीं सार्वजनिक महारुद्र सांगता होत असते त्या त्या दिवशीं.

**माघ महिना** : शुक्ल दशमी, शुक्ल द्वादशी ते पौर्णिमेपर्यंत (वार्षिक महापर्वणी महोत्सव), वद्य पंचमी (कवचोत्सव), वद्य चतुर्दशी (महाशिवरात्र).

**फाल्गुन महिना** : वद्य प्रतिपदेपासून वद्य पंचमी (रंगपंचमी) पर्यंत.

याशिवाय सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण ज्या दिवशीं येईल त्या दिवशीं प्रसाद घेण्यास मिळत नाहींत. जेष्ट महिन्यांतील तीसही दिवस तसेंच अधिक मास आल्यास त्या महिन्याचे तीसही दिवस प्रसाद घेण्यास मोकळीक असते.

× × ×

हे प्रसाद मुख्य उत्सवाचे दिवस खेरीज करून, सकाळीं निर्माल्य विसर्जन

झाल्यापासून रात्रौ आरती होईपर्यंत, किंवा सोमवार किंवा इतर दिवसांत श्रींची स्वारी मिरवणुकीस देवळाबाहेर पडण्यासाठीं पालखींत बसवून पालखी उठेपर्यंत लावीत असतात. हे प्रसाद घेण्यास फक्त हिंदु धर्मीय लोक येतात असें नसून ख्रिश्चन धर्माचे लोकही येतात. त्यांत विशेषेंकरून कुडाळ गांवांतील ख्रिश्चन असतात. जर कोणीही हिंदुधर्मीय देवाचा प्रसाद घेण्यास बसलेला असेल व त्यावेळीं जर देवालयाच्या आवारांत-प्राकारांत कुडाळचा ख्रिश्चन प्रसाद घेण्याच्या हेतूनें आला असेल, तर त्या हिंदुधर्मीय इसमास निर्णायक प्रसाद-कौल होत नाहीं असें मानतात व तसा अनुभव आहे, म्हणून हिंदुधर्मीय इसमानें लावलेले प्रसाद स्वखुषीनें झडवून, त्या कुडाळच्या ख्रिश्चन इसमास विचारून त्याचे प्रसाद प्रथम घेतात व नंतरच हिंदुधर्मीय इसम आपले प्रसाद घेण्यास आरंभ करतो. हें अग्रेसरत्व फक्त कुडाळ गांवच्या ख्रिश्चन इसमांपुरतेंच वहिवाटींत असून इतर कोणासच नाहीं. कुडाळचे ख्रिश्चन गावडे शेतकरी प्रतिवर्षी शेताचें नवीन पीक आल्यावर शेताची कापणी करण्यापूर्वी शेतजमिनींत पिकलेल्या भाताचीं कांहीं नवीं कणसें घेऊन मंगेशींस आणून श्रीमंगेश देवास व सर्व पंचायतन देवतांस अर्पण करतात. त्यास 'नेवुं' 'नवें' असें संबोधण्यांत येतें. याचा अर्थ नवान्न, नवें कणीस, तें देवास अर्पण केल्याखेरीज शेताची कापणी किंवा भात वापरण्यास काढावयाचें नाहीं असा गोमंतकांत सर्वत्र रिवाज आहे. गोमंतकांतील ख्रिश्चन लोक हें नवें आपआपल्या चर्च इग्रेजमध्यें अर्पण करतात.

□ □ □

८६९८
५३८
प्रवाक 31-3-82

# ११ | वार्षिक अनुष्ठानें : त्यांचा पूर्वेतिहास

## स्मार्त सारस्वत ज्ञातीचे कल्याणार्थ श्रीमंगेश आणि श्रीशांतादुर्गा दैवतांचरणीं प्रतिवार्षिक अनुष्ठानें चालू आहेत, त्यांचा परिचय व पुर्वेतिहास

स्वीय स्मार्त सारस्वत ज्ञातीचे कल्याणार्थी श्रीकुलदेवता ( श्रीमंगेश व श्रीशांतादुर्गा ) स्थानीं वार्षिक अनुष्ठानादि देवकृत्यें चालू आहेत, त्याबद्दलची पूर्वपीठिका व गतेतिहास काय आहे याची जाणीव श्रीमंगेश व श्रीशांतादुर्गा या दोन्हीं दैवतांच्या कुळावी महाजनांस असणें फार जरुरीचें आहे. यासाठी शके १८०० सालीं म्हणजे ९२ वर्षांपूर्वी श्रीमंगेश देवस्थानांत श्रीमंगेश व श्रीशांतादुर्गा या दोन्ही देवालयांचे कुळावी महाजन एकत्र जमून त्यांनीं जो एकमतानें ठराव केला व नंतरच्या कालांत त्याची अंमलबजावणीही झाली, त्या ठरावाची नक्कल खालीं दिली आहे; त्यावरून सर्व परिस्थितीची संपूर्ण कल्पना येण्यास मदत होईल अशी आशा वाटते.

॥ श्री ॥

'स्वस्ति श्री नृप शालीवाहन शके १८०० बहुधान्य माघ कृष्ण १ दा भृगुवार प्रभात श्रीमंगेश संस्थान कुशस्थली निवास पिरयोळ तर्प्ये अंतरूज येथें महापर्वणीस मिळालेली सारस्वत स्मार्त केळोसी कुशस्थळी ब्रह्मवृन्द मंडळी यांहीं सिद्धांत केला ऐसाजे. बहुतेक वर्षांमागें स्वकीय ज्ञातींत अकल्याणाची वृद्धि होऊं लागल्यापासून कित्येक सुविचारी गृहस्थांहीं कारण शोधितां पूर्वी कांहीं एक निमित्तानें श्रीगुरुस्वामींचा ह्या ज्ञातीस शाप झाला होता असें, होऊन गेलेले श्रीमच्छिदानंद सरस्वती स्वामी परात्पर गुरु प्रभृति गुरुपरंपरेच्या मुखतः विदित झालें, त्याचा हा परिणाम होय; असा सिद्धांत झाल्यावरून त्यावेळचे गृहस्थ मशारनिल्हे यांहीं तत्परिहारार्थ श्रीशांतादुर्गा व श्रीमंगेश देवता चरणीं प्रसादद्वारा निरोप घेऊन त्या

उभयस्थानीं अनुष्ठानें करून श्रीमूळकेश्वराचा अंवसर काढून विनंती केल्यावर कल्याणाविषयीं अभय मिळालें ( हें वृत्त श्रीसंस्थानांतील दाखल्यावरून समाजांत येत आहे ) व तदनुरुप ज्ञातीचें सर्व प्रकारें ऊर्जितही झालें. परंतु अलीकडे या ज्ञातींत संतति, संपत्ति व विद्या यांची हीनता, कुटुंबांत कलह, अनारोग्य वगैरे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून ती निकृष्टावस्थेप्रत येत आहे; अतएव उभय देवतास्थानीं प्रसादीं विचार करितां भूतकाळीं श्रीमूळकेश्वराच्या वचनाप्रमाणें अनुभव आला; परंतु वक्तित शापाचा परिहार न झाल्याकारणानें तो बाधक होत आहे. यासाठी दोन्ही देवतास्थानीं महारुद्र व हातचंडी होमद्वारा करून श्रीमूळकेश्वराचा अंवसर काढिल्या अंतीं त्या शापाचा ऱ्हास होऊन ज्ञातीस कल्याणकारक होण्याचा निरोप झाला आहे; त्यापेक्षां यद्विषयीं योग्य तजवीज व्हावी, अशा कांहीं गृहस्थांहीं ह्या सभेंत सूचना केलेल्या परस्परांत प्रतिपादित होऊन ठरलें कीं, वक्तित सूचना फार स्तुत्य आहेत, तेव्हां सदरीं व्यक्त तीं अनुष्ठानें करवून श्रीमुळकेश्वराचा अंवसर काढून निरोप घ्यावा व या महत्कृत्यांस अजमासें चार हजार रुपये लागतील त्याची भरपाई थोड्याच गृहस्थांकडून होण्याचा संभव असला तरी, हें सर्व स्वीय ज्ञातीचें कार्य आहे यास्तव एकंदर स्मार्त सारस्वत ज्ञातिगृहस्थ यांकडून द्रव्यांश मिळावा हें विहित जाणून, सर्व प्रांतीं स्वकियांस पत्रद्वारा अभिप्राय कळवून पैका येईल तो जमा करण्यानें वर्णित कार्यसिद्धी करणार्थी ह्या सभेचे सर्वसंमतें राजमान्य राजश्री विष्णु भास्कर शेणवीं केंकरे अध्यक्ष, राजमान्य राजश्री जिवाजी शिवराम शेणवीं कुंडईकर उपाध्यक्ष, राजश्री मंगेश रामकृष्ण शेणवीं गुडे चिटनिवीस या त्रिवर्गांची एक मंडळी नेमीत आहों. त्याप्रमाणें सदरहू मंडळीनें योग्य त्या रीतीनें पैका आदा करून श्रीशांतादुर्गा देवीस शतचंडी व श्रीमंगेश देवास महारुद्र हीं दोन्ही कृत्यें होमद्वारा चांगले तज्ञ ब्राह्मणांकडून करवून नंतर श्रीचा प्रसाद घेऊन योग्य त्या विधानानें श्रीमूळकेश्वराचा अंवसर काढविण्याचा प्रयत्न करावा. तो सिद्धीस जाऊन निरोप होईल तो सर्वांस विदित केला जावा, आणि पुढें श्रींच्या निरोपानुरुप कर्तव्यता करावी. सदरहू कार्य जे गृहस्थ वक्तशीर अनुकूल होतील त्यांचेही विचारें वक्तित मंडळीनें करावें, व पैक्याचा हिशोबही राखावा. याप्रमाणें हा केलेला तह सर्वांहीं वाचून ऐकून ठीक जाणून आपापल्या निशाण्या खालीं केल्या आहेत. लिहीत सभेचे मागण्यावरून गोविंद नीलकंठ भांडारी.'

या ठरावावर एकंदर सत्तर लोकांच्या सह्या असून त्यांतील कांहीं इसम

श्रीमंगेश देवाचे व कांहीं श्रीशांतादुर्गा देवीचे कुळावी महाजन आहेत. वरील ठरावाची छापील प्रत श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांत आहे.

'सदरीं ठरावांत दर्शविलेला शाप परिहारार्थ जीं कृत्यें श्रींचे निरोपानिरूप निश्चयार्थ जाहलीं होतीं ती शके १८०१ प्रमाथी संवत्सर सालीं दक्षिण प्रांत वर्गणीनें श्रीनीं आटपून घेतलीं. पुढें या ज्ञातीचे आचंद्रार्क राखण व कल्याणार्थ श्रीमंगेशीं, महारुद्र, एक श्रीशांतादुर्गेस महारुद्र एवं हवन द्वारा नवचंडी एक व बाकी कुळस्थानीं नेमणुका प्रकारें कृत्येंसुद्धा वार्षिक चालविण्याबद्दल श्रींचा निरोप झाहल्याप्रकारें शके १८०२ विक्रम संवत्सरापासून पूर्ववर्गणी शिलकेंतून चालूही झाहली.'

× × ×

## श्रीमंगेश देवस्थानांत कांहीं परिवार देवतांची पुनः प्रतिष्ठा झाली, त्यांची नोंद

पंचिष्ट देवतांपैकीं श्रीलक्ष्मीनारायण, श्रीसूर्यनारायण, श्रीवीरभद्र व श्रीगरुड आणि कौंडिण्य गोत्राचा मूळपुरुष श्रीशिवशर्मा यांची पुनः प्रतिष्ठा वैशाख कृष्ण द्वितिया शके १८५०, रविवार ता. ६ मे १९२८ या शुभमुहुर्तावर झाली.

श्रीशिवशर्माच्या देवाल्याची जुनी इमारत मोडून परत नवीन सुंदर देवालय बांधण्यांत आलें. या कारणास्तव श्रीशिवशर्मा लिंगाची पुनःप्रतिष्ठा करावी लागली. ही पुनःप्रतिष्ठा माघ वद्य तृतिया शके १८५८ शनिवार, म्हणजे ता. २८ फेब्रुआरी सन १९३७ या शुभमुहुर्तावर श्रीकैवल्य मठाधिपती श्रीमत्पूर्णानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या उपस्थितींत झाली.

श्रीनाईक स्वामींच्या पादुका जिथें होत्या, ती इमारत अत्यंत मोडकळीस आल्यामुळें त्या ठिकाणीं श्रीमंगेश देवस्थानच्या खर्चानें नवीन देवालय बांधलें व त्या देवालयांत श्रीनाईकस्वामींच्या पादुकांची पुनः प्रतिष्ठा माघ शुद्ध त्रयोदशी, बुधवार शके १८६१ तारीख २१ फेब्रुआरी सन १९४० या शुभमुहुर्तावर करण्यांत आली.

□ □ □

# १२ | देवस्थानचे दैनंदिन कार्यक्रम

**श्रीमंगेश देवस्थानचे दैनंदिन नित्य कार्यक्रम, वेळापत्रक व त्यासंबंधींची देवस्थानच्या नियमावलींत उल्लेखिलेली कलमवार नोंद**

दररोज पहांटे चार वाजतां एक तास चौघडा वाजविणें. या मिश्रवाद्य चौघडा-वादनांत दोन सनया, एक सूर्त (सूर) चार नगारे, एक थोर कर्णा व एक कांसाळें या वाद्यांचा समावेश होतो. (कलम २९)

या चौघडा वादनानंतर इतर वाद्यांची नौबत साधारणपणें अर्धा तास होणें. या चाल्त नौबतींत एक सनई, एक सूर्त, एक समेळ, एक कांसाळें, एक झांज, एक आराब, एक ढोलकें, एक थोर ढोल, एक थोर कासाळें, एक कर्णा व एक शिंग इतक्या वाद्यांचा समावेश होतो. (कलम ३१)

सकाळीं सूर्योदयानंतर पुजाऱ्यानें देवावरील निर्माल्य विसर्जन करणें व त्यानंतर देवकृत्यांस आरंभ होणें. [कलम २७ § ४ (१)]

विशेष देवकृत्य असल्यास, देवकृत्यास बसणाऱ्या वैदिक ब्राह्मणांस देवालयांत लवकर येण्याकरितां सकाळीं सात वाजतां घंटानादानें इशारा दिला जातो. त्याचप्रमाणें देवस्थानच्या आश्रित ब्राह्मण मंडळीनें आठ वाजेपर्यंत आपला नित्यक्रम उरकून हजर होणें. अकरा वाजतां एक तास चौघडा वाजविणें. (कलम ३०)

देवकृत्यास गर्दी असेल त्या मानानें दुपारच्या महाआरती होण्याआधीं अर्धा तास देवस्थानांत असलेल्या महाजन मंडळीस देवकृत्यास येण्यासाठीं घंटा नादानें इषारा होत असतो व त्यानंतर अर्ध्या तासानें नोकर लोकांस वगैरे देवालयांत येण्याकरितां नगाऱ्याचे डंक्यानें इषारा केला जातो. दुपारच्या महाआरतीच्या पूर्वी घंटानादानें इषारा मिळाल्यापासून अर्ध्या तासानें देवाची महापूजा बांधण्यात येते. या अर्ध्या तासांत जर कोणी अभिषेकादि देवकृत्य करूं इच्छित असेल तर होऊं शकतें. देवाचें लिंग पुसून पूजा बांधणी सुरू झाल्यानंतर तें देवकृत्य त्याच दिवशीं न होतां दुसऱ्या दिवशीं करण्यासाठीं ठेवणें भाग पडतें.

संध्याकाळीं पांच वाजतां पुन्हा एक तास चौघडा वाजविणें ( कलम ३० ) संध्याकाळीं सहा वाजतां नौबत वादन होणें. ही नौबत प्रारंभीं श्रीमंगेश देवाच्या मुख्य देवालयांत झाल्यानंतर श्रीमुलकेश्वराच्या देवालयांत व त्यानंतर श्रीलोमशर्मा ( कौंडिण्य पुरुष ) यांच्या देवालयांत होणें. अशी नौबत होऊन नौबतवाले वाजंत्री परत श्रीमंगेशदेवाच्या मुख्य देवालयांत पोहोचेपर्यंत साधारणपणें पाव तास नृत्यांगनांकडून नृत्यगान श्रीमंगेशाचा देवालयांत होत असतें. ( कलम २७§१० )

प्रदोषकालीं निर्माल्य विसर्जन झाल्यानंतर संध्याकाळचे महानैवेद्य होत असतात व ते पुजारी दाखवीत असतात. [ कलम २७ § ४ ( ४ ) कलम २० ( २ ) ] संध्याकाळीं ८ वाजतां पुराणिकास देवालयांत पुराण वाचनास येण्यासाठीं घंटानादानें इषारा दिला जातो. इषारा मिळतांच अर्ध्या तासाचे आंत पुराणिक देवालयांत हजर होऊन एक तास पुराण कथन होतें. [ कलम २७§६ ( १ ) ]

पुराण संपल्यावर रात्रौ १० वाजतां नगाऱ्याचा इषारा होतो व तो इषारा होतांच देवस्थानचा हरदास ( नित्यकीर्तनी ) हरिकीर्तन करतो व तें १०।। वाजेपर्यंत होऊन आरती होतात.

आरती झाल्यानंतर मंत्रपुष्प वेद्घोष करून ज्या इसमाची त्या दिवशीं महारुद्र, रंगपूजा, पालखी वगैरें सारखीं देवकृत्यें किंवा उत्सव असतील त्या यजमानाबद्दल अभिष्ट चिंतनार्थ श्रीकडे प्रार्थना करून नंतर समस्त महाजनांच्या आयुरारोग्य अभिवृद्धि व कुटुंब कल्याणार्थ तशीच प्रार्थना ( गाऱ्हाणें ) करावयाचें असतें.

यानंतर वैदिक ब्राह्मणांचा आशीर्वाद, त्यांस दक्षणा वांटणी व त्यानंतर नैवेद्य प्रसाद वांटणेंचा कार्यक्रम संपेपर्यंत चौकावर नृत्यांगनांकडून नृत्यगान होत असतें. शेवटीं नृत्यांगनांस नैवेद्य प्रसाद देण्यांत येतो व उत्सवाची त्या दिवसाची सांगता करण्याचा शेवटचा कार्यक्रम म्हणून नृत्यांगनांस हा प्रसाद देतांना प्रसादाच्या ताटास देवस्थान कमिटीचे कमाविसदार स्पर्श करण्यापूर्वी जर चौकावर श्रीशांतादुर्गा–कवळें देवालयाचे महाजन त्यावेळीं हजर असतील तर त्या महाजनास अग्रमानपूर्वक त्या प्रसादाच्या ताटास ( त्या ताटांत विडा असतों ) स्पर्श करणेंस लावून तो प्रसाद नृत्यांगनांस देतात ( कलम ५० ) व त्या नंतर शेवटीं देवस्थान कमिटीच्या कमाविसदारांकडून तशाच प्रसाद ताटास स्पर्श करवून तो प्रसाद नृत्यांगनांस देतात. हें झाल्यानंतर देवालयांतील त्या दिवसाचे उत्सवादि सर्व कार्यक्रम संपले आहेत असें समजावयाचें असतें.

हे सर्व कार्यक्रम संपल्यावर देवालयांत कोणीही बसून राहिलेला नाहीं, अशी

खात्री करून घेऊन आणि देवालयाच्या खिडक्या दरवाजे वगैरे बंद करून देवालयांत चार दिवे तेवत ठेवून पहिरेकर देवारी (पुजारी) आणि देवळी पहिरेकर या दोघांनीं सर्व रात्र देवालयांत राहिलें पाहिजे. [कलम ५७६५ (३)]

## प्रति सोमवार दिवशीं विशेष कार्यक्रम

प्रत्येक सोमवारीं श्रीमंगेश देवाचा शिबिकोत्सव होत असतो. श्रींची पालखीतून देवालयाभोंवतीं मिरवणूक होत असते. पण ती पालखी देवालयासभोंवार सारखी वर्तुळाकार प्रदक्षिणा घालीत नाहीं. ती पालखी पेणीं (मुक्काम) करीत करीत श्रीमंगेश देवालयाच्या पाठीमागें श्रीमूलकेश्वराच्या देवळासमोर गेली म्हणजे तेथून परत फिरते व श्रीमंगेशदेवालयाच्या डाव्या बाजूस जें तुलसीवृंदावन आहे, त्या तुलसीवृंदावनास प्रदक्षिणा करून नंतर ती देवालयांत परत येते. अशा प्रकारें घेतलेल्या प्रदक्षिणेला सोमसूत्री प्रदक्षिणा असें म्हणतात. या प्रदक्षिणेंत सोमसूत्र ओलांडून जायचें नसतें. सोमवारची पालखी खेरीज करून बाकी अन्य उत्सवाच्या वेळीं पालखी, गुड्यांचा रथ, लालखी, सुखासन, विजयरथ, हत्ती अंबारी वाहन किंवा थोरले रथ या वाहनांतून श्रींची मिरवणूक निघत असते. पण त्या उत्सवांत ती मिरवणूक देवालयाच्या सभोंवार वर्तुळाकार पद्धतीनें व सोमसूत्राची अडचण न धरितां होत असते. सोमवारची पालखी रात्रौ बरोबर दहा वाजतां देवालयांतून निघते व तिची नेमकीं पेणीं (मुक्काम) सोळाच ठिकाणीं होऊन अकरा वाजण्याच्या सुमारास देवालयांत परत येते. या पालखीबरोबर तसेंच कोणत्याही उत्सवांत वाहनांतून श्रींची मिरवणूक होत असतां देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीचे कमाविसदार (चिटणीस) आपल्या हातांत सोन्याचा राजदंड घेत असतात. तसेंच इतर महाजन व भक्तजन चवऱ्या मोर्चेलें वगैरे घेत असतात. दर सोमवारीं रोजच्या नियमाशिवाय सकाळीं आठ वाजतां एक तास चौघडा झडत असतो. त्याचप्रमाणें रात्रौ पालखी मिरवणूक चालू असतांही चौघडावादन चालू असतें.

महाजन मंडळींपैकीं कोणाही इसमाचें वास्तव्य कशाही निमित्तानें देवस्थानांत असल्यास त्यास सोमवारच्या दिवशीं श्रीमंगेशींहून बाहेरगांवीं जातां येत नाहीं. रात्रौ पालखीच्या उत्सवाची पूर्णपणें सांगता झाल्यानंतरच जातां येतें. पण एखादें महत्त्वाचें काम असेल तर अपरिहार्य कारणासाठीं व नाइलाज म्हणून श्रीमंगेशदेवापुढें नारळ ठेवून श्रींची प्रार्थना करून सांगणी करून नंतरच जातां येतें अशी वहिवाट आहे व ती वहिवाट प्रत्येक इसम अचूकपणें पाळीत असतो.

□ □ □

# १३ | देवस्थानचें कारभारविषयक जुनें दप्तर

श्रीदेव मंगेश कुशस्थलींत असतांना कुशस्थलीकरांचें कुलदैवत व अर्थातच देवस्थानचा सर्व खर्च विशेषेंकरून कुशस्थली गांवची ग्रामसंस्था करी हें सांगावयास नकोच. पण त्याही कालीं श्रीमंगेशदेवाच्या कुळावी भक्तजनांकडून आपआपल्या कुटुंब कल्याणार्थ व अभ्युदयार्थ श्रीचरणीं अव्याहतपणें चालू राहणारीं देवकृत्यें व उत्सव खर्चासाठीं स्वखर्चानें शेती, बागायती, कुळागरें इत्यादि जमिनी खरेदी करून श्रीमंगेशार्पण केल्याबद्दलचे पुरावे इतिहासांत (पोर्तुगीज सरकारच्या दप्तरखान्यांत असलेल्या कागदपत्र दाखल्यांत) मिळतातच.

पण त्याहीपेक्षा या गोष्टीचा विशेषरितीनें उल्लेख गोव्याचें ख्रिस्तीकरण करण्याच्या उद्देशानें जेजुइट पाद्रींनीं जी इंक्विझिशन नांवाची धर्म समिक्षण संस्था सोळाव्या शतकांत गोव्यांत स्थापन केली होती, तिच्या जेजुइट पाद्रींनीं कुठ्ठाळ गांवांतील जनतेचें आपल्या श्रीमंगेश देवाबद्दल निस्सीम प्रेम, अतुलनीय निष्ठा व आपल्या देवाबद्दल अपरिमित स्वार्थत्यागाचें वर्णन करतांना केलेला आढळतो. त्या वेळीं कोणकोणते उत्सवादि कार्यक्रम श्रीमंगेश देवालयांत होत असत, त्यांचा हिशेब वगैरे कागदपत्र आज उपलब्ध नाहींत. जिथें बाटाबाटीच्या दारूण संकटांतून रात्रीचें नकळत श्रीदेवाचें स्थलांतर कुशस्थलीहून आजच्या प्रियोळ गांवांत घडवून आणावें लागलें, तिथें देवालयाची मालमत्ता, दागदागिने, वस्त्रालंकार, कागदपत्र यांकडे कोण लक्ष देणार? व तें देणें कोणास परवडणारें होतें! त्या क्षणीं श्रीदेवाची सुरक्षितता हेंच महत्वाचें होतें. सारांश, त्यावेळचें देवस्थानचें दप्तर उपलब्ध नाहीं.

स्थलांतरानंतर म्हणजे शके १४८२ (इ. स. १५६०) पासून शके १६९८ (इ. स. १७७६) पर्यंतच्या काळांतील कारभार-हिशेब विषयक कांहींच

कागदपत्र देवस्थानच्या दप्तरांत दिसत नाहींत. पण शके १६९९ (इ.स. १७७७) पासून आजतागायत कारभारविषयक दप्तर व्यवस्थित स्थितींत आहे. जुन्या दप्तरांत ज्या वह्या आहेत त्या वह्यांची नोंद त्यांच्या कालनिदर्शक शकेसह दिली आहे. या सर्व वह्यांचें लिखाण मोडी लिपींत असून त्यांतील शेवटच्या कालांतील तीनच वह्यांचें लिखाण कानडी लिपींत व मजकूर कोंकणी भाषेंत आहे. या तीन वह्या शके १७४९, शके १८०० व शके १८०८ या सालांच्या आहेत.

गोमंतकांत देवस्थानचा सर्व कारभार व्यवस्थित व योग्यप्रकारें चालण्यासाठीं त्यावेळच्या पोर्तुगीज सरकारनें देवस्थानाबद्दल जो पहिल्यानेंच कायदा प्रसिद्ध केला. तो इसवीसन ३० अक्टोबर १८८६ सालीं होय. त्यानंतर गोमंतकांत लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें ३० मार्च १९३३ रोजीं आणखी सुधारणांसह देवालयाचा नवीन कायदा प्रसिद्ध केला. या कायद्यांतही नंतरच्या कालांत बऱ्याच महत्वपूर्ण सुधारणा घडवून दुरुस्ती कलमांपुरती दुरुस्ती व थोडीं आणखी नवीन कलमें वाढवून लेजिस्लेटिव असेंब्लीनें पास केल्यानंतर सरकारकडून पास केला गेला व प्रसिद्ध झाला. (दिप्लोमा लेजिस्लेटिव्ह नंबर १८९८, ता. २९ मे सन १९५९) त्यानंतर पोर्तारीय ता. २७-७-१९६२ ने, कमिटी प्रेसिडेंट निवडणुकीनें व्हावा असें ठरलें.

इ. स. १८८६ सालीं प्रथमतःच देवस्थानाबद्दल कायदा प्रसिद्ध झाला व त्या कायद्यानुसार प्रत्येक देवालयाचा कारभार चालू झाला. त्यामुळें वार्षिक जमाखर्चाच्या वह्या, व्यवस्थापक कमिटीच्या ठरावांची वही, महाजन मंडळींच्या ठरावांची वही, देवस्थानच्या जमिन जुमल्याची, इमारतींची, भांडार, सोने, चांदी इत्यादि धातुंच्या, तसेंच वस्त्रालंकार, लाकडी सामान वगैरें सर्व सामानांची यादी त्या प्रत्येक वस्तुंचा वर्णन व किंमतीसह उल्लेख, जमिनींचे वार्षिक, त्रैवार्षिक उत्पन्नाबद्दल लिलांव करून करार केल्याची नोंद असलेली वही, देवालयाची वेगळी कारभाराची नियमावली, कुळावी महाजनांची यादी, वार्षिक जमाखर्चाचें अंदाजपत्रक, वर्षाच्या शेवटीं प्रत्यक्षांत झालेला जमाखर्च (दाखवल्यांसह), त्यांची सरकार व त्रिबुनाल (कोर्ट) आदमिनीस्त्रातीव्हकडून तपासणी, तसेंच व्यवस्थापक कमिटीची त्रैवार्षिक निवडणूक वगैरे सर्व गोष्टी घडून आल्या व तसे कागदपत्र, वह्या वगैरे अर्थातच प्रत्येक देवस्थानांत असणें भाग झालें.

देवस्थानचा कायदा झाला त्या सालानंतर, कायद्यांत फर्माविल्याप्रमाणें पद्धत-

शीरपणें लिखाण व वह्या देवस्थानांत आहेत, त्यांची नोंद येथें देण्यापेक्षां पुरातन दप्तरांत ज्या वह्या आहेत, त्यांचीच नोंद पुढें दिली आहे. कारण त्याच दप्तराबद्दल जास्त आस्था आमच्या कुळावी महाजनांस असणें संभवनीय वाटतें. शिवाय या जुन्या दप्तरांत, श्रीमंगेश, मंगेशीं-प्रियोळ, तसेंच श्रीशांतादुर्गा कवळें या दोन्ही देवस्थानांच्या कुळावी महाजनांची एकच महाजनी सभा श्रीस्थळ मंगेशीं देवस्थानांत भरविली जात असल्यामुळें त्या सभेचे ठराव लिहिलेली एक वही असून, त्या ठरावावर दोन्ही देवस्थानांच्या महाजनांच्या स्वाक्षऱ्या (सह्या) आहेत.

□ □ □

# श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांत असलेल्या जुन्या वह्यांची नोंद

| शके | पृष्ठसंख्या | शके | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|
| १६९९ | १९३ | १७५५ | ९७ |
| १७०२-१७०५ | १५४ | १७५५-१७५६ | |
| १७१२-१७१४ | १८९ | १७५६ | ९५ |
| १७२० | १८५ | १७५६-१७५७ | ९७ |
| १७३५ | ५१ | १७५७ | १०० |
| १७३७-१७३८ | ९० | १७५७ | ८७ |
| १७३९ | ९८ | १७५८ | ८२ |
| १७४१ | ९७ | १७५९ | ९३ |
| १७४२ | ७५ | १७५९ | ९२ |
| १७४२ | ८० | १७६० | |
| १७४२ ते १७८६ | | १७६१ | १०१ |
| १७४३ | ८० | १७६१ | ९६ |
| १७४३ | ९० | १७६२ | १०७ |
| १७४४ | ९४ | १७६३ | ११७ |
| १७४५ | ७८ | १७६३-१७६४ | ९१५ |
| १७४५-१७४६ | ८८ | १७६५ | ९५ |
| १७४६ | ९४ | १७६६ | १४० |
| १७४६ | ९५ | १७६७-१७६८ | १४१ |
| १७४७-१७४८ | ९७ | १७६८-१७६९ | ११० |
| १७४८ | | १७७७-१७७८ | ११८ |
| १७४८-१७४९ | १२४ | १७७८ | |
| १७४९ | | १७७९ | ३९६ |
| १७४९-१७५० | ११७ | १७७८ ते १७८६ | |
| १७५० | १०९ | १७८८ | ११५ |
| १७५१ | ८९ | १७९७ | ८६ |
| १७५२ | | १८०० | ७९ |
| १७५२ | ९८ | १८०० | ८६ |
| १७५३ | ९५ | १८३८ | ४०४ |
| १७५३ | १०९ | १८८७ | ९१ |
| १७५३-१७५४ | ९६ | १६९९ ते १७०४ | २८८ |
| १७५४ | ८९ | १७०५ ते १७०९ | २७३ |
| १७५४-१७५५ | ९८ | १७०६-१७०७ | ११६ |

श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांत असलेल्या जुन्या वह्यांची नोंद

| शके | पृष्ठसंख्या | शके | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|
| १७१०–१७११ | २१६ | १७८६–१७८७ | ३८५ |
| १७१२ ते १७१४ | २३५ | १७८७ ते १७९० | ५०१ |
| १७१५ ते १७१९ | २६३ | १७९० ते १७९२ | ३८६ |
| १७२० ते १७२३ | ३४३ | १७९२ ते १७९४ | ४१२ |
| १७२४ ते १७२७ | ३५३ | १७९५ ते १७९६ | १६० |
| १७२४ ते १७२८ | २९२ | १७९६ ते १७९८ | |
| १७२९ ते १७३४ | ८८१ | १७९९–१८०० | २५९ |
| १७३० ते १७३२ | ४०० | १८०१–१८०२ | २४२ |
| १७३२ ते १७३४ | २९१ | १८२१–१८२२ | १५१ |
| १७३५ ते १७३७ | १६६ | १७३४ ते १७३७ | १९३ |
| १७३७ ते १७३९ | १९६ | १७३९ ते १७४३ | १३७ |
| १७३७ ते १७३९ | ३३३ | १७४४ ते १७४७ | १२९ |
| १७४०–१७४१ | ३१० | १७४८ ते १७५१ | १४३ |
| १७४३–१७४४–१७५१ | २९९ | १७५१ ते १७५५ | १४६ |
| १७४५–१७४६ | ३५४ | १७५६ ते १७५९ | १४० |
| १७४७–१७४८ | ३९२ | १७५० ते १७६३ | १३२ |
| १७४९–१७५० | ४३७ | १७६३ ते १७६५ | २३४ |
| १७०४–१७५१–१७५२ | ४६४ | १७६६–१७६७ | १६१ |
| १७५३–१७५४ | ४३२ | १७६४ ते १७६७ | १२९ |
| १७५५–१७५६ | ३९९ | १७६८–१७६९ | २११ |
| १७५६ ते १७५९ | ५०१ | १७६८–१७६९ | ७६ |
| १७६० ते १७६२ | ४५९ | १७७० ते १७७२ | ३४६ |
| १७६९ ते १७७१ | | १७७० ते १७७३ | १५५ |
| १७७०–१७७१ | १२२ | १७७३ | १०५ |
| १७७१ ते १७७३ | | १७७४–१७७५ | ११८ |
| १७७४–१७७५ | २९८ | १७७४ ते १७७६ | २०० |
| १७७५ ते १७७७ | ४३२ | १७७७ ते १७७९ | ३१२ |
| १७७५ ते १७७८ | ३६८ | १७७७ ते १७८१ | २५० |
| १७८०–१७८१ | ४८५ | १७८०–१७८१ | २२७ |
| १७८१–१७८२ | १८७ | १७८२–१७८३ | २३१ |
| १७८२ ते १७८४ | २८७ | १७८२ ते १७८४ | १४६ |
| १७८४–१७८५ | २७२ | १७८४–१७८५ | २३४ |

श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांत असलेल्या जुन्या वह्यांची नोंद

| शके | पृष्ठसंख्या | शके | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|
| १७८५ ते १७८७ | १४१ | १७९६–१७९७ | २०१ |
| १७८६–१७८७ | २२८ | १७९८–१७९९ | १८१ |
| १७८८–१७८९ | २५० | १८०० | * |
| १७८८ ते १७९० | १२८ | १८००–१८०१ | १९५ |
| १७९०–१७९१ | २४७ | १८०२–१८०३ | १८१ |
| १७९१ ते १७९३ | १४१ | १८०४–१८०५ | १७४ |
| १७९२–१७९३ | २३४ | १८०५ ते १८०७ | ६२ |
| १७९४–१७९५ | २०८ | १८०६–१८०७ | १०३ |
| १७९४ ते १७९७ | १४९ | १७४९ | * |
| १७९८ ते १८०४ | २१६ | १८०८ | * |

श्रीमंगेश देवस्थान मंगेशी आणि श्रीशांतादुर्गा देवस्थान, कवळें या दोन्ही देवस्थानच्या कुळावी महाजनांची एकत्र महाजन सभांच्या ठरावाची वही–पृष्ठें १४७.

□□□

* हीं पुस्तकें कोंकणी भाषेंत असून लिपी कानडी आहे.

# १४ | स्थलांतर काल व पूर्वप्रकाशित माहिती

श्रीमंगेशदेव कुशस्थलीहून सध्याच्या प्रियोळ गांवीं स्थलांतर करून आले. या स्थलांतराच्या कालासंबंधांत अन्यत्र पूर्वप्रकाशित माहितीसंबंधी, जिज्ञासूंसाठीं खुलासा :

कवळें येथील श्रीशांतादुर्गेच्या प्रतिष्ठापनेस केळोशी येथून कवळें येथें स्थलांतर झाल्यास शके १८८८ (इ. स. १९६६) मध्यें चारशें वर्षे पूर्ण होत असल्याचें मान्य करून त्या निमित्तानें श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव साजरा करण्यांत आला. या महोत्सवांत जे अनेक, धार्मिक कार्यक्रम, नानाविध उत्सव साजरे करण्यांत आले, त्यांतील एक कार्यक्रम म्हणून 'श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव ग्रंथ, शके १४८८ ते शके १८८८' हें पुस्तक इतिहासाचार्य कै. डॉ. पांडुरंग सखाराम शेणवीं पिसुर्लेकर यांच्या संपादकत्वाखालीं प्रकाशित करण्यांत आलें. हें पुस्तक श्रीशांतादुर्गा सेवा समिती मुंबईकडून मार्गशीर्ष शुक्ल पंचमी शके १८८८, दिनांक १६ डिसेंबर १९६६ रोजीं, मौज प्रिंटिंग ब्युरो, मुंबई, या मुद्रणालयांत छापून प्रसिद्ध करण्यांत आलें. या ग्रंथाच्या वेष्टणाच्या आंतील बाजूस श्रीशांतादुर्गा सेवा समिती, मुंबईकडून जो मजकूर प्रसिद्ध केलेला आहे, त्याच्या पहिल्या परिच्छेदांत खालील मजकूर आहे :

'सोळाव्या शतकांत पोर्तुगिजांनीं देवालयांच्या विध्वंसास आणि जुलमानें बाटाबाटीस सुरवात केल्यानें आपल्या देवता सुरक्षित आणि पवित्र राहाव्या म्हणून त्यांच्यासह सारस्वतांनीं पोर्तुगीज मुलुखांतून शके १४८८ मध्यें स्थलांतर करून प्रियोळ येथें श्रीमंगेशाची व कवळें येथें श्रीशांतादुर्गेची प्रतिष्ठापना केली.'

उल्लेखित महोत्सव ग्रंथांत पंधरा लेख ऐतिहासिक नानाविध विषयांवर परंतु संबंधित चतुःशताब्दि उत्सवास पोषक अशा स्वरूपाचे वेगवेगळ्या शीर्षका-

खालीं व कांहीं नामांकित विद्वान व अभ्यासू लेखक महाशयांकडून लिहिलेले प्रसिद्ध झाले आहेत.

या पंधरा लेखांत त्या पुस्तकाचे विद्वान संपादक, नामांकित लेखक व इतिहासाचार्य कैलासवासी डॉ. पांडुरंग सखाराम शेणवीं पिसुर्लेकर यांचे स्वतःचे चार लेख आहेत. त्या लेखांत जी ऐतिहासिक माहिती वाचावयास मिळते ती अत्यंत महत्त्वाची आणि फार मोलाची असून ती सर्व उपयुक्त माहिती संग्रहीत करण्यास बरेच परिश्रम घेतलेले आहेत यांत मुळींच संशय नाहीं. विशेषकरून 'श्रीशांतादुर्गा श्रीमंगेशींचे कांही नामांकित कुळावे (महाजन)' (पृष्ठ २०१ ते २०५,) हा लेख वागळे, लाड, केरकर (संजगिरी) सुखठणकर, कोठारी, धुमें, सबनीस, वालावलीकर, गुळगुळे इत्यादी गौड सारस्वत ज्ञातींतील उपनांवांच्या कुटुंबांतील किंवा घराण्यांतील कित्येक शूर व मुत्सद्दी पुरुषांच्या कर्तबगारीवर व लौकिकावर प्रकाश पाडणारा आहे. उल्लेखित चार लेखांत तिसवाडी, साष्ट व बारदेश या प्रदेशांतील हिंदूंच्या देवालयांच्या पोर्तुगीजांनीं केलेल्या विध्वंसाची माहिती देणारा लेख, 'गोव्याचें खिस्तीकरण' या शीर्षकाखालीं (पृष्ठ ९१ ते १२२) पर्यंत प्रसिद्ध झालेला आहे. या लेखांत 'देवतांचें स्थलांतर' या पोट-शीर्षकाखालीं पृष्ठ १०१ वर खालील प्रमाणें मजकूर आहे :

'कांहीं वर्षांमागें अशी समजूत होती कीं, श्रीमंगेशाचें देवालय सन १५५४ त मोडून त्या जागीं जेजुइट पाद्रींनीं चर्च उभारलें. परंतु हल्लीं प्रसिद्ध झालेल्या उल्लेखित ता. २९ नोव्हेंबर १५६६ च्या पत्रावरून ही समजूत चुकीची ठरते. अर्थात् सन १५६४ सालीं साष्टींतील ब्राम्हणांच्या एका गांवांत फिरंगी जाऊन तेथील देवालयांस त्यांनीं आगी लावल्या असें जें एका समकालीन पोर्तुगीज पत्रांत आढळतें तो उल्लेख कुठ्ठाळ या गांवांस अनुसरून नसावा, हें उघड दिसतें. इ. स. १५६४ त कुठ्ठाळचीं देवालयें फिरंग्यांनीं उध्वस्त केल्याचें वर्णन पाद्रि फ्रांसिस्क द सौजच्या 'ओरियेंतु कोंकिस्तादु' मध्यें आहे. पाद्रि फ्रांसिस्क द सौज याचा हा ग्रंथ स. १७१० त लिस्बन येथें प्रसिद्ध झाला....'

याच लेखांत पृष्ठ १०२ वर 'देवालयाच्या स्थावर जंगमाचा अपहार' या पोट-शीर्षकाखालीं पांचव्या ओळीपासून पुढें खालीलप्रमाणें मजकूर आहे :

'....देवतांचें स्थलांतर झालेलीं देवालयें मूर्तीशिवाय होतीं. जेथें मूर्ती राहिल्या नाहींत अशा वास्तूपैकीं एक जेजुइट पाद्रींनीं विजरईकडे चर्चसाठीं मागितली व

ती त्यानें दिली. शिवाय त्या देवालयाच्या मालकीच्या जमिनी होत्या त्याही त्रिजरईनें सदर चर्चसाठीं सुपूर्द केल्या. लगेच चर्चच्या धर्तीवर ह्या वास्तूचें रूपांतर करण्यांत आलें. प्रस्तुत चर्च म्हणजे कुट्ठाळचें होय. हें चर्च श्रीमंगेशाच्या देवालयाच्या जागीं स. १५६६ सालच्या अखेरीस तयार झालें. तेथें ता. १ मे १५६६ ला मासचा धर्मविधी झाला असें पाद्री फ्रान्सिस्कु द सौज म्हणतो. पण हा विधी २९ नोव्हेंबर १५६६ ह्या तारखेपूर्वी झाला नव्हता, हें उपरोक्त फ्रै. गोमिस व्हाजच्या पत्रावरून कळून येतें. एवढेंच नव्हे तर फ्रै. गोमिस व्हाजच्या १२ डिसेंबर १५६७ च्या पत्रावरून ह्या वर्षाच्या मे महिन्यांत हा विधी प्रथमच झाला असें सिद्ध होतें.'

पृष्ठ १०२ वरील एकंदर मजकूर प्रो. पिसुर्लेंकर यांनीं दोकुमेंता इंदिक भाग ७, पृष्ठ ६३ वरून घेतलेला आहे व या बद्दलचा उल्लेख त्याच लेखांत पृष्ठ १०३ वर शेवटीं लेखक महाशयांनीं केलेलाही आहे. आतां त्यांच्याच या लिखाणांत काय मजकूर आहे तें लक्षपूर्वक पाहूं.

'दैवतांचें स्थलांतर होऊन देवालयाची इमारत मूर्तीशिवाय रिकामी होती, ती इमारत जेजुइट पाद्रींनीं त्रिजरईकडे चर्चसाठीं मागितली व ती त्यानें दिली. शिवाय देवालयाच्या मालकीच्या जमिनी होत्या, त्याही त्रिजरईनें सदर चर्चसाठीं सुपूर्द केल्या. लगेच चर्चच्या धर्तीवर ह्या वास्तुचें रुपांतर करण्यांत आलें व प्रस्तूत चर्च म्हणजे कुट्ठाळचें होय, हें सिद्ध होत आहे.'

देवालयाची इमारत मूर्तीशिवाय रिकामी होती, ती इमारत जेजुईट पाद्रींनीं त्रिजरईकडे चर्चसाठीं कोणत्या सालीं मागितली व ती विजरईनें कोणत्या सालीं दिली, शिवाय देवालयाच्या मालकीच्या जमिनी होत्या त्याही विजरईनें सदर चर्चसाठीं कोणत्या सालीं सुपूर्द केल्या व लगेच चर्चच्या धर्तीवर ह्या वास्तुचें रुपांतर कोणत्या सालीं करण्यांत आलें याचा उल्लेख या लेखांत' केलेला दिसत नाहीं. या गोष्टी कोणत्या सालीं झाल्या, याचा उल्लेख झाला असता तर श्रीमंगेश देव कुट्ठाळ येथून स्थलांतर होऊन आजच्या फोंडा महालांत, प्रियोळ गांवांत, आजच्या मंगेशवाड्यावर केव्हां, कोणत्या सालीं, निदान कोणत्या सालापूर्वी आले, हें स्पष्टपणें कळलें असतें.

जेजुइट पाद्री मंडळानें त्यावेळीं केलेल्या दैनंदिन सर्व कृत्यांचा आढावा लिहून तें मंडळ तो रिपोर्ट गोव्याहून पोर्तुगालास पाठवीत असे. तीं सर्व पत्रें एकत्र करून लिस्बन शहरांत त्या जेजुईत पाद्री लोकांनीं 'ओरियेंतु कोंकिस्तादु' हा बराच

मोठा ग्रंथ इ. स. १७१० मध्यें दोन भागांत छापलेला असून त्याच्या पहिल्या भागांत इ. स. १४९८ ते इ. स. १५६३ च्या कालांतील घटना सविस्तरपणें लिहिल्या आहेत. या पहिल्या भागांत पृष्ठ १६९ वर स्पष्टपणें त्या पाद्री लोकांनीं आपण गोवा बेटांतून सासष्टी प्रांतांत कोणत्या सालीं पहिल्यानेंच प्रवेश केला, कोणत्या मार्गानें प्रवेश केला, या प्रथम प्रवेशांत कुठ्ठाळ गांवांत कोणत्या ठिकाणीं तात्पुरता मंडप झाडांच्या फांद्यांनीं उभारून तेथें प्रथम मिस्स् ( ईशप्रार्थना ) म्हटलेल्या जागीं एक स्मरणार्थ क्रूस उभा केला, वगैरे सर्व माहिती वाचावयास मिळते.

ती माहिती वाचल्यावर कळतें कीं, हें जेजुइट पाद्री मंडळ, मदतीस सरकारी आरमार बरोबर घेऊन ता. १ मे १५६० या दिवशीं कुठ्ठाळींत प्रथमतःच प्रवेश करतें झालें व त्या रोजीं मंडप घालून त्याजागीं मिस्स् (ईशप्रार्थना) वगैरे सर्व कांहीं झालें. ता. १ मे १५६० दिवसापूर्वी गोवा बेटावरून लगेच सासष्टीवर जेजुईट पाद्रींची धाड येणार हें अनेक घटनांवरून सासष्टीच्या जनतेस व त्यांतही कुठ्ठाळ गांव गोवा बेटाच्या पैलतीरावर प्रथमच गांव आहे, हें कुठ्ठाळ गांवच्या जनतेस पूर्णपणें माहीत असल्यानंतर ती जनता जेजुइट पाद्री मंडळ सरकारी आरमार मदतीसह कुठ्ठाळ गांवांत पोंहोंचेपर्यंत आपले पवित्र देव कुठ्ठाळींतच ठेवून स्वस्थ बसले असतील काय? या गोष्टीचा सारासार व व्यवहार्य रितीनें विचार करणें जरुरीचें वाटत नाहीं काय? कुठ्ठाळ गांवांत ज्या दिवशीं (१ मे १५६०) हें पाद्री मंडळ आरमाराच्या मदतीसह पोंचलें त्या दिवशीं श्रीमंगेश देवालयाची वास्तु मूर्तीशिवाय म्हणजे (लिंगाशिवाय) होती. त्या लोकांनीं ही परिस्थिति पाहूनच ती वास्तु देवाची मूर्ति नसलेली, आपणास चर्चेसाठीं उपयोगांत आणण्यास मिळावी म्हणून विजरईकडे मागणी केली व विजरईनें ती वास्तु तर दिलीच, शिवाय देवालयाच्या उत्पन्नाच्या जमिनी होत्या त्याही चर्चेला सुपूर्द केल्या. हीच वास्तु त्या झेजुइट पाद्रींनीं तात्पुरती दुरुस्त करून तेथें चर्चेची स्थापना केली असें स्पष्टपणें इतिहासावरून कळतें.

त्या नंतरच्या काळांत म्हणजे तीन चार वर्षांनीं ती इमारत संपूर्णपणें मोडून त्याच जागेवर नवीन मोठी इमारत चर्चेसाठीं बांधली गेली. ही नवीन इमारत इ. सन १५६६ साल अखेरीस पूर्ण झाली. या नवीन इमारत बांधणीसाठीं वर्गणी निधी जमा करणें वगैरे सर्व काम त्यावेळचे गोव्याचे पहिले आर्चबिशप दों गास्पार दे लेयांव पेरैर याचा भाचा पाद्री फ्रांसिस्क आरांज यानें पुढारीपण

घेऊन केलें. याचे सर्व पुरावे व दाखले ' गोवा आर्किटुयेसीस ', ' कुठ्ठाळ चर्चेचा इतिहास ' वगैरे सर्व ठिकाणीं पहावयास व वाचावयास मिळतात. मिस्स् किंवा ईशप्रार्थना केलेल्या तारखा ज्या लेखांत लिहिल्या गेल्या आहेत त्याबद्दल सांगावयाचें झाल्यास, तें मिस्स् जुन्या इमारतींत म्हणजे देवालयाच्या वास्तूचें रुपांतर चर्चसाठीं केलें गेलें होतें, त्या इमारतींत प्रथम मिस्स् कोणत्या दिवशीं व सालीं केलें गेलें व त्या जागींच इ. स. १५६६ त जी नवीन इमारत बांधणी-करून नवी चर्च उभारली गेली, त्या नव्या इमारतींत पहिल्या प्रथमच मिस्स् कोणत्या दिवशीं व कोणत्या सालीं केलें याचा त्यांत उल्लेख आहे.

दुसरें असें कीं, ' ब्राम्हणाच्या एका गांवांत फिरंगी जाऊन तेथील देवालयांस त्यांनीं आगी लावल्या, ही गोष्टही कुठ्ठाळ गांवांसच उल्लेखून आहे. आगी लावल्या त्या कुठ्ठाळ येथील श्रीमंगेशाचें देवालय होतें त्या वास्तूस नव्हे. कारण, ती वास्तू इ. स. १५६४ पूर्वीच चर्चमध्यें रूपांतरित केली गेली होती. कारण इ. स. १५६० त तेथून श्रीमंगेश देवाचें स्थलांतर झालें होतें. आगी लावल्या त्या वास्तु म्हणजे कुठ्ठाळ गांवांत श्रीमंगेश देवाच्या आनुषंगिक दैवतांचीं जीं इतर देवालयें ठिकठिकाणीं होतीं तीं होत. त्या आगी लावण्याचीं कारणें कोणती हें खालील पुराव्यांवरून कळून येतें.

दोकुमेंता इंदिका, भाग ६ वा, (इ. स. १५६३–१५६६) दाखला नंबर ५४ :– ता. ११ डिसेंबर १५६४ रोजीं गोव्यांतील जेजुइट कॉलेजचा धर्मो-पदेशक, जॉर्ज काल्देर नांवाच्या पाद्रीनें गोव्याच्या त्या कॉलेजांतून त्याच कॉलेजच्या रेक्टरच्या तर्फे सही करून जें एक पत्र पोर्तुगालास पाठविलें होतें, तें समग्र पत्र वर उल्लेखिलेल्या दोकुमेंता इंदिका या ग्रंथांत पृष्ठ ३४९ ते ३७२ पर्यंत छापलेलें आहे. त्यांत मार्जीन नंबर २४० पासून पुढें २४५–२५०–२५५ –२६०–२६५–२७० पर्यंत जो मजकूर आहे तो जशाचा तसा पुढें दिलेला आहे.

Documenta Indica. Vol. VI página 358.—Documento numero 54.—Goa, 11-Dezembro de 1564. Numero de margem 240) 25—

"25— Indo o Pe. Pero Colaço em Rachol onde reside, a visitar pelas aldeas seus christãos, acompanhado de alguns outros, e visitando hum gentio bramane honrado que estava propinquo à morte (32 In pago Cortalim.—Cf. Sacchinus. Hist. Soc. II lib 8

n. 170), parecendo-lhe que se faria christão, lançou fora hum pregador de sua ley que o bramane tinha consigo pera (o) ajudar a morrer, para que lhe não fose impedimento. Os gentios da aldea, vendo sair a êste começarão a bradar que o Padre queria fazer christão por fraça aquelle bramene, e sairão muitos com arcos e frechas. Finalmente era tanta a frachada que chovia Sobra o Padre e companheiros, que foy necessario acolherem-se com muita presa à fortaleza.(33) Depois, passando o meirinho dos christãos bem innocente do que passara pela aldea dêstes bramenes, o matarão.

Isto feito, pera se livrarem, poserão aquella noite fogo a hum pagode velho, e logo mandarão muitos, capitulos a Goa em que se queixavão do Padre, scilicet, que com os christãos quisera fazer aquelle bramene christão por força, que fazia saltos de noite, que era encend(i)ario e, principalmente, que lha quebrara hum manjericão que êlles adorão como a deus (34 Tulosse), e outras cousas deste genero.

26— Mas como he proprio de Deos manifestar a verdade e (7lv.) acudir por seus servos, por este dilecto de matarem o meirinho e outros que na mesma terra se fizerão, o Viso-Rey (35-D. Antonius (Antão) de Noronha) mandou lá o ouvidor geral (36-Hericus Jaques o qual tirou devasa, e achou que injustamente matarão o meirinho e quiserão matar o Padre (como elles mesmos dizião que, se lhe não fugira, o ouverão de matar), e ser falso quanto alevantarão ao Padre, pelo que, além de poena que lhe era devida polo homicidio que commeterão, pola injuria que ao Padre fizerão lhe queimou logo todos os pagodes de sua aldeia. Os christãos receberão muita alegria vendo arder cinco pagodes grandes, afora outros pequenos, que são entre elles como nossas ermidas. O capitão da fortaleza (37-Didacus Fer-

nandes) andava tãm solicito na destruição dêstes pagodes que com a maçã da espada lhe quebrava os focinhos. E assym, depois de sabida a verdade, o demonio, que deu o ardil, ficou escarnecido e nós muy alegres quando soubemos serem queimados as casas onde se tirava a honrra ao Criador e se dava ao demonio."

(Foi isto copiado de página 358 e 359 desde numero de margem 240-245-250-255-260-265-270).—

O referido documento numero 54 é a carta escrita e assinada pelo Jorge Caldeira por comissão do Pe. Reitor do Colegio de Goa em 11 de Dezembro de 1564 e se encontra desde a pagina 349 té pagina 372 do Documenta Indica Vol. VI. 1563-1566.

वरील मजकुराचें सर्वसाधारण भाषांतर पुढील प्रमाणें आहे:

'(मार्जीन नं. २४०) २५ –राशोल म्हणजे रायतूर येथें राहणारा पाद्री पेरू कुलासु कांहीं इसम आपल्याबरोबर घेऊन, गांवोगांवीं, आपल्या ख्रिस्त बांधवांच्या गांठी भेटी घेत सहलीवर असतां, (कुठ्ठाळच्या देवळांतील) एक हिंदु प्रतिष्ठित ब्राह्मण मरणाच्या पंथास लागलेला आहे व तो ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेण्याची शक्यता आहे असें त्यास वाटलें व त्यासाठीं त्या मृत्युपंथास लागलेल्यास त्या शेवटच्या प्रसंगीं सुश्रुषा–सहाय्य व मदत करीत असलेल्या एका प्रचारकास या दीक्षा देण्याच्या कार्यांत व्यत्यय येऊं नये यासाठीं संधान बांधलें. ही गोष्ट त्या गांवांतील हिंदूंच्या कानावर येतांच त्यांनीं एकदम बोभाटा चालविला कीं हा पाद्री बळजबरीनें त्या हिंदु इसमाला ख्रिस्ती धर्माची दीक्षा देऊं पाहतो. म्हणून ते सर्व हिंदु इसम आपआपल्या हातांत तीरकमठे किंवा धनुष्य-बाण घेऊन त्या पाद्रींवर चाल करून आले व आपल्या बाणांचा वर्षाव त्या पाद्रीवर व त्याच्या सोबत असलेल्या इसमांवर चालू केला. त्यामुळें तो पाद्री व त्याचे सोबती पळत जाऊन आपल्या किल्ल्याचा त्यांनीं आसरा घेतला. त्यानंतर एक निरपराधी ख्रिस्ती रखवालदार–चर्चचा नोकर–ज्याला त्या गांवांत आधीं घडलेल्या घटनांचा मागमूसही नव्हता, त्या हिंदु ब्राह्मणांच्या गांवांतून जात असतां त्यास त्यांनीं जिवंत मारलें, आणि हें कृत्य पचविण्यासाठीं त्या रात्रीं एका जुन्या देवळाच्या इमारतीस

आग लावून दिली व लगेच आपलीं कांहीं शिष्टमंडळें गोवा शहराकडे त्या पाद्रीं-विरुद्ध व्हाइसरॉयांकडे तक्रारी सादर करण्याकरितां पाठवून दिलीं व व्हाइसरॉय-कडे त्यांनीं, तो पाद्री मुद्दाम बळजबरीनें त्या मरणोन्मुख हिंदु ब्राह्मणास बाटवून ख्रिश्चन करूं पाहत होता व अनेक अघोरी कृत्यें करीत असतो, तुळसी वृन्दावनें मोडून टाकतो, अशा प्रकारच्या तक्रारी केल्या. तक्रारींच्या खरेखोटेपणाविषयीं चौकशी करण्यासाठीं, दों आंतांव दे नारोंज या व्हाईसरॉयनें आपला एक अधि-कारी ओव्हिदोर जेराल येंरिकिस जाकिस या इसमास पाठविलें. त्या चौकशींत असें निष्पन्न झालें कीं त्या पाद्रीवर आरोप ठेवून ज्या तक्रारी केल्या होत्या, त्या सर्व पूर्ण-पणें खोट्या होत्या. उल्लेखित ख्रिश्चन रखवालदारास निष्कारणपणें जिवंत मारण्यांत आलें व तो पाद्री पळाला नसता, तर त्यासही मारलें असतें. हा रिपोर्ट व्हाइस-रॉयसमोर आल्यानंतर खुनाबद्दल जी शिक्षा खुनी इसमास द्यावयाची, ती तर दिली जाणारच होती. पण त्या पाद्रीचा दुर्लौकिक केल्याबद्दल त्या गांवांत असलेल्या सर्व देवळांच्या इमारतींस आगी लावण्यांत आल्या. ख्रिश्चन लोकांनीं हिंदु धर्मियांचीं पांच मोठीं देवालयें अग्नींत भस्मसात होत असल्याचें व आणखी इतर लहान देवालयेंही त्याचप्रमाणें नष्ट होत असल्याचें दृश्य पाहून आनंद व्यक्त केला. रायतूर किल्ल्याचा कॅप्टन दिदाकुस फेर्नांदिस तत्परतेनें हिंदु देवालयांच्या इमारती मोडून उध्वस्त करण्यांत झटत होताच. तो आपल्या तलवारीच्या मुठीनें देवतांच्या मूर्तींचे मुखवटे मोडीत असे. याप्रमाणें सत्य उघडकीस आल्यामुळें सूड घेतल्याचें समाधान झालें. म्हणजे ज्या वेळीं त्या इमारती अग्नीमुखीं पडल्या, त्या इमारतींत पूर्वी खऱ्या देवाचा अनादर करून राक्षसांची आराधना करीत....'

हा सर्व मजकूर येथें नमूद करण्याचें विशेष कारण, 'श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि ग्रंथ' या पुस्तकाच्या पृष्ठ १०४ वरच्या लेखांत पुढीलप्रमाणें लिहिलें आहे :

'पण उल्लेखित ता. ११ डिसेंबर १५६४ च्या पत्रांत कुठ्ठाळचा निर्देश नाहीं. ह्या पत्रांमध्यें असें लिहिलेलें आहे कीं, साष्टींतील एका ब्राह्मणाच्या गांवांत (aldeia destes bramenes) जेजुइट पाद्री पेरू कुलासू हा एका प्रतिष्ठित ब्राह्मणास बाप्तिस्मा देण्याच्या इरादानें गेला असतां, त्यावर तेथील ब्राह्मणांनीं धनुष्य-बाण घेऊन हल्ला केला व एका निरपराधी चर्चच्या नोकरास कंठस्नान घातलें.'

कोणत्याही मूळ लेखाचे, पत्राचे, किंवा मजकुराचे मधलेच दोन किंवा तीन शब्द किंवा एकच वाक्य वेगळें घेऊन मागच्या आणि पुढच्या संदर्भाशिवाय वाचकांसमोर ठेऊन त्या दोन किंवा तीन शब्दांचाच किंवा वाक्याचा अर्थ लाव-

ण्याचा प्रयत्न करणें कितपत योग्य ठरेल हें वाचक ठरवतील. त्या दोन किंवा तीन शब्दांचा किंवा एकाच वाक्याचा अर्थ लावतांना त्या वाक्यामागचा व पुढचा संदर्भ समजल्याशिवाय खरा अर्थ ध्यानांत येणें अशक्य वाटतें. यासाठींच वरील समग्र मजकूर पोर्तुगीज भाषेंतील मूळ पुस्तकांतून घेतलेला आहे. तो सर्व वाचल्यानंतर त्यांतील एकंदर वृत्तांत कुठ्ठाळ गांवांतीलच आहे याबद्दल शंकाही राहात नाहीं. हा गांव कुठ्ठाळ असल्याचें Historiae Societatis Iessu ह्या ग्रंथामध्येंही म्हटलें आहे. ता. १ मे सन १५६० दिवसापूर्वीं (इ. स. १५६६ त नव्हे) कुठ्ठाळ येथील श्रीमंगेशाच्या देवालयांतील श्रीशिवलिंग त्या देवालयाच्या कुळाव्यांनीं हलवून अंत्रूज महालांत फोंडा तालुक्यांतील प्रियोळ गांवांत नेलें होतें व त्या श्रीमंगेश देवालयाच्या वास्तुचें चर्चमध्यें तात्पुरतें रूपांतर (इ. स. १५६० त) करीपर्यंत ती अभंग होती, याचा पुरावा मागें दिलाच आहे. अशा स्थितींत श्रीमंगेश देवालयाची वास्तु, चर्चमध्यें तात्पुरतें रुपांतर केल्यानंतर ती उध्वस्त करणें किंवा जाळून टाकणें अशक्यच होतें हें कोणीही कबूल करील. जीं पांच मोठीं देवालयें व इतर लहान देवालयें अग्नीमुखीं पडलीं, तीं देवालयें कुठ्ठाळ गांवांतीलच. पण, श्रीमंगेश देवालयाचीं (चर्चमध्यें जिचें रूपांतर झालें ती वास्तु वगळून) जीं बाकी आनुषंगिक देवालयें होतीं, त्यांच्या वास्तुंस आगी लावण्यांत आल्या. तीं देवालयें म्हणजे श्रीसांतेरी आणि श्रीकेशंभू, श्रीवीर, श्रीकपिलेश्वर, श्रीनारायण आणि श्रीभगवती, श्रीगोपिनाथ, या पांच मोठ्या देवालयांच्या इमारती होत्या हें आणखी पुराव्यांवरून लक्षांत येतें.

पणजी शहरांत आरकिव्हु इस्तोरिकु म्हणजे पुरातन ऐतिहासिक सरकारी कागदपत्र ज्या सरकारी कचेरींत आहेत, त्यांत 'फोराल दे सालसेत' या नांवानें ओळखण्यांत येत असलेले जुने कागदपत्र, पंचनामे वगैरे एकत्र असलेलें पुस्तक आहे. त्यांत पृष्ठ ४५६ ते ४६४ पर्यंत एक जमिनीच्या वर्णनासह पंचनामा (Auto e a descrição dos predios) असून कुठ्ठाळ गांवांतील श्रीमंगेश (Do pagode de Mamginato) देवालयाच्या मालकीच्या व इतर देवालयांच्या मालकीच्या ज्या जमिनी होत्या, त्यांचीं नांवें, वर्णन वगैरे माहिती त्या पंचनाम्यांत नमूद आहे. हा पंचनामा कुठ्ठाळ गांवांत जज्ज स्वतः जातीनें उपस्थित राहून, त्यांच्या समक्ष, कुठ्ठाळ गांवचा चिटणीस, गांवकार लोक, साक्षीदार ख्रिश्चन, यांच्या सान्निध्यांत तारीख ५ मार्च इ. स. १५६८ रोजीं झालेला आहे व या पंचनाम्याची नक्कल श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरांतही

आज उपलब्ध आहे. या पंचनाम्यांत स्पष्टपणें नमूद केलेलें आहे कीं, 'Todas as fazendas que pertemsyam aos pagodes e a seus servidores..' म्हणजे सगळ्या जमिनी ज्या देवालयांच्या व त्यांच्या सेवेकऱ्यांच्या होत्या, त्याची माहिती त्या पंचनाम्यांत आहे.

या कायदेशीरपणें केलेल्या पंचनाम्यावरून स्पष्ट व निःसंदिग्धपण असें सांगतां येईल कीं, ज्या दिवशीं हा पंचनामा केला गेला, त्या ता. ५ मार्च १५६८ रोजीं उल्लेखित जमिनींचा उल्लेख, त्या पंचनाम्यांत, ज्या अर्थी 'होत्या' या शब्दांत अनेक वेळां केलेला आढळतो, त्यावरून त्या ५ मार्च १५६८ तारखेस त्या त्या देवालयाच्या मालकीच्या राहिल्या नाहींत. निदान ते देव त्या आपल्या जमिनी सोडून म्हणजे त्या जमिनींची विक्री किंवा दुसरी विल्हेवाट न लावतां गेले हें उघड आहे. हा पंचनामा कुठ्ठाळ गांवांतील देव स्थलांतर करून गेल्या-नंतर त्या देवालयांच्या मालकीच्या जमिनी व इतर मालमत्ता, जें जें काय तेथें राहिलें, त्या सर्वांचा केला गेला. देवालयांत मूर्ती किंवा श्रीलिंग असतांना हा पंचनामा झालेला नाहीं हें सूर्यप्रकाशा इतकें स्पष्ट व निर्विवाद आहे. कारण देवालयांत मूर्ती असतांना हा पंचनामा झाला असता, तर पंचनाम्याऐवजीं देवळें उध्वस्त केलीं गेलीं असतीं, देवांच्या मूर्तीची मोड-फोड झाली असती, हें त्या वेळच्या परिस्थितीची जाणीव असलेला कोणीही सांगू शकेल. शिवाय, ता. १ मे १५६० या दिवशीं, कुठ्ठाळ गांवांत जेजुइत पाद्रींनीं प्रथमतःच पाय ठेविला त्या वेळीं, श्रीमंगेश देवालयाची वास्तु देवाशिवाय होती व त्यांतील देव त्यापूर्वीच देवालयाच्या कुळाव्यांनीं दुसऱ्या राज्यांत नेले होते व देवाशिवाय असलेली ती वास्तु त्या जेजुइत पाद्रींनीं, चर्च करण्यासाठीं व्हाइसरॉयकडे मागितली व त्यानें ती दिली, याचे पुरावे मागें दिले आहेत. (ओरियेंतु कोंकिस्तादु, भाग १, पृष्ठ १६९). तसेंच कुठ्ठाळ येथें मूळच्या श्रीमंगेश देवालयाच्या भूमीवरच ख्रिश्चन धर्मियांची चर्च सन १५६६ त उभी होती व त्या चर्चचा पाद्रीही तेथें होता, हेंही स्पष्टपणें कळतें. (ओरियेंतु कोंकिस्तादु, भाग २, पृष्ठ २०) (याशिवाय होकुमेंता इंदिका, भाग ७, पृष्ठ ५३, मार्जीन नं. ७४५). इतक्या पुराव्यानंतर श्रीमंगेशदेव कुठ्ठाळीहून इ. सन १५६० सालच्या ता. १ मे पूर्वी स्थलांतर करून अंत्रुज महालांत, दुसऱ्या राज्यांत गेले होते, याबद्दल कसलाच संशय उरत नाहीं आणि म्हणून 'सन १५६६ त कुठ्ठाळ येथील श्रीमंगेशाच्या देवालयांतील मूर्ती सदरहू कुळाव्यांनीं हलविल्या होत्या' असें म्हणणें किंवा लिहिणें कोणाही सारा-

सार विचार करणाऱ्या इसमास पटणें शक्य नाहीं. उल्लेखित 'श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव ग्रंथा'च्या पृष्ठ १०१ वरील लेखांत पुढील मजकूर आहेः

'कांहीं वर्षांमागें अशी समजूत होती कीं, श्रीमंगेशाचें देवालय सन १५६४ त मोडून त्या जागीं जेजुइट पाद्रींनीं चर्च उभारलें. परंतु हल्लीं प्रसिद्ध झालेल्या उल्लेखित ता. २९ नोव्हेंबर १५६६ च्या पत्रावरून ही समजूत चुकीची ठरते....'

लेखकानें २९ नोव्हेंबर १५६६ चें पत्र किंवा निदान त्यांतील आवश्यक भाग त्या ग्रंथांत दिला असता, तर कोणती समजूत चुकीची ठरते व खरा प्रकार काय आहे, हें वाचकांस कळून आलें असतें. पण तसें कांहीं त्या लेखांत केलेलें दिसत नाहीं, त्यासाठीं जिज्ञासू वाचकांच्या सोईसाठीं, मुद्दाम या पुस्तकांत ता. २९ नोव्हेंबर १५६६ चें फ्रै. गोमिस व्हाज यांच्या पत्राचा आवश्यक भाग, Wicki, Documenta VII, Pág. 63, ६३ वरूनच घेऊन दिलेला आहे. तो वाचल्यानंतर श्रीमंगेश देव केव्हांच दुसऱ्या राज्यांत पळवून नेले होते, देवालयाची इमारत देवाशिवाय होती व ती चर्चसाठीं मागून घेऊन तिची दुरुस्ती करून चर्चसाठीं तात्पुरती उपयोगांत आणली, वगैरे सर्व कांहीं कळून येतें.

वरील सर्व मजकूर व त्याबद्दलचे पुरावे, विशेषतः ता. २९ नोव्हेंबर १५६६ चें फ्रै. गोमिस व्हाज याचें पत्र, ज्या पत्राचा उल्लेख 'श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव ग्रंथां'त प्रसिद्ध झालेल्या लेखांत पृष्ठ १०१ वर केलेला आहे, येथें नमूद करण्याचें कारण एवढेंच कीं, श्रीमंगेश देवाचें स्थलांतर इ. सन १५६० वर्षाच्या ता. १ मे पूर्वी झालें व तें इ. सन १५६६ सालीं खचित नव्हे. हें सर्व श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि ग्रंथांतील वर उल्लेखित लेखाचे लेखक कै. इतिहासाचार्य डॉ. पांडुरंग पिसुर्लेंकर यांच्याविषयीं मला पूर्ण व नितांत आदर असूनही लिहिल्याशिवाय राहावत नाहीं.

× × ×

## पोर्तुगीज राजवटींत कुठ्ठाळ येथील उत्खननांत तेथील दैवतांच्या मूर्ती मिळाल्याबद्दल अहवालांतील सरकारी माहिती

कुशस्थली ( कुठ्ठाळ ) गांवांत श्रीमंगेश देवाचें देवालय होतें. तेथून श्रीशिवलिंगरूपी श्रीमंगेशास संकटकालीं रातोरात अंत्रूज महालांत नेण्यांत आलें याबद्दल सविस्तरपणें माहिती मागें दिली आहे. तें शिवलिंग वाहवून नेतांना पंचायतन व परिवार देवतांच्या पाषाणी मूर्तीही बरोबर नेणें अशक्यप्रायः होतें व म्हणून त्या

प्रत्येक दैवताचें कांहीं तरी प्रतीक बरोबर नेलें असणं साहजिकच आहे. श्रीमंगेश देवालयाची इमारत चर्चेसाठीं रुपांतर करून वापरण्यांत आली व इतर परिवार देवतांच्या देवालयांच्या इमारती जाळून टाकण्यांत आल्या याबद्दलचेही पुरावे मागें दिले आहेत. रायतर किल्ल्याचे कॅप्टन दिदाकुस फेर्नांदिस यानें सर्व देवालयांतील मूर्तींचे मुखवटे आपल्या तलवारीच्या टोंकानें मोडण्याचें सत्र चालविलें होतें. ज्यावरून हा इसम कुड्डाळच्या पांच देवालयांस आगी लावण्याच्या व उध्वस्त करण्याच्या कार्यांत होता त्यावरून बहुतेक पाषाणी मूर्तींची वासलात याच इसमानें लावली असावी, असें गृहित धरणें भाग आहे. किंवा देवालयाच्या इमारतींस आगी लावल्यानंतर त्यांतील मूर्ती देवालयाच्या भग्न अवशेषांखालीं गडप झाल्या असतील असें मानण्यासही आज सरकारी पुरावा आहे. गोव्यांत पोर्तुगीज राजवट चालू असतांना त्या सरकारच्या पुराणवस्तु संशोधन मंडळानें (कोमिस्सांव पेर्मानेंत दे आर्किओलोजीय) इ. स. १९३३ सालीं सासष्टी तालुक्यांत गांवोगांवी चौकशी करून माहिती मिळवून सोळाव्या शतकांत हिंदु देवतांचीं जीं देवालयें मोडलीं गेलीं होतीं, त्या मोडलेल्या देवळांतील मूर्ती कुठें असाव्यात याबद्दल माहिती मिळवून त्या त्या जागीं उत्खनन चालविलें होतें. असें उत्खनन कुड्डाळ गांवांतही सुरू केलें होतें व त्यांतील एका उत्खननांत कुड्डाळ गांवांत 'धुम्यालें' नामक बागायतीच्या जमिनींत साडेचार मीटर खोदल्यानंतर श्रीभगवतीदेवीची पाषाणी मूर्ति मिळाली. ही 'धुम्यालें' नामक जमीन मानुयेल फ्रांसिस्क फेर्नांदिस यांच्या मालकीची होती. त्याचप्रमाणें श्रीनारायण देवाचे पाषाणी पाय भगवतीचो पाटो नामक बांधावर जमिनींत दीड मीटर खोल खोदल्यावर मिळाले.

अशाच प्रकारचें उत्खनन कुड्डाळ शेजारच्या सांकवाळ गांवांत चाललें होतें. तेथें श्री. लाडू शेणवीं संजगिरी यांच्या मालकीच्या, 'कामतिलें' नामक बागायत जमिनींत चार मिटर खोल खोदल्यानंतर श्रीशांतादुर्गा देवीची मूर्ति मिळाली. त्याचप्रमाणें श्री. दियस यांच्या मालकीच्या 'वाघालें' नामक जमिनींत एक मीटर खोल खोदल्यानंतर तेथें विरागळ (पाषाणी) मिळालें. * अशाच प्रकारचीं आणखी उत्खननें इतर गांवांत केलीं होतीं त्यावेळीं बेताळभाटी गांवांत बेताळाचे पाय, वेरोडें गांवांत श्रीकाळभैरव, मडगांव येथें श्रीभैरवाचा डोक्याचा भाग, आणि चांदर येथें लिंग सांपडलें.

---

* विरागळ म्हणजे एखाद्या शूर पुरुषाच्या थडग्यावर ठेवलेलें स्मारक.

वरील सर्व माहिती कोमिस्सांव पेर्मानेंत दे आर्कियोलोजीय या कमिशननें इ. स. १९३२–१९३३ सालच्या आपल्या कार्याचा जो अहवाल त्या वेळच्या गोव्याच्या गव्हर्नर जनरलास सादर केला होता, त्या अहवालांत वाचावयास मिळते. हा अहवाल ता. ३० नवंबर १९३३ रोजीं त्या कमिशनतर्फे डॉ. आंतोनियु बेर्नार्दु ब्रागांस पेरैर यांनीं सही केलेला आहे. हे श्री. ब्रागांस पेरैर त्याकाळीं गोव्याच्या हायकोर्टचे जज्ज होते. या अहवालाची नक्कल 'उ ओरियेंतु पोर्तुगेज' या प्रकाशनांत (नंबर ५, सन १९३३, पृष्ठ १९४ ते २३४) छापलेली असून हें प्रकाशन त्या कोमिस्सांव पेर्मानेंतु दे आर्कियोलोजीय तर्फे प्रसिद्ध केलें जाई.

□ □ □

५८६१६ ... ३५ ... ३१-३-६२

# परिशिष्ट १ | देवस्थानांत होणारे महत्वाचे उत्सव

श्रीमंगेश देवस्थानांत दैनंदिन कार्यक्रमांत रुद्रावर्तनें, रुद्र एकादशिनी, रुद्राभिषेक, लघुरुद्र, महारुद्र, महानैवेद्य घूड, ब्राह्मण संतर्पणें, समाराधना, नंदादीप, तसेंच रात्रीच्या वेळीं शिबिकोत्सव, लालक्युत्सव, सुखासनोत्सव, हत्ती अंबारी उत्सव, धाकटा रथोत्सव, खांब पेटविणें, दीपाराधना, रंगपूजा इत्यादि सर्व, यांत विशेषेंकरून देवस्थानच्या असंख्य महाजन व इतर भाविक लोकांकडून अव्याहतपणें देवस्थानांत प्रतिवर्षी ठरलेल्या तिथी महिन्यांत साजरा होण्यासाठीं देवस्थानच्या भांडारांत कायम निधी भरून व्यवस्था केलेली आहे. या पुस्तकांत फक्त श्रीमंगेश देवस्थानांत वर्षाच्या बाराही महिन्यांत जास्त महत्त्वाचे कोणते उत्सव साजरे केले जातात, त्याबद्दलची नोंद दिली आहे व हीच नोंद वाचकांस जास्त उपयुक्त ठरेल असें वाटतें.

## चैत्र मास

चैत्र शु. १. : श्रीसंवत्सर प्रतिपदा, पंचांग श्रवण, (श्रींच्या भांडारांतून खर्च) श्रीरामायण पारायण प्रारंभ, पंचमूर्ती दर्शन, रात्रौ सुखासनोत्सव, श्रीरामनवमी उत्सवाचा प्रारंभ. वसंत पूजा प्रारंभ (दोन महिने म्हणजे वैशाख अमावास्येपर्यंत ही वसंतपूजा दररोज व्हावयाची असते.)

चैत्र शु. ७, ८, ९, १० : चार दिवस रात्रौ नाटक.

चैत्र शु. ९ : श्रीरामनवमी-श्रीरामजन्मोत्सव, रात्रौ फलाहार.

चैत्र शु. १० : समाराधना, ब्राह्मणसंतर्पण, पहांटेस रथोत्सव (खांद्यावरून रथ नाचविला जातो.)

चैत्र शु. १५ : हत्ती अंबारींतून श्रींची मिरवणूक उत्सव, खांबावर दीपाराधना.

चैत्र वद्य ६ : श्रीउमामहेश्वर व्रत समाराधना.

चैत्र वद्य ७ : चांदीच्या पालखींतून मिरवणूक उत्सव.

## वैशाख मास

वैशाख शु. ३ : अक्षय तृतिया—दुपारीं समाराधना, रात्रौ शिबिकोत्सव.

वैशाख वद्य १२ : श्री नाईक स्वामी यांची पुण्यतिथी, समाराधना. (श्रींच्या भांडारांतून खर्च.)

## जेष्ठ मास

जेष्ठ वद्य ५ : शिबिकोत्सव.

## आषाढ मास

आषाढ शु. १२ : श्रीशयन द्वादशी–श्रींची स्वारी पालखींतून तलावावर जाते.

## श्रावण मास

श्रावण शु. १५ श्रावणी पौर्णिमा–पवित्रा रोपण. (श्रींच्या भांडारांतून खर्च).

श्रावण वद्य ८ : श्रीकृष्ण जन्माष्टमी–रात्रौ शिबिकोत्सव.

या महिन्यांतील प्रत्येक सोमवारीं इतर सर्व सोमवारांप्रमाणें शिबिकोत्सव, रंगपूजा वगैरे विशेष पद्धतीनें करण्यांत येतात. परंतु त्याशिवाय रात्रौ म्हणजे प्रदोष पूजा, सोमवार व्रतपूजा कार्यक्रम संपल्यावर समाराधना होऊन नंतर शिबिकोत्सव होत असतो.

## भाद्रपद मास

भाद्रपद शु. ५ : नवान्न ग्रहण (श्रींच्या भांडारांतून खर्च).

भाद्रपद शु. ६ : श्रीदेवीभगवतीस रात्रौ रंगपूजा.

भाद्रपद शु. १४ : श्रीमदनंतव्रतोत्सव, ब्राह्मण संतर्पण, समाराधना, रात्रौ शिबिकोत्सव.

भाद्रपद वद्य १० : शिबिकोत्सव.


## आश्विन मास

आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून शुक्ल ९ पर्यंत नवरात्रौत्सव. दररोज रात्रौ मखरांत श्रींची मूर्ति मोठ्या अवर्णनीय शृंगारांत आरूढ होत असते. कीर्तन झाल्यानंतर आरती चालू असतांना मखर झोंपाळ्याप्रमाणें हलविलें जातें. नानाविध वाद्यें वाजविण्यांत येतात. एकंदरींत उत्सव फारच प्रेक्षणीय होत असतो. मखरांत श्रींची मूर्ति दररोज नवनव्या वाहनांवर आरूढ झालेली असते व महानवमीच्या रात्रौ श्रींची मूर्ति गंगावतरण, भस्म, रुद्राक्षमाला, रुंडमाला अशा अलंकारांत व म्हातारा वेष अशा स्वरूपांत त्या मखरांत दिसत असते. शिवाय शिबिकोत्सव.

आश्विन शुक्ल ८ : 'धुमें' उपनांवाच्या वत्स गोत्रीय कुटुंबियांकडून महारुद्र शिंगांचा, दोन दिवस.


आश्विन १० : श्रीविजयादशमी संध्याकाळीं सिमोल्लंघनाचा पालखीउत्सव, दीपोत्सव. पालखी सिमोल्लंघन करून देवालयांत परत आल्यानंतर श्रींकडे सार्वजनिक कल्याणासाठीं प्रार्थना व गावडे लोकांसह सर्वांकडून गाऱ्हाणें, नंतर कौलप्रसाद. (श्रींच्या भांडारांतून खर्च).

त्याच दिवशीं म्हणजे विजयादशमीची पालखी व गाऱ्हाणें, प्रसाद-कौल झाल्यानंतर कीर्तन, नंतर सुखासनोत्सव, मिरवणूक वगैरे उत्सव होत असतात. हा सुखासनोत्सव



पंचमूर्तीदर्शन

पालखी





सांगड



खांद्यावरील रथ

श्रीमंगेश देवाचें आद्य स्थळ कुशस्थळीं उर्फ कुठ्ठाळ या गांवच्या कोमुनिदादीचे (ग्रामसंस्थेचे) सद्यःकालीन एकमेव हिंदु धर्मीय कोंपोनेंत जणकार वर्गी, जे वत्स गोत्रीय धुमें उपनांवाचे श्रीमंगेश देवाचे उपासक महाजन आहेत, त्यांकडून त्यांच्या खर्चानें साजरा केला जातो.

आश्विन शु. १२ ते कार्तिक शु. १२ : पर्यंत दररोज हरिजागर चालू असतो.

आश्विन शु. १२ : प्रियोळ गांवांतील देवस्थानांतील श्री वेताळाची स्वारी (अवसर) देवालयांत येत असते. त्याची पूजा, व तळी तसरीब, शेला, बहुमान देऊन केला जातो. (श्रींच्या भांडारांतून खर्च)

आश्विन शु. १५ : कोजागिरी उत्सव, रात्रौ सुखासनोत्सव.

आश्विन वद्य १२ : श्रीगुरुद्वादशी उत्सव, दुपारीं ब्राह्मण संतर्पण, समाराधना, रात्रौ थोरल्या लालकींतून श्रींची मिरवणूक.

आश्विन वद्य १४ : नरकचतुर्दशी, दिपवाळीचा उत्सव, पंचमूर्तीदर्शन, रात्रौ श्रीकुबेर–लक्ष्मी पूजनोत्सव.

## कार्तिक मास

कार्तिक शु. १ पासून १४ : पर्यंत सतत चौदा दिवस रात्रौची देवालयांत दोन दारी सहा रांगांची दीपाराधना.

कार्तिक शु. २ : भाऊबीज उत्सव. दुपारीं समाराधना, रात्रौ सुखासनोत्सव.

कार्तिक शु. ११ : पंचमूर्ती दर्शन. रात्रौ खांद्यावरील रथोत्सव.

कार्तिक शु. १२ : कालाउत्सव, रात्रौ गोपालकाला. हा उत्सव फारच प्रेक्षणीय असतो. श्रींची स्वारी पालखींतून मिरवणूकीने देवालयातून प्राकाराबाहेर भटवाडींत व तेथून श्री कौंडिण्य पुरुषाचे देवालयाकडे जाऊन नंतर परत प्राकारांत येऊन देवालयाच्या डाव्या बाजूस उभारलेल्या मंडपांत येते. तेथें तुलसीवृंदावनावर मखर शृंगारलेलें असतें, त्या मखरांत श्रींची मूर्ति आसनावर बसते. वर उल्लेखित पालखीच्या मिरवणुकींत वाटेंत दुतर्फा दीपाराधना, तोरणें उभारलेली, वाटेंत नानाविध रंगीबेरंगी रांगोळ्या काढलेल्या प्रत्येक घराच्या दारांत पूजा, आरती वगैरे सर्व कांहीं होतें. (श्रींच्या भांडारांतून खर्च)

कार्तिक शु. १३ : सकाळीं दहिंकाला व हा दहिंकाला झाल्यानंतर श्रींची स्वारी पालखींत बसून तलावावर स्नानास जाते. पालखींत श्रीमंगेश उत्सव मूर्तीच्या जवळच श्रीविठ्ठल रखुमाईचीही मूर्ति असते. तलावावर पालखी पोंचल्यानंतर तलावाच्या कांठावर पालखी ठेवण्यांत येऊन त्यांतील फक्त श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ति देवस्थानचा पुजारी भटजी आपल्या पोटास घट्ट बांधून घेऊन तलावांत ती मूर्ति पाण्यांत भिजेपर्यंतच्या खोलीवरून त्या तलावाच्या सभोंवार पांच प्रदक्षिणा काढतो. प्रदक्षिणा काढतांना त्या मूर्तीबरोबर देवस्थानचा सेवकवर्ग, वाजंत्री, कलावंती नृत्यांगना वाजत गाजत प्रदक्षिणा काढतात. तलावांत स्थानिक गावडे लोकांचीं मुलें पोहतात. तलावाच्या कडेवर असलेले लोक तलावांत पिकीं केळीं फेंकतात. तीं केळीं पोहणारे इसम जमा करतात. एकंदरीत कार्यक्रम आल्हाददायक असतो. प्रदक्षिणा काढून झाल्यावर ती श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ति

पुसून श्रृंगारून परत पालखींत श्रीमंगेश उत्सव मूर्ती सन्निध बसविण्यांत येते व ही पालखी तलावावर फेरी घेऊन प्राकारांत येऊन देवालयास प्रदक्षिणा घालून देवालयांत येते. पालखी तलावावरून परत देवालयांत येईपर्यंत या पालखीस खांद्यावरून वाहविण्याची वहिवाट श्रीमंगेश देवालयाचे वत्सगोत्रीय महाजनांत आहे, व ही वहिवाट शेंकडों वर्षांपासून असून वत्सगोत्रीय महाजन तो आपणाला बहुमान समजतात. याचे कारण, कुशस्थलीहून श्रीमंगेश देवाचें स्थलांतर प्रियोळ गांवांत आजच्या मंगेशी वाड्यावर जें झालें, तें वत्सगोत्रीय महाजनांनींच त्या संकटकालीं श्रीदेव आपल्या खांद्यावरून आणून केलें अशी आख्यायिका आहे. याच कारणासाठीं प्रतिवर्षी याच दिवशीं पालखी वाहविण्याचा मान वत्सगोत्रीय लोकांस सतत देण्यांत आला आहे. (श्रींच्या भांडारांतून खर्च)

कार्तिक शु. १४ : वनभोजनोत्सव–सकाळीं साधारणपणें ११ वाजण्याच्या सुमारास श्रींची स्वारी पालखींत बसून देवालयांतून वनभोजन मंडपांत (मठांत) थाटानें प्रवेश करते व मखरांत आसनस्थ होते. तिथें होमहवनादि शास्त्रोक्त विधी, देवकृत्य झाल्यानंतर दोन वाजतां वनभोजन समारंभ (समाराधना) होत असते. रात्रौ पुराण, नित्य कीर्तन झाल्यानंतर साधारणपणें रात्रौ १० वाजतां पालखींत परत श्रीमंगेश देवाची स्वारी बसते कदली, पोफळी व इतर नानाविध फुलांफांद्यानी तयार केलल्या कृत्रिम वनांतून मिरवीत मिरवीत ती पालखी देवालयांत येते. वाटेंत दोन्ही बाजूंनीं दीपाराधना, वेदघोष अशा थाटांत व वाद्यांच्या गजरांत त्या मिरवणुकीस फारच शोभा येते. श्रीदेव मंदिरांत पोंचल्यावर महाआरती होऊन नैवेद्य प्रसाद वांटल्यानंतर हा कार्यक्रम संपतो.

कार्तिक शु. १४ : श्रीवैकुंठ चतुर्दशीचा उत्सव–रात्रौ श्रींची स्वारी पालखींतून तलावावर जाते. तलावाच्या वाटेंत सर्वत्र दीपोत्सव, तलावाच्या कांठावर, भिंतीवर, पाण्यांत, तुलसीवृंदावनावर शेंकडो दिवे (पणत्या) यामुळें उत्सव फारच आल्हादकारक वाटतो. पालखी परत देवालयांत येऊन आरत्या होऊन नंतर कार्यक्रम संपतो.

कार्तिक शु. १५ : दुपारीं वनभोजन. कार्तिक शु. १४ प्रमाणेंच (कार्यक्रम) पालखींतून श्रींची स्वारी वनभोजन मंडपांत जाते. तेथें श्रींची मूर्ति मखरांत बसते. होम हवनादी कृत्यें, धात्रीपूजन वगैरे झाल्यानंतर समाराधना. रात्रौ परत तेथून पालखींतून मिरवणूक देवालयांत येते. वाटेंत दीपोत्सव वगैरे पहिल्या वनभोजनाप्रमाणेंच होत असतो.

कार्तिक कृष्ण ७ : श्रीशिवशर्मा (कौंडिण्य पुरुष) चा काला.

कार्तिक कृष्ण ८ : श्रीशिवशर्मा देवालयाकडे गोपालकाला.

कार्तिक कृष्ण १४ : शिबिकोत्सव.

## मार्गशीर्ष मास

मार्गशीर्ष शुक्ल ११ : श्रीमद्भगवद्गीता जयंत्युत्सव. समाराधना, शिबिकोत्सव (चांदीची पालखी ).

मार्गशीर्ष शु. १५ : वनभोजन, समाराधना, रात्रौ लालखी उत्सव.

मार्गशीर्ष वद्य ४ थी : शिबिकोत्सव (चांदीची पालखी).

मार्गशीर्ष अमावास्या : शिबिकोत्सव (चांदीची पालखी).

या महिन्यांत श्रीक्षेत्र प्रयाग येथून श्रीगंगेची कावड श्रीस्थळ मंगेशीं येत असते. ही कावड श्रीस्थळ मंगेशीं गांवांत पोंचतांच ती, सीमोल्लंघनाची पालखी विजयादशमीच्या दिवशीं ज्या पेडावर बसते त्याच पेडावर कावड आणणारा यात्रेकरू ब्राम्हण ठेवतो व आपण कावड आणल्याचा निरोप देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीस पाठवितो नंतर देवस्थानची व्यवस्थापक कमिटी, ब्राह्मण व इतर सेवक जन, वाजंत्री, कलावंती, हिलामतसह त्या जागीं येऊन श्रीगंगेच्या कावडीचें स्वागत करून ती कावड वाजत गाजत देवालयांत नेण्यांत येते व तेथें श्रीगंगापूजन करून ते कलश श्रींच्या गर्भागारांत व्यवस्थितपणें ठेवण्यांत येतात. त्यांतील एका कलशांतील 'भागीरथी'नें श्रीमहाशिवरात्री रोजीं, श्रीमंगेश देवाचे महाजन, कुंभारजुवें येथील केंकरे उपनांवाच्या घराण्याकडून प्रदोष कालीं श्रीमंगेशास महाअभिषेक केला जातो, त्याचप्रमाणें श्रावण महिन्यांत चवथ्या सोमवारीं त्याच केंकरे घराण्याकडून श्रींस शिंगाचा महारुद्र मोठ्या थाटांत करण्यांत येत असतो. त्या महारुद्राभिषेकासाठीं (सोमवार रोजीं प्रदोपकालीं सोमवार व्रत पूजेचे वेळीं) दुसऱ्या कलशांतील गंगाभागीरथीचा वापर करण्यांत येतो. ही गंगाभागीरथीची कावड श्रीक्षेत्र प्रयाग येथून श्रीमंगेश देवस्थानांत प्रतिवर्षीं येण्याची व्यवस्था केंकरे घराण्यांतील कुंटुबियांनीं बऱ्याच वर्षापूर्वीं केलेली आहे.

## पौष मास

पौष महिन्यांतील पहिल्या सोमवारीं : शिबिकोत्सव.

पौष कृष्ण ६ नंतरचा शुक्रवार ते सोमवारपर्यंत—सार्वजनिक महारुद्र (शिंगाचा) दुपारीं समाराधना, रात्रौ धाकटा रथोत्सव. हा रथ खांद्यावरून वाहतात. हा महारुद्र, श्रीमंगेशाचे सर्व कुळावी महाजनांच्या आयुरारोग्य व कुटुंब कल्याणार्थ व उत्तरोत्तर अभिवृद्धिसाठीं केला जातो. (श्रींच्या भांडारांतून खर्च)

पौष अमावास्या : 'गड' घालणें. (श्रींच्या भांडारांतून खर्च). पौष महिन्यांत चतुःसीमांवर 'गड दाळप' जळमीमार्फत केलें जातें.

## माघ मास

माघ शुक्ल ५ : श्रीसांतेरी देवीचें कालट (जत्रा). ही श्रीसांतेरी देवी सर्व महाजनांची आराध्य ग्रामदेवता असून तिचें देवालय तलावाच्या उजव्या बाजूस असलेल्या उंचवट्यावर आहे. रात्रौ श्रीसांतेरी देवीस रंगपूजा, पुराण, कीर्तन, आरत्या वगैरे झाल्यावर २४ विडे श्रीसांतेरी देवीसमोर ठेवलेले असतात. श्रीमंगेश देवस्थानचे महाजन जे तेथें देवालयांत या उत्सवास हजर असतील, त्यांतील प्रत्येक वांगडाच्या महाजनांस एक विडा याप्रमाणें ते विडे (तांबूल) पुजारी भटजीकडून देण्यांत येतात (श्रींच्या भांडारांतून खर्च)

माघ शु. ७ : रथसप्तमी–विजय रथोत्सव.

माघ शु. ८ : हत्ती अंबारींतून श्रींची मिरवणूक.

माघ शु. ९ : रौप्य शिबिकोत्सव.

माघ शु. १० : खांद्यावरील रथोत्सव.

माघ शु. ११ : रौप्य शिबिकोत्सव.

माघ शु. १२ : मध्यान्हीं पंचमूर्ती दर्शन, रात्रौ नौकाक्रीडन (सांगड). तलावांत दोन होड्यांचा सांगड करून त्यावर मखर शृंगारून त्यांत श्रीची स्वारी बसवून त्या सांगडाच्या तलावांत तुलसीवृंदावनाभोंवार पांच फेऱ्या होतात. प्रेक्षणीय दारूसामान, दीपोत्सव इत्यादी यावेळीं करण्यांत येतो.

माघ शुक्ल १३ : सुखासनोत्सव.

माघ शुक्ल १४ : धाकटा रथोत्सव, दीपोत्सव, रोपणाई इत्यादी (श्रींच्या भांडारांतून सर्व खर्च होत असतो).

माघ शुक्ल १५ : महा पर्वणी महोत्सव, थोरला रथोत्सव, महा प्रसाद कौल, सार्वजनिक गाऱ्हाणें श्रींकडे घातल्यानंतर देण्यांत येतो. दीपोत्सव, फोग (दारूकाम) विशेष प्रकारची रोपणाई, मुक्तद्वार सार्वजनिक समाराधना (एकंदर उत्सव खर्च श्रींच्या भांडारांतून होतो).

माघ वद्य १ : सार्वजनिक समाराधना (श्रींच्या भांडारांतून खर्च).

माघ वद्य ३ : दुपारीं समाराधना, रात्रौ शिबिकोत्सव. श्रीमंगेशाची सुवर्णमूर्ति या उत्सवास पालखींत बसते.

माघ वद्य ५ : नूतन कवचोत्सव, दुपारीं समाराधना, रात्रौ शिबिकोत्सव (चांदीच्या पालखींतून मिरवणूक). ह्या उत्सवाचा समस्त महाजनवृंदानें ठरविल्याप्रमाणें खर्च श्रींच्या भांडारांतून होत असतो. याच दिवशीं रात्रौ 'जागर' पेर्णी यांकडून केला जातो (खर्च श्रींच्या भांडारांतून).

माघ वद्य ८ : समाराधना, रात्रौ शिबिकोत्सव (चांदीची पालखी).

माघ वद्य १४ : महाशिवरात्रीचा उत्सव. रात्रौ सार्वजनिक फलाहार, पहांटेस धाकटा रथोत्सव. या दिवशीं अखंड रुद्राभिषेक, लघुरुद्र, तसेंच रात्रौ चतुःप्रहरी पूजा पहाटेपर्यंत होऊन नंतर रथोत्सवास प्रारंभ केला जातो. याच दिवशीं प्रदोषकालीं श्रींस श्रीगंगाभागीरथीचा अभिषेक, वाद्यांच्या गजरांत केंकरे-कुंभारजुवें कुटुंबियांकडून केला जातो.

माघ अमावस्या : दुपारीं ब्राह्मण संतर्पण, समाराधना, ब्रह्मीभूत श्रीमत् परमहंस पूर्णानंद सरस्वती स्वामी महाराज गौड पादाचार्य श्रीसंस्थान मठ कैवल्यपूर (कवळें) यांच्या इच्छेनुरूप कवळें मठाच्या खर्चानें या तिथीस सोमवार आल्यास सोमवारच्या पालखी मिरवणुकीच्या वेळीं खांबावर दीपाराधना पेटविली जाते.

## फाल्गुन मास

फाल्गुन पौर्णिमा : शिबिकोत्सव (चांदीची पालखी).

फाल्गुन वद्य ५ : शिबिकोत्सव (चांदीची पालखी).

फाल्गुन वद्य १० : शिबिकोत्सव (चांदीची पालखी).

वर उल्लेखिलेले बहुतेक उत्सव व त्याबद्दल होणारा वार्षिक खर्च भागविण्यासाठीं त्या त्या उत्सवाच्या संस्थापकांनीं श्रींच्या भांडारांत कायम निधी भरून त्या निधीच्या वार्षिक व्याजाच्या रकमेंतून खर्च होण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यांत कांहीं महत्वाचे उत्सव श्रीमंगेश देवस्थानच्या भांडारांतून देवस्थानच्या खर्चानें साजरे केले जातात. त्यांची नोंद प्रत्येक ठिकाणीं टीप देऊन केलेली आहे.

## प्रतिवर्षी सार्वजनिक गाऱ्हाणें-प्रार्थना

श्रीमंगेश देवस्थानांत वार्षिक फक्त आश्विन शुद्ध-दशमी (विजयादशमी) रोजीं सिमोल्लंघनाची पालखी देवालयांत आल्यानंतर, कार्तिक शुद्ध त्रयोदशी रोजीं काल्याची पालखी देवालयांत येऊन नंतर श्रीमंगेश देवास महारती झाल्यानंतर, व माघ शुद्ध पौर्णिमा रोजीं महापर्वणी महोत्सवांतील थोरला रथोत्सव होऊन त्या रथोत्सवांतील उत्सव मूर्ति पालखींत बसून ती पालखी देवालयांत येऊन त्यानंतर श्रीमंगेश देवास महारती झाल्यानंतर, सर्व महाजन कुळावी, देवस्थानचा सेवक वर्ग, भक्तजन व समस्त जनतेच्या कल्याण व अभिवृद्धिबद्दल सार्वजनिक प्रार्थना–गाऱ्हाणें घालतात. हें गाऱ्हाणें देवस्थानचे सर्व भटजी पुरोहित व बारा गावडे यांजकडून घालण्यांत येतें. वरील प्रमाणें सार्वजनिक गाऱ्हाणें प्रतिवर्षीं तीनच महोत्सवांचे वेळीं घालण्यांत येतें व तें गाऱ्हाणें श्रीमंगेश देवालयांत चौकावर श्रीमंगेश देवासमोर घालण्यांत येतें. पण, याशिवाय पौष महिन्यांत शेवटच्या सोमवारीं सांगता होईल अशा योजनेनें त्या सोमवार पूर्व शुक्रवारीं सर्व महाजनांच्या नांवें शिंगाचा महारुद्र (सार्वजनिक महारुद्र) साजरा केला जातो. तो महारुद्र सांगता झाल्याच्या सोमवारीं एक सार्वजनिक गाऱ्हाणें घालतात व हें गाऱ्हाणें श्रीमंगेशाच्या देवालयांत घातल्यानंतर लगेच श्रीमुलकेश्वर देवालयांत सर्व लोक, पुरोहित, गावडे इत्यादि मिळून गाऱ्हाणें घालतात.

□□□

# परिशिष्ट २ | देवस्थान व्यवस्थेसंबंधीची नियमावली

गोमंतकांत सर्व हिंदु देवालयांची कायदेशीर व्यवस्था व कारभार करण्यासाठीं पोर्तुगीज सरकारच्या राजवटींत एक देवस्थानचा कायदा मंजूर केलेला आहे. हा कायदा सर्व देवस्थानांसाठीं आहे. पण त्या सर्वसाधारण कायद्याशिवाय प्रत्येक देवस्थानची अंतर्गत व्यवस्था, पूर्वापार चालीरिती, हक्क, वहिवाटी, जबाबदाऱ्या व कर्तव्यें यांसंबंधी आपल्या देवस्थानची वेगळी नियमावली करण्याचे अधिकार सरकारनें प्रत्येक देवस्थानास दिले व त्याप्रमाणें श्रीमंगेश देवस्थाननें आपल्या देवस्थानांतील अंतर्गत कारभार, चालीरिती, पूर्वापार वहिवाटी सर्व जमेस धरून एक नियमावली केली. ती नियमावली त्यावेळच्या सरकारनें पास करून, तिची मंजुरी पोर्तारीय नंबर १४६, ता. १५ जून १९०९ नें फर्मावण्यांत आली व ती सरकारी ग्यॉझेटवर प्रसिद्ध झालेली आहे.

देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीस या नियमावलींतील कारभार व व्यवस्थाविषयक बाबतींतील कलमांत व त्यांनुसार योग्य अंमलबजावणी व्यवस्थितपणें होण्यासाठीं बऱ्याच अडचणी अनुभवास येऊं लागल्या. देवस्थानच्या सर्वसाधारण कायद्यानुसार प्रतिवर्षी देवस्थानच्या जमाखर्चाचें अंदाज-पत्रक सरकारकडून पास झाल्याशिवाय अंमलांत येऊं शकत नव्हतें. तें पास होण्यास कांहीं बंधनें सरकारकडून येऊं लागलीं. हीं बंधनें वास्तविक न्याय्य व सयुक्तिक होतीं. उदाहरणार्थ, देवस्थानांत जे देवकृत्यादि उत्सव वगैरे करण्यासाठीं पैसे आकारले जातात, त्यांतील एक पै देखील देवस्थानच्या भांडारास जमा न होतां सर्वच्या सर्व पैशांची वांटणी केली जाते. या वांटणींत एक पैचा हविर्भाग सुद्धां प्रत्यक्ष देवस्थानच्या भांडारास जमा होऊं नये, याबद्दल नापसंती सरकारी मामलेदारांकडून व्यवस्थापक कमिटीच्या निदर्शनास आणली जाऊं लागली. याचें मुख्य कारण देवस्थानच्या उत्पन्नांत दरवर्षी येणारी तूट, खर्चात अपरिहार्य वाढ व अंदाज-पत्रक तुटीचें पास होणें अशक्य, यासाठीं कांहीं तरी प्रत्यक्ष कायदेशीर उपाय योजना केल्याशिवाय वार्षिक जमा-खर्चाचें अंदाजपत्रक पास होण्याचें अडून पडूं लागून, त्याचा प्रत्यक्ष परिणाम देवकृत्यें-उत्सव व इतर सर्वच व्यवस्था कारभारावर होणें क्रमप्राप्त झालें. त्यासाठीं देवस्थानच्या नियमावलीच्या कलम २४ व

कलम २५ या दोनच कलमांसंबंधीं इ. स. १९०९ पासून इ. स. १९३९, या तीस वर्षांच्या कालांत व्यवस्थापक कमिटीस प्रत्यक्षांत जे अनेक अनुभव आले ते जमेस धरून देवस्थानच्या महाजन मंडळीनें आपल्या सभेंत एकमतानें ठराव करून, त्या दोनच कलमांत किंचित् नाममात्र फरक करून देवस्थान भांडारास कांहीं किरकोळ हविर्भाग प्रत्येक देवकृत्याबद्दल जमा होणाऱ्या पैशांतून मिळविण्याची व्यवस्था केली. हीं सुधारित दोन कलमें सरकारकडून पास होऊन पोर्तारीय नंबर ३५३०, तारीख १४ नवंबर सन १९४० नें मंजुरी मिळून ती सरकारी ग्यॉझेट (बोलेतीं ऑफिसीयल पहिली सेरिया, नंबर ४१, ता. १४ नवंबर १९४०, पृष्ठ ३५९ ते ३६२) वर प्रसिद्ध झाली आहे.

मूळ सबंध नियमावली इ. स. १९०९ सालीं तसेंच त्यांतील दोन कलमांची नंतर केलेली दुरुस्ती इ. स. १९४० सालीं सरकारी ग्यॉझेटांत पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध झालेली आहे. परंतु देवस्थानच्या महाजनांच्या सोईसाठीं त्या सबंध नियमावलीचा मराठींत गोषवारा, दुरुस्ती केलेलीं कलमेंहीं योग्य त्या जागीं उद्‌धृत करून, पुढें दिला आहे. याचें कारण, विशेषतः गोव्याबाहेर दूरच्या प्रांतांत वास्तव्य करणाऱ्या महाजनांस आपल्या श्रीमंगेश देवालयाचा कारभार कसा काय, कोणत्या पद्धतीनुसार किंवा नियमानुसार चालतो, या बद्दलच्या माहिती अभावीं अकारण गैरसमज उद्‌भवणें संभवनीय असतें देवस्थानच्या नियमावलीचा मराठींत गोषवारा वाचावयास मिळाल्यास प्रत्येक महाजनास मग तो कुठेंही वास्तव्य करून असो, त्यास आपणास देवस्थानचा महाजन या नात्यानें कोणते हक्क किंवा अधिकार आहेत, आपलीं देवस्थानबद्दल कर्तव्यें काय याची जाणीव होईल.

त्याचबरोबर सेवक जनांच्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव स्वतः त्यांस व महाजनांस जास्त प्रमाणांत उत्पन्न होऊन, याचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुपरिणाम घडून येऊन आपलेपणाची वाढ व कर्तव्य तत्परता जास्त प्रमाणांत वाढण्यास मदत होईल असें वाटतें.

श्रीमंगेश देवस्थानच्या, मूळ पोर्तुगीज भाषेंत असलेल्या नियमावलीचें मराठींत भाषांतर करवून घेऊन याच श्रीमंगेश देवस्थानचे एक सन्मान्य महाजन कै. श्रीयुत भिकाजी कृष्णराव भांडारे (३२९ धुरु बिल्डिंग मुंबई, नं. ४) यांनीं ता. २५ डिसेंबर १९३२ रोजीं एका लहान पुस्तिकेच्या रूपांत प्रसिद्ध केली होती. त्या पुस्तिकेंतील नियमावली (मराठी भाषांतर) जशांचें तसें फक्त त्यांत असलेलीं दोन कलमें. कलम २४ व २५ (वगळून) व त्याऐवजीं नंतरच्या कालांत (इ. स. १९४० सालीं) दुरुस्त केलेलीं व सरकारनें मंजूर केलेलीं तीं दोनही कलमें, योग्य त्या जागी नमूद करून सदर समग्र नियमावली पुढें दिली आहे. मूळ नियमावली सरकारी पोर्तुगीज भाषेंत आहे व मराठी भाषांतरामुळें निदान त्या नियमावलींतील हक्क, कर्तव्यें व जबाबदाऱ्या यांची तरी कल्पना येण्यास मदत होईल

## भाग १

## देवालय आणि त्याचे संस्थापक महाजन यांविषयीं

**कलम १**– श्रीमंगेश देवालयाचें स्थलांतर सोळाव्या शतकांत साष्टी प्रांतांतील कुड-

थाळी गांवांतून प्रस्तुतच्या जागीं मौजे प्रियोळ येथील मंगेश वाड्यावर करण्यांत आलें. हा वाडा देवालयाचा मोकासा असून आलय मजकुरचे संस्थापक महाजन, पांडुरंग कृष्ण दुभाषी उर्फ लाड यांचे मागणीवरून दिलेला आहे.

§ एकच– मंगेश वाड्यावर असणारीं पुढील लहान देवालयें, तसेंच मुख्य देवालयांत अगर त्याच्या बाहेर असणाऱ्या मूर्ति, हीं त्याचीं आनुषंगिक दैवतें होत.

१. श्रीगणपति आणि भगवति, हीं मुख्य इमारतीच्या उजव्या आणि डाव्या बाजूच्या देव्हाऱ्यांत अनुक्रमें अधिष्ठित आहेत.

२. श्री ग्रामपुरुष अथवा देवशर्मा याची मूर्ति मुख्य आलयाच्या चौकावर श्री नंदीच्या समीप असून त्याची आराधना वत्सगोत्री महाजनांकडून होते.

३. पुरुष अगर शिवशर्मा याचें लहान आलय मुख्य देवालयाच्या उजव्या बाजूस असून तेथें त्याची उर्जा चालते.

४. श्रीमुळकेश्वर याचें लहान आलय मुख्य देवालयाच्या मागचे बाजूस आहे.

५. श्रीनारायणदेव आणि श्रीवीरभद्र यांच्या दोन मूर्ति श्रीमुळकेश्वराच्या उजव्या बाजूस अधिष्ठित आहेत.

६. श्रीकालभैरव याचें लहान आलय मुख्य देवालयाच्या समोर चौघड्याच्या बुरुजाखालच्या बाजूस आहे.

७. श्रीसांतेरी हिची उर्जा तळीच्या उजवीकडे लहान आलयांत चालते.

**क. २**– ह्या देवाळयाचे एकंदर महाजन गौड सारस्वत ब्राह्मण वंशाचे होत; यांना कुशस्थळे ब्राह्मण असेंही म्हणतात आणि त्यांची कुलपरंपरा आद्यसंस्थापकांपासून चालत आलेली असून, हेच, गांव कुडथाळी येथील कोमुनिदादींत (ग्रामसंस्थेंत); खालील नांवांच्या चोवीस वांगडांचे ग्रामस्थ असत :

१ लाड पुरुष सत्यवंत; २ खेडारी; ३ भांडारी; ४ सत्यवंत भांडारी; ५ दळवी; ६ राजाध्यक्ष दळवी; ७ सिंगण दळवी; ८ कंठक; ९ ब्राह्मे; १० पालेकार; ११ मिसो; १२ नेत्रावळकार; १३ कैसरे; १४ तिनईकार; १५ वागळे; १६ तेळींग; १७ मेंडे; १८ केंकरे; १९ नाईक कोळंबे; २० मायणकार; २१ धुमे; २२ काबाडी; २३ नाईक; २४ नाईक संजगिरी;

**क. ३**– उपरोक्त कलमांतील चोवीस वांगडांचे वंशज महाजन मिळून ही संस्था संघटित असून, तिची व्यवस्था आणि कारभार, सामान्य कायदे, तसेंच प्रस्तुत कोंप्रोमीस (नियमबंदी) आणि रेगुलामेंत दुश् पागोदिश् (देवालयांची नियमबंदी) यांतील विशिष्ट कायदे यांस धरून चालते.

**क. ४**– महाजन हा पुल्लिंगी संततीचा अनुवंशिक आणि शाश्वत अधिकार असून तो एका पिढीपासून दुसऱ्या पिढींस रक्तसाम्यानें, अगर १६ डिसेंबर १८८० मितीच्या 'उजूस इ कोस्तूमिस्' या (पोर्तुगीज) कायद्यानुरूप झालेल्या दत्तक विधानानें प्राप्त होत असतो.

क. ५—ज्या देवालयासंबंधींचा हा कॉंप्रोमीस (नियमावली) आहे त्याचे महाजन, सोबत जोडलेल्या यादींत (कातालगांत) ज्यांची नोंद असेल तेच होत, आणि या यादीची प्रचलित कायद्यान्वयें दरसाल फेरतपासणी केली जाईल.

§ प्रस्तुत कलमांत ज्या यादीचा निर्देश आहे त्यांत नोंदल्या गेलेल्या महाजनांखेरीज त्याच कुळाचे अगर वांगडांचे आणखीही वंशज परमुलखांत आहेत. त्यांचीं निवासस्थानें अज्ञात असल्यामुळें त्यांची नोंद सदर यादींत केली गेली नाहीं. हे महाजन जेव्हां हजर असतील तेव्हां सभेस त्यांची ओळख पटल्यावर सभेंतील ठरावांवर त्यांना मत देतां येईल; तथापि संस्थानच्या कारभाराच्या जागीं त्यांची निवड होणें मात्र शक्य नाहीं.

## भाग २

## महाजनांचे अधिकार आणि आवश्यक कर्तव्यें

क. ६— चवथ्या कलमांत सांगितलेले अधिकार कधींच रद्द न होणारे तसेच अन्यास देतां घेतां येण्यासारखे नसून, यादींत (कातालगांत) नोंद झाल्या दिवसापासून ते प्राप्त होतात; वरिष्ठ अदालतींत नेलेली तक्रार मंजूर झालेली असेल तर मात्र तो अपवाद होय; कारण अशा प्रसंगीं तक्रार विषयक इनकार ज्या दिवशीं दिलेला असेल त्या दिवसापासून त्या अधिकारास सुरवात होईल.

क. ७— सर्व महाजनांस समान हक्क, समान मान आणि समान सवलती आहेत.

क. ८— संस्थानचा एखादा नोकर कर्तव्यास चुकल्यास त्याची कानउघाडणी करण्याचा, तसेंच त्याचे अत्याचार व गैरशिस्त वागणूक कारभारी मंडळीच्या अगर महाजन मंडळीच्या नजरेस आणण्याचा प्रत्येक महाजनास अधिकार आहे.

क. ९— संस्थेचा जमाखर्च तपासण्याची, निधि आणि इतर मौल्यवान चिजांची नोंद असलेल्या वह्या पडताळण्याची, तसेंच कारभारी मंडळीकडे तिच्या अमदानींतील हरएक खुलासा विचारण्याची प्रत्येक महाजनास मुभा आहे.

क. १०— प्रत्येक महाजनाचीं अवश्य कर्तव्यें पुढील प्रमाणें होत.

१. कारभारी मंडळांत निवड अगर नेमणूक झाल्यास, क. १ आणि त्याचीं पोटकलमें यांत उल्लेखिलेल्या संस्थेचा कारभार तिसऱ्या कलमाच्या उत्तर भागास धरून व पूर्वापार रूढीस अनुसरून चालवीत जाणें.

२. देवालयांत असतील तेव्हां धर्मकृत्यांचे आणि उत्सवांचे प्रसंगीं सभ्य पोषाखानें हजर राहणें.

३. तसेंच प्राकारांत वास्तव्य असेल तर नौबतीचे वेळीं सलामीस हजर राहणें.

## भाग ३

## भांडार

क. ११— जंगम व स्थावर संपत्ति, सोन्याचांदीचे दागदागिने, जडजवाहीर, सरंजामाचे

जिन्नस त्याचप्रमाणें योग्य वहीवरील जाबत्यांत दृश्य असणाऱ्या इतर हरएक चिजा हें संस्थानचें भांडार होय.

क. १२– आदा कलमाच्या बाबी येणें प्रमाणें:

१. स्थावर बदिकाचें उत्पन्न.

२. कर्जाऊ रकमांचें व्याज.

३. सरकारी तिजोरींतून मिळणारे हक्क.

४. सांखळी महालांतील वेळगें गांवचे कोमुनिदादींतून (ग्रामसंस्थेंतून) मिळणारे हक्क.

५. कुटुंबणास दिलेल्या ठिकाणचा दस्त.

६. फोंडा, सांगें व केंपें या महालांतील गांवगन्नांतून आदा होणारी कालेपटी, रथपटी नांवाची वार्षिक नेमणूक; तसेंच हेमाडबारशें महालसंबंधीची प्रस्तुत सरकारी तिजोरींतून दिली जाणारी नेमणूक.

७. देवास अगर धर्मकृत्यास वाहिलेले नवस.

८. प्रस्तुत कोंप्रोमीस अगर 'रेगुलामेंत दुश् पागोदिश्' यांतील नियमान्वयें घेण्यांत येणारा दंड.

९. महाजन अगर अन्य भाविक जन यांकडून मिळणारें द्रव्यसाह्य.

१०. देवकृत्यासंबंधीं संस्थानीं यावयाच्या लागवटी.

११. हरएक आगंतूक येणावळी.

क. १३– नकद नाणें, दागिने, वस्त्र अगर कोणत्याहि वस्तूचा नजराणा स्वखुषीनें दिला गेल्यास त्याचा महाजन मंडळी स्वीकार करूं शकेल. तथापि त्यामुळें संस्थेच्या कारभारांत हात घिघविण्याचा आपणांस हक्क प्राप्त झाला असें मात्र अर्पणकर्त्यास कधींच मानतां येणार नाहीं.

क. १४–एका रुपयापेक्षां ज्याची किंमत अधिक नसेल तो नवसाचा जिन्नस कामावर असणाऱ्या पुजारी व पैरेकार या नोकरांस समभाग वांटला जाईल.

क. १५–कोणत्याहि धातूचा, मोत्यांचा आणि जवाहिराचा तुलाभार झाल्यास तो भांडारचा आयुर्दाव गणला जाईल. नारळ, साखर, चंदन, तांदूळ अगर अन्य खाद्य वस्तूंचा झाल्यास त्यांतून पांच नारळ, पांच रात साखर अगर चंदन, पांच कुडव तांदूळ याप्रमाणें त्या त्या जिनसांतील पांच पांच नगांची किंमत भांडारीं जमा धरून वरकड कलम १६ बरहुकूम नोकर लोकांस वांटला जाईल.

क. १६–कलम १५ यांत ज्या अर्पित वस्तूंच्या विभागणीविषयीं सांगितलें, ती येणें प्रमाणें केली जाईल: त्यांचे पांच समान भाग करण्यांत येऊन त्यांतील एक पुजाऱ्यांस, दुसरा अभिषेकी यांस, तिसरा कामावर असणाऱ्या पुजारी व देवळी पैरेकार यांस, चवथा कळावंतीस आणि पांचवा समभाग बसास व पैरेकार देवळी यांस.

क. १७– नवसाचे जिन्नस तसेंच अन्य अर्पित वस्तू यांची कारभारी मंडळीनें अगर

तिच्या अभावीं चिटणिसानें कामावर असलेल्या पैरेकार भटजीच्या सान्निध्यांत नीट रुजवात करून, लगेच त्याची योग्य वहीवर नोंद केली जावी.

§ या कलमान्वयें नवसाची व अर्पित वस्तूंची टांचणी करण्यास, प्रारंभसमाप्तीचे शेऱ्यासह क्रमांक युक्त आणि अध्यक्षांच्या वैजाची वही पुजारी भटजींकडे दिलेली असावी.

§ या वहीवरील नोंदी खालीं अर्पण करणाऱ्या गृहस्थानें आणि त्याला लिहितां येत नसेल तर त्याच्या तर्फे दोघां साक्षीदारांनीं सह्या कराव्या.

**क. १८**–वस्त्र वगैरे ज्या नवसांची वापरण्याचे कामीं जरूर नसेल त्यांची कायद्यांतील पूर्व विधानानिशीं कारभारी मंडळीकडून लिलावांवर विक्री केली जाईल. याकामीं देवालयाकडे होणारे मोठ्या जमावाचे प्रसंग म्हणजे माघी पौर्णिमा व रामनवमी, अशांचा फायदा घेण्यांत येईल; आणि होणारें घडीत, भांडारीं जमा केलें जाईल.

**क. १९**– संस्थानच्या खर्चाच्या बाबी पुढीलप्रमाणें होत :

१. कलम एक व त्याचीं पोटकलमें यांत दाखल असलेल्या देवालयाच्या इमारती तसेंच अग्रशाळेची, वनभोजनाची आणि मठाच्या मंडपाची वगैरे इमारताची डागडुजी.

२. कलम चौतीस यांत दाखल होत असलेले उत्सव आणि देवकृत्यें.

३. चालू बेहड्यांत दर्श होत असलेली आणि असाधारण खर्च खरडा असल्यास वरिष्ठ मंजुरी मिळालेलीं धर्मादाय वगैरे कलमें.

४. ठिकाणाची उपराजणा.

५. संस्थानची व्यवस्था व कारभार यांस लागणारा खर्च.

६. चाकर नोकरांस पगार.

७. महाजन मंडळीनें ठरविलेला व वरिष्ठ मंजुरी मिळालेला कोणताहि आगंतुक खर्च.

## भाग ४

## देवालयांतील नित्यकृत्यांविषयीं

**क. २०**– श्रीमंगेश या मुख्य दैवताच्या नित्य उर्जेसंबंधीं कृत्यें :

१. आवर्तन.

२. नैवेद्य : एक दिवसा दुपारीं व दुसरा रात्रीं–यांस लागणारीं पात्रें पुढील जिन्नसांचीं तयार केलेलीं असावीं. एक शेर तांदूळ साळीचे पहिल्या प्रतीचे, नवटांक तुरीची डाळ, पावशेर गव्हाची रोटी. दोन तोळे तूप, एक औंस साखर, पावशेर गायीचें दूध, शाकभाजी आणि जरूर तो मसाला.

३. महाआरती : दिवसा व रात्रौ वाद्यासह.

४. रात्रौ रंगपूजा.

५. प्रदोषपूजा सूर्यास्तीं, तशीच प्रभातपूजा सूर्योदयीं.

६. संध्याकाळीं नौबत.

७. नंदादीप त्रेपन (५३)

८. सुर्यास्तीं दिवटी सलाम नामक मुजरा.

९. प्रभातकाळीं काकडआरत.

§ प्रस्तुत कलमांत निर्दिष्ट असलेल्या कृत्यांखेरीज अनेक भाविक गृहस्थांनीं नेमणूक-द्वारां स्वखर्चीं चालविलेलीं दुसरीं देवकृत्यें आहेत, त्यांचीही संपादणी प्रवर्तकांनीं ठरविलेल्या करारांप्रमाणें केली जावी.

**क. २१**–नैवेद्यास दाखवावयाचे पदार्थ मुख्य दैवत श्रीमंगेश यास अर्पण केल्यावर तो अन्नाचा असेल तर त्याचे दोन समभाग करून, एक भाग पुजारी यांस मिळावा व दुसरा श्री ग्रामपुरुप आणि श्री मुळकेश्वर यांस समभाग अर्पण केल्यावर तो कामावर असलेल्या देवळी पैरेकारांस दिला जावा.

**क. २२**–श्रीनारायण, श्रीवीरभद्र, श्रीशिरशर्मा (शिरी पुरुष), श्रीसांतेरी व श्रीकालभैरव या दैवतांची पूजा नैवेद्यादि कृत्यें हरिभट्ट पुजारी याकडून संपादली जावीं आणि ह्या कामगिरीबद्दल श्रीनारायणदेव शीर, वीरदेवाची शीर, सांतेरी देवीची शीर, काळ भैरवाची शीर आणि श्रीशिंवी पुरुषाची शीर या नांवाच्या पांच शिरा अगर ठिकाणें यांचा त्यानें फलभोग घ्यावा.

**क. २३**–मुख्य व इतर दैवतांच्या नैवेद्य विषयक कामगिरीवर असणारे भटजी आपलीं कर्तव्यें यथाप्रसंगीं आणि यथाकाळीं साकल्यतेनें पार पाडीत आहेत कीं काय यावर कारभारी मंडळीनें काळजीपूर्वक नजर ठेवावी.

**क. २४**–देवस्थानांत करावयाच्या देवकृत्यांसाठीं ज्या लागवटी किंवा खर्च आकारणी (दर) द्यावी लागते, ती खालीं नमूद केलेल्याप्रमाणें असून ती या देवालयाचे एक संस्थापक पांडुरंग कृष्ण दुभाषी उर्फ लाड यांनीं ठरवून दिलेल्या प्रमाणें आहे व त्या आकारणी वांटणी खालीं दर्शविल्याप्रमाणें व या नियमावलीच्या कलम २८ मध्यें उल्लेख केल्याप्रमाणें करण्यांत यावी.

### १. श्रीमंगेश देवास आणि इतर दैवतांस दर अभिषेक नैवेद्यासंबंधीं :

| | रु. आ. पै. | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार | ०–१–० | |
| आ) वैसास यास | ०–•–६ | |
| इ) अभिषेकी यास आवर्तनाबद्दल | •–१–० | |
| ई) देव्हारी यास नैवेद्याबद्दल | ०–१–• | |
| उ) पैरेकार देवळी यास १०८ बिल्वपत्रें व इतर कामाबद्दल | ०–०–६ | ०–४–० |

### २. वेद्याचा लघुरुद्र संबंधीं :

| | | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार | ०–८–० | |

आ ) बारा ब्राह्मण. पैकीं एक पाणी आणून देणारा व इतर अकरा रुद्रजप करणारे. यांत अभिषेकी धरून प्रत्येक ब्राह्मणास एक आणा प्रमाणें ०–१२–०
इ ) पुरोहित यास पंचामृताबद्दल ०–३–०
ई ) देव्हारी यास नैवेद्याबद्दल ०–२–६
उ ) प्रति देव्हारी यास प्रत्येक पंचायतन दैवतास एक याप्रमाणें पांच नैवेद्यांबद्दल ०–०–६
ऊ ) प्रति देव्हारी आणि जोतकार यास घरसत (श्रींच्या गर्भागारांत स्वच्छता व टापटीप ठेवण्याबद्दल) ०–२–०
ए ) पुरोहित यास आचार्य पूजासंबंधीं ०–३–०
ऐ ) पैरेकार देवळी यास १०८ बिल्वपत्रें, फुलें, उपकरणांची स्वच्छता राखणें, आरती व इतर कामांबद्दल मिळून ०–१–६
ओ) अभिषेकी यास समईतील तेलाबद्दल ०–०–६
औ) पुजारी यास श्रीसांतेरीस नैवेद्याबद्दल ०–०–६
अं) घैसास यास त्याच्या कामगिरीबद्दल ०–१–०
अः) पुजारी पैरीकार यास दैनिक श्रींच्या गर्भागाराची जमीन धुऊन एकंदर स्वच्छता राखणें व सुव्यवस्था ठेवणेबद्दल ०–०–२ २–२–८

## ३. शिंगांचा लघुरूद्र संबंधीं :

अ) देवस्थान भांडार ०–१२–०
आ) बारा ब्राह्मण वेड्याच्या लघुरूद्राच्या तपशिलांत (आ) मध्यें उल्लेखिल्याप्रमाणें प्रत्येकी ०–२–० १–८–०
इ) वेड्याच्या लघुरुद्राच्या तपशिलात (इ) पासून (अः) पर्यंत उल्लेखिल्याप्रमाणें ०–१४–८ ३–२–८

## ४. वेड्याच्या महारुद्रासंबंधीं :

अ) देवस्थान भांडार १०–०–०
आ) घैसास यास पुण्याह वाचनाबद्दल ०–३–०
इ) प्रति घैसास यास त्याच्या इतर कामांबद्दल ०–८–०
ई) प्रति घैसास यास दक्षणा व फलदानाबद्दल ०–२–०
उ) पुरोहित यास पंचामृताबद्दल १–४–०
ऊ) प्रति पुरोहित यास गोप्रदानाबद्दल १–९–०

| | | |
|---|---|---|
| ए) प्रति पुरोहित यास आचार्य पुजेबद्दल | ०–१२–६ | |
| ऐ) देव्हारी यास महानैवेद्य चार दिवस संबंधीं | १–४–० | |
| ओ) प्रति देव्हारी यास पंचदेव नैवेद्याबद्दल | ०–२–० | |
| औ) प्रति देव्हारी यास श्रीग्रामपुरुषास पायस व श्री मुल्केश्वरास खिचडीबद्दल | ०–२–० | |
| अं) प्रति देव्हारी यास श्रीसांतेरी देवीस महानैवेद्यासंबंधी | ०–३–० | |
| अः) एकदारी पूजा बांधणारास | ०–६–० | |
| क) बारा ब्राह्मणांपैकीं एक पाणी आणून देणारा व इतर अकरा रुद्र जप करणारे यांस प्रत्येकीं १–४–० प्रमाणें | १५–०–० | |
| ख) पैरेकार देवळी यास त्यानें बेल, फुलें देणेंबद्दल | ०–१२–० | |
| ग) पैरीकार देवळी यास दिवे पेटविणेंबद्दल | ०–२–० | |
| घ) जोतकार यास त्याच्या कामांबद्दल | ०–४–० | |
| ङ) महारुद्राच्या पहिल्या तीन दिवसांत पूजा बांधणारास | ०–६–० | |
| च) पुजारी यास देव दक्षणा | ०–३–० | |
| छ) श्रीसांतेर भांडार (देवस्थान भांडारास) | ०–९–० | |
| ज) नारळ, चणे, विड्याचीं पानें, सुपाऱ्या, तांदूळ आणि इतर जिन्नसांबद्दल | ०–१२–० | |
| झ) पुराणिक यास | ०–१०–० | |
| ञ) कीर्तनी यास | ०–१२–० | |
| त) कलावंतीस | १–८–० | |
| थ) मृदंगी | ०–६–० | |
| द) तालदार | ०–२–० | |
| ध) बारा गावडे यांस त्यांच्या कामांबद्दल | ०–१२–० | |
| न) वाजंत्री (वाद्यें वाजविणारे) | ०–८–० | |
| प) हिलामतदार | ०–१४–० | |
| फ) महारुद्राच्या शेवटच्या म्हणजे सांगता होण्याच्या दिवशीं फुलें आणणारास | ०–३–० | |
| ब) ब्राह्मणांस पन्नास जणांच्या संतर्पण खर्चाबद्दल प्रत्येक पात्र ०–२–६ प्रमाणें. (संतर्पण देवस्थानच्या अग्रशाळेंतच झालें पाहिजे) | ७–१३–० | |
| भ) भोजन दक्षणा | ०–१२–६ | |
| म) आशीर्वाद दक्षणा | ०–८–० | |
| य) तेल खर्चाबद्दल | २–४–० | |
| र) पंचखाद्यसाठीं | ०–८–० | ५२–०–० |

**५. शिंगांच्या महारूद्रासंबंधीं :**

बेड्याच्या महारूद्राच्या वांटणी तपशील क्रमांक ४ मध्यें उल्लेखिल्याप्रमाणें, मात्र बारा ब्राह्मण (क) मध्यें निर्देश केलेल्या ब्राह्मणांस प्रत्येकीं २ रु. ० आ. ० पै प्रमाणें. यामुळें ९ रु. वाढ होते ती लक्षांत घेऊन महारूद्र शिंगांचा करणेस एकंदर खर्च — ६१–०–०

**६. रंगपूजा (एकदारी) संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ ) देवस्थान भांडार | ०——२ | |
| आ) अभिषेक नैवेद्याबद्दल क्रमांक १ प्रमाणें | ०——० | |
| इ ) आशीर्वाद दक्षणा | ०——० | |
| ई ) रंगपूजा एकदारी बांधणेस | ०——० | |
| उ ) घैसास यास | ०——० | |
| ऊ ) पुराणिक यास | ०——० | |
| ए ) हरिदास यास | ०——० | |
| ऐ ) मृदंगी यास | ०——० | |
| ओ) तालदार यास | ०——६ | |
| औ) नृत्यांगनांस | ०——० | २–०–८ |

**७. रंगपूजा (तीनदारी) संबंधीं :**

रंगपूजा एकदारीच्या तपशीलाप्रमाणें वांटणी तपशील क्रमांक ६ मध्यें दर्शविल्याप्रमाणें. मात्र रंगपूजा तीनदारी बांधणारास १ रु. २ आ. ० पै. म्हणून ० रु. १२ आ. ० पै वाढ होते, ती जमेस धरून एकंदर — २–१–८ — २–१२–८


**८. गांठवल संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ ) देवस्थान भांडार | ०——८ | |
| आ) श्रीगणपती पूजन | ०——० | |
| इ ) भेटीस नारळ | ०——६ | |
| ई ) फलदान | ०——३ | |
| उ ) वाजंत्री (वाद्यें वाजविणारांस) | ०——० | |
| ऊ ) मृदंगी | ०——३ | |
| ए ) नृत्यांगना | ०——० | |
| ऐ ) अभिषेक नैवेद्य | ०——० | ०–१०–८ |

**९. आवर्तन संबंधीं :**

| | |
|---|---|
| अ) देवस्थान भांडार | ०——४ |


| | | |
|---|---|---|
| आ) अभिषेकी भटजी | ०–१–० | ०–१–४ |
| **१०. एकादशिनी श्रीमंगेश देवास आणि इतर आनुषंगिक दैवतांस :** | | |
| अ) देवस्थान भांडार | ०–१–० | |
| आ) अभिषेकी भटजी यास पंचामृताबद्दल आणि रुद्र जप करणेबद्दल | ०–३–० | ०–४–० |
| **११. पायस ग्रामपुरुषास संबंधीं :** | | |
| अ) देवस्थान भांडार | ०–०–४ | |
| आ) देव्हारी यास | ०–१–० | ०–१–४ |
| **१२. खिचडी श्रीमुलकेश्वरास संबंधीं :** | | |
| अ) देवस्थान भांडार | ०–०–४ | |
| आ) देव्हारी यास | ०–१–० | ०–१–४ |
| **१३. घूड संबंधीं :** | | |
| अ) देवस्थान भांडार | १–०–० | |
| आ) ब्राह्मण भटजींस | १–८–० | २–८–० |
| **१४. चतुःप्रहरीं पूजासंबंधीं :** | | |
| अ) देवस्थान भांडार | १–०–० | |
| आ) अभिषेकी भटजी यास ४ एकादशिनीसंबंधीं | ०–१२–० | |
| इ) पंचामृत, केळीं, धूप, दीप इत्यादींबद्दल | ०– ६–० | |
| ई) पैरेकार देवळी यास ५०० बिल्वपत्रें, फुलें, (केवडा सहित) बद्दल | ०–६–० | २–८–० |
| **१५. लक्ष बेल संबंधीं :** | | |
| अ) देवस्थान भांडार | ५–०–० | |
| आ) पेरीकार देवळी यास एक लक्ष बिल्वपत्रें देणेंबद्दल | ८–०–० | |
| ई) अभिषेकी भटजी यास | २–०–० | १५–०–० |
| **१६. चांदीच्या पालखींतून मिरवणुकीबद्दल :** | | |
| अ) देवस्थान भांडार | ४–०–० | |
| आ) भटजींस पालखी खांद्यावरून वाहविणेंबद्दल | १–०–० | |
| इ) मेणबत्ती खर्च | ०–१२–० | |
| ई) सेवेकरी देवळी यास चांदीच्या पालखीच्या व्यवस्थेबद्दल | ०–४–० | ६–०–० |



माघ पौर्णिमा दीपोत्सव



महापर्वणी (थोरला) रथोत्सव



विजय रथ

हत्ती अंबारी



**१७. श्रीमंगेश देवाकडे किंवा इतर देवतांकडे नंदादीप पेटविणें संबंधीं:**

| | | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार (दर महिन्यास) | ०–१०–० | |
| आ ) जोतकार यास तेलखर्च व बिदागीबद्दल | १–६–० | २–०–० |

**१८. दीपस्तंभ (खांब) पेटविणें संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार | १–०–० | |
| आ) तेलखर्च (२६ शेर तेल) | ४–१४–० | |
| इ ) बारा गावडे यांस खांबावर दीपाराधना पेटविणेंस | ०–१२–० | |
| ई ) आशीर्वाद दक्षणा | ०–६–० | |
| उ ) घैसास यास पूजेबद्दल | ०–३–६ | |
| ऊ ) वाजंत्री यास | ०–३–६ | |
| ए ) पैरेकार देवळी यास | ०–१–० | ७–८–० |

**१९. देवालयाच्या इमारतींवर दिपाराधना पेटविणें संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार | २–०–० | |
| आ) तेलखर्च (७२ शेर तेल) आणि बारा गावडे यांस दीपाराधना पेटविण्यासंबंधी | १२–०–० | १४–०–० |

**२०. देवालयांत तीनदारी दीपाराधना पेटविणें संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ ) देवस्थान भांडार | ०–४–० | |
| आ) जोतकार यास ३ शेर तेल खर्च आणि बिदागी-बद्दल | ०–८–० | |
| इ ) आशीर्वाद दक्षणा | ०–८–० | १–४–० |

**२१. संतर्पण किंवा भोजन संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ ) देवस्थान भांडार | ०–०–३ | |
| आ) भटजीस दर पात्रास दक्षिणेसहित | ०–२–९ | ०–३–० |

**२२. पंचदेव नैवेद्य संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ ) देवस्थान भांडार | ०–०–६ | |
| आ) देव्हारी यास | ०–२–६ | ०–३–० |

**२३. श्रीसांतेर नैवेद्य संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार | ०–०–६ | |
| आ) देव्हारी यास | ०–२–६ | ०–३–० |

**२४. श्रीकालभैरवास वडेमाळ संबंधीं :**

| | | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार | ०–०–६ | |
| आ) देव्हारी यास | ०–२–[illegible] | [illegible] |

**२५. श्रीमुळकेश्वरास तंबाखूची विडी संबंधी :**

| | | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार | ०–०–३ | |
| आ) तंबाखू आणि बिदागीबद्दल | ०–०–९ | ०–१–० |

**२६. श्रीमुळकेश्वरास कांबळ, कोयती संबंधी :**

| | | |
|---|---|---|
| अ) देवस्थान भांडार | ०–४–० | |
| आ) कांबळ कोयतीबद्दल | १–४–० | १–८–० |

§ १. जे महाजन किंवा भाविक महारूद्र आणि रंगपूजा करतील त्यांनीं वर उल्लेखित संबंधित कलमांत दर्शविलेल्या दराशिवाय, दिवाबत्ती खर्च, जितके दिवे पेटविणें असेल त्या आंकड्याप्रमाणें, तसेंच रात्रौ नैवेद्याबद्दल येणारा खर्च द्यावा लागेल.

§ २. कोणताहि महाजन किंवा भाविक, वरील देवकृत्याच्या दरांच्या तक्त्यांत नमूद केलेल्या दरांपेक्षा स्वखुषीनें जास्त पैसे देईल तर ते जास्त पैसे देवस्थान भांडारास जमा केले जावेत. मात्र कोणत्याहि कारणावरून तक्तयांत नमूद केलेल्या दरापेक्षां कमी दर आकारतां यावयाचे नाहींत.

§ ३. एकंदर सर्व देवकृत्यें व धार्मिक विधी कलम २४ मध्यें उल्लेखिलेले, देवस्थानच्या ब्राह्मण भटजी, सेवेकरी इसमांनींच श्रींच्या गर्भागारांत स्वतः जातीनेंच संपादिली पाहिजेत. तसेंच त्यांनीं शिबिकोत्सव व इतर वाहन मिरवणूक प्रसंगीं समीप राहून वेद्‌घोष, मंगल गीतें देवस्थानच्या वहिवाटीप्रमाणें पठण केलीं पाहिजेत. असें न करणारे इसम ही नियमावली व देवस्थानचा कायदा यांस अनुसरून शिक्षेस पात्र होतील.

§ ४. कोणताच ब्राह्मण भटजी, पैरेकार देवळी आणि इतर सेवेकरी ज्यांस देवस्थानच्या नियमावलींत उल्लेखिल्या बरहुकूम कोणत्याहि देवकृत्य, उत्सव किंवा इतर सेवेनिमित्त वांटणी, बिदागी, वेतन वगैरेंत हविर्भाग असेल, त्या सर्वांनीं, आपआपल्या कर्तव्य जबाबदारीचीं कृत्यें, स्वतः करण्याचें सोडून परस्पर इतर वेगळ्या इसमांकडून देवालयांत संपादित करून घेतां येणार नाहींत. मात्र, आगाऊ देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीच्या मान्यतेनें प्रसंग विशेषीं तसें करतां येईल किंवा तीं देवकृत्यें करण्यासाठीं कोणाकडूनच पैसे घेतां येणार नाहींत. परंतु एखादे वेळीं कोणताही महाजन किंवा भाविक इसम परस्पर देवस्थानच्या सेवेकऱ्याकडे पैसे पाठवून देवस्थानांत कोणत्याहि प्रकारचें देवकृत्य करण्यास सांगेल, तर अशा प्रसंगीं त्या सेवेकरी इसमानें ताबडतोब त्याची दखलगिरी देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीस, कलम २५ मध्यें नमूद केलेल्या देवकृत्याचे वहींत त्याची नोंद करून घेण्यासाठीं पैशांसह दिलीच पाहिजे; व ही दखलगिरी न केलेले सेवेकरी या देवस्थानची नियमावली व देवस्थानांच्या कायद्यास अनुसरून या देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीकडून शिक्षेस पात्र होतील.

§ ५. देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीचे चिटणीस किंवा सेक्रेटरी यांनीं कमिटी ऑफिसच्या देवकृत्य रजिस्टर वहींत जीं देवकृत्यें नमूद असतील तीं देवकृत्यें प्रति दिव-

साचीं लिहून त्यांची दैनिक नोंद देवालयांत पाठविली पाहिजे; व या नोंदपत्रकांत जीं देवकृत्यें नमूद असतील तींच देवकृत्यें देवस्थानचे भटजी, अभिषेकी, पुजारी, आणि इतर सर्व सेवेकरी यांनीं देवालयांत संपादिलीं पाहिजेत. या कलमांत दर्शविल्याप्रमाणें जे सेवेकरी पाळा न देतील, ते सर्व गैरवर्तन केल्याबद्दल व शिस्तभंग केल्याबद्दल शिक्षेस पात्र होतील.

**क. २५–** देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीच्या चिटणीस किंवा सेक्रेटरींकडे एक खास वही किंवा देवकृत्यांचें रजिष्टर बुक असलें पाहिजे. या वहीच्या प्रत्येक पानावर पान क्रमांक घालून तेथें व्यवस्थापक कमिटीच्या अध्यक्षांनीं आपली स्वतःची संक्षिप्त सही केली पाहिजे. या वहीवर देवस्थानांत जीं देवकृत्यें, उत्सव वगैरे साजरे करावयाचे असतील, मग तीं कायम स्वरूपाचीं ठेवलेलीं किंवा यापुढें ठेवण्यांत यावयाचीं, तसेंच अलाहिदा स्वरूपाचीं किंवा पैसे पाठवून किंवा स्वतः हजर राहून कोणीहि महाजन, भाविक इसमांनीं करावयाचीं असतील तीं सर्व देवकृत्यें आणि उत्सव रजिस्टर केले पाहिजेत. कोणत्याहि कारणास्तव, कसलेंच देवकृत्य किंवा उत्सव या वहीवर रजिस्टर करून, त्याचे संबंधित पैसे भरून व्यवस्थापक कमिटीची लेखी परवानगी घेतल्याशिवाय कोणतेंहि देवकृत्य किंवा उत्सव साजरा करतां येणार नाहीं.

§ १. कलम २४ मध्यें दर्शविलेल्या सर्व देवकृत्यांचे दर, त्यांची विभागणी, वांटणी वगैरे सर्व लिखाण एका संबंधित वहीवर केलें जावें. ही विभागणी वांटणी, वार्षिक कायम स्वरूपाचीं देवकृत्यें व उत्सवांस व इतर सर्व धर्मकृत्यें जीं वार्षिक बजेटावर दृष्टोत्पत्तीस येतात त्यांना लागू आहेत.

§ २. अलाहिदा देवकृत्यांचे दर वसूल केल्यानंतर त्यांत जो कांहीं हविर्भाग कलम २४ मध्यें दर्शविल्याप्रमाणें देवस्थान भांडारास येणें असेल त्या हविर्भागाची एकंदर रक्कम दर महिन्यास देवस्थान भांडारांत जमा करून तशी नोंद जमाखर्च वहीवर करण्यांत यावी.

§ ३. वर उल्लेखित सर्व देवकृत्यें व उत्सवांच्या संबंधित हिशेब, विभागणी, वांटणी इत्यादि खास लिखाण करण्यासाठीं, व्यवस्थापक मंडळीनें आपल्या स्वतःच्या एका विश्वासू इसमाची नेमणूक रोजगार पगारी स्वरूपांत करावी. मात्र हा विश्वासू इसम देवस्थानच्या महाजन मंडळीपैकींच निवडला पाहिजे.

§ ४. पैरीकार अभिषेकी, देव्हारी, पुजारी आणि पैरीकार देवळी या सर्वांनीं आप-आपल्या हुद्द्याची व जबाबदारीचीं, सर्व कामगिरी व देवालयांत करण्याचीं सर्व कामें दर आठवड्यास एक इसम याप्रमाणें साप्ताहिक पद्धतीनें संपादिली जावींत. पण, प्रत्येक इसम आपली साप्ताहिक सेवेची कालमर्यादा संपल्यानंतर त्या कामाचीं सूत्रें दुसऱ्या म्हणजे पाळीनें आपल्या पुढच्या सेवेकऱ्याकडे सुपूर्द करतांना, आपल्या स्वाधीन ज्या ज्या वस्तू होत्या त्या सर्व त्या सेवेकऱ्यांच्या स्वाधीन लेखी पद्धतीनें करून त्या सर्व वस्तूबद्दल स्वतः सुपुर्द करणारा, स्वाधीन घेणारा, तसेंच इतर सर्व सेवेकरी व्यक्तिशः व सामुहिकरित्या पूर्ण जबाबदार आहेत.

# भाग ५

## नोकर लोकांविषयीं

क. २६– जे स्त्री पुरुष रोख पगार घेऊन अथवा संस्थानचे ठिकाणचें उत्पन्न उपभोगून, तसेंच भाविक गृहस्थांनीं करविलेल्या देवकृत्यांबद्दलच्या लागवटी घेऊन, चालू रिवाजाप्रमाणें देवालयांत काम करीत आहेत तीं संस्थानचीं नोकर समजलीं जावीं.

### तपशील

१. अभिषेकी तीन.
२. पुजारी तीन.
३. जोतकार अगर दिवे पेटवणारे एक.
४. पुराणिक अगर पुराणपाठक एक.
५. हरदास अगर कथेकरी एक.
६. जोशीवृत्ति करणारे भटजी दोन.
७. पैरेकार देवळी चार.
८. आपले मान व क्रमवारीप्रमाणें देवालयांतील कामें करणाऱ्या आठ घरांतील कुळीं कलावंती.
९. मृदंगी अगर मृदंगवादक एक.
१०. धृपदी अथवा धृपदगायक एक.
११. वाजंत्री अगर वाद्यें वाजविणारे दहा.
१२. हिलामतदार अथवा राजचिन्हें धरणारे चौघे.
१३. भावीण एक.
१४ प्राचीन काळापासून देवालयांतील अंगमेहनतीचीं कामें करणारे बारा घरांचे गावडे.

§ प्रस्तुत कलमांतील नोकरांना त्यांच्या कामगिरीदाखल योग्य बेहड्यांत नमूद असलेलें वेतन मिळत जाईल.

क. २७– उपरोक्त कलमाशीं ज्यांचा संबंध पोंचतो त्या सेवकजनांनीं कारभारी मंडळीच्या देखरेखीखालीं आपापलीं कामें तत्परतेनें आणि इमानानें बजावीत जावीत.

§ १. घसास याचीं कर्तव्यें :–

१. ज्या ज्या कृत्यांत गणपतिपूजन आणि पुण्याहवाचन यांची आवश्यकता असेल तेथें तीं संपादणें.
२. मिरवणुकींत पालखीच्या अगर इतर वाहनांच्या समिप मंगल गीतें गाणें.
३. रात्रौ मंत्रपुष्पाच्या वेळीं बिनचूक हजर असणें.
४. शालिवाहन शकाच्या नूतन वर्षारंभीं देवालयांत पंचांग पठण करणें.
५. पालखी अगर तत्सम अन्य वाहनें वाहणारे यांस मिरवणुकींत मदत करणें.

६. मिरवणुकींत पालखीजवळ धूप जाळणें.

७. पुढील देवकृत्यें संपादणें :–

अ ) श्रावण शुद्ध पौर्णिमेस पौतीं पूजन व त्याच महिन्यांत श्रावणी.

आ) श्रावण मासांतील प्रति सोमवारीं, महाशिवरात्रीच्या व इतर वहिवाटीच्या दिवशीं अर्घ्य प्रदान.

इ ) स्वारीच्या प्रसंगीं पूजन.

ई ) ग्रहणकाळीं होम.

उ) माघ पौर्णिमा रोजीं शांति.

ऊ) कार्तिक आणि मार्गशीर्ष मासांत वनभोजनासंबंधीं हवन.

ए) मुख्य देवालयांतील चौकावर उपाकर्म.

ऐ) तळीवर जोडण्याचें गांठवल; खेरीज स्वतःच्या धंद्यास लागू ती रूढीचीं हरएक नित्य नैमित्तिक कृत्यें संपादणें.

§ २. अभिषेकी यांचीं कर्तव्यें :–

१. कलम २० च्या अंक १, ३ व ५ या पोटकलमांत आणि त्याच्या रकमेंत संभवणारीं देवालयांतील कृत्यें आपापल्या वांट्यास येतील त्याप्रमाणें संपादणें; शिवाय भाविक लोकांनीं करविलेलीं नैमित्तिक कृत्यें, घसास भटजीनीं आरंभविधि करून दिल्यावर संपादित जाणें.

२. मंत्रपुष्प प्रसंगीं त्रिवर्गानीं हजर राहणें.

३. स्वारीचे प्रसंगीं पालखीखेरीज इतर वाहनें खांद्यावरून मिरवणें.

४. स्वारींत मंगलगीतें गाणें.

५. सोमवारच्या स्वारींत पळटाप्रमाणें कामावर असतील त्यांनीं आरती दाखवणें.

६. यजमानाच्या सांगणीनें प्रसाद घेणें.

७. आपआपले यजमान सांगतील तीं देवकृत्यें प्रत्यहि संपादित जाणें.

८. खासगी रीतीनें करविलेल्या देवकृत्यांबद्दल लागवटी यजमानांकडून वसूल करून, कलम २४ बरहुकूम त्यांतील भाग भांडारास आणि नोकर लोकांस यथाप्रमाण वांटून देणें.

§ ३. उपरोक्त पोटकलमाचे अंक एक व पांच यांत सांगितलेलीं कृत्यें त्रिवर्ग अभिषेकी यांनीं प्रत्येकीं दहा दिवसांच्या पलटाप्रमाणें संपादावींत.

§ ४. पुजाऱ्यांचीं कर्तव्यें :–

१. अरुणोदयीं निर्माल्यविसर्जन व मंत्रस्नान.

२. गंधपुष्पादि पूजा द्रव्यांची तयारी करणें.

३. रुढीप्रमाणें पूजा बांधण्याची सामुग्री तयार करणें.

४. कलम २० चें पोट कलम २ यांत सांगितलेला नैवेद्य योग्य समयीं समर्पण करणें.

५. योग्य समयीं आरती पेटवून अभिषेकी यांजकडे देणें.

६. आरतींच्या वगैरे प्रसंगीं घंटा वाजविणें.
७. पूजा पात्रें व इतर उपकरणें रीतीप्रमाणें मांडून ठेवणें व नैवेद्याचे प्रसंगीं तीं गर्भागारांतून बाहेर काढणें.
८. गर्भागार स्वच्छ आणि सुसज्जित राखणें.
९. वरकड भटजींच्या बरोबर मंत्रपुष्पाचा घोष करणें.
१०. पालखी, लालखी वगैरे वाहनें खांद्यावरून वाहणें.
११. गर्भागारांत अगर बाहेर मूर्तीच्या अंगावरील नित्य वापराचे अगर उत्सवाचे प्रसंगीं घातलेले सोन्या-रुप्याचे, जडजवाहिराचे किंवा अन्य तऱ्हेचे अलंकार पाळीप्रमाणें स्वतःचे जबाबदारीखालीं संरक्षून पाळीचे दिवस संपतांच मागून येणाऱ्या जोडीदाराच्या ताब्यांत देणें.
१२. भेटी देणें.
१३. मंत्रपुष्पाच्या वेळीं कुळीं पुजाऱ्यांनीं हजर राहणें.

§ ५. जोतकारांचीं कर्तव्यें :–

१. रोजच्या आणि उत्सवाच्या दिवाबत्तीस लागणारें तेल कारभारी मंडळीकडून घेणें.
२. ठराविक वेळीं दिवे पेटवून ते चांगले प्रज्वलित ठेवणें.
३. रात्रीच्या आरती झाल्यावर देवालयांत कोणीहि बसून राहिलेला नाहीं अशी खात्री करून घेऊन आणि आलयाचीं खिडक्या दारें बंद करून चार दिवे तेवत ठेवणें आणि पैरीकार देवारी व देवळी या समागमें सर्व रात्र देवालयांत राहणें.
४. नंदादीप पेटवण्यास जें तेल भाविक लोक स्वखुषीनें देतील तें स्विकारणें.

§ ६. पुराणिकाचीं कर्तव्यें :–

१. रोज ठराविक वेळीं पुराण वाचणें.
२. मंत्रपुष्पास हजर राहणें.
३. उत्सवाचे प्रसंगीं जे पुराणिक येतील त्यांचें टिपण ठेवून कारभारी मंडळीस अगर ज्या महाजनांचा उत्सव असेल त्यांस त्यांची संख्या व नावें कळविणें.

§ ७. हरदासाचीं कर्तव्यें :–

१. प्रत्यहि ठराविक वेळीं कीर्तन करणें.
२. उत्सव प्रसंगीं येणाऱ्या हरदासांचें टिपण ठेवून पूर्वोक्त रकमेच्या तिसऱ्या अंकाच्या उत्तरार्धांत सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करणें.

§ ८. पैरेकार देवळी यांचीं कर्तव्यें :–

१. सोमवार धरून दर आठवडा पाळीनें कामावर रुजू होऊन पुढील कृत्यें करावींत.
अ ) रोज अरुणोदयीं तसेंच चालीच्या इतर वेळीं भुई झाडून ती साफसूफ राखणें.
आ) प्रति सोमवारीं व सर्वत्र साफसूफ करणें.
इ ) तांब्या, पितळीचीं आणि चांदीचीं पात्रें व उपकरणें घांसून नेहमीं स्वच्छ ठेवणें.
ई ) गर्भागाराबाहेरील सर्व ठिकाणचे दिवे अहोरात्र प्रज्वलित ठेवणें.

... ग्र. ... ग्रंथालय, ठाणे.
...८८६१६... दि: ...१५/५/२५
३१-३-८२



उ) बैठकीस सतरंज्या पसरणें.

ऊ) चौकावरील दिवे पेटवणें आणि उदबत्त्यांची तरतूद ठेवणें.

ए) गाभाऱ्याबाहेरचे रोजचे आणि उत्सव प्रसंगीचे त्याचप्रमाणें अनुषंगिक देवालयांतील, कारभारी मंडळीच्या दिवाणखान्यांतील आणि हरएक चालीच्या ठिकाणचे दिवे प्रज्वलित करणें.

ऐ) दिवसरात्र देवालयांत राहून धातूचीं आणि कांचेचीं पात्रें व अशाच इतर वस्तू ज्या गर्भागाराबाहेर असतील त्यांवर नजर ठेवणें.

ओ) इशारत देणें.

औ) घड्याळाचे तास घांटेवर वाजविणें.

अं) तुळाभाराकरितां तराजू टांगणें आणि तो काढून ठेवणें.

अः) भेटीचे नारळ व केळीं यांचा अर्धा भाग स्वतःकडे ठेवून, अर्धा पूजारी पैरेकार यांजकडे देणें.

क) आनुषंगिक देवालयांत येणारे भेटीचे नारळ, केळीं वगैरे जिन्नस, रुपया खालील नकदी रक्कम तसेंच ज्याची किंमत रुपयाहून अधिक नसेल असे कांबळ, कोयती वगैरे जिन्नस घेणें.

ख) संस्थानच्या फुलबागेची निगा राखणें, तिची मशागत करणें, वेणणी करणें वगैरे कामें करून त्या कामगिरीबद्दल ठरविलेला मुशाहिरा घेणें.

§ ९. गावडे यांनीं महाजन मंडळी अगर कारभारी मंडळी सांगतील त्या त्या प्रसंगीं देवकृत्य विषयक जरूर तीं कामें करावीं.

§ १०. कलावंतींनीं सुर्यास्तीं सलामाचे वेळीं आणि रात्रीं आरतीचे प्रसंगीं गायन करावें; प्रति सोमवारच्या, इतर उत्सवांच्या स्वारीचे प्रसंगीं, तसेंच महाजनांच्या नेमणुकीस अनुसरून होणाऱ्या इतर कुळीं उत्सवांचे प्रसंगीं नृत्य व गायन करून तद्विषयक वेतन घ्यावें.

§ ११. मृदंगी यानें प्रत्यहीं हरदास, कलावंती व गवई यांच्या साथीस तसेंच इतर हरएक प्रसंगीं मृदंग वादन करावें आणि त्याबद्दल वार्षिक मुशाहिऱ्याखेरीज लागवटीं-तून त्या त्या कामाचा आपला भाग घ्यावा.

§ १२. धृपदी यानें उपरोक्त रकमेंतील इसमां समागमें धृपद गावें, आणि त्याबद्द-लचा आपला मुशाहिरा व लागवटी घ्याव्या.

**क. २८**—लघुरुद्र, महारुद्र आणि अतिरुद्र या कृत्यांच्या एकंदर बारा सुपाऱ्या असाव्यात आणि त्यांची वांटणी पुढीलप्रमाणें व्हावी :

गोविंद निळकंठ भांडारी एक; घैसास तीन; अभिषेकी पांच, पैकीं दोन गंगाधर भिकं-भट, दोन भिकू गोविंदभट भावे व एक गणेश भिकंभट; पुजारी पाणी देणारा एक आणि श्रीपाद मंगेशभट करंडे याकडे तूर्त एक, यानें महापुरुषाच्या पादुकांची पूजा-नैवेद्याबद्दलची कामगिरी करून त्याचा योग्य तो मुशाहिरा घ्यावा.

**क.** २९– हिंदु मिश्रवाद्य चौघडा, मयत भिकू साजबा मुळगांवकर मुंबई, यांनीं ठेवलेला. यांत पुढील वाद्यांचा समावेश होतो. दोन सनया, एक सूर्त (सूर), चार नगारे, एक थोर कर्णा व एक कांसाळें.

**क.** ३०–पूर्वोक्त कलमांतील वाद्यांच्या कामगिरीवर सात इसम नेमलेले असावेत; त्यांनीं प्रति सोमवारीं सकाळीं आठ वाजतां, स्वारीचे प्रसंगीं शिवाय प्रत्यहीं त्रिकाळ वाद्यें वाजवावींत. प्रथम खेप पहांटे चार वाजतां; दुसरी अकरा वाजतां आणि तिसरी संध्याकाळीं पांच वाजतां. दर खेपेचें वादन एक तास चालू रहावें.

**क.** ३१–चालंत नौबत यांत पुढील वाद्यांचा समावेश होतो. एक सनई; एक सूर्त; एक समेळ; एक कांसाळें; एक झांज; एक आराब; एक ढोलकें; एक थोर ढोल; एक थोर कांसाळें; एक कर्णा व एक शिंग.

§ १. या कामगिरीवरील नोकरांनीं प्रस्तुत कलमांत दर्शविलेलीं वाद्यें दिवसांतून चार खेपा वाजवावींत. सकाळीं पांच वाजतां पहिली खेप, दुसरी दिवसा महा-आरतीच्या प्रसंगीं, तिसरी सूर्यास्तीं व चवथी रात्रीं महा-आरतीच्या वेळीं. खेरीज रीतीप्रमाणें कुळीं उत्सव-प्रसंगीं वाजवून ठरलेला मुशाहिरा व लागवटी घ्याव्या.

§ २. पहिल्या व तिसऱ्या खेपेचें नित्य वादन मुख्य देवालयांत आणि अनुषंगिक देवालयांतही करीत जावें.

**क.** ३२—स्वारी बरोबर असावयाच्या हिलामतीचे नग पुढील प्रमाणें असावे. छत्रें दोन, अबदागिरें दोन, तोरणें दोन, सूर्यपान एक, गुड्या सहा, ध्वज दोन, अस्मानगिर दोन, हुदोरुमाल एक, दिवट्या चार, पायघडी एक आणि आरसा एक.

**क.** ३३—भावणीचीं कर्तव्यें :

१. प्रत्यहीं प्राकाराची व प्रति सोमवारीं भटवाडीकडे तसेंच श्री शिवशर्माच्या आलयाकडे जाणाऱ्या दादरांची झाडलोट करणें, श्रीवर आरतीचे प्रसंगीं तसेंच नवरात्रौत्सवांत चामर ढाळणें.

३. स्वारी बरोबर माल्याचा दिवा घेऊन राहणें.

४. निर्वाहासाठीं आणि वस्त्रप्रावरणासाठीं ठरविलेली नेमणूक तसेंच करपिलेल्या उत्सवप्रसंगीं दाली या नांवांची जी देणगी यजमानाकडून मिळते ती घेणें.

## भाग ६

## उत्सवादि कृत्यांविषयीं

**क.** ३४– उत्सवादि नित्यकृत्यें जीं प्रस्तुत संपादलीं जातात, तीं वार्षिक बेहड्यांत दृश्य होत आहेत त्यांतून मुख्य पुढील होत :

१. प्रति सोमवारीं पालखीच्या मिरवणुका.

२. माघी पौर्णिमेचा महोत्सव–यास दशमी रोजीं आरंभ होऊन महारथाच्या मिरवणुकीनें समाप्त होतो.

३. माघ व।। पंचमीचा उत्सव नामें कवच स्थापनोत्सव.
४. महाशिवरात्रोत्सव. लहान रथाचे मिरवणुकीसह.
५. शिमगा.
६. रामनवमीचा उत्सव.
७. अक्षय तृतीयोत्सव. वैशाख शुद्ध तृतीयेस.
८. शयनी द्वादशी. ( आषाढ शु।। १२ )
९. कृष्णजयंती अथवा गोकुळाष्टमी. ( श्रावण व।। ८ )
१०. अनंत व्रतोत्सव. (भाद्रपद शु।। १४ )
११. नवरात्रोत्सव ( आश्विन मासांतील शुद्ध पक्षाच्या नऊ रात्री. )
१२. दसरा. (सीमोल्लंघनोत्सव. नवरात्राच्या पुढल्या दिवशीं. )
१३. कोजागिरी. ( आश्विन शु।। १५ )
१४. गुरुद्वादशी. ( आश्विन व।। १२ )
१५. दिवाळी. ( आश्विन व।। १४ )
१६. काला. (कार्तिक शु।। १२)
१७. वैकुंठचतुर्दशी. (वनभोजन समाराधनेसह-कार्तिक शु।। १४)
१८. वनभोजनोत्सव. (कार्तिक शु।। १५)
१९. काला. (कार्तिक व।। ७, व पुढच्या दिवशीं दहींकाला श्रीशिवशर्माच्या देवालयासन्निध. )
२०. वनभोजन. (मार्गशीर्ष शु।। १५)
२१. सार्वजनिक महारुद्र आरंभ पौष व।। ६ नंतर जो पहिला शुक्रवार येईल त्या दिवशीं.

**क. ३५**– सदर कलमांतील उल्लेखित उत्सवांत कारभारी मंडळीचे देखरेखीखाल रूढीचे कुल्लीं विधि यथासांग संपादले जातील.

**क. ३६**– मुख्य मुख्य उत्सवाचे प्रसंगीं ते कोणत्या दिवशीं पडतात म्हणायाची सूचना गोमंतक निवासी महाजनांस कारभारी मंडळीच्या चिटणीसांनीं पत्रद्वारा द्यावी.

§ पूजा वगैरे खासगी रीतीनें करविण्यांत येणाऱ्या आगंतुक उत्सवाचीं निमंत्रणें देण्याचें काम त्या त्या उत्सवप्रवर्तकाच्या मर्जीवर अवलंबून राहील.

**क. ३७**– साप्ताहिक अगर वार्षिक मिरवणुकींत कारभारी मंडळीच्या चिटणिसांनीं अगर त्यांचे अभावीं अन्य वर्गानीं सुवर्णदंड धारण करावा.

**क. ३८**– महाजन अगर महाजनेतर जे कोणी मिरवणुकींत भाग घेतील त्यांस पालखी, लालखी, थोर किंवा लहान रथ अगर अन्य कोणतेंही वाहन यांजबरोबर चालतांना तंबाखू ओढण्याची तसेंच श्रीविषयींची मर्यादा व आदरभाव यांस बाधा येण्यासारखें कोणतेंही कृत्य करण्याची सक्त मनाई आहे.

**क. ३९**– देवालयाच्या प्राकारांत ज्या महाजन वा महाजनेतर गृहस्थांचें वास्तव्य असेल त्यांस चिटणिसांनीं काटकार मार्फत मिरवणुकींत हजर राहण्याबद्दल सूचना द्यावी.

**क. ४०**–ठेवलेल्या खाजगी उत्सवांत प्रवर्तकांस अगर त्यांच्या वंशजांस इच्छा असल्यास विवक्षित विधीच तेवढे संपादतां येतील. वरकड कारभारी मंडळीच्या देखरेखी-खालीं चालतील.

§ मूळ प्रवर्तक अगर त्याचा वंशज यांचे अभावीं त्यांच्या पुरोहितांनीं तीं कामें करावीं.

**क. ४१**–श्रावण मासांतील सोमवारांत नवीन उत्सवांची योजना करण्यास सवड दिली जाणार नाहीं. या दिवसांचे उत्सव, विठ्ठल शेणवी संजगिरी, मु।। हणजूण; सखाराम शेणवी उसगांवकर, मु।। उसगांव; दळवी, मु।। पाळी; केंकरे, मु।। कुंभारजुवें, यांजकडून अनुक्रमें संपादले जात आहेत.

§ कदाचित् प्रस्तुत कलमांत निर्देश केलेल्या गृहस्थांनीं ते उत्सव करण्याचें सोडून दिल्यास अन्य कोणाही गृहस्थास ते करतां येतील.

## भाग ७

## सामान्य नियम

**क. ४२**– सर्व प्रकारच्या धार्मिक विधींत, मग ते उपासना विषयक असोत, अगर उत्सवविषयक असोत, महाजन, भट्ट, पुरोहित आणि सेवकजन यांनी लागूं तीं तीं आपापलीं कामें रुढीस अनुसरूनच व कर्तव्यास जागून सांगतेनें संपादीत जावीं.

**क. ४३**– कलम २४ व त्यांचे अंक यांत नमूद असलेलीं उपासनाकार्यें ज्या पुरोहिताकडून अगर अन्य भटजींकडून करविलीं जातील त्यांकडे तद्विषयक लागवट प्रत्येक महाजनानें भरावी.

**क. ४४**– महाजन, कारभारी मंडळी, भटजी अगर अन्य इसम यांस संस्थानचे-अलंकार, उपकरणें अगर अन्य वस्तु स्वतःचे कामीं वापरण्याची किंवा जायांस देण्याची सक्त मनाई आहे. या नियमाविरुद्ध आचरणारास तत्काळ तगिरीची शिक्षा मिळेल. शिवाय गैरविल्हेस लावलेला जिन्नस ताबडतोब परत करणें भाग पाडून योग्य त्या क्रिमिनल खटल्याची उभारणी केली जाईल.

§ संस्थानच्या कामाची खोटी न होतां लग्नमुंजीचे समारंभ प्रसंगीं तांब्या–पितळीचीं भांडीं, हिलामत अथवा वाद्यें, स्वतःचे जबाबदारीखाल महाजनांस देण्याचे कामीं कारभारी मंडळीस ह्या कलमांतील नियम आड येत नाहींत.

**क. ४५**– नियमित व अनियमित बैठकांखेरीज दरसाल माघ पौर्णिमा महोत्सवाचे दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं तीन वाजतां पूर्व निमंत्रणाविना महाजन मंडळीची एक ठराविक बैठक भरली जावी.

§ सदर सभेंत कारभारी मंडळीनें गुदरलेल्या सालचा जमाखर्च खरडा मांडावा;

त्याचप्रमाणें ज्युदिसियाल आणि आदमिनिस्त्रातीव्ह अदालतींत कारभारी मंडळीचे मुखत्यारांनीं कोणकोणते दावे गुदरले; कोणकोणते गुदरणें आहेत; जे गुदरले त्यांतून कोणते निकालांत निघाले; बाकीच्यांची मजल कोणत्या थरावर आहे, ह्या खुलाशासह वर्गवारीचा तक्ता दाखवावा. हा तक्ता त्या त्या अदालतींतून मिळविलेलीं जीं प्रमाणपत्रें प्रोकुरादोर सादर करतील तीं नजरेपुढें ठेवून तयार केलेला असावा.

क. ४६– उपरोक्त कलमाच्या परिछेदांतील द्वितीयार्धांतील नियम जो मुखत्यार न पाळील त्यास बडतर्फी देऊन संस्थानचें होणारें नुकसान त्याकडून भरून घेतलें जाईल.

क. ४७– महाजनांच्या सार्वजनिक, तसेंच महाजनांच्या अगर महाजनेतरांच्या खासगी रीतीच्या ज्या ज्या उपासनाविषयक अगर उत्सवविषयक बांधावळी असतील त्या सर्व पूर्ण वक्तशीरपणें संपादल्या जातील.

§ १– अशा बांधावळीसंबंधीं कुळीं कृत्यें व विधि सांगतेनें संपादले जाण्यासाठीं कारभारी मंडळीनें काळजीपूर्वक लक्ष देऊन त्या कामीं लागेल ती मदत करावी.

§ २– ज्या दिवसास एकानें उपासना अगर उत्सव ठेवलेला असेल, अगर महाजन मंडळीस करावयाचा असेल, अशा दिवशीं अन्यास उपासना अगर उत्सव करण्याची अगर ठेवण्याची यापुढें मुभा मिळणार नाहीं; मूळ प्रवर्तकाचीच याकामीं अनुमति असेल तर भाग निराळा.

क. ४८–ज्या ज्या वेळीं श्री कैवल्यपुर अगर चित्राव मठाधीश स्वामींची स्वारी या संस्थांनीं यावयास निघतील तेव्हां श्रीआलयापर्यंत स्वारी बरोबर चालण्यास ठराविक रुण्यांवर रीतीप्रमाणें वाद्य व हिलामत सामोरे पाठविण्यांत यावी, आणि संस्थानीं आल्यावर त्यांचा योग्य सन्मान करण्यांत यावा.

§ १– उल्लेखित स्वामींची वस्ती मोकाशाच्या हद्दींत असल्यास, वाद्य, मशाली वगैरे राजचिन्हें त्यांच्या निवासस्थानीं पाठवून त्यांस श्रींच्या मिरवणुकीस अगर कोणत्याही उत्सवास आणण्यांत यावें.

§ गौड सारस्वतांच्या कोणत्याही स्वामींशींही असेंच वर्तन ठेवलें जावें.

क. ४९– महाजन अगर कारभारी मंडळीस आपले विशिष्ट मुखत्यारी नेमतां येतील.

क. ५०– श्री शांतादुर्गा देवालयाचे व अन्य महाजन एखाद्या उत्सवास ज्या ज्या वेळीं हजर असतील तेव्हां त्यांचे रीतीप्रमाणें स्वागत करून त्यांस अग्रमानपूर्वक वागविण्यांत येईल.

क. ५१– कोणत्याही काळीं आणि कशाही परिस्थितींत संस्थानच्या स्थावर संपत्तीचा तसेंच सोनें रुप्याच्या आणि तदितर धातूंच्या किंवा पाषाणी मूर्तींचा दानविक्रयादि व्यय करण्याचा महाजन मंडळीस निखालस अधिकार नाहीं.

क. ५२–असाधारण खर्चाचा खरडा महाजन मंडळीपुढें मांडला जावा; अशासाठीं कीं, तिच्या अभिप्रायासह तो वरिष्ठ मंजुरीस गुदरतां यावा.

क. ५३–महाजन मंडळीस जे जे ठराव करावयाचे अगर कारभार विषयक ज्या

चर्चा करावयाच्या त्या सर्व बैठकीच्या जागींच केल्या जाव्या. इतरत्र निखालस होतां नये.

§ एकच–महाजनीय ठरावांतून स्वतःस लागू असेल त्या भागास कारभारी मंडळीनें पाळा द्यावा. बेफिकीरीबद्दल जबाबदारीच्या दंडास मंडळीचे वर्गी पात्र ठरतील.

क. ५४–चौकावर कोणत्याही विषयावर वादविवाद करण्याची सक्त मनाई आहे, कारण ती जागा ईश्वरोपासनेची होय.

क. ५५–महाजनीय ठराव, उपस्थित सभासदांचीं निम्मी मतें, शिवाय ज्यादा एक मत, एवढ्यानें पास ठरतो; ठराव करणाऱ्यांचीं किमान संख्या रेगुलामेंताच्या (नियमावलीच्या) अठराव्या कलमांत ठरविली आहे तितकी भरली पाहिजे.

क. ५६– सांप्रतच्या चोवीस वांगडांच्या महाजनांखेरीज यापुढें नवीन महाजन घेतले जाणें शक्य नाहीं; या पद्धतींत कोणत्याही काळीं आणि कशाही परिस्थितींत बदल निखालस होऊं शकणार नाहीं.

क. ५७– नोकर लोकांस पायांत वहाणा, बूट व खडावा घालून किंवा छत्री उघडून प्राकारांत हिंडण्याची मनाई आहे.

§ या कलमांतील नियम नोकरेतर अशाही सर्व कलावंती, देवळी, चेडे व फर्जेंत यांस लागू आहे.

क. ५८– जो ब्राह्मण अगर ब्राह्मणेतर नोकर मद्यासक्त असेल, व्यसनी निघेल अगर नैतिक आणि धार्मिक कर्तव्य पराङ्मुख ठरेल, त्यास कारभारी मंडळीनें कामावर जाण्याची ताबडतोब बंदी करावी आणि महाजन मंडळीस कळवून तिची सभा बोलवावी. सभेनें प्रकार लक्षीं घेऊन त्यास नोकरीवरून काढून टाकावें.

§ तथापि जर तो नोकर पश्चात्तापपूर्वक कृतकर्माबद्दलचें धार्मिकरित्या प्रायःश्चित घेतल्याचें सिद्ध करून देईल तर पहिल्या खेपेस त्यास कामावर परत घेतां येईल.

क. ५९–बाहेरील कृत्यांचे नोकर–(कलावंती, वाजंत्री इ.) यांस देवालयांत, प्राकारांत अगर लगतच्या इमारतींत कामाचे वेळेशिवाय अधिक वेळ राहतां येणार नाहीं. अशा प्रकारास कारभारी मंडळीकडून एक रुपयापर्यंत दंड लादला जाईल.

§ या कलमांतील दंड एक रुपयाहून अधिक केंव्हांच होतां नये.

क. ६०–नोकर लोकांची नेमणूक, त्यांची मर्यादित काळची तगिरी तसेंच कायमची बडतर्फी, हीं कामें महाजन मंडळीच्या अधिकाराचीं होत.

§ १–तद्विषयक ठराव कलम पंचेचाळीसमधील सभेंत केला जावा.

§ २–देवालयांतील कृत्यांविषयीं अगर धर्मासंबंधीं सेवक लोकांत जे वांधे पडलेले असतील त्यांचा निकालही ह्याच बैठकींत केला जावा.

क. ६१–देवालयांतील सेवेच्या मोबदला जे नोकर सांप्रत विवक्षित ठिकाणांचें घेत आले आहेत, त्यांनीं नोकरी बजावीपर्यंत या पुढेंही घेत जावें.

क. ६२– कलम चोविसच्या चवदाव्या अंकांत सांगितलेले गावडे नोकर श्रींचे

भांडारीं एकशें चौऱ्याहत्तर रुपयांची वार्षिक नेमणूक देऊन सोनाळा, वांकडमूस, कोळमूस, कुशें, कोटयाळो आणि धांमोसमळो, स्थित मोकासा, ह्या ठिकाणांचें उत्पन्न सेवेच्या मोबदलीं भोगीत आहेत.

क. ६३– कलम एकसष्ठ व बासष्ठ यांत ज्यांचा उल्लेख आला तीं ठिकाणें देवालयाचे संस्थेचीं अगर तिच्या भांडाराचीं असून त्यांवर देवालयाचें चिरस्वामित्व व निर्विवाद भोगवटा प्रस्थापित आहे; तेव्हां त्यांची विभागणी, दान व विक्रय करतां येणार नाहीं. नहून ती गहाण टाकतां अगर खंडास (आरांदामेंतास) देखील देतां येणार नाहींत.

क. ६४– कारणपरत्वें उल्लेखित ठिकाणांचा फळभोग घेणाऱ्या नोकरांना कामावरून दूर करण्यांत आल्यास त्या ठिकाणांचें उत्पन्न भांडारीं जमा केलें जाईल.

क. ६५– ब्राह्मणेतरांस गर्भगारांत, हिंदेतरांस चौकावर आणि अति शूद्रांस देवालयांत जाण्याची मनाई आहे.

§ ह्या नियमाची अंमलबजावणी पुजारी व पैरेकार देवळी यांनीं करावी.

क. ६६– संकटाच्या प्रसंगीं, म्हणजे दरोडा, आग, अशा समयीं धोक्याची सूचना मिळतांच कुळीं नोकर मंडळी, बडतर्फीचे शिक्षेखाल मदतीस धांवून येण्यास लाग्निक आहेत.

क. ६७– अतिरुद्र, महारुद्र, लघुरुद्र वगैरे कोणत्याही उपासनाकार्यास कलम अठ्ठावीस यांत सांगितलेले उपाध्याय सकाळीं आठ वाजतां देवालयांत हजर होऊन तद्विषयक वेतन गमावण्याचे शिक्षेखाल महा-आरतीपर्यंत तेथें राहण्यास लाग्निक आहेत; तथापि दंडाची रक्कम चार रुपयांपेक्षां अधिक होतां नये.

§ ह्या कलमाच्या अंमलबजावणीस्तव हजिरी ठेवण्यास अध्यक्षांच्या बैजांची एक अळायदी चोपडी केलेली असावी.

क. ६८– कारभारी मंडळी अगर महाजन मंडळी, यांनीं आरोपीचें म्हणणें पहिल्यानें ऐकून घेतल्याविना प्रस्तुत नियमबंदींत ठरवून दिलेल्या शिक्षा अमलांत आणल्या जाणार नाहींत.

क. ६९– नोकरांच्या बडतर्फीविषयींचे महाजनीय ठराव आदमिनिस्त्रादोर यांचे मंजुरीविना अमलांत येऊं शकणार नाहींत.

क. ७०– प्रसंगविशेषीं एखादा ब्राह्मण देवालयाच्या प्राकारांत अगर स्थल भूमींत मरण पावेल तर त्याचें शव धर्मनियमानुरूप संस्थानचे ब्राह्मण नोकरांनीं अग्निसंस्कारासाठीं स्मशान भूमीकडे न्यावें; आणि तो मृत इसम अकिंचन असल्यास तत्संबंधी खर्च संस्थानांतून केला जावा.

§ उपरोक्त कलमांतील नियमास पाळा देण्याचें एखाद्या भटजींनें नाकारल्यास त्यास कामावरून काढून टाकण्यांत यावें.

क. ७१– यात्रेच्या उद्देशानें येणारे भाविक महाजन, तसेंच क्षेत्र दर्शनासाठीं जमणारे

महाजनेतर यात्रेकरू, यांच्या परिमितकालिक वास्तव्यास अग्रशाळांची योजना आहे; मात्र तें वास्तव्य तीन महिन्यांहून अधिक होतां नये.

**क. ७२**– धार्मिक बाबतींत कदाचित् लढा उपस्थित झाल्यास महाजन मंडळीनें विनंति केल्यावर कैवल्य मठाधीश श्री स्वामी जो निकाल देतील तो मान्य केला जाईल.

**क. ७३**– कारभारी मंडळीचा मुखत्यार आपलें कर्तव्य कायदेशीर रीतीनें बजावणें सोडून देईल तर त्यास कामावरून बडतर्फ केलें जाऊन पुनश्च त्या जागीं त्याची निवड होणार नाहीं; शिवाय देवाळयास आणलेल्या नुकसानीबद्दल तो जबाबदार होईल.

**क. ७४**– वगळून राहिलेल्या बाबतींत ज्यांचा सामान्य व विशिष्ट कायद्याशीं विरोध नसेल अशा प्रचलित रूढींचा अवलंब केला जावा.

**क. ७५**– प्रस्तुत नियमबंदींतील विषयांत जो पुढें फेरफार केला जाईल, तो ह्या नियमबंदीचा योग्य ठिकाणीं लिहिलेला असा सलग भाग मानला जाईल; मग तो फेरफार बदललेल्या कलमाच्या ऐवजीं दुसरीं घालणें, निरुपयोगी गाळणें किंवा प्रचारांत येणाऱ्या कायद्यान्वयें जरूर तीं नवीं कलमें चढविणें अशा कोणत्याही स्वरूपाचा असो.

**क. ७६**– महाजन व देवाळयें यद्विषयक विद्यमान व भावी कायद्यांस ही संस्था पूर्ण राजी आहे.

## भाग ८

## शिक्षाविषयक नियम

**क. ७७**– जो महाजन देवालयांत बेशिस्त वर्तन करील, ब्राह्मधर्म प्रोक्त, शास्त्र-पुराणविहित मर्यादा व आदर यांचें अतिक्रमण करील, त्यास एक पासून पांच रुपयेपर्यंत दंड महाजनाकडून लादला जाईल.

§ एकच उल्लेखित दंडाची रक्कम कायदेशीर सूचनेपासून (इंतिमासांत) दहा दिवसांच्या अवधींत भरली न गेल्यास, ती भरली जाई तोंवर त्याच्या मताचा व सवलतीचा हक्क तहकूब राहील.

**क. ७८**– जे नोकर आपलीं कर्तव्यें न बजावतील अगर महाजन मंडळीचे व कारभारी मंडळीचे हुकूम न पाळतील त्यास पहिल्या खेपेस नुसती ताकीद अगर दमच दिला जाईल, दुसऱ्या खेपेस एक पासून चार रुपयेपर्यंत दंड करून तो त्याच्या पगारांतून वसूल केला जाईल, अथवा पंधरा दिवस कामावर जाण्याची बंदी केली जाईल. तिसऱ्या खेपेस एक वर्षाहून अधिक नव्हे अशी तगिरी आणि चवथ्या खेपेस कायम बडतर्फी दिली जाईल.

**क. ७९**– ज्या कोणा महाजनावर देवालयाच्या भूमीचा अपहार केल्याची शाबिती होईल त्याचे महाजनपणाचे अधिकार, अपहारलेली भूमि राजीखुषीनें परत करीपर्यंत काढून घेण्यांत येतील.

**क. ८०**–कोमिसार्यु रेझिद्यु यांचें सोळा जून १८९६ मितीच्या ६२ अंकाच्या पोर्तारी

अन्वयें इंस्तुसांव ई बैनफिसेंसिय (शिक्षण व परोपकार) विषयक निधीस संस्थानचे उत्पन्नांतुन शेंकडा तीन टक्के देण्यास व प्राथमिक शिक्षणास जरूर तेव्हां हातभार लावण्यास महाजन मंडळी राजी आहे.

**क. ८१**–ही कलमबंदी मराठी भाषांतरासह संस्थानच्या योग्य वहीवर बार केली जावी आणि सरकारी पत्रावर प्रसिद्ध झाल्यानंतर तीन दिवसांनीं पूर्णपणें अमलांत यावी.

□ □ □

## परिशिष्ट ३ | भाविकांसाठीं उपयुक्त माहिती

कोणताहि महाजन कुळावी, म्हणजे ज्याचें कुलदैवत श्रीमंगेश आहे, तो आपण एकटाच किंवा आपल्या कुटुंबीय मंडळीसह जर श्रीस्थळ मंगेशी येथें आपल्या कुलदेवाच्या दर्शनार्थ किंवा सेवेसाठीं आला, तर तो पहिल्यांदांच येत असल्यास, त्याला योग्य प्रकारची माहिती निदान अगदीं जरूरीपुरती तरी मिळणें अत्यंत गरजेचें आहे. कारण, त्या माहिती अभावीं व त्याला योग्य मार्गदर्शन मिळालें नाहीं तर त्याची साहजिकच कुचंबणा होते, हें सांगण्याची गरज नाही. यासाठींच खालील माहिती प्रत्येक महाजन कुळावीनें आपल्या लक्षांत घेणें व प्रसंग विशेषीं आपले नातेवाईक, मित्रपरिवार किंवा इतर कुळावी महाजन, पहिल्या खेपेस श्रीमंगेश देवस्थानांत येत असतील तर त्यांचीहि गैरसोय शक्य तों होऊं नये म्हणून त्यांच्याहि लक्ष्यांत आणून देणें हिताचें वाटतें.

श्रीमंगेश देवस्थानांत, आपला कुलदेव श्रीमंगेशाकडे येणारे सर्व कुळावी महाजन वत्स व कौंडिण्य या दोन गोत्रांपैकींच असणार हें उघड आहे. जे बाकी इतर गोत्रांचे इसम श्रीमंगेश देवस्थानच्या महाजन कुळाव्यांत संभवत नाहींत ते भक्तजन म्हणून सेवेसाठीं येतात. कोणीही कां असेना त्यानें देवालयांत प्रवेश केल्यावर त्याचें प्रथम काम म्हणजे श्रीचें देवदर्शन घ्यावयाचें; याला धुळभेट घेणें असें म्हणतात.

धुळभेट घेण्यासाठीं एक नारळ व दोन किंवा तीन केळीं लागतात. भाविक वत्सगोत्री असल्यास दोन, कौंडिण्य गोत्री असल्यास तीन केळीं लागतात. देवालयाच्या प्राकारांतील दुकानांत (बाजारभावांत) किंवा देवाल्यांत व्यवस्थापक कमिटीमार्फत जशी सोय केलेली असेल त्याप्रमाणें फक्त वीस पैसे देऊन धुळभेटीस लागणारा नारळ व केळीं मिळतील. नारळ व केळीं घेऊन प्रथम श्रीमंगेशापुढें, चौकावरील ताटांत नारळ ठेवून नमस्कार करून देवदर्शन घ्यावें. त्यानंतर लगेच चौकावरील श्रीग्रामपुरुषापुढें एक केळें ठेवून त्याचें दर्शन घेऊन देवालयाच्या मागच्या बाजूस असलेल्या श्रीमुळकेश्वराच्या दर्शनास जावें. श्रीमुळकेश्वरापुढील तबकांत दुसरें केळें ठेवून श्रीमुळकेश्वराचें दर्शन घेऊन लगतच्या खोलींतील श्रीलक्ष्मीनारायण, श्रीसूर्यनारायण, श्रीगरुड, श्रीवीरभद्र आणि श्रीसांतेर देवता या सर्वांचें दर्शन घेवून परत श्रीमंगेश देवालयांत यावें. कौंडिण्य गोत्री असल्यास प्रथम श्रीकौंडिण्य

पुरुषाच्या मंदिरांत जाऊन तिसरें केळें श्रीकौंडिण्य पुरुषापुढील ताटांत ठेवून दर्शन घेऊन नंतर श्रीमंगेशाच्या देवालयांत यावें. देवालयांत येऊन श्रीमंगेशापुढें साष्टांग नमस्कार करावा व पुजाऱ्यानें दिलेली विभूति कपाळास लावून तीर्थ प्राशन करावें.

धूळभेटीचा हा आरंभींचा कार्यक्रम झाल्यानंतर विशेषतः नवीन अपरिचित इसम असल्यास त्यानें धूळभेट झाल्यानंतर लगेच श्रीदेवस्थानच्या व्यवस्थापक कमिटी ऑफिसास आपली भेट देऊन त्या ऑफिसांत श्रीदेवस्थानचे कमाविसदार म्हणजे व्यवस्थापक कमिटीचे चिटणीस असतील त्यांकडे आपलें संपूर्ण नांव, गांव, गोत्र याबद्दल सांगून तो आपल्या कुटुंबियांसह देवस्थानच्या अग्रशाळेच्या जागेंत राहूं इच्छित असल्यास त्या जागेची, स्वैंपाक करणार असल्यास जरूर त्या भांड्यांची, मागणी करण्यास हरकत नाहीं. कारण तशी इच्छा दर्शविल्यास देवस्थान कमिटी शक्य ती सोय करूं शकेल व आतांपर्यंत तशी सोय करीत आली आहे.

पण एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर असते कीं, देवस्थानांत माघ महिन्याच्या महापर्वणी महोत्सवाचे दिवसांत तसेंच मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांत प्रतिवर्षीं अतिशय गर्दी असते, नि म्हणून त्याच वेळीं जागेची टंचाई भासणें शक्य असतें. पण बहुतेक यात्रिक दोन–चार दिवसांत आपला मुक्काम बदलतात व एका यात्रिक कुटुंबाने मोकळी केलेली जागा दुसऱ्या मार्गप्रतीक्षा करणाऱ्या गरजू यात्रिकास मिळण्यास अडचण पडूं शकत नाहीं. जे कोणी यात्रिक स्वतः स्वयंपाक करून राहूं शकत नसतील किंवा तसें इच्छित नसतील तर त्यांची अडचण किंवा गैरसोय होऊं शकत नाहीं. कारण देवस्थानच्या अग्रशाळेंत एका वेगळ्या जागेंत जेवणाची सोय (खाणावळ) असून तिथें सोयीस्कर व योग्य दरांत जेवण मिळतें.

देवालयाच्या प्राकारांत, अग्रशाळेंतच दोन वेगवेगळीं स्नानगृहें आहेत. स्वच्छ पाण्याची विहीर त्या स्नानगृहांच्या नजिकच आहे. तसेंच अग्रशाळेबाहेर चार शौचकुपें आहेत. अग्रशाळेच्या इमारतींत, देवालयाच्या प्राकारांत प्रवेश करण्याच्या महाद्वाराशेजारींच, किराणा माल व इतर सर्व जरुरीच्या जिन्नस विक्रीचें दुकान आहे व तिथें जवळच चहा-कॉफी-फराळ मिळण्याचें दुकान आहे. अशा परिस्थितींत प्रत्येक इसम आपआपली सोय स्वतंत्रपणें आपल्या इच्छेप्रमाणें करून घेऊं शकतो.

कुळावी महाजन किंवा महाजनेतर देवाच्या सेवेसाठीं देवस्थानांत आल्यानंतर त्याला कांहीं तरी देवकृत्य आपल्या इच्छेप्रमाणें आपल्या स्वतःच्या हातानें घडून यावें ही इच्छा असणें स्वाभाविक आहे. यासाठीं प्रत्येक यात्रिकानें आपण स्वतः देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटी ऑफिसांत जाऊन तेथें देवस्थानांत देवकृत्यांचा तक्ता, प्रत्येक देवकृत्याचे दर कायमचे ठरविलेले आहेत, तो तक्ता आपण स्वतः वाचून आपली जी इच्छा असेल तें देवकृत्य व्यवस्थापक कमिटी ऑफिसांत नोंदवून त्या दरपत्रकाप्रमाणें पैसे भरून देवस्थान कमिटीकडून पावती घ्यावी.

इतकी व्यवस्था केल्यानंतर आपले पुरोहित भटजी कोण, हें त्या कुळावी महाजन

किंवा महाजनेतर इसमास ठाऊक नसल्यास व्यवस्थापक कमिटी त्याबद्दल चौकशी करून त्या इसमाची व पुरोहित अभिषेकी भटजीची भेट घडवून आणते. त्याप्रमाणें यात्रिक कुळावी महाजन किंवा महाजनेतरानें त्या पुरोहिताबरोबर जाऊन आंघोळ, सचैल स्नान करून सोंवळें वस्त्र नेसून आपलें पूर्वीचे यज्ञोपवीत (जानवें) बदलून नवें यज्ञोपवीत विधी-पूर्वक धारण करून, भस्म लावून घेवून, संध्याकर्म आटोपून देवालयांत यावें. देवालयांत ते पुरोहित अभिषेकी भटजी आपण कमिटी ऑफिसांत नोंद केलेलें देवकृत्य करण्याचें कार्य करतील. विवाहित कुळावी महाजन प्रथमतःच म्हणजे आपल्या विवाहानंतर पहिल्याच खेपेस सहकुटुंब देवदर्शनास आले असतील तर वधूवरांनी एकत्र बरोबरीनें देवालयाच्या पुढील तलावांत विधिपूर्वक मंत्रस्नान करून देवालयांत परत येऊन देवदर्शन करून नंतरच पुढील कार्यक्रम-देवकृत्य करावयाचें असतें. तलावावर जाऊन मंत्रस्नान करण्याच्या विधीस गांठवल किंवा 'वधूवर दंपत्यस्नान' म्हणतात. हा विधी देवस्थानचे धैसास भटजी करून घेतात. हा गांठवळ विधी म्हणजे श्रीगणपतीपूजन, भेट नारळासह, फळदान, अभिषेक नैवेद्य याप्रमाणें असतो. श्रींच्या तलावांत, जोडप्यानें स्नान करतेवेळीं परिधान केलेलीं वस्त्रें पैरेकार नोकर वर्गास द्यावीं लागतात. अगर त्याऐवजीं एक रुपया द्यावा लागतो.

आपण नोंद करून पैसे भरून पावती घेतलेलें देवकृत्य प्रत्यक्षांत आपल्या हस्तें पुरोहित भटजी व इतर भटजी यथासांग पार पाडीत आहेत कीं नाहीं, हें प्रत्येक इसमानें स्वतः आपण होऊन लक्षपूर्वक पाहणें आवश्यक व अगत्याचें आहे, हें सांगण्याची जरूरी नाहीं. आपणास कांहीं संशय, शंका, गैरसमज उत्पन्न झाल्यास किंवा घडून आल्यास देवालयांत पुरोहित भटजीकडून खुलासा करवून घ्यावा; व एखादे वेळीं आपल्या शंका, संशय किंवा अडचणीचें योग्य प्रकारें वेळींच निरसन होत नाहीं असें वाटल्यास, आपण स्वतः या परिस्थितीकडे लगेच देवस्थान व्यवस्थापक कमिटीचे कमाविसदार (चिटणीस) कडे तक्रार करून दाद मागणें अत्यावश्यक आहे. कमाविस-दारांकडूनहि योग्य व्यवस्था झाली नसल्याचें आढळून आल्यास आपण लेखी तक्रार देवस्थान कमिटीकडे अवश्य केली पाहिजे व कमिटी ऑफिसांत असलेलें तक्रार बुक मागून घेऊन, आपली सविस्तर कैफियत व आपली मागणी काय आहे हें नमूद करून खालीं तारीख व स्वाक्षरी करणें जरूरीचें आहे.

एकंदरींत शांतता व संयम ढळूं न देणें समंजसपणाचें ठरेल. श्रीमंगेश देवस्थानांतील मुक्कामांत आपण अमुकच देवकृत्य केलें पाहिजे याबद्दल कसलीहि सक्ती किंवा बळजबरी नाहीं व तशीच बळजबरी किंवा आग्रह कुणालाही करतां येणार नाहीं, हें प्रत्येक मनुष्यानें खात्रीपूर्वक समजून घ्यावें. श्रीमंगेश देवाच्या देवालयांत आपल्या कुलदेव चरणीं भक्ति-भावानें ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें, एका पंचामृतयुक्त रूद्रावर्तनापासून शिंगाच्या महारूद्रापर्यंत पाहिजे तीं देवकृत्यें, रंगपूजा वगैरे देवकृत्यांचा तक्ता आहे, त्यांत दर्शविल्या-प्रमाणें, त्या खर्चांत करण्यांत येतात. सर्व इसम देवकृत्याच्या बाबतींत समान, हें महत्वाचें

धोरण देवस्थान संस्थापक पुण्य पुरुषांनीं कायमचें ठरवून दिलें असून, प्रत्येक देवकृत्याचें ज्याच्या त्याच्या इच्छेस, खर्चास परवडेल अशाच प्रकारें दर ठरविलेलें आहेत. सर्व देवकृत्यांचे दर देवस्थानच्या नियमावलींत प्रसिद्ध केले असून, ती नियमावली सरकारनें मंजूर केली आहे. देवकृत्याच्या ठरवून दिलेल्या दरांत, कमी जास्त रक्कम कोणत्याहि परिस्थितींत देवस्थानच्या व्यवस्थापकांकडून, पुरोहित, पुजारी किंवा कोणतेहि भटजी किंवा सेवेकरी यांकडून घेण्यांत येऊं नये, याबद्दल कडक निर्बंध, व याचें उल्लंघन केल्यास कडक शिक्षा, यांची तरतूद देवस्थानच्या नियमावलींत स्पष्टपणें आहे; याची जाणीव प्रत्येक संबंधित इसमानें करून घेणें अगत्याचें आहे.

एकंदर देवकृत्याबद्दलचे पैसे देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटी ऑफिसांत आपण स्वतः भरून पावती घेतली नाहीं व पैसे कोणत्याही पुरोहित, पुजारी, जोतकार, भटजी, सेवेकरी किंवा इतर मनुष्याकडे आपण दिले असल्यास त्याबद्दल किंवा देवकृत्याबद्दल देवस्थान कमिटी मुळींच जबाबदारी स्विकारणार नाहीं. या व्यवस्थेविरूद्ध गैरवर्तन नजरेस आल्यास तें देवस्थान कमिटीच्या व प्रसंगीं सरकारच्या नजरेस आणून दाद मागणें, प्रत्येक कुळावी महाजनाचें कर्तव्य आहे व ती जबाबदारी प्रत्येकानें पार पाडणें देवस्थानच्या सुकिर्तींत व लौकिकांत भर घालणारें ठरेल.

श्रीमंगेश देवस्थानांत आपल्या वास्तव्य मुक्कामांत सर्व देवकृत्य आटोपल्यावर आपली पालवी देवी बांदिवडे येथील श्रीमहालक्ष्मी, किंवा म्हार्दोळ येथील श्रीमहालसा-देवी, किंवा अंकोला–कारवार येथील श्रीआर्यादुर्गा या तीन दैवतांपैकीं जी कोणी असेल, त्या देवतेकडे जाणें भाग आहे. (कोणत्या महाजनाची कोणती पालवी देवी, याची माहिती याच पुस्तकांत 'पालवी दैवतें' या प्रकरणांत दिली आहे ती पाहावी.) त्या पालवी देवीकडे जाऊन तेथेंहि आपणास शक्य तें देवकृत्य करावें. उदाहरणार्थ :–श्रीमंगेश कुल देवाकडे जे कुळावी महाजन, महारुद्र सेवा करतील त्यांनीं आपल्या पालवी देवीकडे अगत्यानें लघुरुद्र करणें जरुरीचें आहे, असा आजपर्यंत पूर्वापार चालत आलेला संकेत आहे. पालवी देवीकडे देवकृत्य सांगता करून आपण परत श्रीस्थळ मंगेशी येऊन श्रीमंगेशाचें दर्शन घेतल्यानंतर या कुलदेव दर्शन यात्रेची सांगता झाली असें म्हणावयास हरकत नाहीं.

कांहीं कुळावी महाजन आपला व आपल्या कौटुंबिक मंडळीचा मुक्काम श्रीस्थळ मंगेशींहून हलवून स्वगृहीं जाण्यास निघण्यापूर्वी श्रीमंगेशास प्रार्थना करून आपल्या कुटुंब कल्याणार्थ एक प्रसाद-कौल भक्ती भावानें घेत असतात. देवस्थानांतून प्रवासास निघण्याच्या वेळीं श्रीमंगेशाची प्रार्थना करून निरोप घेतल्यानंतर आपल्या पुरोहितास बरोबर घेऊन तलावाच्या वरच्या बाजूस असलेल्या श्रीसांतेरी देवीच्या देवाल्यांत कौटुंबियांसह वर्तमान जाऊन तेथें त्या देवीचा बहुमान म्हणून एका ताटांत तांदूळ, नारळ व कांहीं दक्षणा ठेवून तिची प्रार्थना करून निरोप घेऊन परस्पर थेट पांध्यावरून मोटार वाहतूक रस्त्याकडे जावें व अर्ध्या वाटेंत वडाचा पार आहे तेथें पोंहोंचेपर्यंत वाटेंत मागें

वळून पाहूं नये, असा रिवाज आहे. त्या पाराकडे पोंचल्यानंतर तेथें एक अर्धा मिनिट थांबून मागें वळून श्रीमंगेश देवालयाला तेथूनच नमस्कार करावा व मग पुढें परतून मोटार रस्त्याकडे जावें व प्रवासास सुरुवात करावी.

इतकी अत्यावश्यक माहिती जरी दिली आहे, तरी पण एखाद्या कुळावी महाजनाच्या मनांत येईल कीं, आपण देवस्थानांत पहिल्याच खेपेस आलों आहें, कुल परंपरेस साजेसें म्हणून मुख्य कुलदैवत श्रीमंगेश व पंचायतन आणि परिवार देवता या सर्वांची थोड-थोडी पूजाअर्चा सेवा आपणाकडून घडून यावी, कुलाचार संभाळावा, या दृष्टीनें कांहीं तरी सल्ला किंवा मार्गदर्शन मिळालें असतें तर स्वतंत्रपणें आपण, कोणत्याहि संभाव्य दिशाभूलकारक सल्ल्यास किंवा दडपणास बळी पडण्याची शक्यता नसती. अशाच अगदीं प्रथमतःच देवस्थानांत येऊं इच्छिणाऱ्या कुळावी महाजनांस सुचवावेंसें वाटतें कीं, त्यांनीं खालीलप्रमाणें देवकृत्याचा आराखडा पसंत केल्यास कुलसांप्रदाय किंवा कुलाचार पारंपारिक पद्धतीहि सांभाळून देवस्थानांतील मुख्य देवता, पंचायतन व परिवार देवतांसहित सर्वांची सेवा घडून आल्याचें मनाला पूर्ण समाधान होईल.

देवालयांत प्रवेश करतांच धूळभेट घेणें, त्यानंतर देवस्थान व्यवस्थापक कमिटी ऑफिसांत जाऊन आपणास जरूर ती सर्व माहिती घेणें, तेथें देवकृत्यांची नोंद करतांना मागें माहिती दिली आहे ती लक्षांत घेऊन लग्नानंतर सहकुटुंब प्रथमतःच देवस्थानांत आलेला असल्यास गांठचल किंवा वधूवर दंपत्यस्नान, श्रीमंगेश व इतर देवतांसाठीं एक अभिषेक नैवेद्य, एक खिचडीपायस, एक पंचदेव नैवेद्य, एक श्रीसांतेरीस आणि श्रीनिरंकारास नैवेद्य, श्रीकालभैरवास नैवेद्य म्हणजे वड्यांची माळ, श्रीमुलकेश्वर देवास एक तंबाखूची विडी, व कुळावी महाजन कौंडिण्य गोत्री असल्यास वर उल्लेखिलेल्या देवकृत्यांशिवाय एक अभिषेक नैवेद्य श्रीकौंडिण्य पुरुषास, इतक्या देवकृत्यांची नोंद करून त्याच बरोबर आपली तशी इच्छा असल्यास देवकार्य म्हणून एक ब्राम्हण, एक सुवासिनी व एक मुलकेश्वर या तिघांच्या संतर्पणासाठीं तीन पात्रें वाढण्याची व्यवस्था करण्याबद्दलहि देवस्थान व्यवस्थापक ऑफिसांत नोंद करून पैसे भरून पावती घ्यावी. येणेंकरून शक्य तों आटोपशीर पद्धतीनें सर्व कांहीं शक्य तें केल्याचें सर्व साधारण मनुष्यास समाधान मिळूं शकेल व वरील सर्व देवकृत्य, देवकार्य संतर्पण इत्यादींचा एकंदर खर्च देवस्थानांतील देवकृत्यांच्या दरपत्रकाप्रमाणें हिशेब करून, शिवाय आजच्या बाजार भावानें तांदूळ, नारळ इत्यादींचा तीन पात्रें संतर्पण खर्चाचा हिशेब धरूनहि अंदाजें दहा-बारा रुपये जास्तींत जास्त खर्चांत समावेल असें वाटतें.

ही माहिती सूचना सर्वसाधारपणें कांहींच माहिती नसलेल्या आणि प्रापंचिक अडचणींत किंवा सांपत्तिक अडचणींमुळें मुक्त हस्तें जास्त देवकृत्य करण्याची इच्छा असूनहि, तें करण्याची शक्यता नसलेल्यांसाठींच आहे हें मुद्दाम सुचवावेंसें वाटतें. कारण देवस्थानांत येणारे बहुतेक भाविक लोक आपल्या कुलदेवता सन्निधानीं राहून जास्तींत जास्त देवकृत्य उत्सव करून आनंद उपभोगावा, समाधान पावावें अशी इच्छा बाळगून

येतात. ज्यांना शक्य असेल ते भाविक मोठ्या खुषीनें व आनंदानें लघुरुद्र, महारुद्र, रंगपूजा, दीपोत्सव व अन्नसंतर्पण करतीलच यांत संशय नाहींच. गैरसमजास जागा राहूं नये व वर उल्लेखित माहितीचा विपर्यास होऊं नये यासाठींच हा खुलासा केला आहे.

श्रीमंगेश देवालय हें श्रीशंकर किंवा श्रीशिवस्थान असून तेथें श्रीमंगेश लिंगरूपांत आहेत. येथें दैनंदिन नित्य देवकृत्यांत अर्थातच रुद्राभिषेकाला जास्त महत्त्व आहे. श्रीमंगेशाच्या प्रत्यक्ष पूजेच्या वेळीं पंचामृत स्नानानंतर श्रीरुद्राध्यायपठणपूर्वक श्रीमंगेश लिंगावर अभिषेक करतात. त्याचे प्रकार पुढीलप्रमाणें असून त्यांची थोडी तरी माहिती प्रत्येक कुळावी महाजन जो श्रींच्या गर्भागारांत जाऊन स्वतः आवर्तन, अभिषेक, लघुरुद्र, महारुद्र, घूड भरणें वगैरे देव कृत्यें करतो, त्यास असणें आवश्यक आहे असें दिसल्यामुळें तशी माहिती पुढें दिली आहे.

**घूड भरणें**– श्रींच्या गर्भागारांत श्रीमंगेशाच्या लिंगावर अभिषेक पात्रांतून जलधारा पडतील अशा प्रकारें चांदीचें अभिषेक पात्र टांगलेलें असतें. प्रातःकालीं निर्माल्य विसर्जन झाल्यावरोबरच व इतर कोणतेंहि देवकृत्य सुरू होण्याआधींच हा घूड भरला पाहिजे पुरोहितासह सर्व ब्राह्मण मंडळींच्या उपस्थितींत यजमान सोंवळ्यानें विहिरीचें पाणी घड्यानीं काढून ते घडे अभिषेक पात्रांत ओतीत राहतो. त्याअगोदर सोमसूत्राचा पाणी बाहेर जाण्याचा मार्ग पुजारी भटजी बंद करून ठेवीत असतो. अभिषेक पात्रांत पाणी ओतीत राहिल्यानें गर्भागार पाण्यानें भरून श्रीमंगेश लिंगाच्या मस्तकावर म्हणजे उर्ध्व भागावरून पाणी भरून पोंहोंचेपर्यंत पाणी अभिषेक पात्रांत ओतावें लागतें व भरून झाल्याची खात्री पाहूनच नंतर गर्भागाराबाहेर राहून पाणी सोडून गाऱ्हाणें प्रार्थना केली जाते. पाण्याचे घडे अभिषेक पात्रांत ओतीत असतांना ब्राह्मण वर्ग मुखानें श्रीरुद्राध्याय पठण करीत असतो.

**रुद्रावर्तन**– पंचामृतसह पूजा व नंतर एक वेळ रुद्राध्याय म्हणून आवर्तन करणें. यजमानानें आवर्तनाभिषेक करतांना स्वतः गव्याचें किंवा चांदीचें शिंग हातांत धरून त्या शिंगांतील पाण्याची धार श्रीमंगेशलिंगावर योग्य प्रकारें पडेल अशी दक्षता घेणें.

**पंचामृतासह एकादशिनी**– सर्व वरील रुद्रावर्तनाप्रमाणें; मात्र अकरा वेळ रुद्राध्याय म्हणणें.

**बेड्याचा लघुरुद्र**– प्रारंभीं पंचामृतासह पूजा; नंतर यजमान गव्याचें किंवा चांदीचें शिंग हातांत धरून त्या शिंगांतील पाण्याची धार श्रीमंगेश लिंगावर अभिषेक करतो. त्याचबरोबर अकरा ब्राह्मण अभिषेक पात्र धरून रुद्राध्याय पठण करीत अभिषेक करतात व अशा प्रकारें अकरा वेळां एकादशिनी करून नंतर पूजा करावयाची.

**बेड्याचा महारुद्र**– वरील प्रमाणें अकरा लघुरुद्र केले म्हणजे एक बेड्याचा महारुद्र होतो.

**शिंगांचा लघुरुद्र**– बेड्याच्या लघुरुद्राप्रमाणेंच; मात्र या लघुरुद्रांत यजमान व त्याबरोबर अकराही ब्राह्मणांनीं प्रत्येकानें आपआपल्या हातांत गव्याचें किंवा चांदीचें

शिंग धरून त्यांतील पाण्याची धार श्रीमंगेशलिंगावर व्यवस्थितपणें पडेल अशी दक्षता घेणें.

**वेड्याचा महारुद्र**– बेड्याचा लघुरुद्र अकरा वेळां केला म्हणजे वेड्याचा महारुद्र होतो.

**शिंगांचा महारुद्र**– शिंगांचा लघुरुद्र अकरा वेळां केला म्हणजे शिंगांचा महारुद्र होतो.

**अन्नसंतर्पण**– बेड्याचा महारुद्र किंवा शिंगांचा महारुद्र करणें झाल्यास त्या देवकृत्याच्या कार्यक्रमांत महारुद्रास रुद्राध्याय पठण करणारे अकरा ब्राम्हण, महारुद्राभिषेकास पाणी अभिषेकपात्रांत घालणारे तीन पुजारी, सुवासिनी, तसेंच श्रीमुलकेश्वराच्या नांवें एक गावडा यांस अन्नसंतर्पण घातल्याशिवाय तें देवकृत्य किंवा काम्यकर्म यथासांग पुरें झालें नाहीं, अशी पूर्वापार समजूत असल्यामुळे हें अन्नसंतर्पण या महारुद्र देवकृत्याचें महत्त्वाचें अंग मानलें जातें.

कांहीं लोक आपल्या इच्छा आणि ऐपतीप्रमाणें महारुद्रास बसलेल्या ब्राह्मणांशिवाय देवस्थानचा सर्व ब्राम्हणवर्ग, देवालयाची आश्रित मंडळी, सेवकजन, बारा गावडे आणि देवस्थानांत संतर्पणाचे दिवशीं हजर असलेली उपस्थित मंडळीं व सर्व श्रीस्थल निवासी यांसही अन्नसंतर्पणास आमंत्रण करीत असतात. हीं सर्व प्रकारचीं अन्नसंतर्पणें कटाक्षानें श्री मंगेश देवालयाच्या अग्रशाळेंतच करावयाचीं असतात व तसा स्पष्ट दंडक देवस्थानच्या नियमावलींत आहे. शिवाय हें अन्नसंतर्पण श्रीमंगेश देवासन्निध व त्या देवालयाच्या अग्रशाळेंत केल्यानें तें संतर्पण करणाऱ्या यजमानाला जें साहजिकच मनाचें समाधान होत असतें, तसें समाधान देवालयाच्या आवाराबाहेर कोणाही खासगी कुटुंबाच्या घरांत, भटजींच्या निवासस्थानीं अन्नसंतर्पण केल्यानें होत नाहीं व होणार नाहीं हें उघड आहे.

सध्याच्या काळांत अपरिमित महागाई, अन्नटंचाई, इत्यादि गैरसोयींमुळें देवस्थानांत होणारीं मोठमोठीं अन्नसंतर्पणें आतां दिवसेंदिवस कमी प्रमाणांत होऊं लागलीं आहेत. पण जीं वार्षिक अन्नसंतर्पणें महत्त्वाच्या उत्सवाचे वेळीं होतात, तीं सर्व देवस्थानच्या अग्रशाळेंतच होतात. माघ पौर्णिमेच्या महोत्सवांत होणाऱ्या अन्नसंतपर्णांस जागा विस्तीर्ण पाहिजे असते, म्हणून ती मठांत होतात. पण कांहीं लोक महारुद्र करून महारुद्राच्या ब्राह्मणांपुरतेंच अन्नसंतर्पण जेव्हां घालतात तेव्हां तें अन्नसंतर्पण महारुद्राच्या यजमानाचे पुरोहित अभिषेकी भटजी यांच्या निवासस्थानीं (स्वैंपाक्याच्या सोयीसाठीं नि इतर गैरसोयी टाळण्यासाठीं) घालीत असतात.

**रंगपूजा**– रंगपूजा रात्रीच्या वेळीं करतात. ही केळीच्या सोपांनीं बांधली जाते व ती श्रींच्या गर्भागारापासून पुढें एक दार, दोन दारें, तीन दारेंपर्यंत (चौकाच्या चांदीच्या दारापर्यंत) बांधलेली असते. केळीच्या सोपांनीं चौकोनी, अष्टकोनी अशा नानाविध स्वरूपांत रंगपूजा बांधतात. त्या सोपांस रंगी कागदाचीं चित्रविचित्र कमळें बसवितात; आंतून दुतर्फा दिवे लावतात. एकंदरींत ही पूजा प्रेक्षणीय असते. प्रदोष पूजा संपल्यानंतर ही पूजा बांधणी सुरू होऊन रात्रौ दहा वाजण्याचे पूर्वी तयार होते. नंतर रात्रीच्या आरती होतात.

**तुलाभार**– श्रींच्या देवालयांत चौकावर मोठा तराजू टांगून एका पारड्यांत ज्याची तुला करावयाची तो इसम बसतो. दुसऱ्या पारड्यांत नवस केला असेल तर त्याप्रमाणें संकल्पित जिन्नस ठेवतात. उदाहरणार्थ, नारळ, तांदूळ, गूळ, साखर, इतर धान्यें, किंवा तांबें, पितळ, सोनें चांदी वगैरे धातूंनीं किंवा आपण संकल्प केला असेल त्या वस्तूनें स्वतःची तुला करून त्या पदार्थांचें दान करतात. तांबें, पितळ, सोनें, चांदी व इतर धातू व मौल्यवान वस्तु असल्यास त्या सर्वच श्रींच्या भांडारात जमा होतात व मौल्यवान वस्तु व धातूंशिवाय इतर सर्व आश्रितांस वांटल्या जातात.

[] [] []

८८६१६ पु. प्रवास
५३८ ३१-३-८२

# शुद्धिपत्र

या पुस्तकांत छपाईच्या कांहीं चुका राहून गेल्या आहेत. त्यांतील ठळक चुकांची खालील प्रमाणें दुरुस्ती कृपया वाचकांनीं लक्षांत घ्यावी.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| श्रीमांगीश आराधना | ४ | पुण्यैर्नीना | पुण्यैर्नाना |
| ,, | ५ | स्ववनैरपि | स्तवनैरपि |
| १६ | ४ | १९१० | १७१० |
| २२ | ४ | २३ लालखी | २३ सुखासन |
| २५ | ६ | मैल | किलो मिटर |
| २६ | ५ | ब्राह्मणास्थापितं | ब्रह्मणास्थापितं |
| २६ | १४ | दिसते | दिसतें |
| २७ | ५ | मिळते | मिळतें |
| ३१ | ५ | आल्व्हाम | आल्व्हरु |
| ३१ | २९ | नांवान | नांवानें |
| ३३ | २ | पैरर | पेरैर |
| ३३ | १४ | उघडली. | घडली. |
| ३४ | ११ | सीमावरून | सीमांवरून |
| ३४ | १४ | प्रसाराचे | प्रसाराचें |
| ३४ | १५ | चालले होते | चाललें होतें |
| ३५ | ४ | नेता | नेतां |
| ३९ | १४ | आले | आलें |
| ३९ | २३ | ग्रंथात | ग्रंथांत |
| ४२ | ८ | व्हिस्तु | व्हिस्सु |
| ४२ | १० | नोस हें | नोस्स दे |
| ४३ | १४ | एरवी | एरवीं |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २५ | तेऱ्हेनु सें देनोमिनासांव इस्पेसियाल | मंगेशीं–प्रियोळ | १८८४८ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६२ | १५२३९ लिव्रु जी २७, पृ. ५ पाठी | १६७ | पेशवे सरकारांतून 'मोकासा' इनाम |
| २६ | व्हार्जेय कुर्शे, दामुसमळो, वांकुडमुस, कोळमुस इ कोतार्लो | मंगेशीं–प्रियोळ | १८८४९ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६२ पाठी | १५२४० लिव्रु जी २७, पृ. ५ पाठी | १६८ | मिळाला त्या मोकाशांत अंतर्भूतहोतात. |
| २७ | आरेकाल नावेलकारालें | मंगेशीं | १८८५० लिव्रु बी ५० नवा, पृ. ६३ | १५२४१ लिव्रु जी २७, पृ. ६ | १६९ | ,, |
| २८ | आरेकाल आत्मा निळंभट | मंगेशीं–प्रियोळ | १८८५१ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६३ पाठी | १५२४२ लिव्रु जी २७, पृ. ६ | १७० | ,, |
| २९ | रासें जिराइतावरील माडांचा तुकडा | वेलींग | १८८५२ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६४ | १५२४३ लिव्रु जी २७, पृ. ६ पाठी | १७८ | खरेदी (पौष शु. १२ शी, जयसंवत्सर) |
| ३० | धाकु सिनाय धर्मेबाबत शीर | वेलींग | १८८५३ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६४ पाठी | १५२४४ लिव्रु जी २७, पृ. ६ पाठी | १७९ | खरेदी केली. |
| ३१ | पडताळ | शिरोडें | १८८५४ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६५ | १५२४५ लिव्रु जी २७, पृ. ७ | १८१ | खरेदी केली. |
| ३२ | कामाझालें | कुंडई | १८८५५ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६५ पाठी | १५२४६ लिव्रु जी २७ पृ. ७ | १८४ | देवस्थाननें खरेदी केली. |
| ३३ | तेऱ्हेनु वोवु प्रेदियु ओंदि फुंसीयोन वु तेंप्लु दे श्रीमंगेश कों सेवु रेसिंतु, अग्रशाळा इ तांकि | मंगेशीं | १८८५६ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६६ | १५२४७ लिव्रु जी २७, पृ. ७ पाठी | लोति नं. ३१ | पेशवे सरकारकडून 'मोकासा' इनाम मिळाला त्या मोकाशांत अंतर्भूत होतात. |
| ३४ | श्रीस्थळ | मंगेशीं | १८८५७ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६६ पाठी | १५२४८ लिव्रु जी २७, पृ. ७ पाठी | लोति नं. ३२ | ,, |
| ३५ | प्रेदियु उर्बानु मठ कों सुअ सेहेंतीय | मंगेशीं | १८८५८ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६७ | १५२४९ लिव्रु जी २७, पृ. ७ पाठी | लोति नं. ३३ | ,, |
| ३६ | तेऱ्हेनु कार्मीजु पाटो | मंगेशीं–प्रियोळ | १८८५९ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६७ पाठी | १५२५० लिव्रु जी २७, पृ. ८ | लोति नं. ३४ | ,, |
| ३७ | तेऱ्हेनु ओंदि फुंसीयोन क्रेमातोरियु | मंगेशीं–प्रियोळ | १८८६० लिव्रु बी ५० नवा, पृ. ६८ | १५२५१ लिव्रु जी २७, पृ. ८ | लोति नं. ३५ | ,, |
| ३८ | कानाल दे इऱ्हीगासांव | मंगेशीं–प्रियोळ | १८८६१ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६८ पाठी | १५२५२ लिव्रु जी २७, पृ. ८ पाठी | लोति नं. ३७ | ,, |
| ३९ | पास्ताजें | मंगेशीं–प्रियोळ | १८८६२ लिव्रु बी ५० नवा, पृ. ६९ | १५२५३ लिव्रु जी २७, पृ. ८ पाठी | लोति नं. ३६ | ,, |
| ४० | आरेकाल सें देनोमिनासांव इस्पेसियाल नु बायस आमशें | कुंकळियें | ६९६२ लिव्रु बी १८ नवा, पृ. १६६ पाठी | १८०२ लिव्रु एफ् ६, पृ. १२७ पाठी | १४१ | खरेदी केली. ता. १०–४–१८३३ |
| ४१ | प्रिमैरु लोति दे आल्देय पारोडा, बायरु काराळी दे आल्देय पारोडा | पारोडें | { ६५७७ लिव्रु बी २० पृ. ९० ते ९१ पाठी केपें कोंसेव्हातोर्यु प्रेदियाल | २८६८ लिव्रु जी ५, पृ. ११९ | ८९ ते १२७ | सरकारकडून लिलांवावर खरेदी. ता. १५–९–१८९९ |
| ४२ | प्रेदियु मोनिक सातुर्नीन गोंसाल्व्हीस इ काझ दे मोराद इ प्रेदियु कोंसिस्तेंति यें दोइस पेदासुस | सांतियागु–खोर्ली<br>करंबळी | { ५५८१ आणि ५५८२ लिव्रु बी १५ नवा, पृ. ५५<br>३८६६ आणि ३८६७ लिव्रु बी १० नवा | ३८६० लिव्रु एफ ९, पृ. १८५ पाठी पणजी–कोंसेव्हतोरियु प्रेदियाल | १८९ ते १९०<br>१८५ ते १८७ | कोर्टांत लिलांवावर खरेदी. १-२-१९०४<br>कोर्टांत लिलांवावर खरेदी १-२-१९०४ |
| ४३ | पार्ति दु पाल्मार कुंभारजुवें | कुंभारजुवें | ९७८ लिव्रु बी ३ नवा, पृ. ९२ | ५४७४ लिव्रु एफ १२, पृ. ८३ | १ ते ८८ | देवस्थाननें पणजी कोर्टांत लिलांवावर खरेदी केली. ता. ८–१०–१९०६ |
| ४४ | पातियु दे काझस सितु यें मेर्कुरीं | मेरकुरीं (आगशी) | १५८५ ते १५८८ लिव्रु बी ४ नवा, पृ. १९८ पाठी. | ५९०१ लिव्रु जी १५, पृ. १९ | १८८ | देवस्थाननें पणजी कोर्टांत लिलांवावर खरेदी केली. ता. २१–५–१९०० |
| ४५ | व्हार्जेय देनोमिनादु ल्वो | नेवरा उ ग्रांदि (थोरलें नेवरें) | ३००३ लिव्रु बी ३३ जुना, पृ. २८६ | ५९०१ लिव्रु जी १५, पृ. १९ | १८० | कोर्टांत लिलांवावर खरेदी २१-५-१९०० |
| ४६ | व्हार्जेयु देनोमिनादु रायंगिणी कों सेवु व्हालादु | बांदीवडें–फोंडा | १४४६ लिव्रु बी ३८ नवा, पृ. ५५ | ११८६८ लिव्रु एफ २०, पृ. ५७ | १२८ ते १४० | कोर्टांत लिलांवावर खरेदी १२-४-१८२२ |
| ४७ | प्रेदियु कुंबेप जिराइतावरील | प्रियोळ | ६९१२ लिव्रु बी १८ नवा, पृ. १४१ पाठी | ११८६९ लिव्रु एफ् २०, पृ. ५७ पाठी | १४५ | खरेदी ता. २९–११–१८३६ |
| ४८ | प्रेदियु रुस्तिकु देनोमिनादु निगळफोड | सुर्ले–डिचोली | { १५७१७ लिव्रु बी ४० नवा, पृ. १४४ पाठी डिचोली–कोंसेव्हातोरियु–प्रेदियाल. } | ११९९८ लिव्रु जी १६ नवा, पृष्ठ १३५ | १८२ | खरेदी ता. ५–२–१८३६ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ४९ | पूर्ण तुकडा | पाळी–सांखळी | १५७१८ लिव्रु बी ४० नवा, पृ. १४५ | ११९९८ लिव्रु जी १६ नवा, पृ. १३५<br>डिचोली-कोंसेव्हांतोरियु प्रेदियाल | १८३ | पाळी येथील 'दळवी' घराण्याकडून अर्पण ता. १४–१०–१९२७ |
| ५० | आरेकाल देनोमिनादु तामखुली | खांडोळें–फोंडा | २७८६ लिव्रु बी ३१, पृ. ५०८ | २ लिव्रु बी ३१, पृष्ठ ५०९<br>पणजी-कोंसेव्हांतोरियु-प्रेदियाल | ३७२ व्होलुम सी. | खरेदी ता. २५–९–१८२३ |
| ५१ | कामुर्डें इ सटियालें<br>„ | माजीलवाडा–प्रियोळ<br>„ „ | ३०६६ लिव्रु बी ८ नवा, पृ. १६९ पाठी<br>३०६७ लिव्रु बी ८ नवा, पृ. १७० | ७७२ लिव्रु एफ् ३, पृष्ठ २१ | ३८९ पृष्ठे ७३ पाठी<br>३९० व्होलुम सी. | खरेदी ता. २२–११–१८२० |
| ५२ | वाडेंपैकीं तळीयेकडील तश्चीम | प्रियोळ | १४५६ ते १४६१ लिव्रु बी ४ नवा, पृ. १३४ ते १३६ | २०६६८ लिव्रु जी ३३, पृष्ठ ८२ | १७१ ते १७७ व्होलुम आ. | खरेदी ता. १८–७–१८३७ |
| ५३ | सापाल इंकुल्तु फोर्मादु ना मार्जें दु कानाल दे | कुंभारजुवें | १८५६८ लिव्रु बी ४९ नवा, पृ. १०३ पाठी. | १४३०६ लिव्रु जी २५, पृष्ठ १०६ पाठी | | सरकारकडून खरेदी ता. ९–१–१९११ |
| ५४ | मार्सेल प्रेदियु तेऱ्हेनु वोइतेराल, तेऱ्हेनु सें देनोमिनासांव इ तेऱ्हेनु सें देनोमिनासांव इस्पेसियाल | मंगेशीं | १७७४१ ते १७७४३ लिव्रु बी ४७ नवा, पृ. ४३ | १४३६६ लिव्रु जी २५, पृष्ठ १२९ पाठी | लोति नं. ३२ | मोकाशांत संभवते. |
| ५५ | दोमिनियु दु प्रेदियु उर्बानु इ स्पेसिफिकादु नु आव्हेर्बामेंतु नं. ३ आ दिस्क्रीसांव प्रेदियाल नं. १७७, पृष्ठ १०४ दु लिव्रु बी ३ जुना | कुंभारजुवें | (आव्हेर्बामेंतु नं. ३) नं. १७७, पृ. १०४ लिव्रु बी ३ आंतिगु. | २१६२४ लिव्रु जी ३७, पृष्ठ २६ | | श्री. वसंत वामन शे. काकोडकर यांजकडून अर्पण. ता. ३–३–१९५६ |
| ५६ | सापाल सें देनोमिनासांव इस्पेसियाल यें त्रेस आदिसोंइस | कुंभारजुवें | १९२१८ लिव्रु बी ५१, नवा पृ. ६८ पाठी | १६८७१ लिव्रु जी २९, पृष्ठ ८६ | | सरकारकडून खरेदी ता. २६-९-१९४५ |
| ५७ | श्रीपुरुषाचा दांडा | कोनें–प्रियोळ | — | — | ३९१ व्होलुम सी. पृ. ७७ | सनद ता. २७ जुलै १८३७ |
| ५८ | मुर्डीबाग बागायत ठिकाण | प्रियोळ | १४००८ लिव्रु बी नवा, पृ. २९ पाठी | | ३५ पृष्ठ १८७पाठी व्होलुम सी. | ही जमीन वार्षिक २३ रु. २ आ. २ पै. शिरस्त्यास दिली आहे. |
| ५९ | दोमिनियु दिरेत्तु कोंसिस्तेंति यें ३ रु. ५ आ. ४ पै. सोब्रि उ प्रेदियु माइन बाग इनाम. | कुंकळियें | २७४९ लिव्रु बी ३१ जुना, पृ. ३४० | २१०७९ लिव्रु एफ् ३२, पृष्ठ १४२ पाठी | | श्री. विनायक नारायण शेणवीं धुमें मुक्काम कुंभारजुवें यांजकडून अर्पण. ता. ३–३–१९५६ |

**टीप :–** वरील जमिनींशिवाय आणखी बऱ्याच जमिनी, शेती, बागायती, कुळागरें वगैरे श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काची असलेली नंतर नानाविध गांवांत वेगवेगळ्या इसमांस कायम लागवटीच्या करारानें, ठराविक वार्षिक रक्कम देवस्थानास मिळण्याचा हक्क ठेवून दिलेली आहेत म्हणून त्यांचे रजिस्ट्रेशन नंबर या तक्त्यांत जागेच्या अभावीं परत नमूद केलेले नाहींत.